म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
अ. क्र. ३७८८



REFBK-0025163

# तमसा तटाकी

मुकुंद सोनपाटकी

अपर्ण सख्या जिवाद्दा
३१८८
२५१६३
२११११८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 21 DEC 1986 | 15 JUL 1987 |
| 21 DEC 1986 | 22 JUL 1987 |
| 18 JAN 1987 | 10 JUL 1988 |
| 1 FEB 1987 | 11 OCT 1989 |
| 15 FEB 1987 | 1 OCT 1989 |
| 2 FEB 1987 | 15 OCT 1989 |
| 11 MAR 1987 | |

(क्र. मा. पद्दा)
५०००–११–८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध ३९८८ / २५९६३
२७।११।८६

# तमसा तटाकी

श्रीविद्या प्रकाशन, पुणे यांनी
प्रसिद्ध केलेल्या तमसा-तटाकी
या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ
६ सप्टेंबर १९८६ रोजी
लंडन येथे संपन्न झाला.

# तमसा तटाकी

मुकुंद सोनपाटकी

REFBK-0025163

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक

दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© सौ. नेत्रा सोनपाटकी
' Green Shade '
16 The Drive
Wembley Park
Middle Sex
England,

मुखपृष्ठ
बाळ आठल्ये, मँचेस्टर, इंग्लंड

प्रकाशन काल
६ सप्टेंबर १९८६

मूल्य
चाळीस रुपये

मुद्रक
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती
टिळक रस्ता, पुणे ३०

चार गावच्या माझ्या चार मित्रांना

अनन्त करंबेळकर
श्रीनिवास माटे
दिलीप चित्रे
किशोर देशमुख

लेखक का लिहितो ?

ती एक ऊर्मी असावी. निर्मितीची आतून आलेली हाक.

चित्रकाराला चित्र काढल्याशिवाय चैन पडत नाही. गायकाला सूराविना बेचैनी येते. तशातलाच प्रकार.

परदेशातून मराठी लिखाण घडावे हे आता नवीन नाही. इंग्लंड-अमेरिकेची नवलाईसुद्धा भारतात आता नवखी राहिलेली नाही. प्रवास वाढला आहे. जेटयुगाने अंतरे कमी झाली आहेत. पण त्यामुळे अनुभवविश्व मात्र संकुचित झालेले नाही. गेल्या वीस वर्षांच्या लंडनमधील अनुभवांचे चित्रण या संग्रहात दिसेल. प्रथम इथले जीवन परके होते, नवलाचे होते. पुढे ते अंगवळणी पडले. त्यामुळे लेखांचे स्वरूपही बदलत गेले.

'तमसा-तटाकी' या 'सोबत' साप्ताहिकातील माझ्या सदरात १९७०-७१ मध्ये मी काही लेख लिहिले. तेच नाव प्रकाशकांनी या लेखसंग्रहाला सुचविले. थेम्स नदी, तिच्यावरील पूल, पार्लमेंट हाऊस हे सर्व मी रोजच पाहात असतो. माझ्या लंडनमधील सार्वजनिक कामाच्या सर्वच पुस्तिकांवरील चित्रे मँचेस्टरच्या बाळ आठल्येने काढली. अपवाद फक्त 'दर्यापार' चा. तो वगळता रेखाटनासंबंधीचा माझा व बाळ आठल्येचा ऋणानुबंध गेली पंधरा वर्षे कायम आहे. 'तमसा-तटाकी'चे दृश्य त्याने वेगळ्या ढंगात जाणीवपूर्वक चितारले आहे.

विदेशी भारतीय लेखकांच्या कथांचा 'कुंपणापलीकडले शेत' हा संग्रह निघत असता माझा व मधुकाका कुलकर्णींचा संबंध आला. त्यातून हा नवा संग्रह निघत आहे. निवड करून लेख पुनर्मुद्रित करण्याची माझ्या बाबतीतली ही ऐतिहासिक कामगिरी मधुकाकांनी केली, त्याबद्दल कृतज्ञता. लाटकरांनी नेहमीच्या हातखंड्याने सुबक मुद्रण केले म्हणून त्यांचे आभार. आणि वेळोवेळीच्या सल्ल्याबद्दल मधु अभ्यंकरचे. श्री. माधव गडकरींच्या मागे असंख्य वृत्तपत्रीय कामे, त्यातून वेळ काढून आपुलकीने प्रस्तावना लिहिण्याचे त्यांनी मान्य केले हे माझे भाग्यच. सातासमुद्रापलीकडे मी राहात आहे व पुण्यात छपाईच्या वेळी नाही ती माझी अनुपस्थिती श्री. अरुण खोरे आणि श्रीमती शुभा यंदे यांनी भरून काढून हस्तलिखित तपासून अत्यंत आपुलकीने मुद्रिते तपासली. त्याबद्दल त्यांचा मनापासून आभारी आहे.

**मुकुन्द सोनपाटकी**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | आठवणींच्या दूर्वांचा लक्ष | १ |
| २ | काठोकाठ भरू द्या पेला | ५ |
| ३ | पिकॅसोपेक्षा लेननची चित्रे अश्लील ! | ११ |
| ४ | जितम् मया जितं मया | १७ |
| ५ | दुर्दम्य आशावादी | २२ |
| ६ | पंगुं लंघयते गिरिम् | ३० |
| ७ | जेव्हा पाण्याला आग लागते | ३५ |
| ८ | टेस्ट ट्यूब बेबी | ३८ |
| ९ | पॉवेल साहेबांचा उद्योग | ४३ |
| १० | गृहिणींनी हीथना निवडले | ५० |
| ११ | ' थंड ' निवडणूक | ५४ |
| १२ | काळ्यांचा प्रश्न | ५९ |
| १३ | त्रिशंकू–रंजन वेद | ६५ |
| १४ | कुंचला लढ्याचे चित्र रेखाटतो | ७१ |
| १५ | वादळ कौमार्य चाचणीचे | ७६ |
| १६ | नयी जिंदगी नया जीवन | ८१ |
| १७ | बहुरूपी हायकमिशनर | ८६ |
| १८ | गोवा मुक्तिवीर | ९४ |
| १९ | डोळस अंध | ९८ |
| २० | पुण्याचा मांसाहारी ब्राह्मण | १०४ |
| २१ | इंदिराजी लंडनमध्ये | १०९ |
| २२ | कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही | ११५ |


ꣻ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 25963
शाखा (स्थळ प्रत)

## प्रस्तावना

श्री. मुकुंद सोनपाटकी हे मूळ कल्याणचे. आर्किटेक्ट होऊन ते इंग्लंडला गेले. स्थायिक झाले. परंतु महाराष्ट्राशी असलेले त्यांचे संबंध ते केवळ उत्तम लेखक असल्यामुळे तुटले नाहीत. ' किर्लोस्कर '- सारख्या मासिकातून अगर मुंबई-पुण्याच्या दैनिकांच्या रविवार आवृत्त्यांत सोनपाटकी मधूनमधून लिहीत. त्यांच्याकडे पत्रकाराची धाटी व लेखकाची शैली असल्यामुळे त्यांचे लेख नेहमीच वाचनीय होत आले. परंतु ' लोकसत्ते ' चे संपादकपद स्वीकारीपर्यंत त्यांचा माझा वैयक्तिक परिचय झाला नव्हता. श्री. मधुकाका कुलकर्णी यांनी ' कुंपणापलीकडचे शेत ' हा परदेशस्थांचा कथासंग्रह प्रकाशित केला. त्यामधून कुलकर्णी-सोनपाटकी जवळ आले व त्यामधूनच त्यांचे हे नवे पुस्तक लंडन मुक्कामी प्रसिद्ध होत आहे. इंग्लंड-अमेरिकेत मराठी पुस्तके प्रसिद्ध करण्याचा उपक्रम केवळ श्रीविद्या प्रकाशनने सुरू केला व त्याचा मोठा फायदा परदेशस्थ लेखकांची पुस्तके प्रकाशित होण्यात झाला आहे.

" तमसा-तटाकी " हे पुस्तकही त्याचे एक उत्तम उदाहरण आहे. कुलकर्णी-सोनपाटकी यांची भेट आधी झाली असती तर हे पुस्तक दहा वर्षे आधी तरी प्रसिद्ध झाले असते. कारण यामधील बरेचसे लेख १०-१२ वर्षांपूर्वी लिहिलेले आहेत. त्यांचे वैशिष्ट्य मात्र असे की आजही ते वाचताना तितकेच ताजे वाटतात. याची कारणे मुख्यत्वे

दोन. लेखकाची शैली व या लेखांतून प्रकट झालेला ब्रिटनमधील विविध क्षेत्रांतील परिवर्तनाचा इतिहास. गेल्या २० वर्षांत मानवी जीवनात जी अनेक स्थित्यंतरे झाली, त्याची माहिती व त्यावरील भाष्य वाचताना मानवी प्रगतीचा एक आलेखच वाचतो आहोत असे वाटते. 'अपोलो तेरा' हा या पुस्तकातील एक सर्वोत्कृष्ट लेख आहे. 'अपोलो तेरा' चे अवकाशवीर चंद्रावर उतरू शकले नाहीत. त्यांनी परतायचे ठरविले, परंतु ते परतणेही सोपे नव्हते. त्यामधील चार मिनिटे तर अशी होती की त्या वेळी पृथ्वीशी संपर्क तुटायचा होता. चंद्रावरील स्वारीच्या या रोमहर्षक कथेत अमेरिका व रशिया दोघांकडे काम करणारे जर्मन शास्त्रज्ञ आहेत, कोसीजीन वाद वैर विसरून या वीरांसाठी पॅसिफिकमध्ये दोन जहाजे सज्ज ठेवीत आहे. विज्ञान-स्पर्धेतही माणुसकीचे झरे प्रकट होताना दिसतात व हे सारे श्री. सोनपाटकी यांनी फार सुरेख पद्धतीने वाचकांसमोर ठेवले आहे.

फुटबॉलचे जागतिक सामने आपण नुकतेच पाहिले. 'जितम् मया जितं मया', या लेखात १५ वर्षांपूर्वीच्या फूटबॉल सामन्याचे वर्णन आहे. इंग्लंडने जर्मनीचा पराभव केला. जणू दुसऱ्या महायुद्धासारखा. दूरदर्शनमुळे हे सारे लेखकाला घरी बसून बघून टिपता आले. परंतु इंग्लंडमधील 'पब' संस्कृतीचा आस्वाद घेण्यासाठी लेखकाने चांगली भटकंती केलेली दिसते. 'रीकलेक्शन्स' व 'पब्ज' ह्या दोन लेखांत ब्रिटिश संस्कृती, तेथील लोकांचे जीवन, त्याबद्दलच्या लेखकाच्या प्रतिक्रिया यांचे सुरेख चित्रण असल्यामुळे ते सर्वांना अतिशय आवडतील. 'वीपिंग विलो' च्या प्रतिमेत लेखकही आपल्या जुन्या संस्कारांचे संस्मरण करतो आहे असे वाटते. 'पेपराआडचे पुतळे' हे ब्रिटिश माणसांचे 'ट्यूब ट्रेन' मधील वर्णन खरोखर समर्पक आहे. एक भारतीय माणूस इंग्लंडमध्ये जातो व तेथील राजकीय आणि सामाजिक जीवन, त्याचे संघर्ष पाहतो व त्याच्या उत्तम प्रतिक्रिया लिहून ठेवतो म्हणून आज त्या आपल्याला वाचावयास मिळू शकतात. चंद्रावर पाऊल ठेवण्याची धडपड करणारा माणूस एकीकडे आहे, दुसरीकडे 'टेस्ट ट्यूब' बेबीचा जन्म होतो आहे. परंतु जीवनसंघर्ष असा आहे की तो इनॉक पॉवेल स्थलांतरितांच्या प्रश्नावर कशी भूमिका घेतो आहे, ती लेखकालाही जाचते आहे. आफ्रिकेचे देश स्वतंत्र झाल्याने तेथून येणारा लोंढा, भारतीय व पाकिस्तानींचे आक्रमण, यामुळे ब्रिटन साहेबाचे राहणार नाही म्हणून उभ्या राहिलेल्या संघर्षाचा लेखकही भाग झाला आहे. खुद्द लेखक एका कारखान्याला भेट देतो, तेथे त्याला ७५ टक्के लोक भारतीय असल्याचे आढळतात, तेव्हा पॉवेलच्या म्हणण्यातही तथ्य आहे, असे त्यास वाटू लागते. सतत पाईप ओढणाऱ्या हॅरॉल्ड विल्सनचा 'अग्निहोत्री विल्सन' हा केलेला उल्लेख मोठा छान आहे.

मानवी जीवन दिवसेंदिवस अत्याधुनिक होत असताना 'परमीसीव्ह सोसायटी' ने उभे केलेले प्रश्न श्री. सोनपाटकींच्या लेखात आले आहेत. स्वीडनमध्ये या मुक्ततेचा कळस झाल्यामुळे तेथे विवाहासाठी उभ्या राहिलेल्या वधूंतील ३६ टक्के मुली या गरोदर असतात, तर या नववधूंत गर्भपाताचे प्रमाण एक कायदेशीर तर चार बेकायदेशीर असे असते अशी माहिती त्यांनी दिली आहे. सनातनी विचारांचे, परंपरांवर श्रद्धा ठेवून चालणारे ब्रिटन युरोपातील घटनांमुळे किती वेगाने बदलते आहे व त्यांच्या एकूण लोकव्यवस्थेतील कृत्रिमपणा लेखकाने फार चांगल्या तऱ्हेने मांडला आहे. आयरिश लोकांचे इंग्रजांशी वाकडे आहे, परंतु आयरिश कर्मचाऱ्यांची संख्या मोठी आहे. पॉवेलच्या म्हणण्याप्रमाणे जर बाहेरच्या सर्वांना हाकलले तर आपले इंग्लंड अर्धेही राहणार नाही.

अशा ब्रिटनच्या पार्लमेंट निवडणुकीवर जे लेख या पुस्तकात आले आहेत ते चांगले मार्गदर्शन करणारे आहेत. पंतप्रधानांच्या सभांनाही बेताची गर्दी, भिंतींवर रंगकाम नाही, आरडाओरड नाही, अशा प्रगल्भ लोकशाहीचे जे दृष्ट लागण्याजोगे चित्र इंग्रजांच्या निवडणुकांत दिसते ते श्री. सोनपाटकी यांनी चांगले टिपले आहे. विल्सनच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या मजूर पक्षाचा पराभव आणि एडवर्ड हीथच्या नेतृत्वाखाली झालेला हुजूर पक्षाचा विजय याचे राजकीय अभ्यासकाला उपयुक्त वाटेल असे विवेचन या विषयावरील लेखांत आहे. विविध स्तरांवर बदलणाऱ्या ब्रिटनचे, त्याच्या अंतरंगाचे दर्शन घडविणारे हे लेख मराठी वाचकाला निश्चित आवडतील असेच आहेत. हीथ पंतप्रधान झाल्यावर विल्सनचे सामान 'Removals' ही पाटी लावलेल्या ट्रकमधून हालविले जाते. यात जे मानवी जीवनाचे सार आहे, ते ललित लेखक श्री. सोनपाटकींना चांगले जाणवते, यातच या लेखांचे यश आहे. 'टेम्स' नदी साफ करणे हाही निवडणूक प्रचारमोहिमेतील एक विषय होतो. आपल्या गंगा सफाईचे पुढील निवडणुकीत हेच होणार आहे. तमसेच्या तीरावर श्री. सोनपाटकी राहिले व त्यांनी आजूबाजूला घडलेल्या घटनांचा स्वप्रतितीच्या मुशीतून निर्माण झालेला आलेख आपल्यासमोर ठेवला याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे. प्रकाशक सातासमुद्रापलीकडे पोहोचलेच आहेत. मराठी साहित्य जगभर लिहिले जाते व ते जगभर प्रकाशित होते याची साक्ष देणारे हे पुस्तक, ते सर्वत्र वाचले जावो. हाती घेतले की वाचत राहावे असे वाटते, याचा अनुभव अवश्य घ्या.

मुंबई, दि. २० जुलै १९८६

**माधव गडकरी**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३९८८
निबंध २५९६३
२१/११/८६
शाखा (स्थळ प्रत)

१

# आठवणींच्या दूर्वांचा लक्ष

मग आठवणींचा पाचोळा वावटळीच्या वेगाने गर्तेतून उठून वर आकाशात झेपावतो. डोळे मिटले की ती शुष्क पाने पुन्हा सजीव, हिरवी अन् तजेलदार बनून झाडांच्या फांद्यांना लगटतात.. जणू शिशिरात वाळलेली इंग्लिश झाडे वसंताचं लेणं सजतात. तेव्हा माझ्या मनीचा कीटस् ढसाढसा रडू लागतो. आठवणीमागून आठवणींचे कढ येतात. लांबलांबच्या आठवणी मनात माहेरपणाला येतात. त्यांचा कधी आवडणारा, कधी नकोसा असलेला गंध. हॅंपस्टेड हीथवरली तलावाकाठची वीपिंग विलोची झाडं स्वत:चं प्रतिबिंब पाण्यात बघण्याच्या नादात हॅमलेटच्या ऑफीलियेसारखी स्वत:ला विसरून जातात. आजूबाजूचं भान हरपतं. स्वत्वाची जाणीव विरून जाते. 'हे माझ्यास्तव-ते माझ्यास्तव' चा अट्टाहास थांबला जातो. मनात उरतो एकच कोलाहल- चूक की बरोबर ? त्या कल्लोळात काहीच ऐकू येत नाही. सोसाट्याचा वारा येतो. वीपिंग विलोच्या आधीच लोंबकळणाऱ्या फांद्या घुसळून निघतात. हीथवरचा जॉन कीटस् मग प्रवासाला निघतो. विलोच्या झाडांआड दडलेल्या आपल्या घराचा आणि फॅनी ब्राऊनचा निरोप

घेऊन. बर्फातून प्रवास...आदीपासून अंतापर्यंतचा अखंड प्रवास... प्रथम कोमल कोमल कविता होत्या. त्यांची आसवे झाली. आणि आसवांचे रक्तबिंदू केव्हा झाले कळलेच नाही. ह्या अनाकलनीय गोष्टी घडायच्या. हे अघटित कर्म आपण फक्त पाह्यचं. बर्फ-थंडी-बोचणारे चावरे वारे आणि तो अवघड प्रवास. कधीच न संपणारा. मन कातर होतं. ओरडून सांगावंसं वाटतं- वीपिंग विलोच्या लोंबकळणाऱ्या फांद्यांना-नका ग डोकावून पाहू पाण्यात. तोल जाईल. पण ऑफीलियेसारख्या त्या फांद्या अधिकाधिक पाण्यात निरखू लागतात. काय वेडी झाडं आहेत. बाकीची झाडं पाहा. हीथवरल्या टेकड्यावरील उन्मत्त शृंगार बघून राह्यलीत. मुलांच्या खेळण्या-बागडण्यात रमून राह्यलीत. हिवाळ्यात बर्फावरून चालणारी आबालवृद्धांची घसरगुंडी बघताहेत. पण ही आगळी विलोची झाडं सारखी रडताहेत. रडता रडता तलावाच्या आरशात स्वत:चा चेहरा पाहताहेत... रीकलेक्शन्स.... आठवणींच्या दूर्वांचा लक्ष. किती आठवायच्या त्या? किती शोधायच्या. आणि कशाला? पण नाद सुटत नाही. आता त्या तलावाच्या पाण्यालासुद्धा फक्त विलोच्या आसूंची तहान आहे. हॅंपस्टेड हीथवरील पाच तळी सगळी गुफ्तगू करतात. फक्त विलोच्या फांद्यांशीच. आणि कविमनाचा जॉन कीटस् प्रवास करतोच आहे. अनुभव गोळा करणारा पांथस्थ, दमलाय पण विटलेला नाही. रखडतोय. पायावर फोड आलेत बर्फामुळे. पण अजून चालण्याची आसक्ती आहे. शोधण्याची आच आहे.

'शुभं करोति कल्याणम्' चा चांदीच्या लहानशा घंटेतून होणारा आवाज. तिन्हीसांजा--शब्द तरी किती अर्थपूर्ण! पण इथे राह्यलाय कुठे शब्दांना अर्थ? कुणी पाह्यली आहे प्रभात? मग तिन्हीसांजेची वाट! जेवताना बीफ नाहीतर पोर्क. भीती वाटली तर हात जानव्याच्या ब्रह्मगाठेला शोधायला लागतो अन् विफलतेच्या जाणिवेतून माघारा मुकाट परत येतो. जानवं नाही. तिन्हीसांजा नाहीत. रामरक्षा आठवते पण शब्दांना जाळी-जळमटे धरतात. कुठली संस्कृती? कुठे आहेत संस्कार? मन बिचारं. त्याच्यावर किती आघात झाले. अवघ्या जखमा झाल्या. पण अजून मरत नाही. सारखी विजयाची आशा करतं. पण विजय म्हणजे तरी काय? ह्यालाच उत्तर नाही. मग उरतो फक्त आक्रोश! वीपिंग विलोचा अन् जॉन कीटस्चा काहीतरी संबंध आहे. त्यांचं पूर्वजन्मीचं नातं आहे. आणि म्हणूनच दाट धुक्यात, डोळ्यांत बोट घातले तरी दिसत नसताना, ते दोघं एकमेकांना बघतात. ट्यूबच्या खडखडाटात त्यांना एकमेकांचं बोलणं ऐकू येतं. हाईडपार्कच्या स्पीकर्स कॉर्नरवरील मतामतांच्या गलबल्यात एकमेकांचे विचार पटतात. थंडीत सों सों करीत वारा येतो. पानं तलवात पडतात. पानगळीनंतर खराटा झालेल्या विलोच्या फांद्यांना भ्रम होतो, पण तरीही जॉन कीटस्च्या कविता कोमेजत नाहीत.

किती दिवस चालायचं हे चक्रनेमिक्रमेण? विश्वाच्या उत्पत्तीपासून चाललंय्. पण संपायचं केव्हा? कुणीतरी कानात हळूच सांगून गेलं-महाभारत काळापासून माणसाचा

स्वभाव बदललेला नाही. माणूस चंद्रावरची माती कपाळाला लावून परत आलाय्. पण स्वभावाबद्दल नाही. मग देश बदलला म्हणून माणसं बदलतील ? ही असंख्य माणसं ट्यूबमध्ये पेपरांआड पुतळे होऊन बसलेली. उद्यानात रतिमदन झालेली. कष्ट उपसणारी. पैसा पैसा जप जपणारी. निशाचरी ! त्यांना ठाऊक आहे जॉन कीटस् ? त्यांना दिसतात रडणारी विलोची झाडं ? बंद घराच्या थंड काचेरी खिडक्यांच्या आत माणसं राहतात. टेलिव्हिजनच्या चित्रात मिसळून जाऊन ती जग विसरतात. काचेच्या प्याल्यातलं विष प्यायल्यावर गुंगी येते. कुठेतरी मग ट्रँझिस्टरवर गाणं लागतं. ते गुळगुळीत किंवा खडबडीत गाणं. त्या गाण्याला हातपाय फुटतात. विचित्र अंगविक्षेप करणारे. 'भोग' एवढा एकच शब्द सांगणारे. ते असंख्य हातपाय भस्मासुरी नृत्य करतात असा क्षणभर भास होतो. त्यांची सांगण्याची खटपट असते— हे नृत्य जगाच्या अंताचं नाही, प्रारंभाचं आहे. काहीच कळत नाही. नृत्य चालूच राहतं.

आजारपणानंतर तोंड कडू व्हावं तसं वाटतं. मैत्रीचे बंध तुटतात. सगळाच वैताग. स्वप्नं होती की नव्हती असा विचार येतो. कविता टराटरा फाडल्या जातात. मने दुभंगली, आता काय ? संकटाच्या सावल्या गिळू पाहतात. विचारांची कोळीष्टकं झाडली तरी पुन्हा चिकटतात. लहानपणी आईने सांगितलेल्या गोष्टींतला अर्थ कळतो. म्हातारी बिचारी कमरेत वाकलेली. एक हात पाठीवर ठेवून अंगणातला पाचोळा झाडते आहे. तुटलेलं आकाश सारखं खाली खाली येतंय. वाकलेल्या म्हातारीच्या पांढऱ्या केसाशी सलगी करतं. तिच्या दुखऱ्या पाठीला घासतं. अनंत पावसाळे पाहिलेली म्हातारी केरसुणी वरती आपटते. त्या धक्क्याने खाली घसरणारं आकाश वर जातं. पण ते मुळातूनच तुटलेलं आकाश. परत खाली सरकतं. परत म्हातारीच्या पाठीवर लोंबकळतं. परत केरसुणीचा फटकारा. आकाश काही वेळाकरता वर जातं. आणि पुन्हा येरे माझ्या मागल्या. ते गुदमरणे. बिचारी म्हातारी. बिचारं आकाश. का घडलं असं ? स्त्रीजात तेवढी निमकहराम, असं कोण म्हणालं ? रानातली टिटवी शहरात येऊन ओरडली का ? परत तोंड कडू होतं. गांधीवधानंतर झालं होतं तसं !

टेरेसा म्हणते तेच खरं का ? जगात दोनच प्राणी हुषार. एक मनुष्यप्राणी आणि एक मधमाशी. मधमाशीने आपली बुद्धी एक्स्प्लॉईट केली नाही. माणसाने ती केली म्हणून तो सर्व प्राणिमात्रांत श्रेष्ठ ठरला. चूक—साफ चूक. मधमाशीला स्वतःची बुद्धी एक्स्प्लॉईट करायची नव्हती. कारण तिला विनाश नको आहे. माणसाने तो प्रकार केल्यावर मधुघट घरी रिकामे झाले ! मधमाशीला विचारा. तिच्याकडे हवा तेवढा मध आहे. सगळ्या मधमाश्या संघ करून राहतात. त्यांच्यात ओव्हरपॉप्युलेशनचा प्रश्न नाही. युगानुयुगे त्या मध गोळा करतात, खातात, दुसऱ्यांना देतात व आनंदाने जगतात. अधिकाचा हव्यास धरणारा मानव कोसळतोय्. केविलवाणेपणे मध संपलाय् म्हणून सांगतोय.

मटेरिॲलिझम हेच एक नाव. माईक अमेरिकेतून पळाला. नको ती संपत्ती. मला माणसे हवीत असं ओरडत. त्या द्रव्याची ओकारी आली. त्या अन्नावरील वांछा उडाली. कीटस्‌ला नेमकं हेच सहन झालं नाही का ? म्हणून का तो पंचविसाव्या वर्षी ' ज्ञानेश्वर ' झाला ? त्याला वीपिंग विलोचा आक्रोश साहवला नाही. नको, जॉन कीटस्‌ची आठवण नको. ऑफीलियेची याद नको. ती बुडाली तेच चांगलं. पण हे हॅम्लेटचं भूत केव्हा पळणार ?

प्रवासात कोजागिरी येते. कधी थंडीतला प्रवास. कधी उबेतला. मग कोजागिरीला ' को जागर्ति ' चा शोध करावा म्हणून जंग सुरू होतो. मराठी मनाची कोजागिरी. त्या आठवणी किती सुखद. हातात हात घालून दुडकत जाणाऱ्या, दुधावरच्या साईसारख्या गोड अन् प्रेमळ. सारख्या सारख्या आठवाव्या. मनाच्या कुपीतून मधून मधून काढून पाहाव्या. हुंगाव्या. त्यांना येतोय् आंब्यांच्या मोहराचा गंध.

आठवण हवी फक्त स्पर्शाची. नाजूकसान स्पर्शाची. शब्दांच्या कोमल स्पंदनाची. निरागसतेची. अव्याजतेची. मनाच्या ऋजुतेची. ती आठवण मिळवण्याकरता तर सगळा व्याप. कोऽहं कोऽहंचा ध्वनी गाभाऱ्यातून ऐकू येतो का म्हणून कानात आणलेले पंचप्राण !

हॅम्पस्टेड हीथच्या हिरव्या टेकाड्यांवर उन्हामुळे तळी चकाकत आहेत. सकाळची नीरव शांतता विस्कटलीच किंचित तर ती फक्त तळ्यातल्या मासोळीच्या उडीमुळे. एक नीग्रो आई हिरवळीवर बसून आपल्या मुलाला पतंग उडवून दाखवीत आहे. त्या दृश्यामुळे बाकीच्या देखाव्याकडे आपोआप दुर्लक्ष होते- पतंग खूप उंच गेलाय. आभाळात उडणाऱ्या विमानाइतका उंच उडालाय् असं बालमनावरचे भाव सांगताहेत. त्यामुळे आईविषयीच्या थोरवीचा भाव अधिक गडद होतोय्. तळ्यातले पांढरेसफेद हंस माना वळवून वळवून त्या कौतुकाकडे बघताहेत. उन्हं अधिक पिवळी झालीत. ती आणखी सोनेरी बनतील. आणखी, आणखी जॉन तू म्हणाला होतास ना-

'O for ten years that I may over whelm
My self in poesy; So I may do the deed
That my own soul has to itself decreed.

संध्याकाळी तो मुलगा आईचा हात धरून घरी जाईल. टेबलापाशी बसेल—आणि जेवणापूर्वी मान खाली घालून प्रार्थना म्हणेल. तुला, जॉन कीटस् तुला नाईटिंगेलच्या सुरावटीत हे चित्र रेखाटायचंय्.

आमेन ! ! !

■

२

# काठोकाठ भरू द्या पेला

इथले सर्व पब् जर बंद केले तर मला वाटतं, इंग्लिश माणसाची ' जळाविण मासा ' अशी अवस्था होईल. पब् व पबमधील बीअर हा फक्त इंग्लिशच प्रकार. इतर अनेक देशांत दारू मिळते पण ' पब् ' हा प्रकार आढळत नाही. युरोप खंडात बीअर सगळीकडेच विपुल प्यायली जाते. किंबहुना इंग्लिश कोमट (Luke-warm) बीअरपेक्षा जर्मनीतली थंडगार (Chilled) लागर कितीतरी पटीने चांगली असते. पण इंग्लिश बीअरचा नूर काही वेगळा आहे. तिचे कौतुक और आहे. एवढेच कशाला, परवा राणीचा नवरा प्रिन्स फिलीप ऑस्ट्रेलियात होता. सध्या राणी, राणीचा नवरा व त्यांची दोन मुले—प्रिन्स चार्लस् अन् प्रिन्सेस अॅन यांची ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथे सफर चालू आहे. तेव्हा एका शाहीखान्याचे वेळी प्रिन्स फिलीपला एकदम ' घरची ' आठवण झाली व त्याने बीअर मागितली. चांगली उंची ' व्हिंटेज ' वाईन मागायची सोडून त्याने बीअरची मागणी केल्यावर सगळीकडे धावपळ सुरू झाली. कुठेच बीअरचा साठा नव्हता. शेवटी नाइलाजाने प्रिन्स फिलीपला बीअरची तहान वाईनवर भागवावी लागली! राजाला

( चुकलो, राणीच्या नवऱ्याला ) सुद्धा बीअर आवडते मग प्रजेचं काय ? इथल्या सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य घटक म्हणजे पब्. पबचे स्थान इथल्या मंडळीत फारच महत्त्वाचे. चुकला फकीर मशिदीत सापडायचा त्याप्रमाणे कोणीही इंग्लिश माणूस सायंकाळी पबमध्ये. पबचे मराठी नाव पबच. ' दारूचा गुत्ता ' ह्या भाषांतराला ' कंट्री ' ची घाण मारते. पबमध्ये दारू प्यायची ती चढवून घेण्याकरता नव्हे, रस्त्याने गात जाण्याकरता नव्हे अथवा शिवीगाळ करण्याकरता तर नव्हेच नव्हे.

लहानपणापासून इंग्लिश मुलाने आईकडून बाळकडू घेतलेले असते. ते म्हणजे कमी बोलण्याचे, इतरांत चटकन न मिसळण्याचे, आय थिंक, आय ॲम अफ्रेड, मे बी इत्यादी शब्दांची पखरण करून वाक्याची सुरुवात करण्याचे. कुठलंही विधान इंग्लिश माणूस सरळ करणार नाही. ही जात मोठी अबोल. फक्त दोन ठिकाणी इंग्लिश माणूस बदलेल. बाहेरच्या देशात प्रवासाला गेला असता आणि आपल्याच देशात प्यायला पबमध्ये शिरला असता. पबमध्ये तो मनमुराद बोलेल, अवखळ हसेल, खूष होऊन दुसऱ्याकरता पदरमोड करून बीअर विकतही घेईल. परत पबच्या बाहेर पडला की आईने सांगितल्याप्रमाणे आळीमिळी गुपचिळी ! पब म्हणजे, पब्लिक हाऊस. तिथे कुणीही जावे, हसावे, खेळावे व हलकेफुलके होऊन रात्री अकरा वाजता घरी यावे. कुणी त्याला ' लोकल ' ह्या शब्दानेही ओळखतात. आपल्या गल्लीचा पब तो ' लोकल ', बाकीचे दुसऱ्या रस्त्यावरचे पबज् ते नुसते पबज्. तिथे ' लोकल ' सारखी मजा नाही. स्वतःच्या पबमध्ये नेहमीचे मित्र भेटतात. बारमागची ब्लॉंड बारमेड ओळखीची असते. तिथे डार्ट खेळायला सवंगडी असतात. ठरलेलं टेबल, ठरलेल्या गप्पा. सगळं रोजचंच असूनही अवीट असतं. रोज सायंकाळी तिथे जाऊन घटका दीड घटका शिळोप्याच्या गप्पा, दारूच्या पेल्यात ' विश्वरूप दर्शन ' न दिसताही रंगतात. मग शनिवार-रविवारची सुट्टी आहे. बाहेर चक्क ऊन पडले आहे. हवेत उबदारपणा आहे. अशा वेळी सकाळी अकरा वाजता खराखुरा इंग्लिश माणूस आपल्या केसाळ अल्सेशिअनला घेऊन पबमध्ये जाईल. त्यावरूनच म्हण पडली आहे- Taking the dog for a walk ! म्हणजे मग कुत्र्याला केवळ फिरायला न्यायचे नाही तर मद्यालयात न्यायचे. तिथे मालक-मालकीण टेबलावर बीअर पीत बसणार व त्यांचा आज्ञाधारक कुत्रा टेबलाखाली मुटकुळी करून झोपणार, नाहीतर दुसऱ्या कुणाच्या कुत्रीकडे पाहात शेपटी हलवणार ! सोळा वर्षांखालील मुलांना पबमध्ये प्रवेश नाही. पबच्या बाहेर एखादा प्रॅममधला छोकरा वरच्या निळ्या आकाशाकडे बघत आपल्या बाळमुठी उडवत असतो आणि त्याची पाचसहा वर्षांची बहीण वडिलांनी आतून आणून दिलेला ' कोक ' पीत असते. हे दृश्य नेहमीचेच आहे. आत पबमध्ये आईवडील प्रेमाने गुलगुल बोलत असतात व बाहेर दोन्ही मुले तक्रार न करता आपल्या विश्वात दंग असतात. नियमाने वागायचे हे शिक्षण लहान मुलांना आईवडील पबमध्येच देतात !

पबमध्ये केवळ बीअरच मिळते असे नव्हे, तिथे कुणी डबल व्हिस्की मारतो, कुणी तरुणी जिन अँड लेमन चाखत असते तर कुणी गालावर नारिंगी रक्तवाहिन्यांचे जाळे पसरलेला कामगार एकदम ब्लडीमेरीची ( व्होडका व टोमाटो रस ) ऑर्डर देतो. वाईन मिळेल, स्पिरिटस् असतील किंवा लीकरसुद्धा चाखली जाईल पण इतके प्रकार असूनही अधिकांश प्याले भरले जातील फेसाळ बीअरचेच. पब व बीअर हे समीकरण आहे. बीअर घरी आणून पिण्यात मजा नाही. पाच-दहा मित्र जमलेत, कुणीतरी लग्नाची बेडी दुसऱ्या दिवशी अडकवून घेणार आहे. आज त्याप्रीत्यर्थ 'स्टॅगपार्टी' आहे. मग त्या तसल्या पार्टीला स्त्रियांना मज्जाव. हे फक्त पोरापोरांचे काम. ज्याचे लग्न आहे तो प्रत्येकाला प्रश्न विचारणार 'काय घेणार ?' उत्तर एकच. पॉईंट किंवा हाफ पॉईंट, डबल डायमंड, पेल एल, ब्राऊन एल नाहीतर गिनेस अथवा लागर. नावे भिन्न पण प्रकार बीअरचाच. क्वचित कुणी व्हिस्की-रमवर उडी मारील. परंतु बाकीचे बीअरच घेणार. मग पहिली राऊंड, दुसरी राऊंड, जितकी मंडळी जमलीत तेवढी सर्व आळीपाळीने बीअर विकत घेतील.

आता साडेदहा वाजलेत. संध्याकाळी सहापासून सुरापान चालू आहे. बीअर हलकेच डोक्यात शिरली आहे. पण झिंगणे होणार नाही. एकदोनदा 'जंटलमन्' मध्ये जाऊन आले की काम मस्त. पुन्हा नवीन 'पॉईंट' मारायला पोटात जागा खाली ! मग पावणेअकराला दिवे मंदउजळ होतील. अकरा वाजायला आल्याची ही सूचना. चला, आटोपले पाहिजे. मग स्टॅगपार्टीला शेवटल्या राऊंडला व्हिस्कीमॅक ( व्हिस्की अन् जिंजर ) आणील. आता मात्र पूर्णविराम हं ! ही पद्धत आहे. पाचसहा बीअरचे पाईंट झाल्यावर व्हिस्कीमॅकने पूर्णविराम द्यायचा. अकराला पब बंद झाल्यावर दहा मिनिटे अधिक बसून उरलेले ड्रिंक संपवून मंडळी बाहेर पडणार. त्या वेळी पावले जलद पडतात. जीभ फार बोलते, सगळाच आनंदी आनंद असतो.

पबचे तरी किती प्रकार आहेत. काही एकदम आधुनिक तर काही जुन्यात जुने. मात्र पब हा जुनाच चांगला. मुरलेल्या लिंबाच्या लोणच्यासारखा, जितका जुना पब तेवढा अधिक घरेलू. व्हिंटेज वाईनसारखा जुना पब अवीट गोड. संपूर्ण काळ्या लाकडाचं छप्पर असलेला. कमीत कमी उंचीचा, आत पितळी, चकचकीत पॉलीश केलेल्या सुरया मांडलेला. खडबडीत अन् दणकट टेबलखुर्च्यांचा, कमी उजेडाचा जुना पब म्हणजे गालीबची याद देणार. तिथली बारमेड 'या बसा' करते. कोपऱ्यात लाकडं फायरप्लेसमध्ये जळत असतात. बाहेर थंडी कडाक्याची असते. मंडळी विस्तवाजवळच्या जागांना चिकटून असतात. गलका वाढत असतो. प्याले भरले जातात. रिते होतात. एकमेकांचे शब्द नीट ऐकू येत नाहीत. सिगरेटच्या धुराने वातावरण अधिकच बधीर झालेले असते. अशा वातावरणात ज्याने प्यायली नाही त्याच्या करता 'हाय कम्बख्त तूने पीही नही !' असा शेर उत्पन्न झाला ! लंडनमध्ये एक भयंकर जुना पब आहे. 'डर्टी

डिक्स ' हे त्याचं नाव. त्याच्या छप्परावरून जाळीजळमटं खाली लोंबतात. कित्येक वर्षांत ती जळमटं कुणी साफ केलेली नाहीत. खालची जमीन, टेबलखुर्च्या एकदम स्वच्छ. मात्र वरची जाळी तशीच लोंबणार. कुणीच तक्रार करणार नाही. जुन्यात जुनं राखून ठेवायचा एक इंग्लिश प्रकार !

खरा पिणारा पबमध्ये कधी बसणार नाही. तो बारला टेकून तासन् तास मजेनं उभा राहील व आपल्या पेयाचे घुटके घेत मधूनमधून बारमनशी गप्पा मारील. मधूनच तो खूष होऊन बारमेडला दुप्पट पैसे देईल. स्वत:ला एक पॉईंट घेऊन दुसरा बारमेडला बहाल करेल. ती नेहमीची, ओळखीची. तिला ड्रिंक देण्याची पद्धत. आश्चर्य हेच की बारपाठीमागे उभे असलेले व सतत लोकांना बीअर पुरविणारे हे बहाद्दर लोक इतके पितात, पण कधी डुलत झुलत नाही. ग्लास भरून तो देताना एकाही बारमनचा हात थरथरताना दिसलेला नाही. साधारण कामगारवर्ग पब्लिक बारमधे जातो. पब्लिक बारमध्ये बीअरचा पाईंट एका पेनीने स्वस्त असतो. महिलावर्ग तिथे सहसा जाणार नाही. त्या जातील सलून बारमध्ये. पब्लिक व सलून ही एकाच पबची दोन अंगे. पब्लिक बारच्या दाराने आत शिरलात तर काही लोक डार्टबोर्डवर डार्टस् फेकताना दिसतील. कुणी दिवाना जुगारी यंत्रावर दांडा ओढता ओढता पैसे हारताना आढळेल. आणि जिंकला तरी त्याला कप्प्यातून जी ' टोकन्स ' मिळतील त्यांची बीअरच घ्यावी लागेल. कारण त्या नकली नाण्यांचा उपयोग बाहेर होत नाही. सलून अथवा लाऊनबारमध्ये मात्र जोडपी जातील, स्वत:ला जंटलमन् समजणारे पांढरपेशे लोक जातील. मान लटपटणाऱ्या म्हाताऱ्या जातील. वेगवेगळ्या व्यवसायातील, तरुणापासून वृद्धापर्यंतची मंडळी पबमध्ये जातील. ' देवाचिया द्वारी ' जसा भेद नाही तसा पबमध्ये बीअर मागायला कुणालाही हक्क आहे. कोपऱ्यात छोट्याशा स्टेजवर एखाद्या ' पॉपग्रुपचे ' गाणे रंगात आले असेल. क्वचित एखाद्या कोन्यात दोनतीन जोडपी नृत्य करीत असतील. त्या खेळाकडे बघत काही म्हाताऱ्या ब्रेडचा भाव वाढला म्हणून सारखी कुरकूर करीत ' शेरी ' पीत बसतील. निरिच्छपणे बार कौंटरला टेकून पाचसात दांडगी मंडळी पाईंट रिता करताना आढळतील. बाकी सगळे लोक आपापल्या टेबलावर स्वत:च्या पेयाचा समाचार घेताना लंब्याचवड्या गप्पा ठोकीत बसतील. वाढत्या गर्दीकडे पाहात, सगळ्यांना बीअर देता देता सोनेरी केसांची बारमेड मात्र एकच गाणे गात असावी.

' हा काठोकाठ भरू द्या पेला,
फेस भराभर उसळू द्या.
प्राशन करिता रंग जगाचे
क्षणोक्षणी ते बदलू द्या. '

आणि खरोखरच मानवी वृत्तीचे रंग पबमध्ये भराभर बदलतात. लंडनमध्ये वेस्ट-इंडिया-डॉकजवळ एक Prospect of whitby नावाचे पब आहे. तेथे दुपारी जा अगर संध्याकाळी जा. कल्याण-मुंबईच्या लोकलपेक्षा अधिक गर्दी असते. बारशेजारी माणसांची थोप गर्दी असते. माणसाला माणूस खेटून पीत असता एखाद्या नवख्या माणसाला कौंटरवरून ड्रिंक मिळवणेही अशक्य व्हावे. बीअर तेथे पाण्यासारखी विकली जाते. लोकांना त्या पबचे इतके आकर्षण का वाटावे कळत नाही. वास्तविक तेथे वैशिष्ट्यपूर्ण असे काहीच नाही. विशेष असा एक लंडनमध्ये पब आहे. त्याचं नाव आहे The World Turned Upside Down ! गंमत म्हणजे तिथल्या सगळ्याच गोष्टींची 'उलटी तऱ्हा' आहे. म्हणूनच बीअरला तिथे मोठी तहान लागते ! माणसांची झुंबड उडते. पोटात डचमळणारी बीअर खाली करण्याकरिता जाताना परका मनुष्य गोंधळून जावा. कारण ' जंटलमन ' मध्ये बायका जाताना दिसतात, तर 'लेडीज' पाटी असलेल्या दरवाज्यातून पुरुषमंडळींची येजा चाललेली दिसते. मध्येच पबमध्ये फायरअलार्मसारखी घंटा घणघणते. व मग पुरुषस्त्रिया हास्याचे मजले उठवितात. 'जंटलमन' मधून येणारी बाई लाजेने चूर झालेली असते, कारण जंटलमन पाटी असलेल्या बायकांच्या टॉयलेटमध्ये एक गंमतीदार चित्र आहे म्हणतात. त्यावर एक नग्न पुरुषाकृती रेखाटलेली आहे व 'नेमक्या' भागावर ॲडमचे प्रसिद्ध झाडाचे पान न लावता एक उघडणारी झडप ठेवली आहे. कुतूहलाने आत काय आहे हे बघण्याकरता कुणा मुलीने जर ती झडप उघडली तर बाहेर जोरजोरात घंटा वाजते. कारण सगळीच नावाप्रमाणे 'उलटी तऱ्हा' झाले ! 'कॉकने प्राईड' नावाच्या पबमध्ये केवळ कॉकने शब्दोच्चाराने बोलणारी मंडळी जात असतील असा कुणाचा समज होईल. 'कॉकने' उच्चार समजायला अतिशय कठीण. लंडनमधील 'बो चर्च' च्या घंटा ज्या परिसरात ऐकू जातात, त्या भागातील सर्वजण कॉकने नावाच्या आपल्याकडील कुणबावू शब्दोच्चाराने बोलतात. मग तर्खडकर व्याकरणाहून 'विंग्रजी' शिकलेल्या मराठी माणसाला ही भाषा समजणे महाकर्मकठीण. परंतु 'कॉकने प्राईड' मध्ये गर्दी जमते ती निरनिराळ्या देशातील प्रवाशांची. प्रख्यात 'पिकॅडली सर्कल' बघून ह्या नजिकच्या पबमध्ये सर्व मुशाफिर मंडळी जमातात. खूप जुने शास्त्रोक्त संगीत मंद स्वरात चालू असते. वेटर व वेट्रेसेस व्हिक्टोरिअन जमान्यातले वेष घालून इकडून तिकडे प्याले नेत असतात. त्या पबमध्ये गेले की 'शॉर्लाक होम' च्या काळात गेल्यासारखे वाटते. लंडनब्रिजजवळ नदीकाठी ( तमसेच्या तीरी ? ) Square Rigger नावाचा पब आहे. त्याचा आकार एखाद्या जहाजासारखा आहे. तीन मजली उंच इमारतीत डोलकाठी आहे, शीड आहे. छायाचित्रीकरणाच्या साह्याने त्याच्या गोल खिडक्याच्या बाहेर पाणी हलतेय, मासे सुळकांड्या मारताहेत असा आभास होतो.

पब व पबमधील बीअर ह्या अद्वैतातून मनोवृत्तीचे रंग नेहमीच पालटतात. पण काही अडाणी, अधाशी व्यक्तींना कुठे थांबावे याचे भान राह्यले नाही की मग झिंगणे प्राप्त होते. डोक्याने हलकी झालेली अशी माणसे रात्री अकरानंतर तर्र होऊन रस्त्यावर दिवानी होऊन भटकतात. गृहहीन लोक ' ओल्ड एज पेन्शनवर ' रात्रीच्या थंडीपासून बचाव करण्याकरता भरपेट पितात व मग आसऱ्याकरता रेल्वेस्थानकाची वाट सुधारतात. नाही म्हटले तरी असे ' सुधाकर तळीराम ' काही भागात आढळतातच. पबज् उघडी असतात. सकाळी अकरा ते दुपारी तीन आणि सायंकाळी साडेपाच ते रात्री अकरापर्यंत. बाकीच्या वेळी दारू मिळणार नाही. युरोपखंडात इतरत्र उघड्यावर सार्वजनिक ठिकाणी ' प्यायला ' परवानगी आहे. पण इथे मात्र मद्य प्यायचे पबमध्ये नाहीतर घरी.

उत्तर आयर्लंड सध्या पेटलेले आहे. श्री. कानिटकरांच्या वार्तापत्रात तिथे झालेल्या प्रॉटेस्टंट-कॅथॉलिक झगड्याचे वर्णन पूर्वी ' नदी थेम्सच्या किनारी ' येऊन गेलेच आहे. बेलफास्ट गावी हे दोन्ही पंथांचे लोक हाणामारीला जोर येण्याकरता पबमध्ये चिक्कार ढोशीत व मग रात्री अकराच्यापुढे बेलफास्ट शहर हादरत असे. खून, मारामाऱ्या, जाळपोळ या कृत्यांना ऊत येई. हे प्रकार नित्य होऊ लागल्यावर बेलफास्टमधली पबज् संध्याकाळी साडेसातलाच बंद होऊ लागली. पोलिस कमिशनरचा तसा हुकूम होता. ह्या ' यावनी ' झगड्यामुळे बिचाऱ्या पबमालकांचे नुकसान झाले. आणखीही एक नियम या देशात जारी आहे. मोटार चालविणारे लोक अधिकांश अल्कोहोल पोटात गेल्याने अपघात करीत म्हणून वाहतुकमंत्री बार्बारा कॅसल ह्या बाईने ' ब्रेथलायझर टेस्ट ' तीन वर्षांपूर्वी सुरू केली. मग अपघाताचे प्रमाण कमी झाले. नाहीतर ख्रिसमसचे चार दिवस इथे अपघाताचेच सत्र असे. आता कुणी ' पिएला आदमी ' मोटार चालविताना आढळला तर त्याला पोलिस थांबवितात. एका विशिष्ट फुग्यात फुंकून हवा सोडायला सांगतात. अल्कोहोल एका ठरावीक प्रमाणापेक्षा अधिक घेतले असेल तर फुगा हिरवा पडतो व सारथ्याला सजा होते.

दारूबंदी इथे नाही. बहुतांश लोक दारू पितात. त्यामुळे ' दारू म्हणजे रे काय दादा ? ' असा खुळा प्रश्न कुणी करीत नाही. परंतु तरीही या मुक्त देशात पिण्याचा अतिरेक होत नाही. ' गावठी ' तयार होत नाही. खुल्लंखुल्ला मामला आहे. शांभवीचे आम्ही उपासक भारतातील दारूबंदीसंबंधी काय धडा घेणार हाच प्रश्न आहे.

' अपोलो १३ ' संबंधी लिहिण्याचा विचार पुढील वार्तापत्राकरिता ठरविला होता. दुर्दैवाने आज सकाळी रेडिओवर बातमी आली व आत्तापर्यंतच्या २००,००० मैलांच्या प्रवासानंतर तीनही आकाशवीरांना परत पृथ्वीवर यावे लागत आहे. आयत्या वेळी गडीबदल करून आत्तापर्यंत अचूक हालचाली करीत ' अपोलो तेरा ' चंद्राकडे झेपावत होते. आणि आता हा प्रकार. तेरा आकडा अशुभ तर खराच. ■

३

# पिकॅसोपेक्षा लेननची चित्रे अश्लिल !

माझ्या लहानपणी सांगितलं जायचं की पॅरिसमध्ये फॅशन रोज बदलते. सर्वांनाच त्याबद्दल आश्चर्य वाटायचं. कारण आमच्या आदर्शाचे आगरकर एकाच शर्टावर राहात होते ना. इथे आल्यावर लक्षात आलं की गेल्या पंधरा वर्षांत फॅशनचं केंद्र पॅरिसमधून लंडनकडे आलंय्. आता कपड्यांच्या तऱ्हा भराभर बदलतात. लंडनमध्ये पाच वर्षांपूर्वी येथे आलो तेव्हा मिनी स्कर्टचं नुकतंच आगमन होत होतं. मेरी स्वीट नावाच्या वीस वर्षांच्या मुलीनं मिनी स्कर्टचं डिझाईन केलं आणि तो तोटका वेष एकदम लोकप्रिय झाला. भराभर तरुण मुलींनी आखूड वेष शिवले. नव्हे आयते विकत घेतले. ज्यांना लगेच नवीन कपडे करणं शक्य नव्हतं त्या मुलींनी आपले गुडघ्यापर्यंतचे स्कर्ट आतून घडी बेतून तोकडे केले. त्या अध:पाताकडे वडील मंडळी किंचित रोषानं पाहात होती. एक काळ असा होता की झगा गुडघ्याच्या खाली वीतभर असायचा. चुकून परपुरुषाला गुडघे दिसले तर ते अकुलीनपणाचे समजत. मिनी स्कर्टने मांड्याही स्वच्छ दाखवायला सुरुवात केली. प्रथम लंडनमध्ये आलेल्या त्या तोकड्या वेषाचा फैलाव मग आजूबाजूला भरभर

होऊ लागला. त्या वेळी ऑफिसमध्ये कुणी उत्तरेतून आला की प्राथमिक हवापाण्याच्या गोष्टीनंतर प्रश्न विचारला जायचा-- काय हो, एडिंबराला मिनी स्कर्ट पोहोचलाय का? नंतर मग वर्षभरातच ब्रिटनमध्ये सगळीकडे मिनी स्कर्टचा प्रचार झाला. इतका की रस्त्यावरून जाणाऱ्या मर्द लोकांच्या नजरा चाळवल्या जाव्यात. एका कारखान्याच्या मॅनेजरने सांगितले, 'As the hem lime of the skirts of women workers went higher and higher, our production went lower and lower.'

मुलींच्या कद्‌लीस्तंभासारख्या पायांकडे पाहात राहणाऱ्या पुरुषी नजरेला त्याही वर बघण्याची जेव्हा सोय झाली, तेव्हा त्या कारखान्याचे उत्पादन मात्र घटले! अर्थात् प्रौढ स्त्रिया मात्र त्या स्कर्टविषयी नेहमीच नापसंती व्यक्त करीत राहिल्या. 'काय बाई एकेक तऱ्हा, काही जनाची नाही पण मनाची तरी लाज ह्या तरुण मुलींना? 'स्टॉकिंग्जचे टॉप' दाखविण्यापर्यंत का आखूड स्कर्ट घालावा?' पण मग काळच असा आला की मिनी स्कर्टचे युग जरी चालू राह्यले तरी लोकांना त्याचे विशेष वाटेनासे झाले. राणीची मुलगी ॲनसुद्धा चक्क तोकडा वेष घालू लागली! मग लोक म्हणू लागले, 'आता स्कर्टची उंची गुडघ्याच्या वर किती इंच उंच आहे अशी मोजण्यापेक्षा कटिबंधापासून खालपर्यंत तो किती लांब आहे हे मोजणेच अधिक सोपे पडेल' मग स्टॉकिंग्ज टॉप दिसण्याच्या कटकटीला कंटाळून वेषयोजकांनी कंबरेपासून नेसायचे नायलॉनचे 'टॉइटस्' काढले, मिनी स्कर्ट आजही महिलावर्गात अंमल गाजवून आहे.

मग महर्षी महेशांचा तरुण पिढीवर प्रभाव पडला. आमच्या देशात दीडशे वर्षांच्या आंग्लसत्तेचा रहेनसहेनच्या बाबतीतला परिणाम दिसत असतानाच ब्रिटनमध्ये मात्र भारतीय संस्कृतीचा (?) पगडा कपड्यांच्या बाबतीत दिसू लागला. एकदम तरुण मुलेमुली भगवे अंगरखे वापरू लागले. गळ्यात रुद्राक्षांच्या माळा दिसू लागल्या. ऑक्सफर्ड स्ट्रीटच्या गर्दीतून चालले असता नुकतेच भारतातून आलेले अन् आदतसे मजबूर असलेले उपरे लोक अचानक घंटानाद ऐकून गर्दीत गाय शिरली की काय या शंकेने वाट मोकळी करून देऊ लागले! कारण मुलेमुली गळ्यात घंटांच्या माळा घालून किणकिण करीत फिरू लागले होते. एकेक तऱ्हा. केवळ मीठ-मिरची-मसाला विकणाऱ्या पटेलांच्या किराणा भुसार मालाच्या दुकानात रंगीत मण्यांच्या माळा, घंटा, नागाच्या चंदेरी आंगठ्या, धूप, उदबत्त्या विसावू लागल्या. नशीब त्यांनी केसाला लावण्याकरता उंबराचा चीक व अंगाला चोळण्याकरता विभूतिभस्म दुकानात ठेवले नाही. कारण त्या वेळेपासून तरुण मुलांच्या केसांची लांबी स्कर्टच्या उंचीच्या व्यस्त प्रमाणात दिसू लागली आहे. मुलगा की मुलगी हे ओळखणे कठीण व्हावे इतपत मुलांचे केस लांब झाले. महर्षी महेश योगी त्यावेळी लंडनमध्ये प्रवचन देत असत. Transcendentalism हा

विषय होता. अर्थात त्या ' अलौकिक अनुभवातीत ' अवस्थेचा अर्थ व अननुभव ज्यांना ज्यांना झाला ते सर्व मॅरिहुवाना अन् कॅनबीजचे सेवन करूनच मग ब्रह्मानंदी टाळी लावीत असत. महर्षींची पोळी पिकली व अपार पैसा मिळाला. त्यांच्या हृषिकेषच्या आश्रमात अमेरिका, इंग्लंड व इतर पाश्चात्त्य देशांतील मंडळींची ये-जा सुरू झाली. पौंड डॉलर्सच्या मिळकतीतून योगीमहाराज राजयोगी बनले व अष्टांगुळे वर चालता यावे म्हणून हेलिकॉप्टरने भ्रमन्ती सुरू झाली.

मिनी स्कर्ट जुना झाला आणि मग फारच आळणी बनला. आता आलाय् मॅक्सी स्कर्ट व मॅक्सी कोट. थंडी निवारणार्थ हिवाळ्यात घालावयाच्या लोकरीच्या जाड्या कोटांची उंची मिनी स्कर्टने फारच आखूड केली होती. ती आता पायघोळ झाली. त्यामुळे मात्र खरा डौल आला. ना.सी. फडक्यांनी कुठेतरी लिहिले होते की, वेषपद्धतीच्या बाबतीत पाश्चात्त्यांनी फारच अरसिकपणा दाखवलाय्. त्यांचा रोख पाश्चात्त्य झग्यावर होता. आता आलेला मॅक्सी स्कर्ट व मॅक्सी कोट मात्र भारतीय साडीच्या शेलाट्या आकृतीशी स्पर्धा करून आहे. आत मिनी स्कर्ट व वरती मॅक्सी कोट घालून यंदाचा हिवाळा गजगतीने चालून-मिरवून गेला. मॅक्सी कोटाचा तोटा इतकाच की भुयारी रेल्वेच्या व्यवस्थापकांना सूचना द्यायला लागल्या की विजेरी हलत्या जिन्यावरून (एस्कलेटरवरून) जाताना मुलींनी त्या कोटाचे ' ओचेपदर ' वर आवरून धरावे. कारण पायघोळ कोटाचे टोक त्या एस्कलेटरमध्ये अडकण्याची व अपघात घडण्याची शक्यता होती, अपघात झाले ते तुरळक, पण थंडीनिवारण मस्त झाले व रुबाब और झाला.

लांब केस तरुण मुले वाढवीत असता दुसराच एक पंथ निघाला. तोटके केस ठेवण्याचा. आखूड केस राखणारी ही मंडळी मात्र भयानक आहेत. स्वत:ला ते ' स्किन हेड ' म्हणवितात. त्यांचा मुख्य रोष काळ्या लोकांवर. एकटी दुकटी फिरणारी कुणी भारतीय, पाकिस्तानी अथवा आफ्रिकी व्यक्ती आढळली की मारहाण करून तिचे पैसे लुबाडावयाचे हा त्यांचा उद्योग. इंग्लिश ' बॉबी ' किती दक्ष असला तरीही ह्या ' स्किन् हेड ' मंडळींचा स्वैरसंचार सर्वत्र चालू आहे. लंडनमध्ये पूर्व पाकिस्तानी लोकांची भारतीय ' उपाहारगृहे ' मुबलक आहेत. ( अजूनपर्यंत ' पाकिस्तानी रेस्टॉरंट ' सापडलेले नाही व चिकनकरी अँड राईस परोसण्याच्या उपाहारगृहांचा मालक भारतीय तुरळकच असतो ! ) त्या उपाहारगृहांच्या रसोईगृहात काम करणारे अशिक्षित पाकिस्तानी तरुण रात्री आवराआवर करून घरी जात असता त्यांना ह्या ठकमंडळींनी खूपच त्रास द्यायला सुरुवात केली. भीतीने व स्वत:ला इंग्लिश बोलता येत नाही ह्या न्यूनगंडामुळे त्यांनी पोलिसांकडे कधीच तक्रारी नेल्या नाहीत. शेवटी पोलिस खात्यानेच उर्दूमध्ये भित्तिपत्रके लावून, असा त्रास होत असेल तर लगेच पोलिसठाण्यावर तक्रारी नोंदवा अशा सूचना दिल्या ! जसे पॉपग्रुप्स-चलनी गाणाऱ्यांचे समूह विपुल आहेत.त्याप्रमाणे हिप्पीज, स्किन्

हेडस् हेल्सएंजेल, फ्लावर पीपल वगैरे नामाभिधान असलेले तरुण मंडळींचे गट शेकडो आहेत. त्यांची वेगळी फिलॉसॉफी आहे. वेषपद्धती आहे. बोलण्याचे भिन्न प्रकार आहेत. राहण्याच्या सवयी आहेत. ब्रिटन कितीही संपन्न( ! ) असले तरी इथे गृहहीन लोक बरेच आहेत. (थंडीत फूटपाथवर झोपणे शक्य नसल्याने ते भुयारी रेल्वेच्या स्थानकात चोरून निजतात ) त्यांना घरे मिळवून देण्याकरता गेल्या वर्षी ' हिप्पीज् ' युवकांनी ( यांच्या लांब केसात उवा लिखा असतात इति गार्डियन वृत्तपत्र ! ) इथल्या मोकळ्या सरकारी इमारतींचा कबजा घेतला. निकम्मी सरकारला जाणीव करून देण्याकरता त्यांनी लंडनच्या वेस्टएंडमधील चांगल्या चांगल्या इमारतींमध्ये बस्तान ठोकले. मुख्य दरवाज्याला आतून फळ्या ठोकून व खिडकीतून आत येणाऱ्या पोलिसांच्या अंगावर पाणी किंवा दगड फेकून त्यांनी या इमारतीचे किल्ले चार चार दिवस लढवले. पोलिसांनी त्यांना बाहेर काढण्यासाठी जंग जंग उपाय केले. अशा तऱ्हेचे अपराध करणाऱ्यांना इथे कायद्याने शिक्षा होऊ शकत नाही. एका इमारतीतून हुसकावले की ही हिप्पी मुलेमुली दुसऱ्या इमारतीचा आश्रय घेत. लंडनमध्ये हा ' खो खो ' चा खेळ दोन महिने गाजला. हिप्पींनी ' सामूहिक जीवन ' उपभोगले अन् त्यांनी खराब केलेल्या इमारतीत बिचाऱ्या पोलिसांचे पाय भरले. फ्लावर पीपल्स फक्त ' लव्ह ' या शब्दावर जगतात. बाणभट्टाच्या चंद्रापीडाप्रमाणे कानावर फुले खोवून जगाच्या शांतीकरता ते केवळ भटकत असतात. विश्वशांतीकरता आणखी एक अभिनव प्रकार केला. तो चार बीटल्सपैकी जॉन लेनन नावाच्या गायकाने. त्याने ओको योनो नावाच्या जपानी युवतीशी विवाह केला. हॉलंडच्या ॲम्स्टरडॅम शहरी एका सुसज्ज हॉटेलमध्ये त्यांनी आगळाच मधुचंद्र साजरा केला. सातही दिवस केवळ एकत्र झोपून व जनतेला स्वत:चे खुले प्रदर्शन ठेवून त्यांनी सात दिवस ' सर्वत्र सुखिन: सन्तु ' चा यज्ञ आरंभिला होता. टी.व्ही. वर एक शय्येवर झोपलेल्या जॉन-योको यांच्या मुलाखती आल्या. विश्वशांतीचा खराखुरा प्रकार ! इतके करून जॉन लेनन थांबला असता तर आश्चर्य ते कसले. नंतर त्याने आपल्या मधुचंद्राची रेखाचित्रे लंडनच्या गॅलरीत प्रदर्शनास्तव ठेवली. जॉन व याको यांच्या प्रणयाची चित्रे अश्लील ठरवून शासनाने प्रदर्शन बंद पाडले. आता खटला सुरू झालाय. जॉनचा वकील स्वत:च्या विधानाला पुष्टी आणण्याकरता पिकासोची चित्रे पुढे करून ' ह्या चित्रापेक्षा लेननची चित्रे अश्लील आहेत काय ' असा सवाल करतोय.

पॉप ग्रुप्स तर आता मुंबई-दिल्लीलाही तयार होऊ लागलेत असे ऐकले. इथला पॉप म्युझिकचा प्रकार फारच जनताप्रिय आहे. त्या गाण्यांनी तरुण समाज अक्षरश: वेडा होतो. त्या ग्रुप्सची नावेही मोठी गंमतीदार आहेत. वानगीदाखल काही पाहा. दी हू, ज्यूसी, लूसी, ॲनीमल्स, मंकीज, दी क्रीम, कॅन्ड हीट एक ना अनेक. बीटल्स व रोलिंग स्टोन ह्या गानसमूहांचे अमेरिकेत जेव्हा कार्यक्रम झाले, तेव्हा लहान मुलेमुली इतकी जमली होती

की, उघड्या मंचावर गायकांना आणण्याकरता हेलिकॉप्टर उपयोगात आणावे लागले व त्यातून त्यांना थेट व्यासपीठावर सोडले ! कित्येक मुली हर्षातिरेकाने बेशुद्ध पडल्या. बायकांच्या नजीक दर्शनाकरता कुंपण ओलांडून आत घुसलेल्या 'फॅन्सना' आवरताना पोलिस हैराण झाले. लोकप्रिय गाणे सुरू होताच ते ऐकण्यापेक्षा, ते गाणे गायले जातेय ह्या एकाच आनंदाने श्रोत्यांनी काढलेले चीत्कार इतके उच्च होते की त्यापुढे गाणे व ऑर्केस्ट्रा लोपून गेला. अर्थात इथल्या गाण्याला-सुरावटीपेक्षा गायकाने केलेले अंगविक्षेप व मुक्त नृत्यच अधिक आवश्यक असते. ऑक्सफर्ड स्ट्रीटवरून रोज धोतर व पातळे नेसून भजन करीत जाणारी कृष्णवेडी अमेरिकन मंडळी आता नित्य परिचयाची झालेली आहेत. त्यांच्या चिपळ्या, टाळ वाजविण्याच्या प्रकाराने हाही एक पॉप संगीताचा प्रकार समजून त्यांचे दुसरे गाणेही रेडिओ टेलिव्हिजनवर चलतीत आहे. 'हरे रामा, हरे गोविन्दा तव अहं भजामि ॥' असे कायसे.

रोज नवी फॅशन, नवा प्रकार. फ्री कंट्रीमधील पर्मिसिव्ह सोसायटीत रोज नवे छंद. त्यात ऐकू येतो तो परदेशी स्थलांतरितांचा प्रश्न. काळ्या लोकांना इथे कशी वागणूक मिळते, दुजा सापत्नभाव सोसावा लागतो त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याकरता एका ॲबिशा डिस्ने नावाच्या इंग्लिश तरुण वार्ताप्रतिनिधी असलेल्या मुलीने, स्वत:वर डॉक्टरांकडून सहा महिने प्रयोग करवून घेऊन आपला गोरा रंग काही महिन्यांकरता पालटवून घेतला. तिचा कायापालट झाला. मग तिने साडी नेसली व रस्त्याने एक भारतीय स्त्री म्हणून ती चालू लागली. एका पबमध्ये ती एकली मद्य पिण्याकरता गेली. त्या वेळी इतर गोऱ्या लोकांनी तिची केलेली टिंगल, कुचेष्टा वगैरेचे वर्णन मग तिने आमजनतेला टी.व्ही.वर दिले. अजूनही ती निरनिराळ्या गावी अनुभव घेत फिरत आहे. धन्य ती ॲथिआ !

इमिग्रंटसंबंधी विषय निघाला की श्री. इनॉक पॉवेल यांचे नाव आपसूक येते. श्री. पॉवेल हे फार हुशार गृहस्थ आहेत. त्यांनी पार्लमेंटपुढे आणलेले प्रश्न खूप महत्त्वाचे आहेत. त्यांनी चर्चिलेल्या महत्त्वाच्या प्रश्नामुळे त्यांचे पाय धरावेसे वाटतात. (आणि इमिग्रंटस्‌विषयी निर्माण केलेल्या कटू प्रश्नामुळे मात्र तेच पाय धरून खेचावेसे वाटतात !) परवाच त्यांनी चर्चिलेला एक प्रश्न भारतीय राजकारणातदेखील नुकताच आणला गेला म्हणून आठवण झाली. तो म्हणजे मंत्र्यांचे पगार. भारतीय मंत्र्यांचे आतापर्यंतचे करमुक्त वेतन आणि त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या सवलती ह्या संबंधांतली बातमी इथल्याही वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली होती. श्री. पॉवेल काय म्हणतात पाहा. 'आजकाल पार्लमेंटच्या आवारात व इमारतीत एकच गुणगुण ऐकू येते. पार्लमेंटचे सभासद आपले पगार वाढविण्यासंबंधी व अधिक सवलती मिळविण्याकरता युनियन काढण्याची भाषा करीत आहेत. पार्लमेंटचे सभासद आता स्वत:ला देशात पगारी नोकर समजू लागले आहेत. वास्तविक स्वेच्छेने समाजसेवेचे व्रत घेतलेल्या एम.पी.नी असली गोष्ट करावी हे

लाजिरवाणे आहे. ते कृत्य पूर्वी गायफॉक्सने (जिज्ञासूंनी इंग्लंडचा सोपपत्तिक इतिहास चाळावा !) पार्लमेंटच्या इमारतीला सुरुंग लावण्याच्या कृत्यापेक्षा अधिक भयावह आहे. केवळ मंत्रीच नव्हे तर एम.पी. लोकांनीही ह्या देशात स्वार्थाकरता केलेल्या मागणीला श्री. इनॉक पॉवेल यांनी वुल्व्हरहॅम्प्टन येथे केलेले विरोध भारतीय खादीला कितपत मानवेल ? आपल्या विधानाच्या शेवटी श्री. पॉवेल म्हणतात, " आजकाल पार्लमेंटमध्ये आणलेले प्रश्न मोकळेपणी चर्चिले जात नाहीत. सध्याचे देशापुढील महत्त्वाचे प्रश्न फक्त तीनच. देहान्त शिक्षा, ब्रिटनचा कॉमन मार्केटमधील प्रवेश आणि इमिग्रेशन !' ( तिसऱ्या मुद्द्यास्तव पाय खेचावे ! )

■

४

# जितम् मया जितं मया

कितीतरी दिवस होणार होणार म्हणून गाजत असलेले वर्ल्डकप फुटबॉलचे सर्व सामने ३० जुलैला संपले. वास्तविक प्रत्यक्ष नेत्रवेधक सामन्यांपेक्षा ' वर्ल्ड कप 'च अधिक प्रसिद्धीला आला. ऑलिंपिक्स गेम्सप्रमाणे दर चार वर्षांनी खेळले जाणारे हे सामने यंदा त्या खेळाच्या जन्मदात्या इंग्लंडमध्ये खेळले जाणार, म्हणून सामन्यांच्या कितीतरी महिने अगोदर अंतिम विजेत्या संघास देण्यात येणारा तो बारा इंची ' सुवर्ण चषक ' इंग्लंडमध्ये लोकांना दाखविण्याकरिता आणण्यात आला. तो कुठल्या मुहूर्तावर आणला कोण जाणे ? आणला अन् चोरीला गेला. कुणातरी शर्विलकाचे हे काम, परंतु इथे ' मैत्रेय ' एक सन्माननीय देश होता. देशाच्या अब्रूचा प्रश्न होता. कुणा एका व्यक्तीचा नव्हे. हजार पौंडांचे बक्षीस प्रसिद्ध झाले. एका रामप्रहरी एका कुत्र्याला तो वर्ल्डकप त्याच्या बागेत सापडला. डेव्हिड कॉर्बेटचे ( कुत्र्याच्या धन्याचे नाव ) भाग्य फळफळले. एक सहस्र पौंडाचे इनाम, अमाप प्रसिद्धी आणि पिकलसला- कुत्र्याला लगेच चित्रपटात काम मिळाले. आता निरनिराळ्या चित्रपटांत त्या कुत्र्यास कामे मिळून त्या डेव्हिडची ' देता

किती घेशिल दो कराने ' अशी स्थिती झाल्यास नवल नाही. एकूण वर्ल्डकप गाजला खराच.

प्रत्यक्ष सामना सुरू झाल्यावर तर लोकांच्या उत्साहास उधाणच आले. क्रिकेटपेक्षा सॉकर ( फूटबॉलचे हे इंग्लिशांचे प्यारे नाव ) इथे अधिक प्रिय आहे. खेळाला सतत गर्दी असते. ती खेळाच्या अव्याहत जोरकस गतीमुळे. मग तिकीट कुठलेही असो. तिकिटांचा काळाबजार इथे खुल्लंखुल्ला चालतो. अंतिम सामन्यांची तीन पौंडांची तिकिटे मी पंचवीस पौंडांस देणार, असे सांगणाऱ्यांची जाहीर मुलाखत टी.व्ही. वर दाखविली गेली. सहा निरनिराळ्या ठिकाणी प्रथम सामने खेळले गेले.

आलेल्या खेळाडूंच्या संघात ब्राझीलचा उदो उदो फार होत होता. कारण ५८ व ६२ मध्ये ब्राझील जागतिक विजेते ठरले होते. या वेळीही ब्राझील मोठ्या उत्साहाने व महत्त्वाकांक्षेने क्रीडांगणावर उतरले होते. पण घडले भलतेच. बिचारे ब्राझील क्वार्टर फायनलपर्यंतही येऊ शकले नाही. पोर्तुगीज संघाने ब्राझीलच्या आडदांड खेळाडूंचा केव्हाच धुव्वा उडविला. प्रतिपक्षाच्या खेळाडूंना कायमचे जायबंदी करण्यात महशूर असलेले ब्राझीलियन्स हरले. उलट त्यांचा उत्तम खेळाडू ' पेले ' कायमचा गंभीर जायबंदी झाला. या ब्राझील-पोर्तुगीज सामन्याकडे सर्वजण अतीव उत्सुकतेने पाहात होते. टी.व्ही. वर सामना पाहणे दोन दृष्टीने चांगले. फुकटात घरबसल्या सामना बघण्यास मिळतो व महत्त्वाच्या आणीबाणीच्या प्रसंगांचे सुंदर क्लोजअप्स कॅमेरामनच्या कार्यामुळे बघायला मिळतात. ब्राझील हरले व तिकडे टेलिव्हिजनवर सामना बघणाऱ्या कित्येक ब्राझीलियन स्त्रिया बेशुद्ध पडल्या. हजारो लोक रडले. कित्येकांच्या मन:क्षोभाला आवरता आवरता पोलिसांना नाकीनऊ आले. त्या रात्री ब्राझीलमधला एकही पोर्तुगीज रहिवासी आपल्या घराबाहेर पडला नाही ! दोनदा सतत वर्ल्डचॅंपियनशीप मिळविणाऱ्या देशाची ही अशी दैना उडाली.

इटली अशीच अर्जेंटिनाविरुद्ध हरली. हा पराभवही इटालियन्सना बोचक ठरला. कारण १९३४ व ३८ मध्ये इटालियन्सही जगविजेते ठरले होतेच. आमचे खेळाडू मायदेशी परत तर येऊ देत, त्यांना अंडीटोमॅटोचा आहेर करू- त्यांना तेच हवे आहे, असे इटालियन्स लोक चिडून बोलू लागले आणि खरोखर त्यांनी आपले बोल कृतीतही आणले.

सेमीफायनल सामने अटीतटीने खेळले गेले. पश्चिम जर्मनी रशियाविरुद्ध जिंकली. पोर्तुगीजांचा आत्मविश्वास ब्राझीलला हरविल्यामुळे वाढला होता. उपान्त्यफेरीत आपण इंग्लंडचे ' ब्राझील ' करू, अशी त्यांची खात्री होती. मात्र अंतिम सामन्यापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने आततायीपणा कुणीच केला नाही. कुणीतरी एकजण हरणार, या न्यायाने पोर्तुगीज हरले इतकेच.पोर्तुगीज कर्णधार क्रीडांगणावरच रडला, पण सामना मात्र बहारीचा अन् चित्तवेधक झाला. इंग्लीश टीमच्या मॅनेजरने रामसेने उद्‌गार काढले,

"या सामन्यात एक पक्ष हरला, हीच फक्त एक वाईट वाटण्याजोगी गोष्ट आहे. जिंकणे-हरणे हा भागच नसता, तर हा सामना दृष्ट लागण्याइतपत आकर्षक झाला. ( श्री. रामसे यांच्या उद्‌गारामागे स्वत: जिंकल्यामुळेच ही उदारता आली होती, ही गोष्ट अलाहिदा ! सतत तीन वर्षे इंग्लिश संघाला उत्कृष्ट शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने श्री. रामसे अविश्रांत खटपट करीत होते. )

वर्ल्ड चँपियन होण्याची इच्छा फसलेले पोर्तुगीज शेवटी थर्ड फायनलमध्ये रशियाविरुद्ध जिंकून जगात तिसऱ्या क्रमांकाचे विजेते ठरले. हेही नसे थोडके !

आता खरीखुरी लढत होती. इंग्लंडविरुद्ध वेस्ट जर्मनी. दोन्हीही संघ सारखेच तुल्यबळ. त्यामुळे सामना बघण्याविषयी सगळे उत्सुक होते. शनिवार तारीख ३० जुलैला लंडनच्या वेम्ब्ली स्टेडियमला कुरुक्षेत्राचे स्वरूप आले होते. बाहेर मर्सिडीझ बेन्स व व्होक्स वॅगनची थोप गर्दी झाली होती. त्यावरून किती जर्मन आत असावेत, याचा अंदाज येत होता. राणी खास सामना बघण्याकरिता ' घरचं ' आटोपून आली होती. पंतप्रधान विल्सनसाहेब अमेरिका-कॅनडाच्या दौऱ्यावरून घाईघाईने परतले व परस्पर विमानतळावरून वेम्ब्लीला पळाले. अर्थमंत्री ब्राऊन त्यांच्या पाठीमागे सावलीसारखे होतेच. आणखी कितीतरी मंडळी जमली होती. प्रेक्षागारात युनियन जॅक्स व जर्मन फ्लॅग्ज हजारोंनी उंचावत होते. प्रेक्षकांची संख्या त्र्याणव हजार झाली होती. घोषणांना अंत नव्हता. गाण्यांना कुठलीही चाल चालत होती. एकूण उत्साह स्टेडियम भरून वाहात होता. ' व्ही फॉर व्हिक्टरी ' च्या खुणा युद्ध खेळलेले कित्येक वृद्ध इंग्लिश एकमेकांकडे पाहून करीत होते. जर्मन प्रेक्षकांच्या डोळयांत विजयाची वीज तरळत होती. आणि वेळ होत आली. राणी आली. पाठीमागून ड्यूक ऑफ एडिंबरोही उपस्थित ! क्रीडांगणावरून ' व्हिक्टर ' वाजविणारी बँडची पथके केव्हाच अदृश्य झाली होती. आता क्रीडांगणात उभ्या होत्या फक्त दोन देशांच्या सेना ! शिस्तीत- उत्साहात, ' गॉड सेव्ह दी क्वीन ' ला राणीसकट सर्वजण स्तब्ध निश्चल उभे होते. तीन वाजले व मैदानावरून जर्मनांनी पहिली ' किक् ' मारली. द्रुतगतीने सामना सुरू झाला. जोडीने भराभर धावणे, प्रतिपक्षाच्या खेळाडूंशी पायात बॉल राखून आट्यापाट्या खेळणे, गोल करायला जाळीकडे आलेला बॉल डोक्याने ( ? ) उडवून परतविणे, जिवाचा आटापिटा करून दुसऱ्याकडून बॉल शिताफीने पळविणे, विलक्षण चापल्याने लत्ताप्रहार करून बॉलची दिशाच वळविणे, एक ना अनेक क्लृप्त्या ! खेळ भराभर चालू झाला. ' प्रथम ग्रासे मक्षिकापात ' होऊन जर्मन गोलकीपरच जायबंदी झाला. अंतिम फेरीत ' गडीबदल ' संमत नाही. त्यामुळे नाना उपाय करून त्याला खडा केला, खेळ परत चालू झाला. पहिल्या १५ मिनिटांतच गोलची भवानी जर्मनांनी केली. टेलीवर ' स्लो मोशन ' मध्ये तो गोल स्पष्ट करून दाखविला.

इंग्लंडच्या संघात चार्लटनबंधूंचा खेळ प्रसिद्ध होता. धाकट्या बॉबी चार्लटनचे नाव

प्रत्यक्षात सारखे घुमून राहिले होते. बॉबीचे टक्कल सर्व खेळाडूंत चकाकून दिसायचे. बॉबी सर्वांचाच प्यारा होता. बॉल पळवत पळवत एका बाजूकडून दुसरीकडे इंग्लिश खेळाडू आणायचे व गोल करण्याकरिता बॉबीकडे हळूच सरकवायचे. कारण त्या खल्वाटांची किक् 'निष्फला क्वचित्' होती. तो बरोबर गोल करायचा. जोडीला जॅकी चार्लटन होताच. पहिल्या अर्ध्या ४५ मिनिटांच्या खेळात दोन्ही संघ समसमान (१-१) होते. दहा मिनिटांच्या मध्यंतरात खेळाडूंना मसाज झाला. थोपटले, पाय चेपले, औषधे लावली व खेळ पुनश्च सुरू झाला. दुसऱ्या अर्धभागाच्या प्रारंभी खेळ बराच वेळ कंटाळवाणा झाला. कुणीच गोल करीत नव्हते. पाऊसही बुरूबुरू सुरू झाला होता. त्यामुळे मैदान घसरडे झाले होते. आणि अचानक इंग्लंडचा दुसरा गोल झाला. जर्मनांचे धाबे दणाणले. काही करून गोल व्हायला हवा. वेळही संपत आली. शेवटली तीन मिनिटे उरली. कॉमेन्टेटरने जाहीरही केले. आता इंग्लंडचा विजय निश्चित आहे! आणि अहो आश्चर्यम्! सामना संपायला केवळ तीस सेकंद शिल्लक असता जर्मनांनी दुसरा गोल केला. परत दोन्ही संघ समसमान ( २-२ ). तोंडाशी आलेला, इंग्लंडचा विजयाचा घास अशा रीतीने काढून घेतला गेला! आता फिरून अर्धा तास खेळणे, फिरून तीच अनिश्चितता.

दिलेल्या अर्ध्या तासाचा खेळ परत सुरू झाला. तोच उत्साह, तीच जिद्द, तीच चिकाटी, तेच मनोबल. पाऊस थांबून चक्क ऊन पडले होते. खेळगड्यांच्या सावल्यांचाही आपापसात खेळ चालू होता. दोन्ही गोलकीपरच्या बाजूंना अनेक वेळा अटीतटीने गर्दी करून लढत झाल्याने खेळणाऱ्यांच्या पावलांची ओल्या मातीवर असंख्य 'गोपद्मे' झाली होती! कितीतरी गोल दोन्ही संघांनी अमाप कौशल्याने व सुंदर रीतीने परतवून लावले आणि इंग्लंडचे भाग्य थोर, त्यांचा तिसरा गोल झाला! त्या गोलाच्या निश्चिततेबद्दल स्विसनिर्णेता डायनेस्टने रशियन लाईनमनचा क्षणभर सल्ला घेतल्याने सगळीकडेच किंचित्काल थोडी खळबळ उडाली. जर्मन खेळाडूंचे मनोधैर्यही त्या प्रसंगामुळे काहीसे दुखावले! गोल झाला व नेहमीच्या पद्धतीप्रमाणे गोल करणारा दोन्ही हात पसरून 'जितम् मया, जितम् मया' ओरडत धावत सुटला. इतर इंग्लिश खेळाडूंनी त्याला मिठ्या मारल्या, थोपटले, मुके घेतले. पण अभिनंदन करायला फार वेळ नव्हता, खेळ चालूच होता. इंग्लंड जर्मनीविरुद्ध एका गोलाने पुढे होते. वेळ भराभर संपत आली. काही सेकंद उरले. जर्मन खेळाडू सामना हरल्याच्या जाणिवेने हताश झाले. पूर्वीसारखा तीस सेकंदांतला 'चमत्कार' करण्याची त्यांच्यात ताकद उरली नव्हती. 'मोरालच' संपले. वेळ जणू उरलाच नाही. या भावनेने ते थंडावले. रेफरीने अजून काही सेकंद शिल्लक आहेत, खेळ चालू ठेवा म्हणून खूण केली. पण जर्मन आपण हरलो याच मन:स्थितीत होते. त्या गाफीलपणाचा फायदा घेऊन इंग्लंडने शेवटल्या पाच सेकंदांत चवथा गोल केला. अन् विजयाचा कळस झाला! ( इंग्लंड ४-वेस्ट जर्मनी २ )

फूटबॉल वर्ल्डकपची मॅच संपलेली आहे. लंडनमध्ये विजयाच्या नौबती झडत आहेत. लंडनच्या 'वेस्ट एन्ड' ला फूटबॉल फॅन्सची तोबा गर्दी उडाली आहे. ट्रॅफलगार स्क्वेअरवर तर कित्येकजण तिथल्या पुष्करणीतल्या पाण्यात उभे राहूनच, आपल्या आवडत्या खेळाडूंचे दर्शन घेत आहेत. रॉयलगार्डन हॉटेलमध्ये रात्री खेळाडूंना खास खाना चालू आहे. शॅम्पेनचे पेले फेसाळत आहेत. उपस्थितांत सर्व खेळाडू तर आहेतच. प्रिमियर विल्सनसाहेबही आहेत.

■

५

# दुर्दम्य आशावादी

अपयशाचे कौतुक इतके इतरत्र क्वचितच झाले असेल. वास्तविक त्याला अपयश का म्हणायचे हा प्रश्नच आहे. कारण अवकाशात पृथ्वीपासून २०५,००० मैल लांब अंतरावर असताना जायबंदी झालेले अवकाशयान तशाच मोडक्यातोडक्या अवस्थेत, स्वत:ला प्राणवायूचा पुरवठा कमी होत असता व कमालीची थंडी वाजत असता आणि शिवाय कुठल्याही क्षणी मृत्यू सामोरा येईल ही भीती सतत सतावत असताना, खंबरीपणे पुनश्च पृथ्वीवर ज्या वीरांनी सुखरूप परत आणले तो प्रयोग जगात अचाट तर होताच, पण ह्यूस्टन केन्द्राला नवीनही होता. फ्रँक बोरमन म्हणतो त्याप्रमाणे ' अपोलो तेरा ' ने अवकाशयात्रा कशी सहजी बदलवता येते हे सिद्ध केले आहे. राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी ' मेडल ऑफ फ्रीडम ' ह्या पदव्या सर्वश्री लॉव्हेल, हेस आणि स्वायगर्ट यांना बहाल केल्यात यात खरेखुरे रसिक औचित्य आहे ! सन्मान सन्मान म्हणतात तो हाच. गेल्या लेखाच्या शेवटी ' अपोलो तेरा ' या अवकाशयानाला अपघात झाल्याची बातमी दिली होती. त्या वेळी त्यांचे पृथ्वीवर परतणे अशक्यप्राय वाटत होते. किंबहुना शुक्रवार दि. १७

एप्रिल १९७० रोजी सायंकाळी सात वाजता ( ब्रिटिश प्रमाणवेला ) त्यांनी साऊथ पॅसिफिकमध्ये सुखरूप डुबी मारेपर्यंत सर्वच गोष्टी अनिश्चित होत्या. आता ' अपोलो तेरा ' चे वीर परतले आहेत. एक अरिष्ट टळले आहे. त्याच्याजवळ चंद्रलोकीची मृत्तिका नाही पण भरपूर अनुभव आहे. म्हणूनच ते जगन्मित्र झालेत. त्यांच्या सुखरूप परत येण्यामुळे गेला शनिवार हा अमेरिकेत सर्वत्र प्रे. निक्सन यांनी आभारप्रदानाचा व प्रार्थनेचा दिवस म्हणून पाळला जावा असे आपुलकीचे आवाहन केले. त्या तीन शूर व्यक्तींविषयी लिहिणे यात लेखकाचाच गौरव आहे !

अपोलो तेरा किती उन्मेषाने चंद्राकडे निघाले होते. आयत्या वेळी गडीबदल होऊनही सारे कसे व्यवस्थित चालू होते. बिचारा थॉमस मॅटिंग्ली ह्यूस्टनच्या अवकाशकेंद्रात चंद्रयानाच्या पराक्रमाची कथा ऐकत, आपला गोवर ( German Measle ) पूर्ण बाहेर केव्हा पडतो याची वाट बघत होता. निघायच्या वेळी आजारी पडल्याने त्याला चंद्राकडे उड्डाण करणे अशक्य झाले. एका वार्ताहराने त्याला त्याच्या मनःस्थितीविषयी प्रश्न केला असता तो म्हणाला, ' मला अपोलो तेरा ' च्या कार्यक्रमात सहभागी होता आले नाही म्हणून वाईट अर्थातच वाटते. परंतु मी जर ह्यूस्टन केन्द्राचा संचालक असतो तर अशा प्रसंगी हाच निर्णय घेतला असता. ' जे जे वीर चंद्रारोहणाच्या मोहिमेकरता निवडले जातात त्यांची केवळ त्याविषयीची शास्त्रीय पारंगता व अंतराळ भ्रमणाचा अनुभव इतक्याच गोष्टींचा विचार केला जात नाही तर खंबीर आणि थोर मनाची ही मंडळी असावी लागतात. त्यांच्या अंतरंगी नाना कळा असतात. नाहीतर नील आर्मस्ट्राँगसारख्या चंद्रभूमीवर पहिला पदन्यास करणार मानव ' जितम् मया, जितम् मया ' करून वेड्यासारखा नाचला असता व सगळाच घोटाळा झाला असता. म्हणून कार्यपूर्तीनंतर अत्युच्च आनंदाच्या प्रसंगी अथवा विघ्नसमयी घोर निराशा दिसत असता मॅटिंग्लीसारखे अंतराळ प्रवासी स्थितप्रज्ञ राहतात ! मॅटिंग्ली खाली राह्यला व स्वायगर्ट वर उडाला. अंतराळात भ्रमंती करणारा तो पहिलाच ब्रह्मचारी. त्याची बहीण कौतुकाने सांगायची की तो फ्रीजमध्ये लेमोनेडचे डबे ऑरेंजच्या शरबताच्या डब्यापुढे रांगेने लावून ठेवायचा. कारण सांगायचा की L हा शब्द O च्या अगोदर येतो म्हणून ही मांडणी ! त्याच दृष्टिकोणातून सर्वत्र पाहणारा जॅक स्वायगर्ट अपोलो तेराचे ' ओडिसी ' नामाभिधान दिलेले मुख्य यान ( कमांड मॉड्यूल ) कौशल्याने चालवत होता. त्याची अंतराळात जाण्याची ही पहिलीच खेप. जिम लॉव्हेल हा ह्या संपूर्ण कामगिरीचा मुख्य संचालक. त्याला अवकाशात परिकम्मा करण्याचे खास वेड. आत्तापर्यंत त्याने ५७२ तास आणि दहा मिनिटे अंतराळात भटकन्ती केलेली होती. तरीही ह्या शेवटल्या उड्डाणाच्या वेळी तो चंद्रमंडळी जायला तितकाच उत्सुक होता. लहानपणी बंदुकीच्या दारूचा उपयोग करून लुटुपुटीचे रॉकेट बनविताना स्फोट होऊन तो चिक्कार भाजला होता. परंतु वयाच्या

बेचाळिसाव्या वर्षीही त्याची चंद्रावर जायची इच्छा दुर्दम्य होती. फ्रेड हेस हा चंद्रवाहनाचा ( लूनर मॉड्यूल ) कप्तान होता. नासामधील सर्व अंतराळवीरांमध्ये ती एक निष्ठावान व्यक्ती आहे. त्याचीही आसक्ती काही और आहे. वयाच्या पासष्ट वर्षांपर्यंत ह्यूस्टनमध्ये काम करण्याची त्याची मनीषा आहे.

शनिवार दि. ११ एप्रिलला केप केनेडीहून अपोलो तेरा सरसर करीत वर उडाले. त्या वेळी तो अजब चमत्कार पाहायला पश्चिम जर्मनीचे चॅन्सेलर श्री. विली ब्रँट हे हजर होते. त्यांच्या उपस्थितीची जाणीव ठेवून त्या वेळी प्रसंगोचित भाषण करताना उपराष्ट्राध्यक्ष श्री. ॲग्न्यू म्हणाले, ' मी अशी कितीतरी अंतराळयाने झेपावत वर वर जाताना पाहिली आहेत. परंतु प्रत्येक वेळी मी त्या दृश्याने अधिकाधिक थक्क होतो. आज चॅन्सेलर विली ब्रँट इथे सांगाती आहेत. त्यांना मी इतकेच सांगतो की अंतराळयात्रेच्या या अद्‌भुत व अचाट यज्ञात त्यांच्या देशाच्या अनेक माणसांनी प्रत्यही हातभार लावणे चालू ठेवले आहे. ' वस्तुस्थिती अशी आहे की अमेरिका व रशिया या दोन्ही देशांच्या चंद्रप्राप्तीच्या यत्नात बहुतांश जर्मन लोक नोकरीस आहेत. श्री. ॲग्न्यू यांच्या जर्मनांविषयीच्या उल्लेखावरून एक गंमतीदार विनोद आठवतो. एक रशियन मनुष्य अमेरिकन माणसाला आपल्या देशाच्या अवकाशकेंद्राची माहिती देताना गर्वाने म्हणतो, ' आमच्या अवकाशकेंद्रातील जर्मन लोक तुमच्या जर्मन लोकांपेक्षा अधिक हुषार आहेत ! ' काही का असेना, रशियन अवकाशयाने चंद्रावर सुखरूप पोहोचली जरी नसली तरी त्यांचेही प्रयत्न तितकेच महत्त्वाचे आहेत, हे सत्य आपणच काय परंतु पहिला चंद्रमानव नील आर्मस्ट्रांगसुद्धा मनमोकळेपणाने कबूल करतो. ' अपोलो तेरा ' पृथ्वीकडे ( आर्मस्ट्राँगच्या शब्दात The good Earth ! ) परत यायला निघाले तेव्हा पॅसिफिक महासागरात पंतप्रधान कोसिजीन यांनी त्यांच्या सुटकेकरता दोन सुसज्ज जहाजे पाठविली होती. ही बातमी फारच महत्त्वाची आहे. त्याच वेळी ब्रिटनची जहाजे मात्र हिंदी महासागरात ' अपोलो तेरा ' आकाशात कुठे दिसते का याची वाट बघत होती ! ' अपोलो तेरा ' अंतराळात धीमेपणाने चंद्राकडे जाण्यासाठी वाटचाल करीत असता ती बातमी ' प्रावदा ' च्या आतल्या पानावर फक्त दोन छोट्या परिच्छेदांत समाविष्ट होती. परंतु रशियाला अमेरिकेचा दुष्टावाच जर ह्याबाबतीत करायचा असता तर नंतर अपोलो तेराच्या अपघाताची व माघारीची हकीगत त्यांना रकाने भरभरून ' अपोलो तेराचे ' ' तीन तेरा ' वाजले ' अशा ' आत्रेय ' पद्धतीने देता आली असती. परंतु प्रत्यक्षात त्या दु:खद घटनेचे पडसादही ' प्रावदात ' तितकेच त्रोटक होते, हे विसरता कामा नये.

अग्निबाण चंदामामाच्या घरी मोठ्या उत्सुकतेने जात होता. सर्व काही सुरळीत चालले होते. योजना निर्विवाद अचूक होती. प्रवासात कुठेसी मार्गदुरुस्ती ( Midcourse Correction ) लागली नाही. जिम लाव्हेल व फ्रेड हेस त्यावेळी त्या गूढरम्य

चंद्रमंडळाची स्वप्ने रंगवीत असतील. चंद्रावरील डोंगरांवर एक मैलाची अद्‌भुत रपेट कशी काय होईल हाच विचार त्यांच्या मनात प्रबळ असेल. त्या खडकाळ प्रदेशाविषयीचे अनोखे आकर्षण त्यांना त्या वेळी भंडावत असेल. निरनिराळी सुंदर छायाचित्रे घेण्याची त्यांची मनात योजना चालली असेल. जेवण्याच्या वेळी जिम लाव्हेल खालती पृथ्वीवर ह्यूस्टनशी बोलणे करीत होता व गंमतीदार विनोदाची पखरण करीत होता. प्रत्यक्ष अपघात होण्याअगोदर नऊ तास लॉव्हेलने खोटे खोटेच घाबरल्याचे दाखविले आणि ह्यूस्टन केंद्रानेही खेळीमेळीने त्याला ' उगीउगी ' केले होते. पण प्रत्यक्षात तो अपघात व्हायचाच होता. पृथ्वीपासून २०५,००० मैलावर असताना तो कटू प्रसंग घडला. अवकाशयानाच्या सर्व्हिस मॉड्यूलवर काहीतरी आदळले. त्यावर कोणाची टक्कर झाली हा प्रश्न अजून अज्ञात आहे. मोडलेल्या सर्व्हिस मॉड्यूलची चित्रे लॉव्हेलने पृथ्वीवर परत आणली आहेत व आता केंद्रस्थानी संशोधन चालू आहे. परंतु अजून त्या परक्या वैऱ्याचा पत्ता लागलेला नाही, का तो उल्कापात होता ? एखाद्या ग्रहाचा छोटासा निखळलेला कण तर मुसंडी मारून गेला नाही ना ? शास्त्रज्ञांच्या मते ही शक्यता हजारात एकाने आहे. बहुधा ऑक्सिजनच्या सहवासात दुसऱ्या एखाद्या वायूचा अंश जाऊन तो स्फोट पावल्याने अपघात घडला असावा. त्या प्रस्फोटामुळे अवकाशयानातील प्राणवायूचा एक कुंभ फुटला. वातावरणविरहित अवकाशात त्या प्राणवायूचे असंख्य अणुपरमाणू लुप्त झाले. फाटलेल्या भगदाडातून चिरफाळ्या झालेल्या कवचाची लक्तरे उडू लागली. हाच तो दुर्दैवी क्षण की ज्यामुळे पृथ्वीवरील केंद्राकडे जिम लॉव्हेलला आता खरोखरीच संदेश पाठवावा लागला- Hey, we have got a problem here ! आणि मग ' अपोलो तेरा ' आणि ह्यूस्टन यांची भराभर जुगलबंदी सुरू झाली. त्या प्राणवायूचे उपयोग तरी अवकाशयानात किती प्रकारचे होते. दोन कुंभांमध्ये अतिशय दाटीवाटीने भरलेला द्रवरूप प्राणवायू त्याच्यावरील अत्युच्च दाबामुळे भयंकर स्फोटक होण्याची शक्यता असते. दोन कवच असलेल्या कुंभातील तो प्राणवायू केवळ त्या तीन मुसाफिरांना श्वसनाकरताच उपयोगी पडणारा नव्हता, तर अग्निबाणाच्या विद्युत्‌ज्वलनाकरता इंधन म्हणूनही तो वापरला जायचा. हैड्रोजनशी संयोग पावून त्याच्यापासून घुटका घुटका पाणी त्या त्रयींना मिळत होते. व प्रत्येक टप्प्याच्या ज्वलनामुळे व घर्षणामुळे रॉकेटमध्ये उत्पन्न होणारी उष्णता निववण्याकरताही त्या ऑक्सिजनची मदत होत होती. अशा प्रकारच्या चार कामगिऱ्या करणाऱ्या प्राणवायूच्या दोन टँकपैकी एक फुटल्याने सर्वच घोटाळा झाला. इंधन श्वसन व जलप्राशन यांना पुरेसा प्राणवायू शिल्लक न राह्यल्याने चंद्रावर उतरण्याची मोहिम रद्द करावी लागली. परतीची आज्ञा झाली. व आता परत येताना त्या उरलेल्या प्राणवायूचा काळजीपूर्वक चाटून पुसून उपयोग करणे क्रमप्राप्त होते. अशा प्रकारचा गंभीर प्रसंग ह्यापूर्वी अपोलोच्या इतिहासात आला नव्हता. त्या अपघातानंतर अग्निबाणातील ते तीनही

यात्री व ह्यूस्टनचे अवघे शास्त्रज्ञ डोळ्यांत तेल घालून प्रत्येक क्षण, काळजीपूर्वक तपासत होते. फ्लाइट डिरेक्टर ग्लिन् लूनी, केन मॅटिंग्ली, रॉबर्ट गिलरूथ व युजिन क्रांटझ् व त्याचे पंधरा हस्तक यांच्या प्रयत्नांची कमाल होती. ह्यूस्टनने वारंवार बजावूनही त्यानंतर जिम लॉव्हेलने झोप अशी क्वचितच घेतली. आता त्या प्रेमळ भूवर सुखरूप परत जाणे ही एकच चिंता त्यांना होती.

'अपोलो तेरा' ह्या अग्निबाणाचे तीन मुख्य भाग होते : १-सर्व्हिस मॉड्यूल, २-कमांड मॉड्यूल आणि ३-लूनर मॉड्यूल. सर्व्हिस मॉड्यूल सर्वांत मोठे व सर्व यंत्रसामग्रीने भरलेले. कमांड मॉड्यूलमधून सर्व प्रवासाची जबाबदारी. तेच मॉड्यूल शेवटी नेहमी पृथ्वीवर परत येते. लूनर मॉड्यूल अर्थात चंद्रवाहन. चंद्रावर उतरण्याकरता वापरण्यात येणारे. सर्व्हिस मॉड्यूलला अपघात झाला. ऑक्सिजनचा तुटवडा, इंधनाची कमतरता. स्वायगर्टचे पाय दोन दिवस ओले होते. वीज कमी वापरावी म्हणून त्यांनी आत अंधार केला. अपघाताच्या क्षणापासून त्या तिघा यात्रींची मन:स्थिती किती समतोल होती हे नंतरच्या त्यांच्या ह्यूस्टनशी झालेल्या बोलण्यावरून लक्षात येते. योगायोग पाहा, शुक्रवारी पहाटे दोन वाजता केंद्रातून मॅटिंग्लो ( ज्याचा गोवर शेवटपर्यंत दृश्य स्वरूपात आलाच नाही ) वर चंद्रयानात बसलेल्या स्वायगर्टला परतीच्या प्रवासाच्या सूचना ( Check list ) पूर्ण दोन तास व सात मिनिटे देत होता. शेवटी त्याने स्वायगर्टला विचारले, 'Are you happy with the check list?' आणि वरतून स्वायगर्टही आत्मविश्वासपूर्वक उत्तरला, 'Tomorrow is the Examination time'. मग हेसलाही त्याच सूचना, तीच आखणी अन् तोच मार्गक्रम सांगण्यात आला. स्वायगर्ट व हेसला अभ्यासाचा खुराक चालू असता लॉव्हेलची झोपायची वेळ होती. पण हा स्थितप्रज्ञ त्या वेळी जागाच होता. आपल्या साथीदारांना ह्यूस्टन फारच डोकेदुखी देतेय म्हणून जिम त्रासला होता व त्याने सवाल केला, 'What are all these steps, if it burns up ( in the atmosphere ) in half an hour?' त्यावर केंद्राकडूनही तसाच गमतीदार जबाब आला,। 'Big city thought you were asleep !'

मग जिम लॉव्हेलला झोप लागावी म्हणून गुंगी येण्याकरता ह्यूस्टनमधून गिटारवर मंजूळ सूर ऐकवू लागले. प्राणसंकट आले तरी तिघांची विनोदबुद्धी जागृत होतीच पृथ्वीकडील परतीच्या प्रवासात जिन लॉव्हेल काय म्हणतो पाहा, 'I am looking freight at the Earth now and it is morning like a fright train. I am also looking at FraMauro' (his scheduled landing site on the moon) त्यावर खालतून एक गमतीदार वाक्य फेकले गेले. 'You are going the wrong way son !' प्रवास चालूच होता. अप्राप्य चंद्रावरील डोंगरांकडे पाहात व जवळ येणाऱ्या प्रेमळ पृथ्वीकडे जात. मधूनच ते एखादा जवळील तारा

ह्यूस्टनला सांगत मग मार्गक्रमणाबरोबर चालल्याची पावती खालून मिळे. शेवटी शुक्रवारी २-२३ वाजता सर्व्हिस मॉड्यूलचे कमांड मॉड्यूलला लावलेले बोल्ट काढून ते हलकेच अंतरिक्षात सोडून देण्यात आले. संथगतीने मागे पडत चाललेल्या सर्व्हिस मॉड्यूलच्या जखमी भागाचे लॉव्हेलने फोटो काढले. त्या वेळी तो म्हणाला, It is really a mess ! ' जणू त्या पंख तुटलेल्या मरणोन्मुख जटायूला त्यांनी मूठमातीच दिली ! सर्वांत दु:खद क्षण होता. लूनर मॉड्यूल जेव्हा विभक्त झाले त्या वेळी. त्या वाहनाने लॉव्हेल व हेस यांना चंद्राची धूळ मस्तकी लावू दिली नाही. परंतु त्याच्यातील न वापरलेल्या विद्युत्शक्तीचा उपयोग करूनच ते आतापर्यंत वाचलेले होते. आता प्रत्यक्ष ते चंद्रवाहनच अंतराळाच्या विस्तीर्ण पोकळीत गडप होत होते. कुठे जाईल ते? सायंकाळी ५.४३ ला कमांड मॉड्यूलपासून ते सुटावल्यावर जिम म्हणाला Farewell Aquarius and thank you. ' तरंगणाऱ्या त्या अलग झालेल्या चंद्रवाहनाला उद्देशून स्वायगर्ट म्हणाला, She sure was a good ship ! ' त्याच वेळी पृथ्वीकेंद्रातूनही आवंढा गिळला गेला. ' The age of Aquarius has ended ! '

आता उरलेला सव्वा तासाचा प्रवास केवळ कमांड मॉड्यूलमधून होत होता.

' अपोलो तेरा ' चा सांगता समारंभ साऊथ पॅसिफिकमध्ये शुक्रवार दिनांक सतरा एप्रिल सत्तर रोजी झाला. आम्हाला सर्व दृश्य टेलिव्हिजनवर पाह्यला मिळाले. नाहीतर ज्या ज्या वेळी अवकाशयाने चंद्राकडे व चंद्रावर गेली तेव्हा तमसातटाकी नेत्रांनी दिवाळी अनुभवली. डोळे चुरचुरत असता भल्या पहाटे अभ्यंगस्नानाला उठण्याची जी अवीट गोडी असते तीच गोडी, तोच उत्साह, सकाळी कधी नव्हे त्या वेळी, टेलिव्हिजनवर अपोलोच्या झेपेची इतिवृत्ते पाहण्यात व ऐकण्यात होता. ' अपोलो अकरा ' प्रत्यक्ष चंद्रावर जेव्हा उतरले त्या वेळी आम्ही सर्वांनी रात्र जागून त्या अज्ञात चंद्रलोकावरची प्रत्यक्ष (Live) चलत् छायाचित्रे पाह्यली: चंद्रमुसाफिरांची हालचाल जोखली. त्यांचे पृथ्वीकेंद्राशी (Ground control) चाललेले हितगुज ऐकले. तो प्रसंग न्यारा होता. तो चंद्रदर्शनाचा प्रथमानुभव ' मधुचंद्रा ' पेक्षा और होता. पण तो विजय होता. आणि आता ' अपोलो तेरा ' चे पुनरागमन पराजयाच्या भावनेने भरलेले जरी असले तरी त्यात ' मारिता मारिता झुंजेन ' म्हणत यशस्वी माघार घेऊन आलेल्या जमखी पराक्रमी शौर्याचा वारसा होता. ते येणेही आम्ही तितक्याच उत्सुकतेने पाहिले. त्यात अपार अपुलकी होती. पृथ्वीच्या अगदी जवळ आल्यावर गुरुत्वाकर्षण सीमेत पोहोचताना अपोलो तेराची कसोटी होती. जगातील प्रत्येकजण त्यांच्या सुखरूप येण्याबद्दल परमेशाजवळ प्रार्थना करीत होता. त्या घातवारी मंगळवारपासून जिम लॉव्हेलची ' मेरिलिन ' व फ्रेड हेसची ' मेरी ' जणू गणपतीला पाण्यात घालून बसल्या होत्या. त्या दोघी गरोदर आहेत. तशा परिस्थितीत त्यांनी मन:स्थिती आपल्या नवऱ्यांप्रमाणे समतोल राखली.

निक्सनसाहेबांनी त्यांना 'राणी झाशी पदक' बहाल करायला हवे होते. जॅक स्वायगर्ट बिचारा अविवाहित. त्याचे वृद्ध आईवडील डोळ्यांत प्राण आणून एकेक वार्ता ऐकत होते.

'अपोलो तेरा' चा अग्निबाण परतीच्या प्रवासात वेगाने पृथ्वीकडे झेपावत होता. पृथ्वीच्या कक्षेत शिरतानाचा कोन जर आखून दिलेल्या ६.५ कोनापेक्षा कमी झाला असता तर तिघेहीजण पुन: अंतरिक्षात भटकत राहिले असते. मग त्यांचे पृथ्वीवर येणे केवळ अशक्य होते. अपेक्षित कोनापेक्षा जर जास्त वक्र दिशेने ते पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणात शिरले असते तर त्यांचा पृथ्वीच्या पाठीवर आदळून चक्काचूर झाला असता. साऊथ पॅसिफिकमध्ये सूर मारण्याच्या ( Splash down ) अगोदर आठ मिनिटे ते पृथ्वीकक्षेत शिरले. गुरुत्वाकर्षणामुळे त्यांचा वेग ताशी २४,००० मैल झाला. प्रचंड वेगामुळे ५००० डिग्रीची उष्णता तयार झाली व परिणामी त्यांचा ठरल्याप्रमाणे चार मिनिटे पृथ्वीवरचा संपर्क तुटला. ( Radio Blackout ) कोणताही अग्निबाण परत येताना हाच आणीबाणीचा अंतिम क्षण असतो. त्या वेळी पृथ्वीकक्षेत ते अचूकरीत्या शिरलेत किंवा नाही हे कुणालाच कळणे शक्य नसते. चार मिनिटांनंतर पुन: संपर्क सुरू झाला तर समजायचे की वाचले ! टेलिव्हिजनवर दिसणारी ह्यूस्टन केंद्रातील मंडळी खरी आहेत की मेणाची आहेत असा संभ्रम पडावा, इतकी स्तब्ध बसली होती. टी.व्ही. बघणारेही स्वत:च्या आसनाला खिळून त्या चार मिनिटांतून निखळणारे एकेक सेकंद मोजत होते. इवोजिमा जहाजावरील टेलिव्हिजन कॅमेरे आकाशाकडे तोंड करून चित्रण करीत होते. तीन सुसज्ज हेलिकॉप्टर्स पाण्यावर एखाद्या स्थिर माशाप्रमाणे घोटाळत होती. आणि अचानक 'डुबीला' चार मिनिटे उरली असता उंच आकाशातून कमांड मॉड्यूल खाली येताना दिसले. तीन सुंदर लालपांढरी पॅरॅश्यूटस् त्याच्या डोक्यावर उघडलेली होती. त्या फुगीर छत्र्याकडे यानाचा वेग क्षणोक्षणी कमी होत होता. मोठ्या दिमाखाने ते निळ्या क्षितिजाच्या पार्श्वभूमीवर रुपेरी करड्या ढंगाच्या मधून खालती उतरत होतो. —

आता सगळ्यांनीच नि:श्वास सोडलाय्. ह्यूस्टन केंद्रातील पुतळे हलचाल करू लागलेत. त्यांच्यासमोरील भव्य पडद्यावर त्यांना पॅरॅश्यूटच्या साह्याने खालती उतरणारे चंद्रयान दिसते आहे. आनंद व्यक्त करण्यासाठी त्यांनी चिरूट पेटवून टाळ्यांचा गजर केलाय. चंद्रयान इवोजिमा बोटीपासून चार मैल अंतरावर आहे. सहायक विमानात ( Recovery Helicopter ) ह्या वेळी मुद्दामहून टी.व्ही. कॅमेरा बसविल्याने पाण्याकडे सूर मारणारे यान अगदी जवळून सुस्पष्ट दिसतेय. महासागराच्या लाटा केवळ तीन-चार फूटच वर उचंबळताहेत. जणू अवकाशयानाला धक्का पोहचू नये म्हणून विशाल सागरही शांत बनलाय. तिथे पहाटेची सुंदर हवा खेळते आहे. जिम लॉव्हेलचा 'OK Joe we are in fine shape' हा सदेश खूपच हायसे वाटू देतोय. ब्रिटिश प्रमाण वेळेप्रमाणे सायंकाळी बरोबर ७ वाजून ७.४५ सेकंदाने अवकाशयान डौलाने पाण्यावर हलकेच

उतरते आहे. नंतरच्या घटना किती जलद गतीने घडल्या. हेलिकॉप्टरमधून जलपटूंनी भराभर पाण्यात उड्या मारल्या. त्यांच्या अंगावरील खास कातडी कपडे व इतर आयुधे यांचे ओझेच त्यांच्या स्वतःच्या वजनापेक्षा अधिक आहे. त्यांनी पाण्यात तरंगणाऱ्या यानाभोवती रबरी कडे (Floating Collar) लावले. मग वरतून तरंगता तराफा (Raft) टाकला गेला. तो यानाला बांधला. अर्नी जॅकी या जलपटूने यानाचा दरवाजा उघडला. तीनही अवकाशवीरांना, ते चंद्रावर पोहोचले नसल्याने क्वारंटाईनमध्ये ठेवण्याची गरज नव्हती. त्यामुळे स्वायगर्ट, हेस व मग लॉव्हेल या क्रमाने ते तिघेही पांढरेशुभ्र कपडे व टोप्या घालून रबरी तराफ्यात उतरले. पाच दिवस बावीस तास आणि पंचावन्न मिनिटांनी त्या संकुचित जागेतून पुनः टवटवीत वातावरणात उघड्या सागरपृष्ठावर आल्यावर त्यांना किती उत्साही वाटले असेल. नाहीतरी त्या कटू अपघातानंतरचे साडेतीन दिवस त्यांनी कुठल्या मनःस्थितीत काढले असतील कोण जाणे! पस्तीस मिनिटांच्या छोट्या अवधीत त्यांना चंद्रयानाच्या बाहेरही काढले. ह्या वेळची सुटका फारच त्वरित करण्यात आली होती. आकाशात उभ्या असलेल्या हेलिकॉप्टरमधून जाळे सोडून एकेक वीर वर घेण्यात आला. जलदीने ते हेलिकॉप्टर दुसऱ्या संरक्षक हेलिकॉप्टरच्या संगतीने इवोजिमा जहाजावर पोहोचलेही. मग लाल गालीचा अंथरला गेला. हेलिकॉप्टरचा दरवाजा उघडताच नासाचा प्रतिनिधी शिडी चढून वर गेला. त्याने हस्तांदोलन करून त्या त्रयीचे स्वागत तथा अभिनंदन केले. ते शिडी उतरून रेड कार्पेटवर पाय ठेवताच घोषाचा (बँड) मंजूळ नाद झाला. तिघेही हसताहेत. जिम लॉव्हेलची दाढी वाढलीय्. बिचाऱ्याचे वजन सात दिवसांत चौदा पौंडांनी घटले. बाकीच्या दोघांनी मात्र चेहरे तुकतुकीत करून घेतलेत. त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यावरून एकच भाव ओसंडतोय् की उद्या जरी पुन्हा चंद्रावर जायला सांगितले तरी आम्ही तयार आहोत. ते तिघेही अंतरिक्षात संकटात सापडले असता, ह्यूस्टनला अपोलो आठचा पराक्रमी फ्रँक बोरमन सांगत होता की, 'ह्या अघटित प्रकारामुळे इतर आकाशवीरांच्या मनोवृत्तीत यत्किंचितही फरक पडणार नाही. हे सतीचे वाण स्वतःहून स्वीकारलेले वीर कचखाऊ वृत्तीचे कधीच नसतात.' फिनिक्स पक्ष्याप्रमाणे अवकाशातून पुन्हा जन्म घेऊन ते वीर पुनश्च दुर्दम्य आशावादाने खडे आहेत. 'अपोलो तेरा' च्या त्रयींची ही त्रोटकगाथा आहे!

■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९८८
दिनांक २५.९.६३
२१।११।९६
शाखा (स्थळ प्रत)

६

# पंगुं लंघयते गिरिम्

अन्बीटन ट्रॅक ही आर्थर टार्नव्हस्की नावाच्या तरुणाने केलेल्या परिक्रमेची गाथा आहे. 'पंगुं लंघयते गिरिम्' चा हे पुस्तक केवळ साक्षात्कार आहे. जगातले दु:ख पाहण्याकरिता वणवण हिंडणाऱ्या आर्थरची ही चालती-बोलती 'जीवनी' आहे. अर्थात नुसतं दु:ख पाहून हळहळीने नक्राश्रू ढाळण्याचा हा आर्थरचा पश्चिमी शौक नव्हे. त्याच्याजवळ योजना आहे. ती भारतात त्याने अंमलात आणली आहे. ऐन तारुण्यात पोलिओने पाय निकामी झालेला आर्थर टार्नव्हस्की. त्याची पूर्वीपासूनची इच्छा होती-भारत देश पाहायची, आशिया खंडात भ्रमन्ती करायची! त्याप्रमाणे त्याने एकदा चक्कर लावलीही आणि परतताना वाटेत त्याला पोलिओ झाला. त्यानंतरची काही वर्षे पुनश्च धडधाकट बनण्याचा आर्थरचा अट्टाहास चालू होता. पण दुर्दैवाने चाकाच्या खुर्चीशी नियतीने घालून दिलेली आर्थरची सांगड सुटण्याचे चिन्ह दिसेना. शेवटी अगदीच निरुपाय झाल्यावर आर्थरने तशाही परिस्थितीत सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे वागायचे ठरवून, असामान्य कर्तृत्व करण्याचा चंग बांधला!

आर्थर टार्नव्हस्की १९३० मध्ये पोलंड देशात जन्मला. त्याला बाळगुटी पाजली त्याच्या आईने चांदीच्या चमच्याने, रुपेरी वाटीतून, आई कौंटेस होती. घरात सुबत्ता होती. पण ती काही वर्षेच. दुसरे महायुद्ध आले. पोलंडवर जर्मन-रशियनांचा लोखंडी पंजा पडला. लोकांची ससेहोलपट झाली. त्या वाताहतीच्या कृष्णकटू आठवणी आर्थरने संयमाने लिहिल्या आहेत. दुःख सांगण्याचीही त्याची एक विशिष्ट पद्धती आहे. त्यात कुठेही आक्रस्ताळेपणा नाही, कांगावा नाही, आरडाओरडा तर अजिबात नाही. पोलंडमधून आईचा हात धरून केलेले ते यशस्वी पलायन, त्यातलं ' थ्रिल ' आर्थरनं हसत-खेळत सांगितलं आहे. त्यानंतर त्याचं वास्तव्य असतं लंडनमध्ये–फक्त जेव्हा प्रवास नसेल तेव्हाच. कारण देशपर्यटन करण्याची त्याला अतीव ओढ आहे. तिच्या पोटी त्याने इंडिया ऑफिस लायब्ररीतली जाडीजुडी ' रेकॉर्डस् ' पालथी घातली. भारताविषयी आर्थरला जितकी बारीकसारीक माहिती आहे तितकी तुम्हा आम्हा भारतीयांना क्वचित असावी ! सौ. साधनाताई आमटे त्याची एक आठवण सांगतात- आर्थर एकदा विशाखापट्टमला गेला. तिथल्या सरकारी गॅझेटमध्ये एका विशिष्ट दिवशी रेड्याच्या झुंजी होतात, असा उल्लेख होता. प्रत्यक्षात रेड्याच्या झुंजी बंद होऊन कितीतरी वर्षे झालेली. मग आर्थर तिथल्या कलेक्टरशी भांडला- गॅझेटस् ' अपटुडेट ' का ठेवीत नाही म्हणून ! अर्थात अशा कितीतरी आठवणी !

पहिल्यांदा आर्थर घराबाहेर पडला तेव्हा त्याच्या आईला व सावत्र वडिलांना काळजी वाटली. जवळ पुरेसे पैसे नव्हते. कारण सर्वसामान्य माणसाप्रमाणे त्या त्या गावी चटणी-भाकरी खायची व समाज बघायचा ही प्रवासामागची कल्पना. टर्कीपर्यंत ' हिचहायकींग ' करीत हिंडला. भारतातही जाऊन आला. परतत असता तो काळा दिवस बालीला बोटीवर उगवला. पायांतलं त्राण गेलं. सपाटून ताप भरला. त्यानंतर कमरेखालचा भाग लुळा पडला तो कायमचा. आपण पोलिओला बळी पडलो ही कल्पना आर्थरला सहन होणे शक्य नव्हते. त्याही परिस्थितीत रखडत आर्थर लंडनला आई-वडिलांजवळ पोहोचला. लंडनच्या रुग्णालयात आर्थरने पोलिओच्या कैचीतून सुटण्याकरिता प्रयत्न केले. दुर्दैवाने ' फिझिऑथेरपी ' च्या प्रयत्नांतूनही गमावलेले पाय परत मिळाले नाहीत.

मात्र आर्थरची हिमालय बघायची आस निवलेली नव्हती. आता परिक्रमेच्या आसक्तीला, व्यथितांचे दुःख निवारण्याच्या ध्येयाची जोड मिळाली. पुढील आयुष्यातील आकांक्षांचे स्वप्न त्याने पुनः पुन्हा पाहिले. दीनदुबळ्यांना भेटायचे, त्यांच्या पुनर्वसनाची योजना अंमलात आणायची. मुके बोलके होतील, पांगळे पर्वतारोहण करतील, आंधळे सूर्य पाहतील अशी काही योजना. आर्थरच्या त्या योजनेला पाश्चात्त्य जगातून द्रव्यभार मिळाला. ब्रिटिश मोटरिंग कंपनीने त्याच्याकरिता एक खास गाडी

बनवून दिली. तिचं बारसं झालं. नाव–जिप्सी मॉथ ! दोन उत्साही, धडधाकट आंग्ल तरुण पाळीपाळीने प्रवासात सांगाती येण्याचे सांगून गेले–जेसलीन व ज्युलीयन. जीवनावश्यक सामग्रीने भरलेली ' जिप्सी मॉथ ' प्रयाणास सिद्ध झाली. युरोप खंडातले सर्व देश मागे पडले. अरब राष्ट्रे झाली. आशिया खंड तर सर्वांत प्यारा.

प्रत्येक ठिकाणी मदत मिळत होती. सरकारी वर्तुळातही आर्थरचा प्रभाव पडत होता. आपल्या साहाय्यार्थ धावून येणारी व्यक्ती आपल्यासारखीच रंजली-गांजलेली आहे हे पाहून पीडितांना धन्यता वाटे, जवळीक साधे. भारतात आर्थरने अनंत पाहिले, अपार अनुभवले. ते सर्व त्याने फोटो काढून टिपले- रंगीत फोटो. टाइपरायटरशी संधान जोडून पानेच्या पाने लिहून ठेवले. कितीतरी रुग्णालयांना भेटी दिल्या. सल्ला-विचारविनिमय झाला.

त्या आठवणी टाहो फोडायला लावणाऱ्या आहेत. एकेक आठवण आर्थरने सोप्या अकृत्रिम भाषेत ओवून ठेवली आहे. बालपणी अपंग झालेला पण तरीही पुन्हा चालण्याचे स्वप्न बघणारा तो मुंबईचा कोवळा मुलगा मारुती. शिवाजी हॉस्पिटलातून पळून जाणारा व स्वतःच्या जखमा रस्त्यावर उघड्या करून दाखवीत भीक मागणारा बनारसचा बोकाय... तेरा भावंडांतली जमखिंडीची एकाकी पांगळी उषा... पिठाच्या गिरणीत हात गमावलेला, मालकाच्या माजोरीपणामुळे हतबल होऊन रुग्णालयात खितपत पडलेला अलाहाबादचा राम व त्याची शरणार्थी बायकामुले... डॉक्टरी उपचाराला आचवलेली अस्पृश्य केरळीय महिला-कुमेरान ! या सगळ्यांचं दुःख दूर करायचं, त्यांना कामधंदा शिकवून मार्गाला लावायचं ' कसं ', ' केव्हा ', ' किती ' या ' क 'कारात गर्क असता लंडनहून आर्थरला आई गेल्याची तार येते.

ती भयाण बातमी तशीच पचवून आर्थर पुढे चाललाय–भारतीय संस्कृतीच्या असंख्य पाकळ्यांच्या कमलाचा गंध घेत ! मग त्या परिक्रमेमध्ये उत्तर हिंदुस्थानात होळी साजरी होते. आर्थर रंगपंचमीला न्हाऊन निघतो. अमरनाथची यात्रापण होते. कुणाच्या तरी पाठीवर हिमालय चढून. परततानाचा अपघात आर्थरने माणुसकीच्या गहिवरातून रंगवलेला आहे. जिप्सी मॉथ उतार उतरतेय. ज्युलियन सारथ्याचे काम कुशलतेने करीत असता, प्रथम एका चुकार बकरीला धक्का लागतो. काही झालेच नाही, असे दाखवीत ती टुणकन उडी मारून पळून जाते. मग एक कोंबडी चाकाखाली येते. मागच्या खिडकीतून आर्थरला तिची शेकडो पिसे उधळताना दिसतात. इजा-बिजा आता तिजा होणार का ? आर्थरच्या मनात अशुभ पाल चुकचुकते. इतक्यात धुक्यात कुणीतरी गाडीपाशी कोसळतं. मोटार थांबवून ज्युलियन उडी मारून धाव घेतो. एक आठ वर्षांची मुलगी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली... तिच्या हातांतलं भांडं लांब उडालेलं ! गर्दी जमते. तिला मोटारीत घालून हॉस्पिटलमध्ये नेल्यावर डॉक्टर म्हणाले, " ही बरी होईल. केवळ भीतीने

शुद्ध हरपली आहे. " मुलगी काही वेळाने हलती-बोलती झाल्यावर प्रश्न उभा राहतो, ते रक्त कुठून आले ? हिला कुठे खरचटलेसुद्धा नाही. दुसऱ्या दिवशी कुणीतरी खुलासा केला, हातातल्या वाडग्यातला कसलातरी लालभडक रस्सा सांडला होता म्हणून !

याच भ्रमन्तीत थोडासा अंधश्रद्धेचा भागही आटोपला जातो. जोधपूरजवळच्या लाम्बा नावाच्या खेडेगावात स्वतःच्या शारीरिक व्यंगावर कुणा जटाधारी मांत्रिकाकडून करवून घेतलेला जडीबुटीचा उपचार. कुणी गंगेत डुबी मारायला सांगितली. ' हर गंगे ' म्हणून तीही मारली. आर्थर सगळं मोकळेपणे लिहितो. त्याला विस्तवावरून चालायचे होते. पण एका मुख्य साधकाने तपश्चर्या नव्हती म्हणून मना केले. ती कानउघाडणीही त्याने न संकोचता लिहिलीय. वाटेत एक माणूस दिसला, झोपून स्वतःच्या शरीराने रस्ता मापत जाणारा. त्याला प्रयागच्या कुंभमेळ्याला जायचे होते. या सर्व प्रवासात ऑर्थरने जे जे मिळेल ते-ते खाल्ले. प्रसंगी पत्रावळीवर भोजनाचा सरंजाम थाटला. कारण भ्रमन्तीचा उद्देश केवळ पाहणे एवढाच नव्हता. ' टूरिस्ट ' म्हणून आर्थर भटकत नव्हता. पीडितांचे प्रश्न समजावून घेण्याकरता तो खटाटोप होता. भारतात, पाकिस्तानात, थायलंडमध्ये किंवा मध्य पूर्वेकडील देशांत सगळीकडेच अपंगत्वाविषयी दाट उदासीनता होती. ' ठीक आहे, आता काय करणार ! जे व्हायचं आहे ते का चुकणार ? ' ' भगवानका खेल ' ' अलाहकी दोह ' अशा नाना थंड प्रतिक्रिया. त्यांतून मार्ग काढून, दिलासा देऊन, अपंगांच्या आकांक्षांची क्षितिजं उंचावून त्यांना इतरांप्रमाणे जगायला लावायचे याविषयीच्या योजना आर्थर टार्नव्हस्की आखीत होता. त्या दृष्टीने पुनर्वसनाचे भारतात जे जे प्रयत्न चालू आहेत तिथे तिथे तो गेला. गुजरातेत फान्झा येथे अंधांना शिक्षण देण्याचा प्रकल्प त्याने पाहिला. केरळातील मेलकोट येथील अपंगांच्या ' करुणागृहा 'त तो राहिला.

असंच भटकता भटकता त्याला शोध लागला वरोरा गावच्या 'आनंदवना'चा ! बाबा आमटे सपत्नीक आनंदवनात महारोग्यांच्या जखमा धुताना पाहून आर्थर गहिवरला. जे इतके दिवस शोधीत होता ते गवसल्याचा त्याचा आनंद अपूर्व होता. ' अन्बीटन ट्रॅक '-मधली शेवटची दोन प्रकरणे बाबा आमटे यांच्या कुष्ठरोग्यांविषयीच्या कार्यावर आहेत. भारतात आतापर्यंत त्या कार्यावर अनेक ठिकाणी लिहिले गेले. आर्थरचे ' अन्बीटन ट्रॅक ' प्रसिद्ध झाल्यावर ' रीडर्स डायजेस्ट ' च्या संपादकांनी, त्यातली शेवटची दोन प्रकरणे रीडर्स डायजेस्टमध्ये ' बुक सप्लिमेंट ' स्वरूपात छापण्याकरिता दीड लाख रुपयांना विकत घेतली आहेत. अर्थात त्या पैशाचा विनियोग आर्थरने स्वतःकरिता केलेला नाही, हे उघडच. इतकेच कशाला, त्याने आपले मृत्युपत्रच बाबांच्या नावाने केले होते, जे बाबांनीच स्वतः फाडून टाकले ! आर्थर त्यानंतर ' आनंदवनात ' कितीदा तरी गेला. बाबांशी त्याने रात्ररात्र जागून चर्चा केली. त्यातून निर्माण झाले ' संधिनिकेतन ! '

शारीरिक अपूर्णता असलेल्या लोकांना कार्यशिक्षण देणारे विद्यालय. संधिनिकेतनच्या भिंती महारोग्यांकडून बांधल्या जात असताना, रणरणत्या उन्हात चटके देणाऱ्या लोखंडी चाकांच्या खुर्चीवर बसून विटा वाहण्याचे, चुना नेण्याचे आर्थरने काम केले. बाबा आमटे यांच्या साहाय्याने आर्थरची योजना संधिनिकेतनच्या स्वरूपात साकार झाली आहे.

'अन्बीटन ट्रॅक' हे आर्थर टार्नव्हस्कीचे पुस्तक विल्यम कॉलिन्स सन्स ॲन्ड कंपनी लिमि.ने नुकतेच प्रकाशित केले आहे. त्याच सुमारास, त्यातल्या दोन प्रकरणांचा कथानायक असलेले बाबा आमटे शल्यचिकित्सेकरता लंडनला यावेत हा एक योगायोगच म्हटला पाहिजे.

■

हा लेख प्रथम प्रसिद्ध होऊन चौदा वर्षे झाली. आर्थर टार्नव्हस्की अद्यापी पंगू अवस्थेत बाबा आमट्यांच्या आनंदवनात नियमाने जात असतो !

७

# जेव्हा पाण्याला आग लागते

खवळलेला समुद्र शांत झालाय. आतल्या वडवानलाशी स्पर्धा करणाऱ्या अन् आकाश ग्रासू पाहणाऱ्या संतप्त ज्वाला आता शांत झाल्या आहेत. एक नाट्यपर्व जवळजवळ संपले आहे. कारण खरोखरच पाण्याला आग लागली होती. नव्हे लावली होती. एका प्रचंड बोटीतून तेल गळू लागते काय, अन् त्यामुळे सबंध ब्रिटनमध्ये एकदम हलचाल सुरू होते काय! सगळेच और! आतापर्यंत अशा प्रकारचा विचित्र पेच कुठल्याच राष्ट्राच्या जीवनात घडला नव्हता. टोरी कॅनिअनमधून तेल गळू लागले आणि लगेच एका बातमीपर्वाला सुरुवात झाली.

टोरी कॅनिअन. एक मालवाहतूक करणारी अगडबंब बोट. युनिअन ऑईल कंपनी-कॅलिफोर्निया यांची ही बोट. ६,०००,००० पौंडांचा तिचा विमा उतरविला होता. १२०,००० टन क्रूड ऑईल घेऊन ती निघाली अन् इंग्लंडच्या नैर्ऋत्य दिशेला सिली बेटे अन् कॉर्नवॉल यांच्यामधील समुद्राच्या खडकात फसली. चिखलात गाडी रुतावी तशी. मागल्या बाजूने तेल गळू लागले, अन् बघता बघता आजूबाजूचे पाणी तपकिरी गालीचा

अंथरल्यासारखे झाले. क्षणोक्षणी रंग गडद होत होता, आणि ब्रिटनच्या नेत्यांवर काळजीची छटा दिसत होती. एखाद्या प्रचंड मृत व्हेल माशासारखी बोट अथांग सागरात शांत डुलत होती. बोटीवरला इटालियन कप्तान मात्र भीतीचा लवलेशही न बाळगता 'कोलंबसाचे गर्वगीत' आळवीत होता. फेसाळणाऱ्या खुल्या समुद्राकडे बघून मनातल्या मनात हसत होता. तिथून बोट आपल्याला लवकरच हालवता येईल याची त्याला खात्री होती. बोटीचे मालकही बोट नष्ट होऊ द्यायला तयार नव्हते. वायव्य दिशेकडून येणाऱ्या जोरदार वाऱ्यामुळे तेल समुद्रात उत्तरोत्तर मैलोगणती पसरत होते. हेच तेल जर किनाऱ्याला लागले, तर फारच भयंकर हानी होणार होती.

आणि झालेही तसेच. सिली बेटाच्या किनाऱ्यावर तेल पोहोचल्याची बातमी आली. कॉर्नवॉलच्या समुद्रात घुसलेल्या सोंडेभोवती तेलाचा विळखा पडला. समुद्रावर आनंदाने विहार करणारे पक्षी मलूल होऊन किनाऱ्यावरील वाळूवर रुग्णाईत झाले. आर.एस.पी.सी.ए. ची पथके तुरुंगातील कैद्यांना हाताशी धरून त्या दीन पक्ष्यांना स्नान घालण्याकरता सज्ज झाली. प्रश्न होता वाळूवर लाटांनी फेकल्या जाणाऱ्या तेलाचे काय करायचे ह्याचा. कारण बोटीभोवती परसलेल्या तेलावर आतापर्यंत कितीतरी गॅलन रसायनांचा वर्षाव करून ते तेल सत्त्वहीन करण्याचा खटाटोप झाला होता. ब्रिटिश पेट्रोलियम कंपनीने आपल्या गुदामांची दारे 'डिटर्जन्टस' चा भरपूर वापर करण्याकरता खुली केली होती. अर्थात समुद्रातील तेलावर रसायनाचा मारा म्हणजे केवळ 'दर्यामें खसखस'च ठरली. हेच ब्रिटिश पेट्रोलियम कंपनीचे 'डिटर्जन्ट' फ्लोरेन्सच्या पुरानंतर रस्त्यावरील तेलकट घाण साफ करण्याकरता गेल्या नोव्हेंबरमध्ये वापरले होते. किनारा सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने मात्र हे रसायन काम देत होते. ब्रिटनचे संरक्षणमंत्री श्री. हिली यांनी त्याकरता ठिकठिकाणच्या स्थानिक शासन विभागांना केंद्रीय तिजोरीतून ५०,००० पौंडांची रक्कम मंजूर केली. कॉर्नवॉलच्या किनाऱ्यावर ईस्टरच्या सुट्टीत सूर्यस्नानाची पर्वणी साधण्याकरता गेलेली मंडळी कंबरा कसून किनारे धुण्याच्या कामाला लागली. स्वयंपाकघरात 'कॅर्निश पॅस्ट्रि' करण्यात दंग झालेल्या कॉर्नवॉलच्या महिला सरकारी अधिकाऱ्यांची हाक ऐकताच हातात झाऱ्या घेऊन बाहेर पडल्या.

टोरी कॅनिअन मात्र समुद्रात शांत पहुडली होती. आजूबाजूला उडालेली गडबड पाहून तिला मौज वाटत असावी. बोटीतले उरलेले तेल दुसऱ्या बोटीत लांबच लांब पाईपाच्या साहाय्याने भरावे ही कल्पनाही फेटाळली गेली, आणि बोटीभोवती 'नो मॅन्स लॅंड (?)' घोषित करून इतर बोटींना टोरी कॅनिअन जवळून जाण्यास मज्जाव करण्यात आला. कारण पाण्यावर पसरलेल्या तेलाचा केव्हा भडका उडेल याची कुणालाच शाश्वती नव्हती. फोम रबराच्या प्रचंड पट्ट्यांनी बोट आवळून तिला फुटण्याच्या भीतीपासून मुक्त करावी याकरता कारखान्यात कामगारांनी इस्टरच्या सुट्टीतही स्वेच्छेने कामाला सुरुवात

केली. आता तेल तीस मैलांपेक्षा अधिक लांबवर पसरले होते. फ्रान्स व बेल्जिअम आपल्या किनाऱ्याला तेल केव्हाही पोहोचेल या शंकेने तयारीला लागले होते. ब्रिटनच्या किनाऱ्यावर दैनंदिन ८०,००० गॅलन ' डिटर्जन्ट 'चा वापर केला जात होता. लांबच्या किनाऱ्यावर तेल पोहोचू नये म्हणून प्लॅस्टिक कार्पेटचे ' बूम्स ' बांधून ' सेतुबंध ' चालू होता.

अजून बोटीचे मालक बोट जाळून टाकण्याच्या योजनेला मान्यता देण्यास तयार होत नव्हते. इंजिनरूममध्ये स्फोट होऊन टोरी कॅनिअन ओढण्याकरता दुसरी बोट घेऊन गेलेला एक बिचारा कप्तान मृत्युमुखी पडला. तरीही बोट कशी वाचविता येईल ह्याच हेतूने बोटीच्या मालकांना ग्रासले होते. प्रिमिअर विल्सन साहेब सिलीजवर ईस्टरची सुट्टी त्यांच्या कुत्र्यासह मजेने घालवीत असताच बोट फुटल्याची त्यांना बातमी मिळाली. प्रथम दोन व नंतर तीन तुकडे होऊन बोट पाण्यावर तरंगत होती. हेलिकॉप्टरवरून पंतप्रधान विल्सन यांनी पाहणी केली. आता बोट वाचविण्याचा प्रश्न उरलेला नव्हता. अधिक अंत बघण्याची कुणाचीही हिंमत नव्हती. शक्य तितक्या लवकर तेलाला आग लावण्याची गरज होती. परंतु हे क्रूड ऑईल किती झपाट्याने जळेल याची कुणालाच माहिती नव्हती. कारण असा प्रसंगच पूर्वी कधी आला नव्हता. त्यामुळे बोटीवर बॉम्बहल्ला केल्यावर जे जे घडेल त्याचे छायाचित्रण व्हावे म्हणून टेलिव्हिजन कॅमेरामन सज्ज झाले. बॉम्बहल्ल्याकरता हंटर व बुकॅनीर विमाने निघाल्यानंतर कॅमेरामनचे एक विमानही त्याचे पाठीराखे झाले.

आणि शेवटी टोरी कॅनिअनच्या तीन शकलांमधील तेलाच्या १८ कप्प्यांवर बॉम्बहल्ला केला गेला. आग सतत जळत राहण्यास मदत करणारे ' नापाम ' (NAPALM) नावाचे व ' थाऊजंड पौंड ' नावाचे बॉम्ब वापरले गेले. प्रचंड अग्निजिव्हा बोटीवरील वायुमंडल लपेटून घेत वर जात होत्या अन् त्याहीपेक्षा उंच काळाकुट्ट दाट धुराचा स्तंभ आकाशापर्यंत पोहोचला होता. सतत तीन दिवस असा बॉम्बचा मारा करण्यात आला तेव्हा कुठे सर्व तेल जळून संपुष्टात आले.

अजून टोरी कॅनिअन तीन शकलांत पाण्याच्या लाटांवर दिमाखाने मिरवतेच आहे. त्यानंतर निर्माण झालेल्या प्रश्नांची अन् राजकीय पडसादांची तिला खंत कशाला ? सतत दोन सप्ताह समुद्रावर निर्माण झालेले हे वादळ संपले आहे. आणि यानंतर मतामतांच्या गलबल्यांचे वादळ सुरू होण्यापूर्वीची शांतता सर्वत्र पसरली आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# ८

# टेस्ट ट्यूब बेबी

इतके दिवस मानव चंद्रावर जाण्याची भाषा करीत होता, त्या वेळी त्याबद्दल किती आश्चर्य वाटायचे. आतापर्यंत दोनदा चंद्रावरोहण झालेही. एप्रिलच्या मध्याला अपोलो १३ पुनश्च चंद्रविजय करण्यास निघेल. अशक्य वाटणारी गोष्ट प्रत्यक्षात आणण्याचे अतिमानवी प्रयत्न सध्या होत आहेत. मूक वाचाल केव्हाच झाले अन् पंगू मानवाने एव्हरेस्ट गाठल्यालाही कित्येक वर्षे झाली. अल्डस् हक्सलेच्या अद्‌भुतकथा सजीव होत आहेत. केवळ वैज्ञानिक तथा शास्त्रीय परंतु कल्पित गोष्टी आता सहजी कृतीत येत आहेत. 'हृदय-चाहिये' च्या आक्रोशाला डॉ. बर्नार्डसारख्या सर्जनने साद दिली आणि कुणा अनोखी माणसाचे हृदय ( छातीशी ? ) बाळगून, कालपर्यंत मरणाच्या उंबरठ्यावर घोटाळणारी माणसे पुनश्च धडधाकट बनली. रोज नव्या बातम्या, अकल्पित घटना. आता काळच असा आला आहे की आश्चर्याचेही आश्चर्य वाटू नये !

ही नवी बातमी पाहा. दि. २३ फेब्रु. १९७० रोजी रात्री इथल्या टेलिव्हिजनवरील 'होरायझन' नावाच्या कार्यक्रमात तिला तोंड फुटले. 'टेस्ट ट्यूब बेबी' हे तिचे नाव.

आजपर्यंत जन्मणे ही क्रिया स्त्रीपुरुषसंबंधातून उत्पन्न होते आहे. मनू आणि ईला ( किंवा ॲडम अन् ईव्ह ) यांच्या मीलनातून जगातील मानव उत्पत्तीला सुरुवात झाली. पण आता लवकरच टेस्ट ट्यूब बेबी हा प्रकार निघत आहे. 'होरायझन' कार्यक्रमात डॉ. पॅट्रिक स्टेप्टो यांनी ह्या प्रकाराचे विवरण केले. गेले वर्षभर डॉक्टरसाहेब ह्याच उद्योगात गर्क आहेत. लँकशायर परगण्यात राहणारी सिल्व्हिया ॲलन नावाची चौतीस वयाची महिला ह्या अद्भुत प्रयोगात सहभागी होण्यास स्वतःच्या इच्छेने सिद्ध झालेली आहे. गेले वर्षभर तिच्यावर डॉ. स्टेप्टो यांनी शस्त्रक्रिया केल्या आहेत. सिल्व्हिया अन् तिचा पती केनेथ यांना विवाहानंतर मूल झालेले नाही. एकदा टेलिव्हिजनवर डॉ. स्टेप्टो यांच्या प्रयोगाची माहिती ऐकून सिल्व्हिया उत्तेजित झाली व आपले वंध्यत्व डॉक्टर दूर करू शकतील ह्या आशेने तिने त्यांच्याशी संपर्क साधला. तिच्या गर्भाशयामधून बीजाण्ड बाहेर काढून ते 'जोपासण्याचा' प्रयत्न डॉक्टरमहाशयांनी चारदा केलाही. सिल्व्हियाच्या पतीच्या वीर्यबीजाचा ट्यूबमध्ये ठेवलेल्या सिल्व्हियाच्या उत्पत्तिबीजाशी संयोग आणवून ते बीजाण्ड दोनदा सजीव तथा पक्व (Fertilised) झालेही. अशा तऱ्हेने पक्व झालेले बीजाण्ड नंतर वंध्या स्त्रीच्या गर्भाशयात परत ठेवून दिले की, टेस्ट ट्यूब बेबीच्या प्रयोगाचे यश लांब नाही. फक्त गर्भधारणा बाहेर करायची व नंतर तो अणुमात्र चिमुकला गर्भ मातेच्या उदरी पुढील नऊ मासाच्या वाढीकरता ठेवून द्यायचा. हा प्रयोग जगाला आता लवकरच दिसणार आहे. धन्य ती सिल्व्हिया आणि अजब तो डॉक्टर स्टेप्टो. सिल्व्हियाच्या बाबतीत अजूनपर्यंत ते पक्वबीज गर्भाशयात स्थापित करण्याच्या अवस्थेला पोहोचलेले नसले तरी पाचव्यांदा डॉक्टरमहोदय नक्की यशस्वी होतील अशी त्यांना खात्री आहे.

सोमवारच्या रात्री टी.व्ही. वरील कार्यक्रमामुळे आणि मंगळवार बुधवारच्या वृत्तपत्रातील प्रसिद्धींमुळे ह्या विषयावर लोकांमध्ये बरीच खळबळ माजली. दोन्ही टोकांची मते मांडली जाऊ लागली. अशा प्रकारे मूल जन्माला येणे अशक्य आहे असे म्हणण्याची कुणालाच हिंमत नाही. कारण हेच की आत्तापर्यंतच्या वैज्ञानिक व शास्त्रीय यशस्वी प्रयोगामुळे सर्वचजण थक्क झाले आहेत. आता शक्याशक्यतेच्या विचारांना थारा नाही. फक्त घडतेय ते योग्य की अयोग्य ह्यावरच आता चर्चा होणार ! ओल्डहॅम गावचे डॉक्टर पॅट्रिक स्टेप्टो आणि त्यांचे केंब्रिजमधील सहायक डॉ. एडवर्डस हे मुळातच जरा संकोची आहेत. गेल्या वर्षभराच्या त्यांच्या प्रयोगाचे गुपित त्यांनी पूर्ण यश येईपर्यंत फोडले नाही. आता प्रयोग शेवटाला नेण्यास डॉक्टर स्टेप्टो व सिल्व्हिया केनेथ ॲलन यांनी निश्चय केला आहे. त्यामुळे चालू झालाय मतामतांचा गलबला! चर्च ऑफ इंग्लंडमधून ह्या संबंधात जे पत्रक निघाले आहे, त्यात ह्या विषयाचा नैतिक, सामाजिक व कायद्याच्या दृष्टीने विचार व्हावा असे आवर्जून म्हटले आहे. 'जे जे शास्त्रीयदृष्ट्या शक्य

आहे ते ते सर्व कृतीत आणलेच पाहिजे असे नाही ' असा साजूक इशाराही दिला आहे. अर्थात ख्रिश्चनधर्मप्रचारकांना लग्न करण्याची मुभा देण्याच्या सवलतीपासून आता तर नुकतेच प्रीस्टस्‌ना सेक्स एज्युकेशनही द्यावे ह्या मागणीसंबंधाने व्हॅटिकन्‌चे दरवाजे खडखडविण्याचे यत्न सुरू झाले आहेत. जिथे धर्मप्रचारकांना इतके स्वातंत्र्य मिळविण्याचे चालले आहे तिथे सामान्यजनांनी काय करू नये हे चर्चला सांगण्याचा अधिकार येतो कुठे ? परंतु पाश्चात्त्य जग कितीही पुढे गेले तरी चर्चच्या घंटा सारखी भुणभुण करतातच. टेस्ट ट्यूब बेबीच्या बाबतीत कित्येक डॉक्टरांनी निषेध नोंदवून डॉ. स्टेप्टो यांचे पाय खेचण्यास सुरुवात केली आहेच. डॉ. बर्नार्ड या साऊथ आफ्रिकेतील सर्जनने जेव्हा हृदयारोपणाच्या ( Heart Transplant ) शस्त्रक्रियेची घोषणा केली त्या वेळी कितीतरी इंग्लिश डॉक्टर्स जळले होते. जे ब्रिटनमध्ये झालेले नाही ते आफ्रिकेत डॉ. बर्नार्ड करतोय आणि म्हणूनच ते अशक्य आहे हा एकच भाव त्यांच्या अंतर्यामी त्या वेळी होता. डॉ. बर्नार्डना जास्तीत जास्त इंग्लिश डॉक्टरांनी विरोध केला होता. हे एक इंग्लिश स्वभावाचं झालं ! त्या बाबतीतलं दुसरं उदाहरण म्हणजे अपोलो ११ ज्या वेळी चंद्रावरोहण करण्याकरता झेपावत होते तेव्हा मँचेस्टरच्या जॉर्डल बँकच्या रडारचा प्रमुख बर्नर्ड लॉव्हेल त्या प्रयोगाविषयी साशंकता व्यक्त करीत होता. आता मात्र खुद्द इंग्लिश डॉक्टरच हा ' नलिका जननाचा ' अचाट विक्रम करणार आहे. हृदयविकारतज्ज्ञ डॉ. बर्नार्ड यांची मात्र त्यावरची प्रतिक्रिया पाहण्यासारखी आहे. ते म्हणतात, टेस्ट ट्यूब बेबीच्या संशोधनातून फ्रँकस्टाइनसारखे भस्मासुर उत्पन्न होतील ही भीती निराधार आहे.

अर्थात एक टेस्ट ट्यूब बेबीचा प्रयोग प्रसिद्ध झाल्यावर नंतर त्याचसंबंधीचे विविध कल्पित प्रयोग चर्चेला आले. कावळी आपली अंडी कोकिळेला उबवायला देते ही आपल्याकडील समजूत मानवाच्या विषयात वापरली जाईल ही कल्पना तरी कुणी केली होती काय ? मूल न होऊ शकणाऱ्या बाईचे उत्पत्तिबीजाण्ड दुसऱ्या कुणा मूल झालेल्या स्त्रीच्या गर्भाशयात सोपवून वंध्या स्त्रीच्या नवऱ्याच्या वीर्याने ते कृत्रिमरीत्या (Artificial insemination ) पक्के करावयाचे, व अठ्ठेचाळीस तासांनंतर ते पक्व बीज मूळ स्त्रीला परत करावयाचे, वगैरे सव्यापसव्ये कल्पिली गेली. 'होस्ट मदर' दुसऱ्या महिले-करता ती कृत्रिम गर्भधारणा ४८ तास सहन करील अथवा परिस्थितीनुरुप नऊ महिने तो भार वाहील. स्वतःचे शरीर सुंदर ठेवण्याकरता होस्ट मदरला प्रसूतिवेदना देण्याची ही कल्पना, आपल्या मुलाला दाईचे दूध पाजविण्याच्या कल्पनेपेक्षा किती भयंकर आहे ? मला माझ्या नवऱ्यापासून मूल हवे आहे. परंतु त्या जीवाचा भार वाहणे नकोय तेव्हा दोन हजार पौंड नऊ महिन्याकरता कुणा अभिनव दाईला दिले की झाले. मुलापरी मूल मिळाले व परत शरीरयष्टी बिघडली नाही ! आहे की नाही खास कल्पना ? बरे, त्या दुसऱ्या

बाईला ' होस्ट मदर ' हा एक नवा व्यवसाय मिळाला ! डॉ. कोहेन नावाचा ' कल्पनेची आयडिया 'वाला म्हणतो, ' Such Host mothers could be friends, sisters or other relatives. '

एका बाजूला वंधत्व नाहीसे करून सर्वच विवाहित स्त्रियांना मातृपदाची पायरी चढण्याचे सौभाग्य देण्याकरता डॉ. स्टेप्टो लॅबोरेटरीत प्रयोग करीत असताना सर्वच पाश्चात्त्य जगात ' नको असलेल्या गर्भारपणाचाही ' (Unwanted pregnancy) कळस होत आहे. त्यातून गर्भपात करण्याची संख्या वाढत आहे. एकाने तर वर्णन केलंय कीLondon is becoming an abortion Mecca ! युरोप खंडातूनच नव्हे तर कॅनडासारख्या लांबच्या देशातूनही अनेक मुली गर्भपात करवून घेण्यासाठी लंडनकडे धाव घेतात. ब्रिटनमध्ये ह्या क्रियेला बंदी नाही. नैतिक व सामाजिक बंधने इकडे इतकी शिथिल झालेली आहेत की, त्यामुळे विवाहपूर्व व विवाहबाह्य शरीरसंबंधाचा बुजबुजाट वाढलेला आहे. त्याची आकडेवारी दिली तर आपल्या पूर्वेकडील मनाला धरणीकंप व्हावा.

In Sweden, for instance, where primary school sex-education in its fullest and frankest terms has been compulsory for 15 years, it is now reckoned that for every 20 brides there are one legal and four illegal abortions. 35 per cent of brides are pregnant on their wedding day, veneral disease figures are soaring and it is commone for boys to have had over 200 sexual partners.

वरील आकडेवारी एवढ्याकरताच दिली की त्या एका वाक्यानेच पाश्चात्त्य जगताचे ' सेक्स ' ह्या विषयावरचे चित्र गडद रंगात स्पष्ट व्हावे. नुकतीच डेन्मार्कमध्ये गेल्या सहाच महिन्यांतली दुसरी ' इंटरनॅशनल सेक्स फेअर ' भरली आहे. आणि त्या रंगीन जत्रेचे उद्घाटन केले आहे फॅनी मिरांडा नावाच्या ७९ वर्षांच्या वृद्धेने ! इंग्लंडमधील अनौरस संतती हा एखाद्याच्या प्रबंधाचा विषय होऊ शकेल. संततिप्रतिबंधक साधने सर्रास-अविवाहितांनाही सहजसाध्य असूनही ही परिस्थिती. शेवटी अशा अनौरस मुलांचा भार ब्रिटिश वेलफेअर संस्थेलाच उचलावा लागत असल्याने गेल्या आठवड्यात बारा मार्चला हेल्थ एज्युकेशन कौन्सिलने एक गमतीदार चित्र प्रसिद्ध केले आहे. एका पोट पुढे आलेल्या पुरुषाच्या चित्राखाली लिहिलेय-

'Would you be more careful it if was you that got pregnant?'

अर्थात फॅमिली प्लॅनिंगच्या केंद्रात हे चित्र लावल्यावरही किती पुरुष शुद्धीवर येणार हा एक पाहण्यासारखाच विषय आहे.

इन्क्युबेटरमध्ये मानवी बीजाण्डे उत्पत्तीकरता ठेवली आहेत आणि जेव्हा लढाई

उद्भवेल तेव्हा हजारोंच्या संख्येने शालिवाहनाच्या मातीच्या बाहुल्यांचे सैनिक झाले त्याप्रमाणे मानवी प्रजा बाहेर पडेल; हे टेस्ट ट्यूब बेबी ह्या विषयावरून रंगविलेले एक अतिशयोक्तिपूर्ण चित्र ! स्वैराचारापासून उत्पन्न झालेली परंतु नको असलेली संतती हे दुसरे भडक परंतु खरेखुरे चित्र. आणि त्याच कल्लोळात आपले इनॉक पॉवेलजी उपऱ्या ( Immigrants ) लोकांच्या संतती होण्याच्या प्रमाणावर काय टीका करतात त्याचे चित्र पुढील लेखात पाहू.

■

९

# पॅावेल साहेबांचा उद्योग

' चला, तुमची बॅग भरलीत का ? ' शुक्रवार दि. १९ जून रोजी सकाळी ऑफिसला जाताना एक्सलेटरवर चढताचढता मी माझ्या सोबत्याला प्रश्न केला. त्यानेही हसून उत्तर दिले, ' आता फक्त दोन हजार पौंड केव्हा मिळतात त्याचीच वाट बघतोय. ' पैसे घेऊन भारतात परत जाण्याचे आता खरोखरच सर्वांच्या नशिबी आहे काय ? गुरुवारी रात्री दहाला संधिप्रकाशात इथले मतदान शांतपणे पार पडले व रात्री साडेअकरानंतर एकेक जागांचे निकाल टेलिव्हिजनवर यायला सुरुवातही झाली. राज्यावर कोणता पक्ष येणार हा प्रश्न सर्वांनाच सतावत होता. रात्री बारा वाजता दिवस बदलला व प्रचंड मताधिक्याने वुल्बरहॅम्पटनहून श्री. इनॉक पॉवेल निवडून आले. त्या वेळी तिथल्या निवडणूकप्रमुखाने ते जाहीर करताना कित्येकांनी हर्षाने टाळ्या वाजविल्या तर काही तरुण माणसांनी निषेधाच्या घोषणा केल्या. श्री. पॉवेल आभारप्रदर्शक भाषणाचे दोन शब्द रागीट चेहरा करून बोलत होते. इतका झक्क विजय होऊनही त्यांनी निषेधाच्या आरोळ्यांकडे कानाडोळा केला नाही. तो प्रसंग पाहात असताना झोपेचा अंमल सुरू

झाला. वास्तविक एकेका जागेचे निकाल सांगण्याकरता टेलिव्हिजन रात्रभर जागा राहणार होता. पण तो खोका यांत्रिक होता. माझ्यासारख्या मानवी यंत्राला विश्रांतीची आवश्यकता होती. हो, आपल्याकडल्यासारखे इथले मतदान रविवारी थोडेच घेतले होते ? आम्ही काम करून आलो व मग मतदानाचे कर्तव्य बजावले. नाही म्हणायला शाळकरी पोरांना सुट्टी होती. कारण त्यांच्या वर्गातच मताच्या पेट्या खड्या केल्या होत्या ना ! विचार केला, काय व्हायचे असेल ते होवो. आपण झोपावे हे उत्तम. दोन पक्षांपैकी एक राज्यावर येणार. उद्या सकाळी समजेल 'टेन डाऊनिंग' मध्ये संगीताग्नी टेड हीथ येतोय् की अग्निहोत्री विल्सन परत शिरतोय् ते ! अन् खरं म्हणजे रात्रीचा दिवस करून टेलिव्हिजन पाह्यला तो अपोलोचा चंद्रारोहणाचा कार्यक्रम थोडाच होता. म्हणून झोपलो. शुक्रवारी सकाळी सहाला तो 'बोलता-हलता ढलपा' दाखवू लागला चकाकणारे श्री. हीथ यांचे डोळे. आपले किंचित पुढे असलेले दात अधिक विस्फारून लांब नासिका असलेले श्री. एडवर्ड हीथ विजयाने हसत होते. मुलाखतवाला रॉबिन डे त्यांना विचारत होता, 'हीथसाहेब, आता तुम्हाला पंतप्रधान झाल्यासारखे वाटते ना ?' त्यावर उत्तर द्यायची गरजच नव्हती. हीथ यांचा फुललेला चेहराच सगळं काही सांगत होता. त्या प्रसंगी एकूण जाहीर झालेल्या जागांत लेबर पक्षाचे उमेदवार तीस पस्तीसच्या संख्येने पुढे होते. परंतु टोरी पक्षाच्या हुकमी जागांचे निकाल त्या वेळी लागायचे होते. कॉम्प्यूटरने ते सर्व मोजून हीथ राजा झाल्याची ग्वाही दिली होती. आता प्रश्न विचारणाऱ्याने 'टेन डाऊनिंग' मध्ये शेवटला ब्रेकफास्ट घेणाऱ्या हॅरॉल्ड विल्सनना विचारले, 'तुमच्या पक्षाच्या पराभवाबद्दल तुम्हाला काय म्हणायचे आहे ?' सर्व जागांचे निकाल त्या वेळी लागायचे होते. चौसष्ट साली आपला पराभव होतोय हे पाहात असताना त्या वेळचे पंतप्रधान अलेक् डग्लस ह्यूम यांनी जसे उत्तर दिले होते, अगदी तसेच उत्तर विल्सन यांनी दिले व त्या वेळी कॉम्प्यूटरवरून टोरी पक्ष जिंकल्याचे भाकित केले गेलेले होते. एका बाजूला आपण अजून हरलेलो नाही हे सांगत असतानाच विल्सन यांच्या मनात 'आज रात्री आपल्याला व आपल्या बायकोला 'टेन डाऊनिंग' मधील शय्या मिळणार नाही' हे ठाऊक होते. म्हणूनच 'बेकन अँड एग्ज' ची न्याहरी वाढणाऱ्या बाईला त्यांनी खिन्नपणे हसून म्हटले, "माझ्याकरता एक घर तमसातटाकी पार्लमेंटच्या आसपास पाहणार काय ?" त्या प्रश्नाने अवघ्या 'टेन डाऊनिंग' मधल्या कर्मचाऱ्यांच्या पोटात गलबलले. ब्रेकफास्ट कुणीच घेतला नाही. अतिश्रांत झालेले विल्सन तेवढे बकाबका खात होते.

एक प्रचंड उलाढाल त्या वेळी चालू होती. सगळ्या काळ्या जनतेच्या मनात एक सूक्ष्म कळ उठून राह्यली होती. हा हन्त हन्त... शेवटी त्या पुराणमतवादी पक्षाचा विजय होतोय तर ! तो पॉवेल तर काल रात्री ११.४२ वाजताच जिंकला. त्याच्या रागीट चाणक्यी चेहऱ्यावरील दुर्योधनी भाव आता अधिक गडद झालेत. टेड हीथच्या मनात

संगीताचे सूर निघू लागलेत. विल्सनच्या पाईपमधला तंबाखू पार विझून गेलाय. आता फक्त बॅग भरायची अन् सांगतील तेव्हा वाट धरायची ! आपला मुलगा पंतप्रधान होतोय् हे पाह्यल्याबरोबर टेड हीथ यांचे म्हातारे ८१ वर्षांचे वडील गहिवरले. 'टेडीचे मास्तर, तो सोळा वर्षांचा असतानाच म्हणाले होते की हा पोरगा एक दिवस पंतप्रधान होईल म्हणून.' वडिलांनी आनंदाने कौतुक केले. बिचारे उगवते पंतप्रधान अविवाहित राह्यलेत. टेन डाऊनिंगमध्ये शिरताना त्यांना कमरेला सुपारी बांधावी लागेल. मागल्या दाराने विल्सन साहेब स्वपत्नीसह बाहेर पडले. पुढल्या दारी सामान हालवणाऱ्या मोठ्या लॉरीवरची 'रीमूव्हल्स' ही अक्षरे 'सुखदु:खे समेकृत्वा' खडी होती. ज्या घरात गेली सहा वर्षे खालच्या खोल्यांत राज्यकारभार केला व वरच्या भागात संसार थाटला ते 'डाऊनिंग' नावाच्या रस्त्यावरचे दहा क्रमांकाचे घर सोडताना श्री. विल्सन व त्यांच्या बायकोला काय वाटले असेल ?

लोक म्हणतात, हीथ पाव-दुधावर जिंकले. मग खरोखरच टोरी पक्षाने इलेक्शन जिंकले तरी कशावर ? गेल्या सहा वर्षांच्या विल्सन यांच्या निकम्म्या कारभारावर ? भरमसाठ वाढलेल्या बाजारभावामुळे ? की पॉवेलिझममुळे ? का टोरी पक्षाच्या तमसा नदी स्वच्छ करण्याच्या आश्वासनावर ? हीथ यांनी शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची घोषणा केली म्हणून तर नव्हे ना ? पक्षाने कॉमन मार्केटमध्ये लवकरात लवकर शिरकाव करण्याची तयारी दर्शविली त्याचा तर हा परिणाम नाही ना ? का इन्कमटॅक्समध्ये कपात करण्याचे सोनेरी आश्वासनं दिले म्हणून लोकांनी टोरी पार्टीची तळी उचलून धरली ? एडवर्ड हीथ व त्यांचा पक्ष निवडून आलाय्. गेल्या चार महिन्यांत घेतले गेलेले 'ओपिनिअन पोल्स' खोटे ठरलेत. एकूण बहात्तर टक्के मतदान होऊन ४३ जागा अधिक मिळवून टोरी पक्ष अधिकारावर आलाय. आता एकच प्रश्न विचारला जातोय की, निवडणुकीपूर्वी दिलेली सर्व वचने हीथमहोदय आता पुरी करणार ना ? निवडणूक लढविताना टोरी पक्षाची घोषणा होती, 'Action, No words'. त्यांच्या जाहीरनाम्याचे ब्रीदवाक्य होते, 'Better Tomorrow'. आता 'उद्या' 'आज' झालाय. तेव्हा खरोखरच ब्रिटनचे भवितव्य उज्ज्वल करण्याकरता शब्दापेक्षा कृतीचीच गरज आहे. सगळ्या जगाचे लक्ष ब्रिटनमधील निवडणुकांवर होते. निकाल जाहीर झाल्यावर प्रत्येक देशाच्या राजधानीत प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. दिल्लीत थोडा आनंद झाला, थोडी निराशा आली. कलकत्त्याहून इंदर मलहोत्राने लिहिले, 'विल्सनची राजवट भारतात अप्रिय होती. भारत-पाक युद्धात विल्सननी पाकिस्तानची बाजू घेतल्यापासून ते राजधानीच्या मनातून उतरले होते. हीथशासन भारताचे आर्थिक संबंध सुधारण्याची शक्यता आहे.' नैरोबीत मात्र लोकांना धडकी भरली. आता नैरोबीच्या 'रंजन वेद'ला न्याय नाही ! वॉशिंग्टनमध्ये राष्ट्राध्यक्ष निक्सन यांना आनंद झालाय.

युरोपियन देश खूष आहेत आणि प्रत्यक्ष ब्रिटनमधील उपरे लोक ' बॅगा भरण्याचा ' विनोद करीत कमी होणाऱ्या प्राप्तिकरावर नजर ठेवून ' पेनीवाअीज ' बनताहेत. समाधानाची गोष्ट एकच की, आपल्या अठराजणांच्या छोट्याशा मंत्रिमंडळात निवडणूकपूर्व वचन दिल्याप्रमाणे हीथ यांनी पॉवेलजींना कुठलीच जबाबदारी दिलेली नाही. गुरुवारी रात्री आपल्या बेक्स्ली मतदारसंघात श्रमपरिहार्थ बीअरचे घुटके घेत असताच हीथ यांच्या कानावर श्री. पॉवेल यांची टोरी विजयवार्ता आली. गंमत अशी की त्यावर त्यांनी काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. आता शंका इतकीच वाटते की सर्व स्थिरस्थावर झाल्यावर हीथसाहेब श्री. पॉवेल यांच्याकरता नवीन Repatriation Ministry तर खोलणार नाहीत ना? टाइम्सच्या एका व्यंगचित्रात हसऱ्या हीथसाहेबांचा एक दात ' किडका पॉवेल ' दाखविला आहे. दुसऱ्या एका चित्रात त्याच व्यंगचित्रकाराने हीथरूपी उत्फुल्ल सूर्यफुलावर चाल करून जाणारा विषारी इनॉक सुरवंट दाखविलेला आहे. निवडणुकीपूर्वी दोन आठवडे प्रचारयंत्रात श्री. पॉवेल यांनी आपले स्वरूप परत एकदा स्पष्ट करून दाखविले होते. त्या वेळेपासूनच श्री. पॉवेल व श्री. हीथ या द्वयीचे संबंध फारच बिघडले. दोन्ही बाजूंनी उलटसुलट चर्चा होऊ लागली. इतकेच काय, निवडणूक जिंकल्यावर श्री. विल्सन यांनी श्री. हीथ यांचा ' एक उमदा माणूस ' म्हणून गौरव केला. परंतु श्री. हीथ यांनी मात्र पॉवेल यांच्या विजयवार्तेवर अनुल्लेखाने टोला हाणला.

निवडणूक जरी अकरा जूनला झाली तरी तत्पूर्वी चार महिने अगोदर निरनिराळे ' ओपिनीअन पोल्स ' घेतले गेले. प्रथम प्रथम या नमुन्याच्या मतदानात मजूर पक्षाचा जोर होता. जसजसे मतदान जवळ येत चालले तसतसे हे ' मासल्याचे मत ' मजूर पक्षाच्या तागडीतून कमी होत गेले. अठरा जूनच्या अगोदर दोन दिवस मजूर पक्षाचे पुराणमतवादी पक्षापेक्षा दोन प्रतिशत मताधिक्य होते, आणि हे नमुन्याचे मत शेवटी खोटे ठरले. टोरी निवडून आले. रविवारच्या एका अंकात एक गंमतीदार चित्र आले. ओपिनिअन पोल्सच्या कार्यालयात शेवटपर्यंत जिंकत गेलेल्या लेबर पक्षाच्या मतांचा चढता आलेख होता व त्याखाली टोरी पक्षाच्या मतांची उतरती भांजणी होती. कार्यालयातली सेक्रेटरी साहेबाला म्हणते, ' Mr. Wilson is to see you sir! ' बिचारे विल्सनसाहेब!! अर्थात जिंकले कुणीही असले तरी हे मतदान अगदी मस्त झाले. विचार एकच येत होता की अमेरिकन सरकारप्रमाणे इथल्याही शासनाने भारतातील प्रत्येक प्रमुख पक्षाच्या दोन दोन नेत्यांना ही निवडणूक बघण्याकरता बोलवायला हवे होते. इथले दोन पक्ष कशा प्रकारे निवडणूक-प्रचार करतात हे दृश्य बघण्यासारखे होते. भारतीय निवडणुकांचे तंत्र वेगळे असते. ते काय असते हे सुज्ञ वाचकांस सांगण्याची गरज नाही. इथे प्रचार फक्त भाषणाच्या रूपाने झाला असेल तेवढाच. एकेका भाषणाला ' लाखोंकी तादातमें ' उपस्थिती कधीच नव्हती. एका नेत्याच्या ' कॉर्नर मीटिंगला ' भाजी आणायला

निघालेली एक गृहिणी तेवढी हजर होती ! लोकांनी भाषणे टी.व्ही. वर पाह्यली, ऐकली. लेबर व टोरी पक्षाच्या अतिरथी महारथींचे परिसंवाद बी.बी.सी.ने घडविले. लोकांकडून मागवलेले खास प्रश्न त्यांनी त्या परिसंवादात नेत्यांना विचारले आणि नेत्यांनीही समाधानकारक उत्तरे दिली. कुठेही चिडाचीड नव्हती. मारामाऱ्या नव्हत्या. लोकांच्या घराच्या भिंती खराब झाल्या नाहीत. रस्त्यावर घोषणा नव्हत्या. मिरवणुका अदृश्य होत्या. नाही म्हणायला विल्सनसाहेबांच्या अंगावर कुणीतरी एक अंडे मात्र फेकले. ते अंडे नासके नव्हते. तेव्हा विल्सन म्हणाले, ' टोरी पक्षवाले आमच्यावर बाजार वस्तूंच्या किंमती वाढताहेत म्हणून टीका करतात. हे चांगले अंडे ज्या अर्थी माझ्यावर फेकले गेले त्या अर्थी किंमती वाढलेल्या नाहीत हेच सिद्ध होते ! ' परंतु अशी अंडी, टोमॅटो फेकण्याचे प्रकार तुरळक घडले. निवडणूक जिंकल्यावर उगवते पंतप्रधान श्री. एडवर्ड हीथ टेन डाऊनिंगमध्ये शिरत असता त्यांच्या कोटावर एका माथेफिरू तरुणीने रंग मात्र फेकला. निषेधाच्या घोषणा दोन्ही पक्षनेत्यांच्या वाट्याला येत. स्वतःच्या भाषणात जास्तीत जास्त अडथळ्याची शर्यत खेळले पॉवेल महाशय. एक मात्र उल्लेख आवर्जून करावासा वाटतो की श्री. इनॉक पॉवेल आपल्या मताशी शेवटपर्यंत प्रामाणिक राह्यले. निदान निवडणूक जिंकण्यापुरती तरी एखाद्याने आपल्या मतांशी प्रतारणा केली असती. परंतु दोन-अडीच वर्षांपूर्वी बर्मिंगहॅमला केलेल्या विषारी भाषणाच्या आवृत्त्या पॉवेल अगदी शेवटल्या दिवसापर्यंत गिरवीत होते. कदाचित त्यांचा वर्णद्वेषी भाषणाचाच त्यांना भरघोस निवडून येण्याकरता उपयोग झाला असावा.

संध्याकाळची उन्हे खूपच उबदार होती त्या दिवशी. एकवीस जून हा वर्षातला सर्वांत मोठा दिवस केवळ तीनच दिवसांनी येणार होता. त्यामुळे ऊन रात्री ९-३० पर्यंत होते. रात्री आठला मतदानाला जाताना कमालीची शांतता होती. फिरायला निघावे अशा थाटात मंडळी तुरळक तुरळक मते द्यायला जात होती. स्वयंसेवकांचा ससेमिरा नव्हता. एका जुन्या शाळेच्या एका वर्गात शिरलो. लेबर पक्षाच्या उमेदवाराचे नाव लक्षात ठेवले होते. कारण मतपत्रिकेवर तीन पक्षांच्या ' बैलजोडी किंवा दीप ' अशा खुणा नव्हत्या. आतले व्यवस्थापकीय अधिकारी स्मित करून स्वागत करीत होते. मतदानपत्रिकेवर फुली करून पोस्टाच्या पेटीत पत्र टाकावे इतक्या सहजतेने मतदान केले. बोटावर पक्क्या शाईची खूण केली गेली. शाळेच्या पटांगणात आलो. वर्दळ इतकी कमी होती की वाटावे आमच्या मोहल्ल्यात १०-१२ टक्केच मतदान झाले असावे. परंतु दुसऱ्या दिवशी कळले की ७० टक्के लोकांनी मतदान हक्क बजावला होता. सारेच और ! आख्ख्या ब्रिटनमध्ये ६३० जागांपैकी ३३० मिळाल्या कॉन्झर्वेटिव्ह पक्षाला. लेबर पक्षाला गवसल्या २८७, लिबरल पक्षाची नावनिशाणी सहा जागांनी राहिली. उरलेल्या सात जागांवर इतरांना समाधान मानावे लागले. श्री. जेरीमाँ थॉर्प ह्या उदारमतवादी पक्षाच्या नेत्याबद्दल सर्वांना

वाईट वाटले. ' आम्हाला लिबरल पक्षाला मत द्यायचे आहे, परंतु त्या पक्षाचा जोरच कमी आहे. त्यामुळे आमचे मत वाया जाईल अशी भीती वाटते. ' असे लोकांत उघड बोलले जाई. त्यामुळे शेवटी लिबरल पक्षाचा ' गाभारा ' पाण्याने भरला ! ह्या वेळी टोरी पक्षाला मिळालेले निर्भेळ बहुमत १९०६ नंतर कुणाला मिळालेले नव्हते. १९६४ साली निवडणुका होऊन लेबर पक्ष निवडून आला. अगदी थोड्या बहुमतावर. मग निर्भेळ बहुमताकरता विल्सनना ६६ साली पुन्हा निवडणुका घ्यायला लागल्या. तेव्हा कुठे त्यांना ' मेजॉरिटी ' मिळाली. ह्या वेळी मात्र टोरी पक्ष भरपूर विजयी झाला. निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये ऑक्स्फर्ड व केंब्रिजचे पदवीधर. १७१ लेबर पक्षाचे आहेत तर टोरी पक्षाचे २२८ जण आहेत. बहुतेक सर्व निवडून आलेले लोक किमान पदवीधर आहेत. वकील, वृत्तपत्रकार, प्राध्यापक, डॉक्टर्स, शेतकरी व मोठ्यामोठ्या कंपन्यांचे चालक-सूत्रधार, असे सर्वांचे व्यवसाय आहेत. त्यांची आकडेवारी पाह्यली की भारतीय लोकसभेत गप्प बसणारे व केवळ निषेधाच्या आरोळ्यांत आवाजी करणारे ए.पी. आठवतात ! आपल्याकडला विरोधाभास अधिक गडद होतो. इथे प्रमुख पक्ष दोनच आहेत. लोकशाहीची बूज राखण्याकरता जनता आलटून पालटून एकेका पक्षाला राज्यकारभाराची संधी देते. त्यामुळे कुठल्याच एका पक्षाची ' काँग्रेस ' झालेली नाही.

गेल्या वेळी मजूर पक्ष अधिकारावर असता टोरी पक्षाचे ' परछाई मंत्रिमंडळ ' अस्तित्वात होते. त्या छायामंडळामुळेच ( Shadow Cabinet ) श्री. हीथ यांना निवडून आल्यावर कुणाला कसला मंत्री करायचा ही अडचण पडली नाही. कारण गेली सहा वर्षे ' छायामंडळात ' एकेका मंत्र्याने एकेक खाते सांभाळून त्याचा अभ्यास केलेला होता. सध्या मोडकळलेल्या आपल्या काँग्रेसमध्ये सारखी मंत्रिबदलाची झटापट चालू आहे. आजचा गृहमंत्री उद्याचा अर्थमंत्री होतोय् ! त्यामुळे मंत्रिमंडळातील ' खाते ' हे एक अभ्यासाचे व कारभाराचे साधन आहे ह्याचा सर्वांनाच विसर पडतोय. इथली वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, कालच्या शॅडो कॅबिनेटमधले विरोधी पक्षाचे मंत्री आजच्या खऱ्याखुऱ्या मंत्रिमंडळात निवडून येताच कामाला लागले. शुक्रवारी निवडणूक जिंकली व शनिवारी टोरी पक्षाचे मंत्री श्री. हीथ यांनी जाहीर केले. रविवारपासून कॉमन मार्केटच्या कामास्तव मंत्री परदेशी गेलेसुद्धा ! अजून पार्लमेंटसुद्धा उघडायची आहे. राणीच्या हस्ते दोन जुलैला औपचारिक उद्घाटन होईल. परंतु कार्य पार्लमेंट उघडावयाची आहे म्हणून थांबलेले नाही. हाच भारतीय व ब्रिटिश राजनीतीतील मोठा फरक जाणवतो. आमच्याकडल्या जनतेने काँग्रेसखेरीज दुसरा पक्ष राज्यावर आणून अनुभव घेण्याकरता मतदान कधीच केले नाही. सध्या ही भयानक अवस्था जर कशाने प्राप्त झाली असेल तर तो एकाच पक्षाच्या दोन तपांच्या अनिर्बंध अधिकारामुळे ! ब्रिटनमधील लोकशाही समतोल राखण्याकरता ह्या वेळचे मतदान झाले असे म्हटल्यास वावगे होणार नाही. ही

निवडणूक कॉन्झर्वेटिव्ह पक्षाने जिंकली असे म्हणण्यापेक्षा लेबर पक्ष आपल्या कारभारामुळे निवडणुकीच्या प्रांगणात हरला हेच म्हणणे अधिक सयुक्तिक वाटते. हीथ गृहिणींच्या मतांवर निवडून आले असे सांगतात ते खोटे नाही. अशी परिस्थिती आपल्याकडे निर्माण होईल तेव्हाच खऱ्या लोकशाहीला सुरुवात झाली असे म्हणता येईल.

■

१०

# गृहिणींनी हीथना निवडले !

एक्काहत्तर साली होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीची रणशिंगे आत्तापासूनच फुंकली जाऊ लागली आहेत. नवा उन्मेष, नव्या आकांक्षा अन् नवी आश्वासने यांनी नेत्यांची भाषणे रंगू लागली आहेत. कॉन्झर्वेटिव्ह पक्षाचे नेते श्री. एडवर्ड हीथ यांनी रविवार ८ फेब्रुवारी १९७० रोजी आपल्या बाराशे तरुण कार्यकर्त्यांसमोर ग्वाही दिली की, सत्तर सालामध्ये टोरी पक्षच देशावर राज्य करील. अर्थात असे सांगताना त्यांना लेबर पार्टीच्या उखाळ्यापाखाळ्या काढाव्या लागल्याच. ' गेल्या तेरा वर्षांत मजूर पक्षाने फक्त निवडणूक तंत्रच ओळखले, कार्यक्रमाच्या, योजनेच्या बाबतीत मात्र नन्नाचा पाढा! वाढते जीवनमान, करांचा वाढता बोजा, बेकारी, संप, अल्प तुटीची घरबांधणी योजना वगैरे गोष्टी म्हणजे गेल्या तेरा वर्षांचा मजूर सरकारचा कारभार. आम्ही ते चित्र बदलणार आहोत. जो सरकार निकम्मी है वो सरकार बदलनी है... ' वगैरे वगैरे. मग हीथ साहेबांनी स्वतःच्या पक्षाच्या योजना सांगितल्या. कुठल्याही पक्षाने स्वतःच्या सोनेरी आश्वासनांचा जाहीरनामा ' नेमेचि ' मांडावा तसलाच हा प्रकार. भाषणाच्या शेवटी

त्यांना इनॉक पॉवेल यांच्यासंबंधी प्रश्न विचारला असता ते म्हणाले, ' शॅडो कॅबिनेटमध्ये पॉवेलजींना अजूनही स्थान नाही. मला इनॉकची परिस्थिती समजू शकते. पक्षधोरणाहून त्यांचे विचार भिन्न आहेत. मात्र नेता ह्या नात्याने माझे कर्तव्य आहे की, पक्ष संघटित राहावा. '

एका बाजूला वेल्स प्रांताच्या उत्तर कोन्यात Llandudno ह्या गावी पक्षकार्यकर्त्यांच्या मेळाव्यात हीथ साहेबांचे ' पक्षबांधणी ' वरील भाषण चालू असता आदल्या दिवशीच उत्तर आयर्लंडच्या दक्षिण सीमेवरील Enniskillen या ठिकाणी इनॉक पॉवेलनी आपले वेगळे अस्तित्व दाखविणारे भाषण ठोकले होते. टेड हीथच्या भाषणाला गार्डियनने शीर्षक दिले होते-Torries will control the Seventies. आणि पॉवेलच्या करणीला म्हटले होते. Powell further out on limb.स्वतःच्या पक्षापासून इनॉक पॉवेल अधिकाधिक फुटत आहेत. अर्थात जरी पॉवेलच्या भाषणाची जनतेला आता सवय झाली असली, तरी आत्तापर्यंतच्या त्याच्या सर्व भाषणावरून लक्षात येते की त्यांनी आपले म्हणणे जनतेचा कौल बघून बदललेले नाही. कुठल्याही भाषणातील मांडलेल्या ' उपऱ्यांबद्दलच्या ' मतांशी प्रतारणा केलेली नाही. राजकीय व्यभिचार त्यांना पसंत नाही. लोकांनी त्यांच्या प्रत्येक भाषणावरून अनुमान काढले की पॉवेलना टोरी पक्षाचे धुरिणत्व हवे आहे. पक्ष विजयी झाला तर पंतप्रधानकी हवी आहे. परंतु गेल्या शनिवारच्या भाषणात त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. ते म्हणतात-

I would like to be Minister of Repatriation if the opportunity ever arose-but only if there was 'a genuine and whole hearted desire for the administration to give it the necessary moral as well as financial support.'

वरील भाषणानंतर टेलिव्हिजनवर ह्या त्यांच्या इच्छेसंबंधी मुलाखत घेतली असता त्यांनी आपले म्हणणे स्पष्ट केले. ' ब्रिटनमधील निम्मे परदेशी लोक प्रत्येकी दोन हजार पौंड घेऊन आपापल्या देशात जाण्यास तयार आहेत. त्यामुळे Compulsory नाही. ' अर्थात हा पन्नास टक्के उपऱ्यांचा आकडा त्या धूर्त पॉवेलसाहेबाने कोठून मिळविला हे एक कोडेच राहील. ह्यावरून एक गोष्ट मात्र सिद्ध होते की, मुख्यमंत्रिपदाची हाव पॉवेलना नाही. स्वतःच्या (अतिरेकी) मताशी ते एकनिष्ठ असून त्यांचे सर्व प्रयत्न त्याच प्रश्नाच्या पूर्ततेसाठी चाललेले आहेत. त्यामुळे टेड हीथ शॅडो कॅबिनेटमधे जागा देवोत अगर न देवोत, पॉवेल भाषा बदलण्यास तयार नाहीत.

उत्तर आयर्लंड हा ब्रिटनचाव भाग. दक्षिण आयर्लंडमध्ये कॅथॉलिकांचे वर्चस्व आहे. सध्या उत्तर व दक्षिण आयर्लंडमध्ये धार्मिक कारणांवरून दंगेधोपे चालू आहेत, हे सर्वश्रुतच आहे. त्या संबंधात पूर्वीच्या वार्तापत्रात खूप सविस्तर चर्चा झालीच आहे.

असा हा धार्मिक वाद व त्यातून उद्‌भवलेली डोकेफोडीची चळवळ चालू असता इनॉकची उत्तर आयर्लंडमधील एनिस्किलेन गावी फक्त Repatriation वरच बोलते तर त्यांचे एकमेवाद्वितीयत्व कसे सिद्ध होणार? उपऱ्या परदेशी लोकांवर तोंडसुख घेणे ही भाषा आता जुनी झाली. भडका उडविणाऱ्या पहिल्या बर्मिंगहॅमच्या भाषणाला आता दोन वर्षे झाली.

उपऱ्यांची हकालपट्टी करायची तर तयारी जबरदस्त हवी. सशाच्या शिकारीला जातेवेळी वाघाच्या शिकारीची योजना हवी! आणि म्हणूनच की काय आता 'उपऱ्या परदेशी' लोकांच्या व्याख्येचा पॉवेलसाहेब सविस्तर विस्तार करू लागले आहेत. पेटत्या आयर्लंडमध्ये त्यांनी केलेले भाषण भडका उडविल्याशिवाय राहणार नाही. वस्तुस्थिती अशी आहे की दक्षिण आयर्लंड हे अलग राष्ट्र असले तरी तेथील आयरिश विना परवाना (Passport) ब्रिटनमध्ये येऊ शकतात व कुणीही ब्रिटिश त्याच प्रकारे आयर्लंडमधे मुक्त संचार करतात. नेपाळ-भारतासारखे राजनैतिक संबंध असलेले हे दोन देश. इनॉक पॉवेलनी आपल्या भाषणात काय म्हटले ते पाहा- Britain should treat citizens of Irish Republic as foreigners and Ulster (Northern Ireland) should be fully incorporated into the United Kingdom. अर्थात आयरिश लोकांना परके (Aliens) संबोधण्याच्या खटपटीत पॉवेलजींनी इतिहास उकरला, दोन देशांतील लोकांचे वैमनस्य उच्चारून दाखविले. एक ना अनेक भारतीय, पाकिस्तानी, आफ्रिकी, वेस्ट इंडियन्स यांना त्यांच्या त्यांच्या देशात घालविण्याच्या तयारीत ओल्याबरोबर सुके (?) जाळण्याचा हा पॉवेलसाहेबांचा उद्योग तर खराच! शॅडो कॅबिनेटमधील टोरी पक्षाचे गृहमंत्री श्री. क्विंटन हॉग यांनी मात्र पॉवेलच्या ह्या मताला कडाडून विरोध केला आणि आयरिशांना ब्रिटनमध्ये परके अन् उपरे ठरविण्याचा कायदा 'मी मेल्यावरच संमत होऊ शकेल' (only over my dead body) ही गर्जना केली.

गंमत अशी आहे की ज्याप्रमाणे ब्रिटनला महाकाळू जमेकन बस व गाड्या चालवायला हवेत, काळे भारतीय डॉक्टर्स इंजिनिअर्स व आर्किटेक्ट म्हणून हवेत, त्याचप्रमाणे गोरे साधेभोळे आयरिश कारखान्यात मजूर म्हणून हवेत. दरवर्षी २०,००० आयरिश नोकरीस्तव देश सोडतात व त्यातले अधिकाधिक ब्रिटनमधे येतात. पॉवेलच्या शनिवारच्या भाषणाची दखल आयरिश लोक घेणार नाहीत. परंतु त्या भाषणामुळे ब्रिटिश मनुष्य मात्र चिंतेत पडला आहे. आयरिश लोक अल्पशिक्षित आहेत, (इंग्लिश मनुष्य त्याच्या पद्धतीनुसार त्यांना अशिक्षित म्हणतो.) पण तगडे आहेत. हॅरॉल्ड जॅक्सन नावाचा स्तंभलेखक म्हणतो, जर इनॉक पॉवेल पंतप्रधान झाला तर आयर्लंडला त्यांच्या दहा क्रेन ड्रायव्हर बायका (!) परत मिळतील! ह्या एकाच वाक्यावरून आयरिश लोकांच्या ब्रिटनवरील साहाय्याची आकडेवारी देण्याची गरज पडणार नाही. ६८०,०००

आयरिश सध्या ब्रिटनमध्ये नर्सच्या नाजूक कामापासून कारखान्यातल्या मजुराच्या अवघड कामापर्यंत निरनिराळ्या प्रकारे खपत आहेत.

शुद्ध ब्रिटिशत्वाची व्याख्या फक्त पॉवेल साहेबांनीच करावी. उपरे देश सोडून गेले तर उरणार कोण एवढाच विचार व्हायचा राह्यलाय्. ह्या सर्व ऊहापोहातून डोळ्यांसमोर उभा राहतो, बुडत्या पेशवाईतला स्पृश्यास्पृश्य मानणारा ब्राह्मण-पॉवेलजींचा टी.व्ही.वरील धूर्त, सनातनी चेहरा पाहून ! इनॉक पॉवेल मूळ वेल्श रक्ताचे आहेत. सध्या वेल्शभाषेचा आग्रह धरणाऱ्या काही तरुणांवर खटले चालू आहेत. वेल्श लँग्वेज सोसायटीला यश आले तर खुद्द पॉवेलजींना स्वत:चे ब्रिटिश नागरिकत्व गमवावे लागेल. सध्या तरी त्यांनी तीच चिंता धरावी झाले ! !

■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९८८
२५९६३
२१।७।८६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

११

# 'थंड' निवडणूक

लंडन येथे निवडणुकीची धमाल अशी दिसलीच नाही. किंबहुना एखाद्या वर्तमानपत्र न वाचणाऱ्या माणसाला रस्त्यावर कितीही फेऱ्या मारल्या, तरी निवडणूक जवळ आली आहे, याचा वास लागणे अशक्य. भित्तिपत्रके नाहीत, मोठाले फलक किंवा फरारे नाहीत, मोटारगाड्यांतून ध्वनिक्षेपकावरून गर्जना नाहीत, कॉर्नर मीटिंग्ज नाहीत किंवा 'लाखोंकी तादातमें' हाईड पार्कवर सभाही नाहीत. अगदी विल्सनसाहेबांचीही सभा झाली तरी, भाषणाला हजार-दोन हजारांपेक्षा अधिक जमाव दिसत नाही. लोक निवडणुकीसाठी उदासीन आहेत, असे काही नाही, परंतु आपल्याकडे ज्याप्रमाणे निवडणुकीपूर्वी तीन महिने जळी-स्थळी (?) एकच एक चर्चा ऐकू येते, ती येथे अजिबात नाही किंबहुना निवडणुकीचा दिनांकच मुळी केवळ महिनाभर अगोदर घोषित केला. महिनाभर काय तो निवडणूक प्रचार. त्यातही एक-दोनदा विल्सन व हीथ (हुजूर पक्षाचे नेते) यांना बर्फावरून स्केटिंग करायला आणि गोल्फ खेळायला सवड मिळाली.

तीन पक्षांच्या (मजूर, हुजूर व लिबरल) उमेदवारांना 'इलेक्शन फीव्हर' चढला

असला तरी एकूण जनता शांत आहे. सर्व व्यवहार सुरळीत चालू आहेत. मी येथे आलो तेव्हा काहींच्या मोटारींवर ' डोंट ब्लेम मी, आय हॅव्ह व्होटेड कॉन्झर्व्हेटिव्हज् ' ( मला दोष देऊ नका, मी हुजुरांना मत दिले आहे ) असे वाक्य लिहिलेले पाहात असे. तो निवडणुकीनंतरचा कॉन्झर्वेटिव्हप्रेमी लोकांच्या प्रचाराचा भाग होता. दोष देण्याइतपत लेबर गव्हर्नमेंट ' कॉंग्रेसी ' मला तरी वाटले नाही, पण लोक स्पष्टवक्ते आहेत. हल्लीच्या वाहतूकमंत्री बार्बारा कॅसल नामक महिला आहेत. त्या पूर्वी कुणी एक चुकार वाहतूकमंत्री होता. तो काम नीट करीना आणि मग मोटारींच्या कांचावर वाक्य लागले, ' कम बॅक मि. एक्स, यू हॅव्ह बीन फर्गिव्हन ' लोकांना मि. एक्स ( पूर्वीचा मंत्री ) त्या वेळचा चुकार वाहतूकमंत्र्यांपेक्षा बरा वाटू लागल्याने त्याला क्षमा करून ' ये रे माझ्या मागल्या ' ची घोषणा लोकांनी सुरू केली होती, पण ते तेवढेच. एकूण राजकारणावर चघळत बोलण्यात मजा वाटणारे लोक कमी असावेत.

इथल्या प्रमुख पार्टीज् तीन-लेबर ( मजूर पक्ष ),कॉन्झर्वेटिव्ह ( ह्यांनाच लेबर पार्टीचे लोक ' टोरी ' म्हणून चिडवितात ) आणि लिबरल ( उदारमतवादी ).अर्थात खरी लढत पहिल्या दोन पक्षांतच गेली अनेक वर्षे चालू आहे. विसाव्या शतकात लिबरल्स राज्यावर कधीच आले नाहीत. टोरी पक्षाचे प्रमुख श्री. एडवर्ड हीथ हे काही महिन्यांपूर्वी पूर्वेकडील देशांचा दौरा करून आले. त्या वेळी ते भारतात गेले होते. ते उत्तम संगीततज्ज्ञ असून, संगीत शाळेत गीताचे पाठ देताना एकदा टी.व्ही.वर दाखविले होते. एकूण मनुष्य उमदा, तसे सध्याचे पंतप्रधान विल्सन काही कमी उमदे नाहीत, पण हीथपेक्षा विल्सन फारच धूर्त वाटतात. शुद्ध बी.बी.सी. इंग्लिश बोलण्यात दोघांचाही हात धरणे कठीण आहे. ( इंग्लंडमध्ये असंख्य शब्दोच्चारांनी इंग्लिश बोलण्याची पद्धत आहे. गावोगावी इंग्लिश बदलते. लंडनचे ' कॉकने ' इंग्लिश तर प्रसिद्ध आहे ) अर्थात विल्सन चेहऱ्यावरून धूर्त तसेच रागीट वाटतात. ते तोंडात सदैव पाईप ठेवत असल्याने कित्येकांना हा चर्चिलची नक्कल करण्याचा प्रयत्न करतो म्हणून राग येतो. ह्याच्या उलट विरोधी पक्षनेते हीथ अगदी निवडणुकीच्या रिंगणातही तापून बोलताना चेहऱ्यावर शांतच वाटतात.

टी.व्ही. वर प्रचार करण्यास एखाद्या पक्षास जर संमती हवी असेल, तर त्या पक्षाचे किमान ५० उमेदवार निवडणुकीला उभे हवेत आणि ह्या दंडकामुळेच कुवत नसताही कम्युनिस्टांनी ५७ उमेदवार उभे करून, चंग बांधला आहे. सध्या हाऊस ऑफ कॉमन्समध्ये साम्यवादी कुणीच नाही, यावरून ३१ मार्चला किती कम्युनिस्ट यशस्वी होतील, याची कल्पना येईल. उरलेले उमेदवार किती तरी स्वतंत्र ( इंडिपेंडन्ट ) आहेत.

तुरळक मारामारीचे प्रकार होतात. लंडनच्या ' स्लाव्ह ' नावाच्या भागात एका शाळेत मि. विल्सन प्रचारार्थ गेले असता एका १४ वर्षांच्या मुलाने काचबॉम्ब त्यांच्या डोळ्यांवर फेकला, पण जखम झाली असताही श्री. विल्सननी काढलेले उद्गार कितीही

गंमतीदार आहेत ! ( वुइथ सच ॲन एम, ही शुड बी सिलेक्टेड इन इंग्लिश इलेव्हन ) स्वतःवर हल्ला करणाऱ्या मुलाला शिक्षा करू न देण्याचा आदेश देऊन, उलट गंमतीने त्याला इंग्लंडच्या क्रिकेट टीममध्ये धाडण्याची सूचना देणारा प्रधान विरळाच नाही का ?

तमसातटाकीतला पहिला लेख इथे निवडणुकीची रणशिंगे वाजू लागल्यासंबंधीचा होता. सोमवार दि. १८ मे रोजी इथे निवडणुकीचा दिवस निश्चित करण्यात आला. आपल्याकडे तिथिनिश्चय करतात त्याप्रमाणे ! निवडणूक ह्या वर्षात कधीतरी होणार हे जरी ठरलेले होते तरी ती इतक्या लवकर येईल ही कल्पना नव्हती. परवाच्या शनिवार-रविवारी निवडणुकीचा दिवस ठरेल अशी कल्पना होती. ' टेन डाऊनिंग ' च्या दाराबाहेर वार्ताहरांचा घोळका पंतप्रधान विल्सनना शोधत होता. परंतु शनिवार-रविवारी विल्सन यांनी आळीमिळी गुपचिळी केली. राणी सँड्रीग्हॅमला होती. ती सोमवारी दुपारी परत येणार होती. परवाच्या सकाळच्या वृत्तपत्रात १८ जूनच्या ' तिथिनिश्चया 'ची भविष्यवार्ता केली गेली होतीच. राणी विमानाने लंडनला आली व लगेच हॅरॉल्ड विल्सन-साहेब ' अक्षत ' घेऊन बकिंगहॅम ' राणी ':- वाड्याकडे गेले. त्या भेटीत त्यांनी अठरा जून सत्तर रोजी ' हळद ' लागावी हा मनोदय व्यक्त केला व २९ मे ला पार्लमेंट विसर्जित करण्याची राणीला विनंती केली. सर्वच औपचारिक. मग राणीने होकार दिला. मग ' टेन डाऊनिंग ' ला परतल्यावर तोंडातला पाईप सांभाळत विल्सन यांनी अठरा जूनला मतदान होईल हे जाहीर केले. म्हणजे निवडणुकीची तारीख केवळ एक महिना अगोदर जाहीर केली. राजकीय वर्तुळात पंतप्रधान विल्सन हे दीर्घमुदतीच्या निवडणूक प्रचाराच्या विरुद्ध असल्याचे सर्वांना ठाऊकच आहे. २९ मे रोजी पार्लमेंट विसर्जित होईपर्यंत कुणालाही प्रचार करायला मुभा नाही. म्हणजे पत्रके, घोषणा वगैरे. बाकीचा प्रचार तसा गेले काही महिने चालूच आहे. त्याबद्दल विरोधी पक्षनेते श्री. हीथ म्हणतात,

'We have had five years of bad Government and five months of non-government because Mr. Wilson started electioneering at the beginning of this year.'

ते काही असो, अठरा जूनच्या दिवसाची घोषणा अठरा मेला केली गेली तरी कुणाला आश्चर्य वाटले नाही याचे कारण निवडणुकीची चाहूल तशी बरेच दिवस अगोदर लागली होती.

चार वर्षांपूर्वी झालेल्या पुनर्निवडणुका ३१ मार्च १९६६ रोजी होत्या. निर्भेळ बहुमत मिळविण्यासाठी वर्षाअगोदर मतदान झाले असताही पंतप्रधान विल्सन यांनी ६६ मध्ये परत निवडणूक घेतली होती. त्या मतदानाच्या वेळचा प्रस्तुत लेखकाचा लेख पुण्याच्या सकाळमध्ये प्रसिद्ध झाला होता. तो अजून आठवतोय. त्या वेळची प्रतिक्रिया केवळ

भारतातील गरमागरम धकाधकीच्या मामल्याच्या निवडणुकांवरून येणार नाही. इथले मतदान किती थंड होते हे तेथे समजूही शकणार नाही. आता त्या आगळ्या प्रकाराची सवय झाली आहे. आठ जूनपर्यंत उमेदवार नावे दाखल करतील. २९ मे नंतर प्रचाराला सुरुवात झाल्यावरही गल्लोगल्ली 'इलेक्शन फीव्हर' चढलेला दिसणार नाही. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी वृत्तपत्र न वाचणाऱ्याला व आकाशवाणीवरील बातम्या न ऐकणाऱ्याला आज निवडणुका आहेत हे कळणार देखील नाही. एकूण हा सार्वत्रिक निवडणुकांचा मामला लवकरच खतम होणार. त्याला 'शिमगा' म्हणायला वावही मिळणार नाही, इतक्या चुटकीसरसे मतदान संपेल. ही लढाई जिंकणार कोण ? लेबर की कॉन्झर्वेटिव्ह ? ( का लिबरल ! ) निवडणुकांचा दिवस निश्चित झाल्याबरोबर पत्रकारांनी तीनही पक्षनेत्यांची मुलाखत घेतली. रॉबिन डे नावाच्या बी.बी.सी. च्या वार्ताहराने टोरी पक्षाच्या एडवर्ड हीथला प्रश्न केला, ' समजा, ह्या दुसऱ्या प्रयत्नातही तुम्ही हरला तर मग हीथसाहेब, पक्षनेतृत्वाचा तुम्ही राजीनामा द्याल काय ? ' ह्या सवालाला जबाबही चपखल आला. ' ह्या वेळी आम्ही जिंकणार आहोत, मला वाटतं, तुमच्या प्रश्नाचं उत्तर आम्ही विजयी होणार हेच आहे ! ' अर्थात जिंकणार कोण याचं उत्तर लांब नाही.

निवडणुकानंतर लगेच २९ जूनला पार्लमेंट बोलावली जाईल. सभापती निवडून प्रत्येक सभासदाचा शपथविधी सुरू होईल. दोन जुलैला राणी आपल्या भाषणाने नवीन पार्लमेंटचं उद्घाटन करील. मग परत आपला राज्यकारभार चालू. इथल्या टाईम्स वृत्तपत्राने Marplan नावाचा एक सर्व्हे योजिला होता. साठ मतदारसंघांतील १,६१३ विविध प्रकारच्या मतदारांच्या मुलाखती घेऊन त्यांना प्रत्येकी दोन प्रश्न विचारले होते, ' समजा, उद्या निवडणूक असेल तर तुम्ही कुणाला मत द्याल ? ' हा एक प्रश्न. दुसरा प्रश्न म्हणजे, ' निवडणुकीत कोणता पक्ष जिंकेल ? ' ह्या प्रश्नांच्या उत्तरांची मोजणी शेवटी लेबर पक्षाच्या बाजूने झुकली. एकूण साठ जागा अधिक जिंकून लेबर पक्षाचे निर्भेळ मताधिक्य होईल असा मारप्लॅनचा अंदाज आहे. पंतप्रधान विल्सनसाहेबांच्या मनात काय आहे ते सांगणे कठीण आहे. त्यांची वागणूक अजून तरी आपण निश्चित जिंकणार ह्या आत्मविश्वासाचीच दिसते. उत्तर आयर्लंडमधील चाललेले अराजक हे विल्सन यांनी जवळ आणलेल्या निवडणुकीचे एक कारण आहे. युरोपियन कॉमन मार्केटमध्ये शिरण्याकरता ब्रिटनने सादर केलेल्या आवेदनाचा विचार सुरू होईल त्या वेळी तमसातटाकी नवीन सरकार आलेले असेल. भरकन निवडणुका संपवून पुन्हा राज्यकारभारावर निर्वेध येण्याची विल्सनसाहेबांना हाव तर सुटली नाही ना ? मध्यंतरी कॉन्झर्वेटिव्ह व लिबरल पक्षासंबंधी टीका करताना पंतप्रधान विल्सन म्हणाले होते, ' लोक मला कितीही कंटाळलेले असले तरी शेवटी निवडणुकीच्या प्रांगणात ते त्या दोन भुतांपेक्षा ( Evils )परत माझाच स्वीकार करतील. ' लोक कोणत्या भुताला जवळ

करतात ते महिन्याभराने दिसणारच आहे. कारण गेल्या पाच वर्षांतला लेबर सरकारचा कारभार दिवाळखोरीचाच झाला आहे. तरीसुद्धा विल्सन यांचा आपल्या पक्षधोरणावरच विश्वास आहे. लोक आपल्या धोरणावर विश्वास ठेवून लेबर पक्षाच्या पेटीत मतांचा फुलोरा उभा करतील ही त्यांची स्वप्नील स्थिती तर नाही ना? मारप्लॅनप्रमाणे लोक दिवाळखोर लेबर पक्षाची तळी उचलून धरणार की पॉवेलिझमच्या पगड्याखाली गेलेल्या पुराणमतवादी कान्झर्वेटिव्ह पक्षाला मते देणार हे बघण्यासारखे ठरेल. रॉबिन डे यांनी श्री. हीथ यांना इनॉक पॉवेलविषयी प्रश्न केला की श्री. पॉवेल यांना मंत्रिमंडळात स्थान देणार काय? हा अप्रिय प्रश्न हीथ महाशय डावलू पाहात होते. परंतु डेनी सारखा पिच्छाच पुरविला तेव्हा किंचित चिडून ते उद्गारले, 'इनॉकला टोरीपक्षाच्या मंत्रिमंडळात स्थान नाही हे गेले कित्येक महिने मी घसा खरडून सांगत आहे. माझी धारणा अजून कायम आहे!' श्री. पॉवेल यांच्याविषयीची हीथ यांची ही इतराजी अथवा नाराजी फक्त काळ्यांच्या मतांवर डोळा ठेवून आहे काय? कारण त्यांचे पक्षधोरण काय हे विचारले असता ते केवळ प्रतिक्रियात्मकच उत्तर देतात. उपऱ्यांच्या जागत्या प्रश्नाविषयी पक्षभूमिका स्पष्ट करण्याऐवजी ते लेबर कारकीर्दीतील वाढती महागाई, करांचा अवाढव्य बोजा, जागोजागचे संप, विस्कटलेली घरबांधणी योजना ह्यांचेच विस्तृत वर्णन करतात. गंमत अशी आहे की लेबर सरकार निकम्मे आहे हे कबूल केले तरी टोरीपक्ष ते सर्व उष्टेखरकटे निपटण्यास समर्थ आहे काय हाही प्रश्न शिल्लक राहतोच. तिसरा लिबरल पक्ष तीनशेतीस जागा लढविणार आहे. त्या पक्षाची आर्थिक स्थितीही आता सुधारलेली आहे. स्वतंत्र स्कॉटलंड व वेल्स लोकांचे स्वतंत्र वेल्शराष्ट्र या मागणीचा अहोरात्र पुरस्कार करणारे पक्षही जिद्दीने निवडणूक लढविणार आहेत. साम्यवादीही निवडणुकीच्या अंगणात उतरले आहेत. स्वतंत्र उमेदवार आहेतच. एकूण निवडणूक चुरशीची होणार यात शंका नाही.

■

## १२

# ' काळयांचा ' प्रश्न

सगळ्या पाश्चात्त्य जगतात सध्या परवलीचा शब्द आहे-पर्मिसिव्ह सोसायटी. त्यातून इंग्लंड अमेरिका हे या बाबतीत अधिक पुढे गेलेले. तिथे तर काय देशाच्या बाबतीत बोलायचे तर सांगतात 'फ्री कंट्री!' त्यामुळे अशा सर्व तऱ्हेचे स्वातंत्र्य असलेल्या देशातील विमुक्त समाजाला अगदी ' जो जे वांच्छिल तो ते लाहो' चे पसायदान मिळालेले आहे. पर्मिसिव्ह सोसायटीचा टाहो गेल्या लेखात काही प्रमाणात वर्णन केला होता. टेस्ट ट्यूब बेबीपासून नको असलेल्या संततीपर्यंतचा. 'आहारनिद्राभयमैथुनंच- ' ह्यामधे सिगारेट, मद्य आणि अमली औषधे ( Drugs ) यांचा समावेश व्हायला हवा. कारण इथली तरुण जनता आता केवळ उन्मनी अवस्थेतच सापडायला लागणार आहे. हृषिकेशच्या महर्षी महेश साधूचे शिष्योत्तम ' बीटल्स ' यांच्यापैकी जॉन लेनन नावाच्या एका गायकाने परवा एका फ्रेंच मासिकाला मुलाखत दिली. १९६५ मध्ये ते चौघे गायक राणीच्या बर्किंगहॅम राजवाड्यात M. B. E. ( राष्ट्रपतिपदक ) घेण्याकरता गेले असता त्यांनी राजवाड्यातील शाही शौचकूपात ' मारिहवाना ' सेवन केला ! ह्याचेच नाव विमुक्त

समाज. एवढेच नव्हे तर चार वर्षांनंतर त्यांनी व्हिएटनाम व बियाफ्रामधील युद्धाच्या निषेधार्थ त्या पदव्या राणीला साभार परत केल्या. त्याच विमुक्त ब्रिटनमध्ये आता लोकसंख्या वाढते आहे. अन्यान्य देशांतून वसाहतीकरता येणाऱ्या उपऱ्या लोकांमुळे आणि त्यांच्या वाढत्या लेंढारामुळे ! या दोन्ही लोंढ्यांना थोपविण्याकरता इनॉक पॉवेल जिवाचे रान करीत आहेत. नुकतेच त्यांच्याच पक्षाचे सर जेरॉल्ड नाबारो आपल्या मिश्यांचे आकडे वळवून पॉवेल यांना पावले आहेत. ते म्हणतात- Enough is enough, Enoch is right ! परंतु इतके असूनही निसर्गक्रमेण वाढणारी संतती वाढतेच आहे. फॅमिली प्लॅनिंगचे योजक संततिनियमनाच्या अभ्यासात गर्क आहेत आणि इतर डॉक्टर्स वंध्या स्त्रीची कूस उजविण्याकरता खटपट करीत आहेत. टेस्ट ट्यूब बेबी अजून जन्माला यायची आहे, परंतु 'फर्टिलिटी ड्रग्जच्या' साह्याने मूल निपजविण्याची जी पद्धती गेल्या दोन वर्षांत इथे अंमलात आणली गेली ती अचाट होती. अशा तऱ्हेचे औषध घेतलेल्या स्त्रियांना एक दोनच नव्हे तर 'सातळ' होण्यापर्यंत मजल गेली ! बर्मिंगहॅममधील एका इंग्लिश बाईने ही 'सुपीक औषधी' घेतली आणि तिला एकाच वेळी सात मुले झाली. नंतर अशी आश्चर्ये कितीक घडली. गार्डियनने त्या वेळी एक गंमतीदार व्यंगचित्र प्रसिद्ध केले होते. लेबर आणि कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे एकेक कार्यालय दाखविले होते. टोरी पक्षाचा सचिव आपल्या मतदार जोडप्याला टेबलावरील बाटलीतील Fertility Drug देत होता- गुणितजनन होऊन आपल्या पक्षाचे मतदार वाढविण्याकरता ! लेबरपक्षाच्या कार्यालयात ती जगप्रसिद्ध संततिप्रतिबंधक The Pill वाटली जात होती-बिचारा मजूर पक्ष लोकसंख्या कमी ठेवण्याच्या खटपटीत आपले मतदार कमी करीत होता ! !

संततीसंबंधी सतत उलटसुलट प्रयत्न चालले असतानाच मार्चच्या मध्याला इनॉक पॉवेल यांनी आणखी एक अग्निबाण सोडला. ब्रिटनमध्ये राहणाऱ्या देशांतरित लोकांसंबंधीच्या प्रश्नाच्या सर्व बाजू घासून अभ्यास करण्याचा पॉवेलजींनी चंग बांधला आहे. आताचा त्यांचा शोध पाहा. इमिग्रंट लोकांना होणाऱ्या मुलांचे प्रमाण भयानकरीत्या वाढत असून १९८६ मध्ये त्यांची संख्या १३००००० वरून ३५००००० वर जाईल व नंतर दोन हजार साली तेच लोक ४५००००० वर जातील. ही त्यांची आकडेवारी संपूर्ण चुकीची आहे असे सांगताना समाजकार्यमंत्री श्री. क्रॉसमन यांनी श्री. पॉवेल यांचे विधान Irresponsible and alarmist अशा शब्दात वर्णन केले. श्री. क्रॉसमन यांनी शासकीय पद्धतीने श्री. पॉवेल यांची क्रॉसएक्झामिनेशन घेऊन स्वतःचे आकडे प्रसिद्ध केले. ते इनॉकच्या आकड्यांपेक्षा निम्म्याने कमी होते. आता उपऱ्या लोकांच्या जगलेल्या संततीविषयीची टक्केवारी पाहा. एकूण जननात त्यांचे ११.८% प्रमाण. त्यात ५.८%

भारतीय ( अर्थात पूर्व आफ्रिकी भारतीय धरून ) व वेस्ट इंडियन लोकांची मुले ३.२% आयरीश लोकांची मुले २.८% बाकीच्या युरोपियन तथा अमेरिकनांची मुले म्हणजे ३.२+२.८=६% मुले गोरी तर ५.८% मुले काळी अन् महाकाळी श्री क्रॉसमन यांनी पॉवेलांचा धिक्कार करताना म्हटले की पॉवेलचा खरा ' आठवा देवकीपुत्र ' ६% प्रमाणात असून तो गोराच आहे ! मग काळ्या उपऱ्या लोकांना नावे का ठेवा ?

अर्थात काळे लोक ज्या ठिकाणी अधिक प्रमाणात राहतात त्या ठिकाणी काळी संतती टक्केवारीने अधिक आहे यात आश्चर्य ते कसले ? लंडनच्या ब्रेन्ट नावाच्या विभागात ३३ प्रतिशत संतती काळी होती. परंतु त्या भागातील लोकसंख्येत ३० टक्के प्रजाच काळी आहे तेव्हा अशा आकडेशास्त्राने कुणी घाबरण्याचे कारण नाही. गंमत अशी आहे की ब्रिटनमध्ये सध्या जे भारतीय आहेत ते बहुतांश तरुण आहेत. त्यांच्या बायका २० ते ४० वयाच्या आत आहेत. म्हणजेच मूल होण्याच्या वयाच्या आहेत. प्रथम पुरुष ' व्हाव्चर ' घेऊन इथे येतात व नोकरी लागून सर्व स्थिरस्थावर झाले की आपल्या बायकांना बोलावितात. ' नयी जिंदगी-नया जीवन ' जगण्याकरता आलेल्या त्या भारतीयांच्या घरी परिणामेअन्ते पहिला पाळणा लवकरच हालतो. अर्थात याचा खरा अर्थ असा नव्हे त्या भारतीय जोडप्यांना एक दोन व मग अनेक मुले होणार आहेत. सर्वच भारतीय रोममध्ये रोमनांप्रमाणे वागावे म्हणून इथल्या जीवनपद्धतीचा आवश्यक तेथे स्वीकार करीत आहेत. त्यामुळे दोन खूप व तीनानंतर पूर्णविराम हे तत्त्व त्यांना मान्य आहे. मग अशा नवविवाहित भारतीय जोडप्यांच्या पहिल्या दोन मुलांवरच पॉवेलसाहेबांचा ' कंसनेत्र ' राहणार असेल तर आमचे काही म्हणणे नाही. वेस्ट इंडियन लोक भारतीयांच्या खूप अगोदर इथे स्थलांतर करून आले आहेत. त्यांच्या देशात कॅरेबियन समुद्राकाठी राहून समुद्रातील माशाप्रमाणे प्रजा वाढवून गोकुळ करायची पद्धत आहे. तेच लोक ब्रिटनमध्ये जेव्हा आले त्या वेळी त्यांनी संततिनियोजनाचे धडे घेतलेच: तेव्हा शहाणे फक्त ब्रिटिशच आहेत हे खरे नाही. जेव्हा भारतीय, आफ्रिकी अन् आयरिश व इतर युरोपियन लोकांच्या संततीविषयीची टक्केवारी प्रसिद्ध झाली तेव्हा बारा मार्चच्या ईव्हनिंग स्टॅन्डर्ड ह्या ' सांजमराठ्यात ' एक खासे चित्र जॅक नावाच्या व्यंगचित्रकाराने दिले. एक गोरा उपरा आयरिश महाकाळू जमेकन काळ्या पगडीबंद सरदारजीला म्हणतो- We Irish are two and half per cent more sexy than any of you.

मात्र ह्या उपऱ्यांच्या जननाचा हिशेब वर्षातील एका सहा महिन्याच्याच कालखंडात घेतला गेला. गंमत अशी की तो सहा महिन्यांचा काळच ब्रिटनमध्ये अधिक सुपीक असतो. त्या सहा महिन्यांतच पक्ष्याप्रमाणे इथे जास्तीत जास्त स्त्रिया प्रसूत होतात, हेही श्री. क्रॉसमन यांचेच विधान. तेव्हा ती सहा महिन्यांची आकडेवारी संपूर्ण वर्षाला लावणे किती चुकीचे ठरेल !

समाजकार्यमंत्रिमहोदय श्री. क्रॉसमन इनॉक पॉवेल यांची आकडेवारी ऐकल्यावर केवळ भडकले इतकेच नव्हे तर त्यांनी त्या प्रश्नाबाबत सखोल अभ्यास करून आपले मत प्रसिद्ध केले. वाढते आहे ना लोकसंख्या, वाढू द्या. हे चिमुकले बेट काही त्या भाराने बुडून जाणार नाही. ब्रिटनमध्ये नवीन नगररचना होत आहेत. औद्योगिक वसाहती बांधल्या जात आहेत. मग लोकसंख्या वाढली तर बिघडले कुठे ? ती लोकसंख्याच समाजबांधणीकरता पूरक ठरेल हा त्यांचा विश्वास. गार्डियन वर्तमानपत्राच्या अग्रलेखात संपादकांनी आपली बाजू उचलून धरली. पॉवेलजींना त्यांनी 'काय आकडे मोजीत बसशी, हिशेबात रसनिर्मिती कैची' असा सवाल करून म्हटले- But what afterall does all Mr. Powell's numerical (and usually inaccurate !) hairsplitting matter ? Does it really matter whether coloured people from 3, 4, 5 or 10 per cent of Britain's population by the year X ? It will only matter if people insist on treating them as second class citizens and deny equal esteem.'

शेवटी त्यांनी म्हटले की ब्रिटनच्या शाळेत, कारखान्यात अथवा खेडेगावात जे घडते ( अर्थात दुजाभाव ) ते अधिक महत्त्वाचे की प्रसूतिगृहात किती जनन होते ते महत्त्वाचे ? श्री. पॉवेल यांच्या आकडेशास्त्राला विरोध करणाऱ्या वृत्तपत्रात टाइम्स, गार्डियन व टेलिग्राफ ही तीनच वृत्तपत्रे आघाडीवर होती. आणि ब्रिटनमध्ये ही तीनच वर्तमानपत्रं खरी आहेत. बाकीची डेली मिरर, एक्स्प्रेस, डेली मेल, सन् आणि स्केच वगैरे आलतूफालतू 'मराठा' वृत्तपत्रे पॉवेलची तळी उचलून 'आवाज' करीत होती !

गृहमंत्री श्री. कॅलहॅन यांनी नुकतीच वर्ण-वंश संबंधावर विचार करण्याकरता एक सभा आलिशान उपाहारगृहात आयोजित केली. 'रेस रिलेशन ॲक्ट' ब्रिटनमध्ये आल्याला वर्ष लोटले. आणि तरीसुद्धा नोकरी तथा उत्पादनखात्याचे श्री. एडमंड डेल म्हणतात की, उपऱ्यांच्या बाबतीत अजूनही सापत्नभाव चालू आहे. प्रत्यक्ष घडते आहे काय यासंबंधी 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर इकॉनॉमिक ॲंड सोशल रीसर्च' या संस्थेने एक स्वतंत्र अहवाल प्रसिद्ध केला आहे. सर्वश्री जोन्स व स्मिथ यांच्या दोन वर्षांच्या परिश्रमपूर्वक केलेल्या अभ्यासावरून असे दिसते की, ब्रिटनच्या सर्वांगीण उन्नतीमध्ये उपऱ्या वसाहतवादी लोकांचा हात अधिक आहे, हे सर्वमान्यच आहे. काळे लोक मन लावून काम करतात. रात्रपाळी करण्याकरता इंग्लिश लोक नाखूष असतात, तर हे खूप राजी असतात. इंग्लिश माणसाप्रमाणे स्वतःची नोकरी व नोकरीजवळचे किल्लारूपी घर इतके संकुचित इमिग्रंट लोकांचे विश्व नसते. सांगाल तिथे नोकरीस जाण्यास ते तयार असतात. हे झाले वरील संस्थेचे मत. प्रस्तुत लेखक दोन वर्षांपूर्वी मॅंचेस्टरजवळ बोल्टन नावाच्या औद्योगिक गावी गेला असता आढळून आले की, तिथल्या कारखान्यात ७५

प्रतिशत माणसे भारतीय आहेत. कारखान्याचे मालक स्वत: इंग्लिश असूनही इंग्लिश कामगार भरती करण्यास नाखूष असतात. ह्याचे कारण एकच- भारतीय माणसाच्या नेकीचा स्वभाव. ही जर सत्य परिस्थिती आहे तर बिचारे पॉवेल महाशय वाढत्या कृष्णवर्णीयांच्या संख्येने उदास होऊन ब्रिटनमध्ये रक्तरंजित क्रांती ( Rivers of Blood हे त्यांचे शब्द ! ) होईल ही भीती का व्यक्त करतात कोण जाणे !

पुढील शतकात लोकसख्या तर सर्व जगाचीच वाढणार आहे. युनायटेड नेशन्सच्या 'डेमॉग्रॅफिक इयर बुक' मध्ये प्रसिद्ध झालेय की २००९ साली जगाची लोकसंख्या दुप्पट होईल. ७०००० लक्ष लोक त्या वेळी पृथ्वीच्या पाठीवर असतील ( पैकी चंद्रावर किती जातील ते अमेरिका जाणे ! ) चिनी लोकसंख्येला भारत १९९९ मध्ये मागे टाकील. जगाची अर्ध्याहून अधिक लोकसंख्या तर केवळ एकट्या आशिया खंडात आहे. लोकसंख्येच्या बाबतीत ब्रिटनचा अकरावा क्रमांक लागतो आणि तरीही श्री. पॉवेल कुरकूर करतातच. ते काहीही असो, उपऱ्यांची ब्रिटनमधील वाढती लोकसंख्या मजूर आणि पुराणमतवादी टोरी पक्षांना ७१ सालच्या निवडणुकांबाबतीत सारखीच छळते आहे. नुकतेच इथले आपले राजदूत श्री. आप्पासाहेब पंत केनियात गांधी शताब्दीच्या कार्यक्रमासाठी गेले होते. त्या वेळी पंतप्रधान केनियाटा व इतर मंत्र्यांची त्यांनी भेट घेतली. पूर्व आफ्रिकी देशांच्या स्वातंत्र्य चळवळीला त्यांनी १९४८-५४ मध्ये तिथल्या भारतीय दूतावासात असताना पाठिंबा दिला होता. इतका की त्यांची तिथून हकालपट्टी व्हावी असा तिथल्या गोऱ्या वसाहतवाद्यांनी डाव टाकला होता. केनियात आप्पासाहेबांचे बरेच वजन आहे. ब्रिटिश पासपोर्टधारी भारतीयांचा ओघ ब्रिटनकडे वळला असता त्या ज्वलंत प्रश्नावर आप्पासाहेब पंतांनी केनियात कृष्णशिष्टाई केली आणि शेवटी ७०००० पैकी ४०००० केनियातील भारतीय लोक भारत सरकार स्वीकारू शकेल. ( त्यांनी भारतीय नागरिकत्व घेतले तरच ! ) ही सुवार्ता त्यांनी दिली. त्या बातमीचा इथे खूपच गाजावाजा झाला. गृहमंत्री कॅलॅहॅनना त्यामुळे खूपच हायसे वाटले असेल. नाहीतरी ह्या प्रश्नाने त्यांची झोप गेले काही महिने उडालीच आहे. रंजन वेद संबंधीच्या लेखात शेवटी एक वाक्य होते. एक रंजन वेदच कार आता केनियातील सगळेच भारतीय ब्रिटनमध्ये पदन्यास करतील ! आणि योगायोग असा की पुढच्याच आठवड्यात बातमी आली की दोन प्रचंड जहाजे प्रत्येकी हजार लोक घेऊन ब्रिटनकडे येण्यास निघाली आहेत. अनुमान असे केले जाते की, त्या दोन सहस्र ब्रिटिश पोसपोर्टवाल्यांपैकी एकाजवळ जरी एन्ट्री परमिट असेल तर सर्वच्या सर्व जहाजं इंग्लंडच्या धक्क्याला लावणे सरकारला भाग पडेल. आणि मग ? परत श्री. कॅलॅहॅनना हार पत्करावी लागेल. आता परिस्थितीच अशी आहे की, फार ताणून धरले तर निवडणुकीत यश नाही. पॉवेलिझम्मुळे टोरी पक्षालाही काळ्या लोकांची मते नाहीत. जिथे काळ्यांचे प्रमाण कमी आहे तिथले गोरे लोक मजूर

पक्षाला मत देणार नाहीत. काळ्या लोकांचे ठरावीक गावात ' गेटो ' तयार होऊ नयेत म्हणून त्यांची वस्ती पांगविण्याकरता मजूर पक्ष त्यांना घरे मिळू नयेत अशी योजना आखीत आहे. त्याकरता त्या त्या गावची गृहनिर्माण योजना मंदावली आहे. आणि परत त्या टंचाईमुळे गोरे लोक मजूर पक्षाची कोंडी करीत आहेत ती निराळीच. एकूण दोन्ही पक्षांना काळ्यांच्या ह्या प्रश्नाने निवडणुकीपुरते भंडावले आहे. ' धरले तर चावते अन् सोडले तर पळते ' ही त्यांची अवस्था आहे. आता निवडणुकीची ' दिल्ली ' दूर नाही. वुलवर्‌हॅम्प्टनमधून पॉवेल निवडून आले तर ते एक आश्चर्य ठरेल. श्री. आप्पासाहेब पंत नैरोबीला गेले असतानाच टोरी पक्षाचे लॉर्ड बटलर मौ. आझादांवर भाषण देण्यास दिल्लीला गेले होते. तिथे त्यांनी स्वपक्षीय पॉवेलसाहेबांचा धिक्कार केला आणि जर टोरी पक्ष पॉवेलिझम्‌कडे वळणार असेल तर मी माझा राजीनामा सादर करीन अशी घोषणा केली. पक्षनेते श्री. एडवर्ड हीथ व त्यांचे हस्तक श्री. क्विंटन हॉग यांनी मात्र उपऱ्यांना परके म्हणूनच समजले पाहिजे असे पक्षधोरण अवलंबिण्याचे ठरविलेले दिसतेय. असे जर आहे तर बघू या निवडणुका कोण जिंकतेय.

■

१३

# त्रिशंकू-रंजन वेद

गेले दहा दिवस ब्रिटनमध्ये रंजन वेदने खळबळ माजवली आहे. तिच्या कृतीने सरकारचे रंजन तर झालेले नाहीच, पण भल्याभल्यांची झोप उडाली आहे. ब्रिटिश राजनीतीचे इतके धिंडवडे कधीच निघाले नसतील ! तमसातटाकी असलेल्या त्या इतिहासप्रसिद्ध पार्लमेंट हाऊसमध्ये भयंकर वादळ उठून हाऊस ऑफ कॉमन्स व हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये सरकारचे इतके वाभाडे कुणीच काढले नसतील. धन्य ती रंजन. एक एकवीस वर्षांची, तोटके इंग्लीश बोलणारी, सीधीसाधी, मुलगी नैरोबीहून लंडनला येते काय, तिच्याजवळ योग्य ते प्रवेशपरवान्याचे कागदपत्र नसल्याने लंडन-विमानतळावरूनच ब्रिटिश इमिग्रंट अधिकाऱ्याकडून तिची पुन: नैरोबीला बोळवण होते काय आणि अन्ती १७००० मैलांचा एकूण सर्व प्रवास आटोपून सदतीस तासांनंतर विजयी होत्साती ती लंडन शहरात प्रवेश मिळवते काय, सारेच अजब, अतर्क्य होते. बिचारी रंजन ! शाकाहारी म्हणून तिने विमानात पाव व दूध अथवा चहावरच सर्व वेळ काढला. नैरोबी-लंडन, लंडन-नैरोबी, नैरोबी-जोहान्सबर्ग, जोहान्सबर्ग-नैरोबी आणि

शेवटी नैरोबी-फ्रँकफ्रूट इतका दीर्घ प्रवास करताना तिची बॅडमिंटनच्या फुलाप्रमाणे (Shuttlecock) इकडून तिकडे टोलवाटोलवी झाली. तिच्यापायी लुफ्तांझा विमानकंपनीला ३३० पौंडाचा भुर्दंड बसला. इंग्लंड व केनिया या दोन्ही देशांनी ' नको ही ब्याद ' म्हणून रंजनकडे पाठ फिरवली. फ्रँकफ्रूर्टमधे रंजन हताश होऊन थांबली असता लंडनमधे नदीवर गृहमंत्री कॅलॅहॅन यांचेवर स्वपक्षाच्या तथा विरोधी पक्षाच्या सभासदांनी भरपूर तोंडसुख घेतले. शेवटी गृहमंत्र्यांना दया आली ( की नाइलाज झाला ! ) आणि मनुष्याने मनुष्याकरता केलेल्या कायदेकानूमध्ये अपवाद करून त्यांना रंजन वेद हिला तीन महिन्यांकरता का होईना ब्रिटनमध्ये प्रवेश दिला. फ्रँकफ्रूर्टहून दमलीभागली रंजन लंडनला आली तेव्हा विमानतळावर तिच्या स्वागताला तिचे नातेवाईक होते, सुरक्षिततेच्या जबाबदारीकरता पोलिस होते आणि प्रसिद्धीकरता वृत्तपत्रे अन् टेलिव्हिजन वार्ताहर व छायाचित्रकारांची भाऊगर्दी होती !

एकूण हा सर्व धकाधकीचा मामला आहे तरी काय ? रंजन वेदसारखे बत्तीसजण सध्या निरनिराळ्या ठिकाणी, नव्हे अन्यान्य देशांत त्रिशंकू अवस्थेत ब्रिटनमधे प्रवेश मिळण्याची वाट बघत आहेत. काहीजण रंजनप्रमाणे लंडनला येऊन परत नैरोबीच्या भोज्याला शिवून येऊन आता स्वित्झर्लंड आणि फ्रान्समध्ये अडकले आहेत. विनापरवाना आलेल्या एकोणीसजणांना इंग्लंडमधील कँटरबरी गावी तुरुंगाची हवा खाण्यास पाठविले आहे. असे जर घडतेय् तर मग अजूनही परवाना न घेता अधिकाधिक पूर्व आफ्रिकेतील भारतीय लंडनकडे धाव घेऊन ' हाराकिरी ' का करीत आहेत ? एकदा नैरोबी सोडली की पुन्हा तिकडे परत जायची प्रवेशपत्रिका नसल्याने त्यांना धड लंडन नाही, धड नैरोबी नाही, अन् मग ज्या देशाच्या विमानकंपनीने प्रवास केला त्या देशात ' निर्वाणदिनाची ' वाट बघत थांबावे लागते आहे. झ्युरिच आणि पॅरिसमध्ये अडकलेल्या अभाग्यांचे पैसेही संपत आले आहेत. हॉटेलचे बिल भरता येणे शक्य नसल्याने अशा तिघांना फ्रेंच अधिकारी चतुर्भुज करण्याच्या मार्गावर होते. श्री. प्रफुल्ल पटेल हे ' ब्रिटिश नागरिक समिती ' चे सचीव आहेत. त्यांनी पैसे पाठवताना म्हटले- Home office is deliberately using these people as Shttulecocks and playing with human rights !

आता प्रकरण तापत आहे. या सर्व लोकांना न्याय मिळून ब्रिटनमधे प्रवेश द्यावा म्हणून इमिग्रंट लोकांचे हित पाहणाऱ्या श्रीमती मेरी डाईन्सबाई आता प्रयत्नशील झाल्या आहेत. फ्रान्समधील स्ट्रासबरी येथील युरोपिअन कोर्टात त्या लवकरच खटले चालू करतील.

आपली अनेक भारतीय मंडळी पूर्व आफ्रिकेत गेली. कित्येक वर्षे वसती करून आहेत हे सर्वश्रुतच आहे. गुजराथी व पंजाबी लोकांचे प्रमाण या लोकांत अधिक. पूर्व आफ्रिकेचा कारभार याच लोकांनी इतके दिवस चालवला हे मात्र खरेच. केनिया, युगांडा व झांबिया

यासारख्या सुजलाम् सुफलाम् देशांत वाणिज्य करून या लोकांनी आपले बस्तान बसविले. सुंदर, कोरडी, समशीतोष्ण हवा, भरपूर सूर्यप्रकाश, पाश्चात्त्य संस्कृतीची ब्रिटिश शासनामुळे मिळालेली भौतिक देणगी, ( 'कुशी लाइफ' म्हणून त्याचा इकडे बोलबाला झालेला ), भरपूर पैसा या सर्व गोष्टींचा लाभ उठवत ही मंडळी सुखाने कालक्रमणा करीत होती. आपल्यापेक्षा वर्णाने कितीतरी उजळ असलेल्या राज्यकर्त्यांच्या आश्रयाने, आपल्यापेक्षा अधिकतम कृष्णवर्णीय असलेल्या अशिक्षित दीन आफ्रिकी लोकांवर त्यांच्याच भूमीत वर्चस्व गाजवून या भारतीयांनी 'दुधकुल्ल्या मधुकुल्ल्या' केल्या ! एका मुलाखतीत नैरोबीतल्या एका समंजस भारतीय माणसाने सांगितले ते काही खोटे नाही. तो म्हणतो, 'A lot of our troubles as a cmo-munity have stemmed from the insolent and arrogant attitude of the Asians towards Africans !' राह्यला स्वतंत्र मोठे घर, भरपूर पैसा, कमालीची स्वस्ताई आणि तैनातीला एखादा काळा पोरगा. बिचाऱ्याने स्वयंपाकही करावा. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात आमच्यावर ब्रिटिशांकडून अन्याय झाला, पण तिथे गोरे सरकार व काळी प्रजा असे नाते होते. पूर्वआफ्रिकेत राजा गोरा होता पण महाकाळू लोकांवर काळ्या भारतीयांनी दादागिरी केली. पण आता दिवस पालटले. स्वातंत्र्य आले आणि मग इतके दिवस सुप्त पडलेल्या समाजाला जाग आली. हक्कांची जाणीव झाली. स्वत:च्या देशात परक्या भारतीयांकडून नोकर म्हणून केल्या गेलेल्या अन्यायाची चीड आली. आफ्रिकीकरणाचा प्रयोग नव्या शासनाकडून सुरू झाला. नवी विटी, नवा दांडू ! बदला म्हणून नव्हे परंतु स्वबांधवांवर संस्कार करण्याकरिता भारतीयांना व्यापार परवाने एकदा संपल्यावर परत देण्याचे थांबविण्यात आले. जे भारतीय चाकरीत होते व ब्रिटिश पासपोर्ट भूषण म्हणून बाळगीत होते त्यांची नोकरी करण्याची परवानगी काढून घेण्यात आली. त्याबद्दल दुसरा एक शहाणा भारतीय म्हणतो- 'If the Government had not a policy of giving jobs to its own citizens, it would have been guilty of discrimination against its own people.'

स्वबांधवांना वर आणण्याच्या खटपटीत परक्या देशाचे पासपोर्ट धारण करणाऱ्यांची तमा आता आफ्रिकी शासन बाळगत नाही. त्याचा परिणाम भारतीय बांधव पूर्व आफ्रिकेत सोशीत आहेत. जे दूरदर्शी होते त्यांनी बदलत्या काळाची पावले ओळखून तिथले नागरिकत्व स्वीकारले. बाकीची पूर्वआफ्रिकेतील आम भारतीय जनता मात्र हाल सोशीत आहे. १९६८ साली त्यांच्यावर हे आफ्रिकीकरणाचे गंडांतर येताच त्यांनी भराभर देश सोडून ब्रिटनकडे धाव घेतली. आपला चिमुकला देश ह्या लक्षलक्ष भारतीयांच्या ओझ्याने बुडून जाईल अशी विल्सन सरकारला भीती पडली व त्यांनी लगेच वार्षिक १,५०० लोकांनाच येऊ देण्याचा कायदा केला व लाट थांबवली. ह्या सर्व

प्रश्नासंबंधीचा ऊहापोह पूर्वीच्या वार्तापत्रात झाला असला तरी रंजन वेदच्या प्रश्नाची पार्श्वभूमी म्हणून ही थोडी उजळणी !

गार्डियन म्हणतो तेच खरं- ' वर्णभेदाच्या बाबतीत लंडन व नैरोबी यांना एकाच ताजव्यात मापलं पाहिजे. ' एक देश आपल्या बांधवांना वर आणण्याकरता भारतीयांचा छळ करतोय तर दुसरा देश स्वत:ची जबाबदारी असूनही गोऱ्या कातडीला काळं फासलं जाईल म्हणून स्वत:च्या सोयीचे कायदेकानू करतोय ! आपले भारतीय बांधव मात्र सध्या पूर्वआफ्रिकेत भरडले जात आहेत. नोकऱ्या संपल्यात. व्यापार थांबलाय. पैशाची आवक केव्हाच बंद झाली आहे. जमवलेल्या गंगाजळीवर निर्वाह करीत ब्रिटिश हायकमिशनरच्या कार्यालयात नाव नोंदवून वाट बघणे तेवढे शिल्लक राह्यले आहे. शिल्लक लवकरच संपेल. मग विमानभाड्यापुरतेही पैसे उरणार नाहीत. भुके मरणे एवढा एकच पर्याय राष्ट्रीयत्व गमावलेल्या ( ? ) ह्या भारतीय बांधवांना उरणार काय ? वर्णसंबंधसुधार समितीचा प्रतिनिधी पीटर एव्हन्स याला टाइम्सने केनियात पाठविले. एका पीडित भारतीयाचे वाक्य त्याच्या सर्व परिशीलनाचे सार आहे. ब्रिटिश वकिलातीला विनवताना तो भारतीय लिहितो-'If tears can better explain my case than words, I could only say that I and my family are actually crying when my friend is typing this letter to you for me.'

केनियातील ब्रिटिश हायकमिशनरला अशाच अर्थाची विनवणी करीत ब्रिटनमध्ये जाण्याची एकदाची परवानगी द्या असे सांगणारे ७,००० लोक सध्या रांग लावून उभे आहेत. ब्रिटिश वकिलातीच्या नैरोबीतील कार्यालयाला मात्र कात्रीत सापडल्यासारखे झाले आहे. म. गांधी व इंग्लंडच्या राणीचे चित्र घेऊन भारतीय लोक निदर्शने करीत आहेत. उपवास करून मरून जाऊ अशीही धमकी काहींनी युगांडात दिली आहे. शेवटी अडचणीतच राहायचे तर स्वहक्काकरता भांडत भांडत तरी अडचणीत पडू या कल्पनेने रंजन वेद आणि इतर परवाना न घेताच लंडनच्या दिशेने उडाले. आणि ' तब तो लंडनतक चलेगी तेग हिंदुस्थानकी ' म्हणत लंडन विमानतळावर येऊन दरवाजे ठोठावू लागले ! आता गृहमंत्री कॅलॅहॅनना कुणीच स्वस्थ बसू देणार नाही. आठवण झाली ती १९६३ साली त्यांनी वकिलांच्या मेळाव्यासमोर केलेल्या आवेशपूर्ण भाषणाची. एक वाक्य होते. The individual citizen must never be made to feel helpless before the juggernaut of the modern States !

आजच्या जगातील नेत्यासमोर एकही व्यक्ती हतबल ठरता कामा नये. त्यांनी वापरलेल्या ' जगरनॉट ' शब्दाची व्युत्पत्ती आपल्या ' जगन्नाथ ' देवावरून झालेली आहे. त्याच जगन्नाथाचे उपासक असलेले भारतीय बांधव मात्र विलसन सरकारच्या

धुरीणत्वापुढे हतबल होऊन गजावर डोके आपटीत आहेत! कॅलॅहॅनच्या भाषणातील पितळ आज सत्तर साली उघडे पडत आहे.

वास्तविक भारत सरकारने सुचविलेल्या ह्या प्रश्नावरला तोडगा ब्रिटन अंमलात का आणीत नाही, कळत नाही. नोकरीचे परवाने घेऊन प्रतिवर्षी भारतातून ब्रिटनमध्ये स्थलान्तर करणारे जे लोक आहेत त्यांच्या संख्येत तात्पुरती घट करावी किंवा कुणालाच येऊ देऊ नये. त्या संस्थेच्या बदली पूर्वआफ्रिकेतील भारतीयांना प्रवेशपत्रिका द्याव्यात. नाहीतरी १९६९ मध्ये असे आढळून आले आहे की ' एम्प्लॉयमेंट व्हाऊचर ' घेऊन येणाऱ्यांच्या संख्येत एकतृतीयांश घट झाली आहे. राष्ट्रकुलामधील लोकांना इकडे ब्रिटनमध्ये कायमचे स्थलांतर करण्याकरता दहा हजार ' व्हाऊचर्सचा 'परवाना दिलेला आहे. ६९ मध्ये ६८ सालापेक्षाही घट झाली. ब्रिटनमध्ये येताना मनात काही सोनेरी स्वप्नं बाळगून येण्याचे दिवस संपलेत. व्हाऊचर्स मिळवायला अतोनात विलम्ब लागतो. अनेक खटपटी कराव्या लागतात. आणि त्या व्यापातच दर चार महिन्यांनी इनॉक पॉवेलसाब गरळ ओकतात. मग त्या देशात जा तरी का? ह्या विचारानेच वरील घट झाली. ' काळ्यावर काळे परदेशीजन ब्रिटनमध्ये येऊन येऊन थोड्याच वर्षात हा देश मिश्ररंगीन होईल ' ह्या पॉवेलसाहेबांच्या अतिरंजित स्वप्नाला वरील घटलेल्या प्रमाणामुळे तडा जातो आहे. परदेश स्थलांतर करणाऱ्यांची ही आपसूक घसरलेली संख्या व भारतीय शासनाने उदार मनाने केलेली स्वागतार्ह सूचना यांचा दुहेरी फायदा उठवून सद्य:परिस्थितीत ब्रिटनने पूर्वआफ्रिकेतील भारतीयांना मदत करावी अशी अपेक्षा आहे. अडुसष्ट साली मंजूर केलेला १,५०० चा आकडा २,५०० वर जाईल अशी दाट शक्यता उत्पन्न झालेली आहे. एकदा पूर्वआफ्रिका ह्या ब्रिटिश पासपोर्टधारी भारतीयांनी सोडली की तिथेच मामला खतम होतो. पूर्वआफ्रिकी सरकार काही अशा लोकांना ब्रिटनकडे जाताना हातावर दही ठेवून मोठ्या प्रेमाने ' पुनरागमनायच ' म्हणून सांगत नाही. तेव्हा ही मंडळी ब्रिटनमध्ये कायम राहणार हे तर निर्विवादच आहे. कदाचित तीच भीती इंग्रजांना वाटत असेल. गेल्या जूनमध्ये केलेल्या शिरगणतीप्रमाणे ब्रिटनची लोकसंख्या ५५,५३४,००० इतकी झाली आहे. अजून ७०,००० काळी डोकी तर केवळ केनियातच आहेत. संख्या वाढणार हे अटळ. पण दोष ब्रिटिश पासपोर्ट धारण करणाऱ्या बिचाऱ्या भारतीयांचा नाही. ' आमच्या साम्राज्यावरचा सूर्य कधीही मावळू नये ' ह्या राक्षसी महत्त्वाकांक्षेतून उत्पन्न झालेल्या ' भस्मासुराचा ' आहे.

इकडे येणार ते आपले पूर्वआफ्रिकी बंधू आहेत तरी कसे? ज्यांचे आयुष्यच केनिया, युगांडा, झांबिया यासारख्या देशात गेले, त्या रक्ताने भारतीय असलेल्या मंडळीवर इंग्रजी शिक्षणाच्या ' वाघिणीच्या दुधाचा ' प्रभाव जरी पडलेला असला तरी ते ' बी ' व्हाऊचर घेऊन येणाऱ्या भारतातील व्यक्तीपेक्षा अधिक वरचढ आहेत असे मुळीच नाही. रंजन

वेदसारखे थोडे भारतात, थोडे केनियात आयुष्य घालवलेले लोक यांच्यात अनेक आहेत. काहीही असले तरी त्यांच्याजवळ ' पौंड ' आहेत. इंग्लंडमध्ये आल्याबरोबर एकरकमी पैसे देऊन घरकूल विकत घेण्याची त्यांच्यात ताकद आहे. भारतातून केवळ ' तीन ' पौंड घेऊन येणाऱ्या आम्हा ' उपऱ्यां ' प्रमाणे त्यांची अवस्था नाही. बहुतेक मंडळी येणार ती आपले वृद्ध आईवडील, काकामामा घेऊन येणार. अशा लोकांना सायंकाळचा विरंगुळा म्हणून वेळ घालविण्याकरता लंडनमध्ये आजीबाईंनी ' देऊळ ' उघडले आहे. गेल्या वर्षी लंडनच्या रस्त्यावरून सर्व वाहनांना थांबवून जगन्नाथाच्या रथाची मिरवणूक निघाली होती. पुढे दहापाच कृष्णवेडी अमेरिकन मंडळी तल्लीन होऊन नाचत होती. आणि रहदारी उगाचच अडली होती. एवढेच नव्हे तर ' हरे रामा हरे क्रिस्ना ' हे धूनगीत टी.व्ही. वरील ' टॉप ऑफ दी पॉप्स ' च्या क्रमांकात ' आठवी पादानपे ' जवळजवळ चार-पाच आठवडे चालू होते ! गोल्डर्सग्रीन व साऊथ हॉलमध्ये दर रविवारी नेमाने हिंदी ' पिक्चरला ' जाणाऱ्या भारतीयांमध्ये पूर्व आफ्रिकेतील लोकांचाच भरणा अधिक असतो. सबंध ब्रिटनमध्ये कुठल्याही कुग्रामात एक ' पटेल ' चे दुकान आढळतेच. रस्त्यात फिरणाऱ्या रंगीन साड्यांनी व मसाल्याच्या वासाने पॉवेल महाशयांचे डोके फिरते आहे. परंतु सर्व इंग्लिश लोक लक्षात येऊनही एकाच गोष्टीकडे कानाडोळा करतात, ती म्हणजे ह्या सर्व लोकांचे पासपोर्ट ब्रिटिश सरकारी आहेत. तो हुकमी एक्का त्यांच्या हातात असल्याने ब्रिटनमध्ये यायचा त्यांचा हक्क कुणीच हिरावून घेऊ शकणार नाही. रांग मोडून रंजन वेद व इतर काही मंडळी बिगरपरवाना ब्रिटनमध्ये घुसली तरी परिस्थिती इतकी गंभीर न होवो की आख्खी रांगच परवान्याशिवाय इथे पदन्यास करील !

■

हा लेख लिहून पंधरा वर्षे झाली. अनेक ' रंजन वेद ' इंग्लंडला आले. आज इंग्लंडमध्ये ' पटेल ' आडनावाचे फक्त १०० वर मिलिऑनेअर आहेत. वेम्बली स्टेडिअमचे अधिकांश शेअर गुजराथी लोकांनी घेतले आहेत. जवळजवळ सर्व मिनिपोस्ट ऑफिसे भारतीयांनी सांभाळली आहेत !

१४

# कुंचला लढ्याचे चित्र रेखाटतो

लंडनच्या हॅम्पस्टेड नावाच्या 'कलानगर' मध्येच सहा भारतीय चित्रकारांनी आपले पहिले प्रदर्शन भरविले होते. बर्गहाऊस म्युझियमच्या तीन खोल्यांत या चित्रकारांची चित्रे ठेवली होती. उद्घाटनाला ॲक्टिंग हायकमिशनर श्री. आय. पी. सिंग आणि चित्रकारांच्या परिचयाकरता प्रसिद्ध उद्योगपती स्वराज पॉल यांची हजेरी नेहमीप्रमाणेच उद्घाटनाच्या दिवशीचे आकर्षण- रेड अँड व्हाइट वाईन व जोडीला पकोडेसमोसे !

तशी या सहा कलाकारांची प्रदर्शने व्यक्तिगत किंवा सामूहिकरीत्या लंडनमध्ये अनेक वेळा झालेली आहेत. इंग्लंडमधील रसिक कलाप्रिय समूहाला त्यांची नावेही थोडीबहुत ठाऊक आहेत. कित्येकांच्या कलाकृती खाजगी घरांना ठिकठिकाणी शोभा देत आहेत. पण आज घटकेला २७ जानेवारी ८० ते २४ फेब्रुवारीपर्यंत चालू असलेल्या या प्रदर्शनाचे एकुलते एक वैशिष्ट्य होते आणि ते म्हणजे या सहाही जणांची एकमेव मागणी रेकग्निशन ! प्रथम या चित्रकारांचा परिचय- त्यांनीच जो खाकी रंगाच्या दुमडलेल्या

पानाच्या फोल्डरवर, लोकशाहीपद्धतीनुसार इंग्रजी मुळाक्षरांच्या अनुक्रमे येणाऱ्या नावांनी छापलाय ! यशवंत माळी, प्रफुल्ल मोहंती, लॉन्सलॉट, रिबेरो सुरेश वेदक, इब्राहिम वाघ व महंमद झाकीर. ( एकही महिला कलाकार नाही ! ) पैकी यशवंत माळींचे एक प्रदर्शन नुकतेच मुंबईला ताज आर्ट गॅलरीत घडलेले होते. प्रफुल्ल मोहंती वर्षातून निम्मा वेळ भारतातच असतात.

सगळेच कलाकार इंग्लंडमध्ये स्थायिक आहेत. वयाने चाळिशीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेली ही मंडळी गेली पंधरावीस वर्षे इंग्लंडमध्ये आहेत. पोटापाण्याकरता नोकरी, तीही मुख्यत्वे त्यांच्याच क्षेत्रातली आणि उरलेल्या वेळात कलानंद उपभोगतात. एकमेकाच्या चित्रकलेच्या पद्धतीकडे आकर्षित होऊन नव्हे परंतु एकमेकांना आलेल्या सारख्याच कटू अनुभवामुळे मात्र त्यांनी गेल्या काही महिन्यांत स्वत:चा एक संघ स्थापन केलाय. भारतीयत्वाची पुरेपूर खूण असलेले हे कलाकार पूर्वी एकदोन ध्वजांखाली एकत्र आले होते. परंतु त्यातून त्यांच्या अन्यायाला वाचा न फुटल्याने त्यांनी आज ' इंडियन आर्टिस्ट यूके ' असे नवे नाव धारण करून फिरून एकदा लढा द्यायचे ठरविले आहे.

आर्टिस्ट एकत्र येणे ही गोष्ट नवीन नाही. किंबहुना एकान्तात मनमुराद रंग उधळणाऱ्या चित्रकारांना आपली कलाकृती दाखविण्याकरता समाजात यावेच लागते. पण त्यापूर्वी आपल्यासारख्या समानधर्मी व्यवसायबंधूंशी आपल्या चित्रकलेवर चर्चा करायलाही त्यांना आवडते. ही सहा मंडळी इंग्लंडमध्ये राहून एक गोष्ट प्रकर्षाने पटल्याचे सांगतात. चित्रे ही फक्त कॅन्व्हासवरच काढायची या मर्यादित व्याख्येचे बंधन न पाळता ती कुठल्याही माध्यमाने, कुठल्याही पृष्ठभागावर, कुठल्याही स्वरूपात आकर्षकपणे उभी करणे ही सध्याची अवस्था त्यांना समजली-पटली आहे. या दृष्टिकोणातूनच त्यांनी त्यांची कला बदलली आहे किंवा ती बदलत गेली आहे. या एकाच जाणिवेतून एकत्र आल्यावर त्यांना पुढे मात्र एकच एक कटू अनुभव आला. इंग्लंडमध्ये त्यांच्या कलेला फारशी प्रसिद्धी मिळेना. कलेचे यथार्थ मूल्यमापन करायला कुणी ' क्रिटिक ' जवळपास फिरकेना. त्यामुळे जी मदत चित्रकारांना सरकारतर्फे मिळते, ज्या सुविधा उपलब्ध होतात तसेच आर्थिक सहाय्यही मिळते त्या सर्वांना हे चित्रकार वंचित झाले. यामुळे विफलता आली तर नवल नाही. कारण कितीही कष्ट केले तरी कलाकृती पूर्णत्वाला नेण्यास साधनसामग्रीची जी मदत लागते ती त्यांना मिळाली नाही. याला कारण वर्णभेद की संकुचितपणा यावर नेमके बोट ठेवणे कठीण.

पूर्वी ज्याप्रमाणे पॅरिस कलेचे केंद्र होते, त्याप्रमाणे आता सर्व प्रकारच्या कलात्मक सांस्कृतिक हालचाली मोठ्या प्रमाणात लंडनलाच घडतात. त्या केन्द्रस्थानी चित्रकारांच्या बाबतीत भेदभाव असता कामा नये. कलेच्या क्षेत्रातील उच्चनीचता ही कलाकृतीच्या मूल्यावर ठरविली गेली पाहिजे. कलाकारांच्या वंशवर्णावर नव्हे ! पण तशा

तऱ्हेचा अनुभव घेतल्यावर ही सहा मंडळी एकत्र आली ( आता सहांनी काम होणार नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी इतर भारतीय चित्रकारांना सामील होण्याबद्दल आवाहन केले आहे ! ) लंडनच्या भारतीय दूतावासातर्फे त्यांना आधार मिळाला.( हे श्रेय नानासाहेब गोऱ्यांना.) साऊथ ऑडले स्ट्रीटवरील भारतीय दूतावासाच्या दुय्यम इमारतीत त्यांना एक जागा उपलब्ध करून देण्यात आली. पण तेवढ्यानेही सगळेच भागलेले नाही. त्यांना मदतीबरोबर त्यांच्या कलेचे यथार्थ मूल्यमापन हवे आहे. इतर ब्रिटिश चित्रकारांशी तौलनिक मोजमाप हवे आहे. ब्रिटिश आर्टक्रिटिक एक तर गोऱ्या कलाकारांचेच गुणगान करतात किंवा होऊन गेलेल्या पुरातन चित्रकारांच्या शिळ्या कढीलाच ऊत आणतात. ( भारतीय मिनिएचर्स तेवढी इथे ठाऊक ! ) मात्र उदयोन्मुख भारतीय चित्रकारांविषयी जाणून घेण्याबद्दल कमालीची उदासीनता.

या सहा चित्रकारांपैकी चारजणांनी त्यांच्या कलाकृतींविषयी माहिती दिली व त्याचबरोबर त्यांच्या व्यथाही सांगितल्या. सगळ्यांच्याच चित्रांचा विषय वेगवेगळा होता. रंगविण्याची पद्धत अलग अलग होती. परंतु सगळ्यांचीच चित्रे मॉडर्न आर्ट किंवा ॲब्स्ट्रॅक्ट या सदरात मोडत असल्याने ती आकर्षक वाटली तरी त्यांच्या सुंदरतेचे विकसन, चित्रकाराच्या भावना समजून घेतल्याशिवाय होत नव्हते. किंबहुना चित्रकाराचे चित्रामागचे म्हणणे ऐकून घेतल्यावरच ती अधिक सुंदर वाटू लागली. यशवंत माळी हे मध्यतंरी चार वर्षे ब्रायटन नावाच्या समुद्रकिनाऱ्यावरच्या गावी जाऊन राह्यले होते. त्या निसर्गसंपन्न गावी समुद्राच्या लाटांवरून किनाऱ्याकडे हेलकावे खात येणाऱ्या चित्रविचित्र वस्तू बघता बघता त्यांच्यातला कलाकार जागा झाला. आणि त्यांच्या चित्राला विषय मिळाला-बॅले आन द सी ! त्या विषयातून एक चित्रमालिकाच तयार झाली. फक्त त्या चित्रमालिकेत पाण्यावर नृत्य करणारी पात्रे केवळ भारतीय राह्यली. लहानपणी मुंबईला पाण्याबरोबर वाहात येणारे डालडाचे डबे, फुलाच्या पुड्या, पाने, दगड वगैरे. सागर म्हटला की आकाश आलेच. या दोन्हीकरता वारपलेल्या निळ्या छटांत माळींनी एक ' नजाकत ' आणली होती. ताजी फुलाची पुडी दोऱ्यांत गुंडाळून ती त्यांनी पारदर्शक प्लॅस्टिकच्या रसात बुडवून तो रस घट्ट होताच, त्यात ती कायमची बद्ध केली. पार्श्वभागी समुद्र व आकाश यांचा मिलाफ झाला. आणि गंमत म्हणजे माळी नाव फुलाच्या पुडीला संलग्न झाल्याने त्या कलाकृतीला दिलेले ' सेल्फ पोर्ट्रेट ' हे शीर्षकही सार्थ झाले. माळींच्या सर्वच चित्रांचे विषय अशा रीतीने प्रगट झाले होते.

प्रफुल्ल मोहंती प्रदर्शनाच्या वेळी भारतात होते. मोहंती स्वत:च्या ' माय व्हिलेज माय लाइफ ' या ओरिसातील कलेसंबंधीच्या पुस्तकाने इथे प्रसिद्ध आहेत. त्या पुस्तकाची भाषांतरे नॉर्वेजियन, जपानी व डॅनिश भाषांत झालीत. मूळ आर्किटेक्ट-प्लॅनर असलेला हा कलाकार चित्रांतील रंगधारांचे नृत्यकलेतून आविष्करण करतो. मोहंतींच्या

चित्रमालिकेचे नाव होते 'बिंदू'. 'शून्यातून ब्रह्म' या पुरातत्त्वानुसार एका छोट्या बिंदूभोवती जलरंगांत रंगविलेली त्यांची सर्वच ठळक चित्रे आकर्षक होती. दोन विरोधी रंगांचा झालेला तरल मिलाफ केवळ बघण्यासारखा होता.

सुरेश वेदक स्टेज डिझाइनचे काम करतात. स्वतःच्या व्यवसायाचे व व्यवसायातील वातावरणाचे पडसाद आपल्या चित्रनिर्मितीवर व चित्रविषयावर जबरदस्तपणे पडलेत ही गोष्ट ते अभिमानाने सांगतात. या प्रदर्शनात असलेली त्यांची सर्व चित्रे रंगभूमीची आठवण करून देणारी आहेत. ती पूर्णपणे भूमितिप्रधान, वरवर पाहता एकाच पातळीची निदर्शक अशी वाटतात. खूप प्रयत्न करून त्या चित्रांतील खोली- परर्स्पेक्टिव्ह लक्षात येते. आणि मग चटकन अनाकर्षक वाटणाऱ्या त्या चित्रातील गुण दिसू लागतात.

इब्राहिम वाघ या चित्रकारांच्या समूहाचे एक प्रमुख प्रवर्तक आहेत. या ग्रुपच्या आजच्या अल्प का होईना पण मिळालेल्या यशात त्यांचा वाटा मोठा आहे. प्रत्येक चित्रकाराच्या एका चित्राचे रंगीत छायाचित्रित मुद्रण कागदाच्या एका अंगाला करून पाठीमागे चित्रकाराचा परिचय, आजपर्यंतचे कार्य वगैरे माहिती खूप मेहनत घेऊन अत्यंत आकर्षकपणे त्यांनी प्रदर्शन बघण्यास येणाऱ्या व्यक्तीस एका फोल्डरच्या माध्यमातून दिली. त्या सर्वांचे डिझाईन, ग्राफिक, छपाई यांतील सुंदरता, सहजता विशेषेकरून लक्षात आली. 'सोर्स' हा इब्राहिम वाघांच्या चित्रांचा विषय. बाकीच्या चित्रकारांच्या मानाने यांच्या चित्रांचा आकारही मोठा. एका छोट्या कोषात स्वतःला कोंडून घेतलेला मानव व त्याच्याभोवतीचे विशाल विश्व स्वतःच्या कुंचल्यातून सांगायचा त्यांचा चित्रप्रयत्न. प्रथम प्रथम अनाकलनीय वाटला तरी तो खूप चित्तवेधक वाटतो. त्यांतील रंगांची सफाई उत्कृष्ट वाटते. खूप वेळ बघत राहावी अशी त्यांची चित्रे खचित आहेत.

महंमद झाकीर मात्र चित्रे एका मालिकेत काढत नाहीत. त्यांचे विषय भिन्न आहेत. त्यांत निसर्ग आहे तशीच सामाजिक अन्यायाची बूज आहे. त्यांच्या चित्रांचे माध्यम अनेक प्रकारचे आहे. ती चित्रे काहीशी त्रिमित आहेत. एनॅमलचे रंग लोखंडी पृष्ठावर पसरून ते चित्र भट्टीतून तावूनसुलाखून तयार केल्यावर त्याचा सरतेशेवटी निर्माण होणारा परिपाक हे एक आश्चर्य नसले तरी मेहनतीने तयार केलेली ती कलाकृती सुंदर वाटते यात शंका नाही. 'इकॉलॉजी' या विषयाकरता पृष्ठभाग म्हणून त्यांनी 'पॉलिस्टायरीन' वापरले आहे. त्यावर पसरलेले रंग, रंगात पसरलेली बारीक वाळू, या सर्वांनी निर्माण केलेला पोत हे सर्व चित्राचा विषय आपसूकच दर्शवितात. मार्किस नावाच्या वार्ताहराचा रशियन एजंटकडून खून होतो ही विदारक घटना त्यांनी मोडक्या छत्रीच्या अस्ताव्यस्त सांगाड्याखाली त्या खुनाच्या बातमीची वृत्तपत्रे पसरवून मोठ्या कलात्मक रीतीने मांडली होती.

इंडियन आर्टिस्ट यूके यांची एक मांग आहे, त्यांच्या कलेचे मूल्यमापन करा आणि

इतर ब्रिटिश कलाकारांमध्ये त्यांचे जे स्थान असेल ते त्यांना द्या. २४ फेब्रुवारीला संपलेल्या त्यांच्या प्रदर्शनाचे पडसाद किती दूरवर पोहोचलेत ते लवकरच कळेल. कारण १९८२ मध्ये आर्ट कौन्सिल ऑफ ग्रेट ब्रिटनतर्फे 'फेस्टिव्हल ऑफ इंडिया' हे जे मोठे प्रदर्शन इथे भरणार आहे त्या वेळी या सर्व कलाकारांना खचितच आमंत्रण येईल अशी आशा करायला हरकत नाही!

■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९८८
२५९६३
२१।११।८४
शाखा (स्थळ प्रत)

१५

# वादळ ' कौमार्य-चाचणी 'चे

रस्त्यावर सगळीकडे कचऱ्याचे प्रचंड ढीग, त्यांतून पळणारे उंदीर ! कमालीची थंडी, बर्फ-वर्षाव, अनेक संप या पार्श्वभूमीवर ब्रिटनमध्ये गेले काही दिवस गार्डीयन वृत्तपत्राने छापलेल्या बातमीने इथल्या भारतीय समाजात मोठी खळखळ उडवून दिली. दि. १ फेब्रुवारीला गार्डीयनच्या पहिल्याच पानावर मोठ्या अक्षरांत मथळा होता-व्हर्जिनिटी टेस्टस् ऑन इंडियन इमिग्रंटस् ॲट हीथरो ! काहीतरी सनसनाटी बातमी देऊन तेवढ्यापुरती खळबळ माजविण्याकरता गार्डीयन प्रसिद्ध नाही. सन, मिरर, एक्स्प्रेस या वर्तमानपत्रांपेक्षा दुप्पट किंमत, अत्यल्प खप परंतु दर्जेदार बातमीपत्रे देणारी ब्रिटनमध्ये वर्तमानपत्रे दोनच: टाइम्स व गार्डीयन. त्यातले टाइम्स सध्या बंदच आहे. (दोन महिन्यांपूर्वी ते बंद पडले.) गार्डीयनने ही अशी बातमी देऊन इथल्या व भारतातील आपणा सर्वांना उपकृतच केले आहे.

घडले ते असे : एक पस्तीस वर्षांची भारतीय शिक्षिका लंडनमध्ये स्थायिक झालेल्या एका भारतीयाची नियोजित वधू म्हणून लंडनच्या हीथरो विमानतळावर आली. तिथल्या

योजनेप्रमाणे तिला विमानतळावर इमिग्रेशन ऑफिसर भेटले. त्यांनी या शिक्षिकेस एका हिंदी दुभाषीतर्फे विमानतळावरील डॉक्टरकडे पाठविले. दुभाषीने तिला हिंदीतून कपडे उतरविण्यास सांगितले. तिने तसे केल्यावर, तपासणीसाठी आलेला डॉक्टर पुरुष आहे हे पाहताच, तिने महिला डॉक्टरची मागणी केली. ती अमान्य करण्यात आली. त्या डॉक्टरने ही शिक्षिका पूर्वी गरोदर राह्यली होती असे सांगताच तिला बिचारीला काय करावे हेच कळेना. ती लंडनला प्रथमच आलेली. परका देश. भिन्न वातावरण. ओळखीचे कुणी नाही. इंग्लिश बोलणे भिन्न उच्चारांमुळे पुरेसे समजत नाही. या अडचणींमुळे त्या शिक्षिकेस, केव्हा एकदा विमानतळावरील सव्यापसव्यातून सुटते असे झाले. आणि म्हणूनच दुभाषीने वाचून दाखविलेल्या फॉर्मवर तिने स्वाक्षरी दिली. अशा तऱ्हेच्या फॉर्मवर सर्वांनाच सही द्यावी लागत असावी अशी तिची समजूत झाली. शिवाय सही दिली नाही तर आपल्याला भारतात परत पाठवतील अशीही तिला भीती वाटली. गार्डीयनने २४-१-७९ रोजी तिने सही केलेला तो फॉर्मही प्रसिद्ध केला आहे. शिक्षिकेचे नाव व सही अर्थातच गाळून. तो फॉर्म पुढीलप्रमाणे :-

This is to certify that Miss .... agree to a gynacological examination which may be vaginal if necessary.
This statement has been read to me in my own mothertongue and is fully understood by me.

हातात रबरी मोजे घालून व वरती एका ट्यूबमधील बुळबुळीत द्रवपदार्थ माखून त्या डॉक्टरने शिक्षिकेची आंतरिक तपासणी केली. ती पूर्वी गरोदर होती काय किंवा तपासणीप्रसंगी गरोदर आहे काय हे अजमावण्याकरता ही तपासणी आहे असे त्याने सांगितले. सर्व प्रकार संपल्यावर इमिग्रेशन ऑफिसरने तिला तीन महिन्यांच्या राहण्याबद्दल मान्यता देऊन तिची रवानगी केली. लज्जास्पद आणि अपमानास्पद वागणुकीने थक्क झालेली ती शिक्षिका नंतर बाहेर पडताच परिचितांच्या साहाय्याने गार्डीयनकडे धावली.

वरील प्रसंग घडला, गार्डीयनने एक फेब्रुवारीला बातमी छापली आणि मग त्यावर मोठे वादळच सुरू झाले. जनतेची प्रतिक्रिया तीव्र होती म्हणा किंवा या सर्व प्रकाराचा परिणाम गंभीर होईल याची जाणीव होऊन गृहमंत्री श्री. मर्लिन रीस यांनी दुसऱ्याच दिवशी सर्वप्रथम ती लाजिरवाणी वैद्यकीय तपासणी बंद करण्याचा आदेश दिला. यानंतर अनेक गोष्टी उघडकीस यायच्या होत्या. ६८ सालापासून इथल्या भारतीयांची इमिग्रेशन अधिकाऱ्यांबद्दलची अनेक गाऱ्हाणी केवळ अरण्यरुदनच ठरली होती. त्या वेळी अशाच प्रकारची तपासणी दोन मुलींच्या बाबतीत झाल्याचे श्रीमती मेरी डाइन्स यांना कळले होते. इथे स्थायिक होण्याकरता येणाऱ्या भारतीयांच्या मदतीकरता जी संस्था कार्यरत

आहे त्या संस्थेच्या मेरी डाइन्स त्या वेळी एक अग्रगण्य कार्यकर्त्या होत्या. तो प्रकार त्यांनी श्री. मर्लिन रीस यांना कळविला होता. आता घडलेल्या या शिक्षिकेच्या वागणुकीबद्दल सारवासारव करण्याचा संबंधितांनी प्रयत्न केला. पण प्रकरण इतके पुढे गेले होते की ते दाबून टाकणे केवळ अशक्य होते.

इंग्लंडमध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत वैद्यकीय तपासणी ही आवश्यक आहे. सहा महिन्यांहून जे अधिक काळ इथे राहणार असतात त्यांना वैद्यकीय तपासणी आवश्यक असते. इंग्लंडमध्ये कायम राहण्याकरता येणारी बाहेरील देशांतील व्यक्ती संसर्गजन्य रोगापासून मुक्त आहे हे शाबित करूनच मग तिला प्रवेश द्यावा हे निर्विवादपणे योग्यच आहे. गेल्या पंधरा वर्षांत भारत, पाकिस्तान आणि बांगला देश येथून इंग्लंडमध्ये अनेक लोक कायम वस्ती करण्याकरता येत आहेत. त्यांतील बहुतेक वैध मार्गाने येतात. मात्र काही थोडे अवैध मार्गाचा अवलंब करतात. त्यामुळे इथल्या होम ऑफिसपुढे तत्संबंधी अनेक समस्या निर्माण होतात, मग निरनिराळे कायदे अंमलात आणले जातात. इथे कायम राहण्याचा परवाना घेऊन आलेल्या व्यक्तीस आपल्या देशातून आपला प्रियकर अथवा प्रेयसी किंवा नियोजित वर किंवा वधू इकडे आणण्याचा अधिकार आहे. या यथायोग्य सवलतीचा काहीजणांनी दुरुपयोग केलेला आहे, नाही असे नाही. वधू म्हणून आलेली मुलगी प्रत्यक्षात इंग्लंडच्या किनाऱ्यावर पाय ठेवल्यावर मात्र एक स्वतंत्र व्यक्ती बनते. प्रत्यक्षात तिचे तिकडे लग्न झालेले असते. मग काही काळानंतर ती आपल्या खऱ्या नवऱ्यास इकडे आणते. अशा रीतीने हे जाळे वाढत जाते. खोट्या प्रकारे इथे येणे याकरता आमच्या मंडळींनी तऱ्हेतऱ्हेचे प्रकार अवलंबिले आहेत. त्यात गोऱ्या लोकांचाही हात असतो. मात्र या प्रकारांवर उपाय योजताना जेव्हा ' व्हर्जिनिटी टेस्ट 'चा अवलंब केला गेला तेव्हा सर्वत्र धिक्काराच्याच घोषणा झाल्या.

या अपमानास्पद वागणुकीबद्दल श्री. मर्लिन रीस यांनी त्या शिक्षकामहिलेची माफी मागितली. अर्थात प्रश्न तेवढ्यावरच संपलेला नाही. गार्डीयनने त्याचा पुरता पिच्छा पुरविला. भारतात ही बातमी गेली व तिथे ब्रिटिश वकिलातीसमोर महिलांनी निदर्शने केल्याचे फोटो इथे प्रसिद्ध झाले. आणखी काही घटना उघडकीस आल्या. व्हर्जिनिटी टेस्ट दिल्लीला ब्रिटिश दूतावासातही घेतली जाते हे वाचून सर्वांनाच आश्चर्य वाटले. इंग्लंडमध्ये येण्याचे आकर्षण अद्याप आपल्याकडे कमी झालेले नाही. त्यातून आपल्या नवऱ्याबरोबर राहायला जायचे किंवा आपल्या प्रियकर अथवा वराच्या गावाला जायचे या कल्पनेने मोहरलेली भारतीय महिला दिल्लीला ब्रिटिश हायकमिशनमध्ये काय काय अवहेलना सोशीत असेल याचे पक्के चित्र इथे सर्वांपुढे आता निश्चित स्वरूपात चितारले गेले आहे ! दिल्ली महानगरपालिकेच्या सदस्या श्रीमती अमिया राव, श्रीमती लीला फर्नांडिस आणि श्रीमती प्रमिला दंडवते यांच्यासारख्या महिला तिकडे भारतात या

प्रश्नावर मोर्चे काढून जनतेचे लक्ष वेधून जनजागृती करीत आहेत हे वाचून इंग्लंडमधील भारतीयांना नक्कीच हायसे वाटले आहे ! दिल्लीला व्हर्जिनिटी टेस्टमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या एका मुलीला धड इंग्लंडला जाता आले नाही, ना धड तिचा तिच्या आईवडिलांनी परत स्वीकार केला !

कौमार्यपरीक्षेच्या कसोटीव्यतिरिक्त आणखीही काही प्रकार एकापाठोपाठ उघडकीस आले. बांगलादेशात गरोदर स्त्रीचे एक्सरे घेतलेले वाचून आणखी एक धक्का बसला. गरोदर स्त्रीची अशा तऱ्हेची एक्सरे घेऊन केलेली तपासणी ही एक भयावह तसेच निंद्य गोष्ट आहे हे वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने जाहीर केले. इथे स्थिर झालेल्या बांगलादेशीयांचे कुटुंबीय हजारोंच्या संख्येने डाक्क्यात ब्रिटिश वकिलातीत रांगा लावून प्रवेशपत्रिका मिळविण्याकरता खटपट करतात. त्यात काही खोटे असतात. पण सुक्याबरोबर ओले जळते या न्यायाने अनेक पत्नी, मुलांना स्वतःचे खरे वय शाबित करताना एक्सरेच्या दिव्याला विनाकारण तोंड द्यावे लागते. हाडाचे घेतलेले एक्सरे फोटो संबंधित व्यक्तीचे अदमासे वय सांगू शकतात. दोन वर्षांनी ते वय कमी किंवा जास्त होऊ शकते हे वैद्यकीय सत्य आहे. असे असता खरे वय शाबित करण्याकरता अनेक मुलांना एक्सरेच्या कसोटीतून जावे लागते हे दुर्दैव. त्या एक्सरेमुळे पुढे जन्माला येणाऱ्या बालकांवर अनिष्ट परिणाम होऊ शकतो,या भीषण सत्याकडे कानाडोळा करता येणार नाही. डाक्क्यात काय घडते याची जनतेला जाणीव होते न होते तोच ९ फेब्रुवारीस आणखी एक गोष्ट गार्डीयनने उजेडात आणली. लंडनच्या हीथरो विमानतळावर उतरणाऱ्या आशियायी रहिवाशांना जेव्हा वैद्यकीय सत्रातून जावे लागते, तेव्हा एक्सरे घेणारे डॉक्टर नसून केवळ कारकून असतात हे समजले ! विमानतळावरील डॉक्टर फक्त दिवसा काम करतात. मात्र विमाने रात्रीही पोहोचतात. त्या वेळी येणाऱ्या मंडळींची एक्सरेने तपासणी ही कारकून मंडळी करतात. हिलींगडन कौन्सिलचे म्हणणे मात्र असे आहे की,हे कारकून गेल्या दहा वर्षांत या कामात निष्णात झालेले आहेत. विमानतळाचा भाग भौगोलिक दृष्ट्या या नगरपालिकेत मोडतो.

व्हर्जिनिटी टेस्ट व तिच्या अनुषंगाने उघडकीस आलेल्या आणखी काही गोष्टी यामुळे खूप चर्चा झाली. इंडिया हाऊसमधून दुय्यम राजदूत श्री. नाझरेथ हे २ फेब्रुवारी रोजीच फॉरिन ऑफिसमध्ये तडक गेले आणि त्यांनी आपल्या तीव्र भावना तिथे लेखी सादर केल्या. अशा प्रकारचा लाजिरवाणा प्रसंग जगात इतरत्र कुठेही घडत नाही असे त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले. लेबर पक्षाच्या पार्लमेंटमधील सदस्या श्रीमती जो रिचर्डसन यांनी पार्लमेंटमध्ये या प्रकाराला तोंड फोडले. इतक्यावरच त्या थांबल्या नाहीत तर या प्रकरणाची पूर्ण शहानिशा करण्याचा त्यांनी निश्चय केला. व्हर्जिनिटी टेस्टचे फर्मान कुणी काढले, होमऑफिसच्या मंत्र्यांना त्याची माहिती का नव्हती, इमिग्रेशन

अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई का करू नये इत्यादी प्रश्न त्या धसास लावणार आहेत. इंडियन वर्कर्स असोसिएशनला या जुलमी प्रकारांची जाणीव ६८ सालापासून होती. त्यांनी इतके दिवस मौन का पाळले किंवा आकाशपाताळ एक का केले नाही कळत नाही. कौमार्यभंग सिद्ध करण्याच्या पद्धतीचा अनेक डॉक्टरांनी निषेध केला. गार्डीयनच्या वाचकांच्या पत्रव्यवहारात वीसएक पत्रे या प्रकरणावर प्रसिद्ध झाली. पैकी पुष्कळशी इंग्रज मंडळींची व काही भारतीयांची होती. सर्वांनीच धिक्कार केला. गार्डीयनने आणि ऑब्झरव्हरने अग्रलेखही लिहिले हे विशेष. आता लक्झेम्बर्गमध्ये युरोपियन पार्लमेंटमध्ये ( कॉमन मार्केट ) या विषयावर चर्चा होणार आहे.

एक भारतीय स्त्री. पिढ्यापिढ्यांचे संस्कार ल्यालेली. लग्नाआधी तिचे पुरुषाशी संबंध नसणारच या समजुतीवर दृढ विश्वास ठेवून आणि बदलत्या भारताविषयी अपार अज्ञान बाळगून ब्रिटिश अधिकारी ' व्हर्जिनिटी टेस्ट ' सारखे हास्यास्पद, वेडगळ प्रकार आज हाताळतात. एक गमतीदार विचार आला. उद्या परिस्थिती पालटली. भारताकडे ब्रिटिश लोकांचा ओघ सुरू झाला आणि त्यांनी वधू म्हणून ब्रिटिश मुलींना इकडे बोलावले आणि तिथे भारतीय अधिकाऱ्यांनी जर अशीच कसोटी अवलंबिली तर त्या बिचाऱ्या ब्रिटिश पुरुषांना आठ-दहा वर्षांच्याच मुलींना बोलवावे लागेल आणि उगाच ' बेबी स्नॅचिंग ' चे आरोपी व्हावे लागेल !

मात्र भारतीय स्त्री ' मुकी बिचारी कुणी हाका ' अशी आता राहिलेली नाही हे या प्रकरणावरून ब्रिटिश अधिकाऱ्यांना नक्कीच समजले आहे.

■

१६

# नयी जिंदगी नया जीवन

इथे इंग्लंडमध्ये राहणारा भारतीय सुखाने कालक्रमणा करीत असतानाही त्याचे लक्ष भारतातून येणाऱ्या बातम्यांकडे असते. यांतल्या काही वृत्तपत्रांतून वाचावयास मिळतात तर काही घरून येणाऱ्या पत्रांतून. अशाच एका बातमीने कुणीतरी चुकचुकले.... ' महाराष्ट्रात अवर्षण-दुष्काळ ! आपण इथे उदंड जाहले पाणी. अशा ठिकाणी राहतोय तर तिकडे महाराष्ट्रात खेडोपाडी महिला चुळकाभर पाण्यासाठी वणवण भटकताहेत... '

लंडनला मग मदत गोळा करण्याकरता एक समिती स्थापन झाली. पैसा गोळा करणे सुरूही झाले. तसे काम इतरत्रही सुरू झाले होते. लॉस एंजलीसहून एक पत्र आले. तिथला मित्र लिहीत होता, " महाराष्ट्रातील दुष्काळामुळे खेडुतांची शहरांकडे कशी रीघ लागली आहे याची वर्णने ऐकून हरी नारायण आपट्यांच्या ' काळ तर मोठा कठीण आला ' ची आठवण होते. तिकडच्या पत्रांवरून शहरांतील उच्च वर्गीयांना दुष्काळाची झळ लागलेली नाही वा त्यांना इतरांच्या खडतर परिस्थितीची जाणीव नाही असे दिसते... इकडे तर काय आम्हाला अंतराची सवय आहे. अंतराने विस्मृती होते अन् डोळेझाक करणे

सोपे जाते. येथून आमची मदत जायला एक महिना तरी लागेल."

एक जण इंडिया हाऊसमधून नुकतीच वृत्तपत्रे वाचून आले असावेत, न्यूयॉर्कला मदत गोळा करणे सुरू झाले होते. टोरोण्टोतही तशा हालचाली सुरू झाल्याचे पत्र आले होते. कुणीतरी नुकताच भारतात सुट्टीवर जाऊन आलेला नागपूरकडला मित्र तिथल्या परिस्थितींचे वर्णन रुद्ध कंठाने करीत होता... "एकीकडे खूप वर्षांनी भेटल्यामुळे आमरस पुरीच्या मेजवान्या खाऊन राह्यलो होतो. दुसरीकडे मात्र डोळ्यांसमोर गिट्ट्या फोडणाऱ्या खेडुतांचे रणरणत्या उन्हातले चित्र दिसायचे व ते जेवण नको वाटायचे..." मुंबईचा मित्र लिहीत होता- "वसंतराव नाईक सुखडी वाटप करीत आहेत... दुष्काळग्रस्तांसाठी मी पार्ल्यात एक कार्यक्रम केला होता. दोन हजार रुपये जमवून दिले... पावसास सुरुवात झाल्यावर पाण्याची ओरड थोडी कमी होईल. पण महागाईने सध्या कमाल मर्यादा गाठली आहे. साधे टमाटे काय? ते पण चार रुपये किलो. सोने ४०० रुपये तोळा. गोडेतेल ८.२० रु. किलो."

आमचे पैसे गोळा करणे जोमाने चालूच होते. निरनिराळ्या कल्पना निघाल्या. दोन पत्रके सर्व मराठी कुटुंबांपर्यंत पोचली. एक इंग्रजीत तर दुसरे मराठीत... पैसा खरोखर भराभर जमू लागला. त्याच वेळी सौ. नलिनीबाई पंत रोमहून लंडनला थोड्या दिवसांकरिता आल्या. त्यांचा इथल्या मराठी मंडळींशी ऋणानुबंध. त्यांचा सल्ला विचारला. काम चालूच होते. मध्येच कधीतरी बातमी कळायची. ज्या खेड्यात दुष्काळ त्याच खेड्यात रात्री पालं मांडून तमाशा उभा राह्यला! आम्हाला अशा बातम्यांचं भांडवल करायचे नव्हते. मनुष्यस्वभावच तो. चालायचेच.

दुष्काळाच्या बातम्या इथल्या इंग्रजी वृत्तपत्रांतही आल्या. खेडोपाडी रस्ता करण्याकरता खडी फोडणारे मजूर टेलिव्हिजनवर दाखवताना बी.बी.सी.च्या प्रवक्त्याने अभिमानपूर्वक सांगितले 'हे मराठी लोक भीक म्हणून मागणार नाहीत. मोडेन पण वाकणार नाही हा त्यांचा बाणा आहे.' त्याच वेळी 'ख्रिश्चन एड' संस्थेनं अतिशयोक्तिपूर्ण वर्णन करून दुष्काळाने मृत झालेल्यांची संख्या सांगून जाहिरातीतून आवाहन केले. काही मंडळी त्यामुळे रुष्ट झाली. भारत सरकारही अस्वस्थ झाले. लंडनमध्ये पैसे जमवणे मात्र चालूच होते. त्या पैशाचा विनियोग कसा करावा? महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या निधीला द्यावेत? की ट्रॅक्टरसारखे एखादे घसघशीत यंत्र पाठवावे? दुधाचे डबे पाठवावे की औषधे पाठवावी? इथे एक दोघा अनुभवी गृहस्थांना विचारले. ते म्हणाले, "आधी पैसे तर जमू द्या! विनियोगाचे नंतर पाहू! महाराष्ट्र सरकारच्या चीफ सेक्रेटरींचा सल्ला विचारला. पत्र पाठविले. त्यांचे दोन महिन्यांनी उत्तर आले ते महाराष्ट्र स्केअर्सिटी फंडाकडून. त्यांनी 'हार्ड कॅश' पाठवून देण्याची सूचना केली होती. आमचा निर्णय दरम्यानच्या काळात घेतला गेला होता. सर्व मंडळींची धारणा

होती की, इथे जमा होणाऱ्या प्रत्येक पौंडाचा, महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांकरताच उपयोग व्हावा, तिथे त्या संबंधात प्रत्यक्ष काही काम चालले असेल त्यालाच त्या पैशाचे पाठबळ द्यावे. देणगीदारांना नंतर पैशाच्या खर्चाची पावती कामाच्या स्वरूपातही दिली जावी. कधीकुणी महाराष्ट्रात गेलो की त्याला त्या विनियोगाचा पुरावा दिसावा. दान सत्पात्री जायला हवे होते सर्वांना !

महाराष्ट्राकरता फक्त लंडमधील महाराष्ट्र मंडळच काम करीत नव्हते. ऑक्स्फॅम संस्थाही असे काम करीत होती. ती संस्थाच दुष्काळ निवारण्याच्या कल्पनेतून निर्माण झालेली. ऑक्सफर्डला काही पदवीधर तरुण जमले. विश्वविद्यालाच्या विशाल हिरवळीवर बसून त्यांनी जगातल्या रंजल्या गांजल्यांचा विचार केला. ' ऑक्सफर्ड ' ला निघालेली ' फॅमिन ' निवारण्याची संस्था ' ऑक्स्फॅम ' झाली. संस्थेचा वृक्ष कितीतरी मोठा झाला. त्या संस्थेचे कार्यकर्ते जगात ठिकठिकाणी काम करीत आहेत. त्यांच्यापुढे कितीतरी काम ! इथियोपियातला दुष्काळ केवढा मोठा ! ऑक्स्फॅमने महाराष्ट्रात पाणी मिळविण्याकरता संकल्प केला ट्यूबवेल्सचा नि त्यांची यंत्रणा ठिकठिकाणी ट्यूबवेल्स खणू लागली. महाराष्ट्र मंडळाला तशी योजना हाती घेणे शक्य नव्हते. एका रिगलाच मुळी आठ एक हजार पौण्ड पडतात. कॉम्प्रेसर, ट्रॅक्टर्स, ट्रेलर्स वगैरे धरून सर्व यंत्रसामग्रीची एकूण किंमत अठरा हजार पौण्ड होणार. पण आमच्या कामाची कुणकुण लागून ऑक्स्फॅमच्या एका कार्यकर्त्यांनी आमच्याशी संपर्क साधला. त्यांनी आम्हाला ऑक्स्फॅमच्या महाराष्ट्रात चालू असलेल्या कार्याचा छापील अहवाल पाठवला. महाराष्ट्रातले त्यांचे काम पुण्याच्या डॉ. पेंडशांच्या ज्ञानप्रबोधिनीमार्फत आणि हडपसरच्या डॉ. दादा गुजर यांच्या महाराष्ट्र आरोग्य मंडळामार्फत चाललेले कळले. मग आणखीनच हुरूप आला. चर्चेतून ऑक्स्फॅमच्या मंडळींनी आम्हाला एक आढावा दिला. त्यातून दोनशे पौण्डांना एक विहीर असे ठरविले गेले. प्रत्यक्षात एका ट्यूबवेलकरता अधिक खर्च येऊ शकतो. जमीन कशी लागेल, पाण्याचा साठा कितपत खोल असेल ह्या गोष्टींवर खर्च ठरतो. सरासरी दोनशे फूट खाली खणावे लागेल या कल्पनेने ती किंमत ठरवली गेली. ऑक्स्फॅमचा उद्देश त्यांच्या प्रयत्नांत आमचा हातभार लागावा इतकाच होता. त्यामुळे व्यावहारिक तपशिलाचा प्रश्न निर्माणच झाला नाही.

ऑक्स्फॅमने ब्रिटनमध्ये ' टू पेनी अ टॅप ' अशी घोषणा केली. प्रत्येकजण आपल्या घरात जितके नळ त्याच्या दुप्पट पेनी खुषीने महाराष्ट्राकरता देऊ लागला होता. त्यांची महाराष्ट्रात ३,३०,००० पौंड खर्च करण्याची भव्य योजना. ऑक्स्फॅम एक परदेशी संस्था...ख्रिश्चॅनिटीवर आधारलेल्या संस्थांचे पाठबळ मिळालेली. अशा संस्थेस आम्ही जमविलेले पौंड देत आहोत हे पाहून थोडासा विरोध झाला. पण तो फक्त विरोधाकरता विरोध होता. पाच हजार मैलांवरसुद्धा मराठी स्वभाव बदलत नाही त्याचे हे उदाहरण !

त्यामुळे थोडी फार कागदी बाणांची फेकाफेक झाली. काही काळ कपातली वादळे उठली नि निमाली. मात्र त्या विरोधामुळे आत्मनिरीक्षण करण्याची संधी मिळाली. प्रयत्नांत अधिक संयम, शिस्तबद्धता आली.

हजारांवर पौंडांचा आकडा गेला. रेडिओ टेलिव्हिजनवर बातम्या ऐकून ज्यांनी आमच्या आवाहनपत्रकास पाठिंबा दिला नव्हता, त्यांनाही ह्या प्रयत्नांचे मोल पटले. हजारपैकी सहाशे पौंडांच्या तीन ट्यूबवेल्स उभ्याही झाल्या. त्याच सुमारास श्री. व सौ. शंतनुराव किर्लोस्कर लंडनला आले. समितीचा त्यांच्याशी पुण्याला पत्रव्यवहार होताच. त्यांच्याशी पाझर तलावाच्या कल्पनेवर खल झाला. मग डॉ. दादा गुजर युरोप-यात्रा करण्याकरता आले. त्यांच्याबरोबर बैठक झाली. ऑक्टोबरमध्ये महाराष्ट्र मंडळाचे 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' नाटक रंगले. त्या वेळी मध्यंतरात, प्रेक्षकांना अरणगाव, राजुरी या जामखेड तालुक्यातील व माथकुळी या अष्टी तालुक्यातील मंडळाच्या वतीने झालेल्या तीन विहिरींचे डॉ. आरोळे यांनी काढलेले फोटो बघावयास मिळाले. ट्यूबवेलच्या प्रत्येक पंपावर एक मजकुराचा पत्ता आहे. 'ही विहीर महाराष्ट्र मंडळ-लंडन यांनी ऑक्स्फॅम या संस्थेच्या सहकार्याने बांधली. ह्या विहिरींच्या पाण्याचा उपयोग जात-धर्म-वर्णनिरपेक्ष असावा' विशेष म्हणजे अरणगाव, राजुरी, माथकुळी आणि नंतर नाहुली, आनंदवाडी व नायगाव अशा सहाही गावांतील ट्यूबवेल्स हरिजन वस्तीत खोदण्यात आल्या! महाराष्ट्रात चाललेल्या स्पृश्यास्पृश्य भेदाचे पडसाद इथल्या गार्डीयन-टाइम्समध्ये यावेत व भारतीयांनी शरमेने मान खाली घालावी, या प्रकाराला लंडन महाराष्ट्र मंडळाने ट्यूबवेलच्या कृतीने सणसणीत उत्तर दिले आहे!

एक डिसेंबर १९७३ रोजी वरील कामाकरिता निर्माण झालेली उपसमिती विसर्जित झाली. तत्पूर्वी समितीच्या प्रयत्नांची यथायोग्य नोंद सर्वत्र व्हावी म्हणून इथल्या भारतीय वृत्तपत्रांत बातम्या प्रसिद्ध झाल्या. बी.बी.सी. टेलिव्हिजनवर दर रविवारी भारतीयांकरता 'नयी जिंदगी नया जीवन' नावाचा कार्यक्रम असतो. त्यातही एक ट्यूबवेलचा रंगीत फोटो व बातमी दिली गेली. बी.बी.सी. रेडिओनेही बातमी देऊन आपले कर्तव्य बजावले. एक डिसेंबरच्या सांगता समारंभात समितीच्या कामाचा सर्व अहवाल जमलेल्या दीडशे उपस्थितांना मिळाला. एकूण जमलेल्या १६३० पौंडांपैकी १२०० पौंड प्रत्यक्ष विहिरींकरता खोदाईच्या निमित्ताने खर्च झाले. ३७३ पौंड सहाच्या सहा विहिरींना ओटा व छप्पर करण्याकरिता पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनीकडे रवाना झाले आहेत. उरलेले पैसे इथे छपाई, पोस्टेज वगैरे करता खर्च झाले. एकूण ४५० जणांनी ह्या उपक्रमात मदत केली. अवघ्या ब्रिटनमध्ये जेमतेम सातशे मराठी कुटुंबे. त्या सर्वांचा शोध लावून त्यांच्यापर्यंत हा संदेश पोचविणे किती जिकिरीचे! त्या मानाने झाले हेही नसे थोडके! यातले काही बिगरमराठी होते. काही युरोपिअनही होते. पण दात्याला जात-धर्म नसतो हेच खरे!

मंडळाचे एक सभासद सुट्टीवर गेले असता प्रत्यक्ष एका गावची विहीर पाहून आले. त्यांनी सर्वांना ती ' आँखों देखा हाल ' बातमी सांगता समारंभात दिली. डॉक्टर पेंडसे यांची लंडनच्या मराठी लोकांशी दोन वर्षांपूर्वी ओळख झालीच होती. त्यांच्या ज्ञानप्रबोधिनीतर्फे ट्यूबवेल खणण्याचे काम झाले. आता त्यांच्याच प्रयत्नाने आरोग्य राखणारा ओटा व ऊन पावसापासून संरक्षण देणारे छप्पर प्रत्येक विहिरीवर उभे राहील.

एक काळ असा होता. भारतीय तरुण परदेशी उच्च शिक्षण घेऊन मायदेशी परत जात. आता काळ बदललाय. भारतीय माणूस परदेशात मोठ्या संख्येने स्थायिक होणे हे नवीन राहिलेले नाही. त्यातून ' ब्रेन ड्रेन ' ची कटू समस्या उभी राहते आहे. काही का असेना, परदेशातील भारतीय मन अजूनही भारतोन्मुख आहे हे सांगण्याकरताच एका उपक्रमाचे हे निवेदन.

■

१७

# बहुरूपी हायकमिशनर

ती अनामिक हुरहूर. झपाझप पडणारी आमची पावले. नॉटिंगहिल विभागातला तो ऐश्वर्यशाली गजबजलेला रस्ता. गती वाढली. एका मोठ्या माणसाची नियुक्त भेट. एकेकाळच्या राजपुत्र. आताचा राजदूत. दोन भिन्न गावी भिन्न प्रकारचे जीवन. त्या वेळची ती नगरी... तो महान राजा... ते ऐश्वर्य.... अन् ती सत्ता ! सगळंच काळाच्या उदरात गुप्त झालंय्. आता फक्त जबाबदारी व कर्तव्यनिष्ठा. एका मोठ्या राष्ट्राचं दौत्य करायचंय् आणि तेही एके काळी असलेल्या राजाने. केन्सिंग्टन पॅलेस गार्डन्स नावाच्या भव्य शांत रस्त्यावरील नऊ क्रमाकाच्या आलिशान घराची बेल दाबली आणि आता आप्पासाहेब कसे भेटतील याविषयी मनात तर्क केले.

अमुक एका स्थितीपलीकडे पोहोचलेला मनुष्य कसा असतो ? तसे भरपूर पाह्यले. सर्वसंगपरित्यागी. भगवी वस्त्रे नेसून जिभेवर तत्त्वज्ञानाची भाषा घोळवणारे. स्वत्वाची जाणीव अनंतात विलीन केलेले. मीपणा हरवून बसलेले. एक ना अनेक. पण आज पाहात होतो ते आप्पासाहेब वेगळेच होते. वस्त्रे काषाय नव्हती, जिभेवर तत्त्वज्ञानाची भाषा होती.

सर्वसंगपरित्याग नसूनही ऐहिक मर्यादेच्या पलीकडे गेलेले. ते सांगत होते, आम्ही ऐकत होतो.

"स्वत:च्या अज्ञानाचे ज्ञान प्रत्येकाला असायलाच पाहिजे. त्यातूनच व्यक्तीचा विकास होतो. नाहीतरी विकास म्हणजे काय ? माझ्या दृष्टीने सत्यशोधन हाच विकास. सत्ता वाढविणे, भौतिक सुखाचे प्याले अधिकाधिक भरणे म्हणजे व्यक्तीचा विकास असं सकृद्दर्शनी म्हटलं जातं. माझ्या दृष्टीनं ते सब झूट आहे. मनाची शांती व अनुभवाचा आनंद हीच यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. एकतेशी तादात्म्य होता आलं पाहिजे. समाजकार्यासाठी अहंभाव नष्ट झाला पाहिजे. असा छंद वाढविला पाहिजे की माणूस त्याने झपाटला जाऊन कौशल्याच्या परिसीमा ओलांडल्या जातील !" हे खरे आप्पासाहेब.

"नुसतं कौशल्य असून उपयोगी नाही." आजूबाजूला काचेच्या कपाटात निरनिराळ्या देशांतील सुबक वस्तू मांडून ठेवलेल्या होत्या. सिक्कीम, भूतान, इजिप्त, इंडोनेशिया अन् नॉर्वे. आणि त्या छंदाची स्वामिनी सांगत होती, "नुसतं कौशल्य असून उपयोगी नाही. उत्तम चित्रकार, गायक, वादक यांना त्यांच्या कृतींतून आत्मज्ञान मिळाले पाह्यजे व त्यातूनच पूर्ण तादात्म्य मिळते !!" टेबलावर अंथरलेले व्याघ्राजिन व त्यावरील औंध संस्थानी शस्त्रे या विरागी वृत्तीशी कर्तृत्वाची सांगड घालताना नलिनीबाईंचा छंदसुद्धा असा चपखल मिसळून जात होता! तशा नलिनीबाईच छंदाची जोपासना अधिक करतात. आप्पासाहेबांना त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे वेळ अपुरा पडतो. नलिनीबाई कथाकादंबऱ्या वाचतील. मग त्यातील निवडक भाग आप्पासाहेबांकडे सुपूर्द होईल. नलिनीबाई केसरी नियमित वाचतात. अगदी परवा परवा प्रसिद्ध झालेली रणजित देसायांची 'श्रीमान योगी' ही त्यांनी वाचली आहे. आप्पासाहेबांच्या वाचनाचा ओढा बालवाङ्मय नाहीतर आध्यात्मिक ग्रंथ. दोघांनाही लिहिण्यासंबंधी आता उत्साह नाही; केवळ अनेक व्यापांमुळे. आप्पासाहेबांना मात्र हॉबीज्‌विषयी विचारलं की ते छंदाची व्याख्याच सांगतील. कारण स्वत:विषयी फारसं बोलायचं नाही हा स्वभावधर्म आहे ना! त्यांच्या फोटोग्राफीविषयी विचारा त्यांना, उत्तर तयार. "अहो बाबांजवळ सदतीस कॅमेरे होते, ते १९२२ साली कलर्ड फोटोग्राफी करीत. फ्रान्समधून तऱ्हतऱ्हेची उपकरणे आणवून. बाबा काय करीत नसत ? ते प्रिंटिंग करीत, ब्लॉकमेकिंग चाले त्यांचे. चित्रकला त्यांच्या अंगी मुरलेली. नमस्काराचे व्रत तर त्यांनी अवघ्या संस्थानास घ्यायला लावले." अरे हे तर श्रीमंत बाळासाहेबांच्या छंदांविषयी सांगणे झाले. मग सौ. नलिनीबाई मदतीला पुढे. "इथे आल्यापासून ह्यांना टेनिस खेळायला कुठे वेळ मिळतो ? पूर्वी ग्लायडिंग करायचे, गिर्यारोहण चालायचे. समुद्रकिनाऱ्यावर तासन्‌तास भटकणे हा तर ह्यांचा आवडता क्रम होता. नाही म्हणायला पूर्वीपासून चालत आलेली फोटोग्राफी तेवढी अजून कायम आहे, स्टिल आणि मुव्हीसुद्धा ! पण खरं सांगू का, आता मुख्य छंद उरलाय्

दुसऱ्यांनी केलेले प्रयोग बघण्याचा. " मग आठवलं ' इंडिया हाऊस ' मधील परिवर्तन. आप्पासाहेब आले आणि वेगवेगळ्या चित्रकारांची प्रदर्शनं भरायला लागली तिथं. भारतीय गायक-वादकांचे कार्यक्रम योजले जाऊ लागले. पूर्वसंस्कारांच्या वाट्यांतून समाजाकरता जगण्याचे मिळालेले बाळकडू अशा रीतीने साकार झालेले !

" का हो तुम्ही सोमवार करता ना ? " छोटामोठा भेद पंढरीला नष्ट होतो त्या दृष्टीने हा प्रश्न बरा. कुठेतरी साधर्म्य सापडायचं. प्रश्न नलिनीबाईंना. उत्साहाने उत्तर मात्र आप्पासाहेब देणार.

" हो त्या करतात सोमवार-शनिवार. मी मंगळवार करतो. नवरात्राचे नऊ दिवस एकभुक्त राहतो. कारण एकच. इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते । हे जे आपले शरीर आहे ना ते एक Experimental Laboratory आहे. मन व शरीर यावर प्रयोग करीत करीत सत्याचा अनुभव घ्यायचा. सत्य तत्त्वे शोधणे हाच खरा धर्म. मग त्याकरता मी रोज पहाटे चारला उठून गीता वाचतो, बुद्ध धर्माचा अभ्यास करतो. सत्यशोधनात बायबल अन् कुराणही अभ्यासतो. अहो टाळ वाजविणे, मूर्तिपूजा करणे म्हणजे धर्म नव्हे. "

" पण मग हा धर्माचा विशाल अर्थ तुम्ही टाळ वाजविणाऱ्या लोकांच्या धर्मसम्मेलनाला जाता तेव्हा सांगता ? " रोख आजीबाईंच्या देवळावर ठेवून !

" हो सांगतो ना. पण त्याचं असं आहे, एकदम सांगितलं तर माणसं तुटतात. त्यांच्या कलानं घ्यावं लागतं. हायकमिशनरला बहुरूपी व्हावं लागतं म्हणत होतो ना ते असं ! अहो धर्म ह्या नावाखाली केवढा प्रचंड पैशाचा चुराडा चालवलाय ह्या लोकांनी. परवा कोण ते साधू आले होते; त्यांना म्हणे स्त्रिया पाहायच्या नसतात. आमच्या संभाषणात मी सांगितले, हाच पैसा समाजाकरता लावा म्हणून. भारतीय लोकांकरता लंडनमध्ये होस्टेल बांधा. ' इंडिया सेंटर ' उभं करा. तो धर्म होईल. आता मी आपलं सांगून बघतो. बाबांची शिकवण आहे ना पाठीशी. माझ्या लहानपणी औंधला शिवजयंती आणि आजोबांच्या पुण्यतिथीला बाबा निरनिराळ्या पंडितांना बोलावीत. ज्ञानसत्र चाले मग बरेच दिवस. ती व्याख्यानं, त्या बैठका, ते परिसंवाद. त्यात पूर्वसुकृताची शिकवण-

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्या जगत् ।
त्येन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृध: कस्यचिद्धनम् ।।

बाबा सांगायचे ते आठवतंय अजून. इंग्लंडला जाऊन बॅरिस्टरी घेऊन आलास. आता कर्तव्याचे पालन हेच मुख्य काम. त्याची वंचना करू नकोस. मात्र एक लक्षात ठेव. हे जे आहे ते सर्व समाजाचं आहे, जे करायचं तेही समाजाकरता. तू समाजाचा आहेस. समाजपुरुषाची पूजा बांध. तो खरा धर्म. जो समाजाकडून घेतो व समाजाला देत नाही तो चोर-

-तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः ।

असा प्रचंड वडिलोपार्जित वारसा. सांस्कृतिक, आध्यात्मिक व सामाजिक. त्यात भर घातली म. गांधींनी. नलिनीबाई कौतुकानं सांगू लागल्या. त्यांनी सर्व पाह्यलं होतं, ऐकलं होतं. "महात्माजी म्हणायचे, राजा व प्रजा हे भेद आता संपले आहेत. तुझ्या संस्थानातल्या गरीब माणसाप्रमाणे तुला राह्यले पाहिजे. गांधींनी सांगितलं अन् तेव्हापासून हे महिना पन्नास रुपयांवर राहात होते. पूर्ण दहा वर्षे. खादीशिवाय दुसरं काही वापरलं नाही ह्यांनी." कदाचित म. गांधींचा आपल्यावरील प्रभाव आप्पासाहेबांनी सांगितला नसता. नलिनीबाईंमुळे एवढे तरी कळले. मग म. गांधींनी स्वतंत्र लोकसत्ताक औंध संस्थानची राज्यघटना कशी लिहिली, १९३९ मध्ये म्हणजे भारत स्वतंत्र होण्यापूर्वीच औंध संस्थान आप्पासाहेबांनी वडिलांच्या सल्ल्याने आपल्या प्रजेच्या हाती कसे दिले ह्या सर्वांविषयीचे किस्से सांगणार नलिनीबाईच. म. गांधींनी आप्पासाहेबांना भारून टाकलेच-एका राज्यावर तिलांजली देणे ही तर किस झाडकी पत्ती. त्यापुढची अवस्था गाठायला हवी. अहिंसा ! कुठलीही जगातली समस्या केवळ अहिंसेनेच सुटेल. आपल्यात अहिंसा पेलण्याची ताकद नाही. म्हणूनच आजचे विस्कळीत संघर्षित जीवन आपल्याला दिसते. संघर्ष सुरू होण्यापूर्वीच; मग ते संघर्ष जातीयवादाचे असोत, वर्णभेद, राष्ट्रभेदाचे असोत; त्या वेळीच अहिंसक मार्गे खटपट केली तर काय बहार उडेल ?-बाबांनी औंध संस्थानच्या सेवेची संधी दिली तर म. गांधींनी अवघा हिंदुस्थान सेवेकरता दिला.

स्वातंत्र्यानंतर पंख फुटले त्या कर्तृत्वाला. स्वतंत्र भारताचा संदेश घेऊन हा राजदूत निरनिराळ्या देशी गेला. म. गांधींची व वडिलांची शिकवण घेऊन. तू प्रजेचा आहेस. समाजाची उन्नती कर आणि अशी सेवा करता करता साम्राज्यपिपासू ब्रिटिश राज्यशासनाची त्यांच्यावर इतराजी होणारच.

"आफ्रिकी स्वातंत्र्याकरता तुम्ही खूप प्रयत्न केले म्हणतात..."

"त्याचं असं आहे. नेहमी इतिहासाच्या केंद्रस्थानी व्यक्ती गोवली जाते आणि मग खुळा समाज म्हणतो, व्यक्तीने इतिहास घडविला. अहो व्यक्ती कधीच इतिहास घडवीत नाही. इतिहास व्यक्तीला बनवीत असतो. नदीच्या ओघवती प्रवाहात झाडाचे पान चाललेले असते; पण मग आपण म्हणतो का की पान पाण्याला वाहवून नेत आहे ? भारतीय स्वातंत्र्यानंतर स्वतंत्रदेवतेचा सूर्य आफ्रिकेत उगवणारच होता. आफ्रिकेच्या पूर्वेला भारत देश, म्हणून तिथे तो अगोदर उगवला इतकेच. मी त्या वेळी आफ्रिकेत होतो हा एक योगायोग. असे इतिहासाच्या केंद्रस्थानी जाण्याचे प्रसंग माझ्या जीवनात आले, पण म्हणून मी हे केलं, मी ते केलं हे म्हणणं साफ चूक."

"पण तुम्ही माओ चळवळीला पाठिंबा दिला. रशियाकडून शस्त्रास्त्रे मिळवून दिली, ते

तर खोटं नाही ना ? ह्या बाबतीत तुमचं विवेचन हा तुमचा विनय जरी म्हटला... "

" छे, छे, विनय नव्हे,सत्यपरिस्थिती आहे सत्यपरिस्थिती ! "

" सिक्कीमला असताना तुम्ही पं. नेहरूंना भारतावरील संभाव्य चिनी आक्रमणाविषयी जागरूक केले-- "

" पण त्या वेळी ह्यांचं ऐकलं कुणी ? " नलिनीबाईंनी मध्येच अडविले. त्या स्पष्ट बोलतात. आप्पासाहेब जे सांगत नाहीत- किंबहुना जे न सांगण्यात त्यांना प्रौढी वाटते म्हणून कदाचित ते टाळतात, ते सत्य नलिनीबाई एक स्वतंत्र नागरिक ह्या नात्याने सांगतात. त्यात पतीविषयीचा अभिमान तर असतोच पण निर्भीडता अधिक असते.

" मी त्या वेळी जे केलं ते माझ्या जागी दुसरा कुणी असता तर त्यानेही केलं असतं. चीनच्या होऊ घातलेल्या आक्रमणाविषयी चीनमधील भारतीय राजदूताने दिल्लीला कळविले. रशियाहून, जपानहून अन् सयाम-बर्माहून आपल्या दूतावासातून त्यासंबंधीच्या बातम्या पं. नेहरूंकडे पाठविल्या जात होत्या. त्याचप्रमाणे माझे निदान मी सिक्कीमहून कळविले. त्या सर्व बातम्यांवरून प. नेहरूंची पॉलिसी ठरत होती. चीनचा तर भारत सरकारवर आरोप होता की पं. नेहरूंनी आप्पासाहेबांना सिक्कीम भूतानमध्ये पाठवून दलाई लामांना चीनविरुद्ध बंड करायला लावले ! दलाई लामांना ल्हासाहून भारतात पळून जाण्यास मी मदत केली. आरोप काय काहीही करता येतात. पण सगळे थोडेच खरे असतात. आता माझी दलाई लामांशी प्रत्यक्ष ओळख आहे, स्नेह आहे. त्यांच्याकडील जी क्रान्तिकारी लोकांची यंत्रणा होती त्यातील भूमिगत नेता ( बहुधा Chime Youngdong ) मला भेटत असे, आमच्या वाटाघाटी होत. पण म्हणून सर्व मी केलं हे साफ खोटं. तिबेटी लोकांना चिथवून, दारूगोळा पुरवून चीनविरुद्ध उठविले ह्यात खरेपणाचा अंश कमीच. वास्तविक पं. नेहरूंचे धोरण, तिबेट शांत व्हावा असे होते. तिबेटच्या उन्नतीकरता भारत-चीन या दोन्ही देशांनी त्याला मदत करावी, तिबेटी संस्कृती, त्यांचे जीवन व समाजव्यवस्था ह्यावर चीनने आक्रमण करू नये असे सत्तावन्न सालीच नेहरू व चौ एन-लाय यांच्यात ठरले होते. मुद्दामहून त्या वेळी दलाई लामा दिल्लीला उपस्थित होते. चीनने दिलेल्या अभिवचनामुळेच ते त्या वेळी तिबेटला परतले. चीनने काही केले तर तिबेटमध्ये केवळ सुधारणाच घडतील ह्या आश्वासनामुळे ! दलाई लामांची इच्छा तिबेटला परतून तुरुंगात पडण्यापेक्षा भारतात राहावे अशीच होती. "

गेल्या फेब्रुवारीमध्ये रीडर्स डायजेस्टमध्ये आलेला नोएल बार्बरचा लेख. The Rape of Shangrila. सर्व वाचल्यावर मनाला येणारी उदासीनता. एका छोट्या राष्ट्राचा संहार. विद्येचं पुनरुज्जीवन करणाऱ्या लामांची दाणादाण. सर्वं यस्य वशाद्‌गात स्मृतिपथम् कालय तस्मै नमः ।

" तो नोएलचा लेख तुम्ही वाचलाय ? "

" वाचलाय ना. फारच अप्रतिम ! "

" मग भविष्यात त्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याची काही आशा ? "

" अं-अं-तो पुढचा प्रश्न. त्याचं विवेचन इथं करता येणार नाही. " नलिनीबाईंनाही त्याबद्दल खंत आहे. त्यांचाही पतीबरोबर तिबेटी लोकांशी संबंध आलेला.

" ते तिबेटमधील पोस्टग्रॅज्युएट स्कूलमधले सगळे लामा आता भारतात धरमशालेजवळ गुंफा बांधून राहात आहेत. त्यांचं पूर्वीचं तिबेटमधील जीवन जसंच्या तसं परत सुरू झालंय. भारत सरकारने त्यांच्याकरता पुष्कळ केलंय. अहो, बाहेरच्या देशांनी तिबेटी लोकांना मदत केली तर त्याचा गाजावाजा किती होतो ! पण आपण त्यांच्या पुनर्वसनाकरता जे जे केलं त्याची कल्पना इतर देशांना किती आहे ? कारण आम्हाला आमची पब्लिसिटी करता येत नाही ना ? " व्यक्तीने आपल्या कर्तृत्वाचा डंका पिटू नये हे योग्य पण राष्ट्राने मात्र सोवळं राहून चालत नाही. नलिनीबाई भारतीय शासनातील उणिवा चोखपणे सांगतात !

पुनर्वसनावरून निघाले. सध्याचा पूर्व आफ्रिकी भारतीय बंधूंच्या पुनर्वसनाचा प्रश्न. भारतीय आणि विशेषतः ब्रिटिश सरकारचा डोकेदुखीचा प्रश्न. तो सोडविण्याच्या बाबतीत आप्पासाहेबांचा सिंहाचा वाटा. त्यांनी कितीतरी कृष्णशिष्टाई केली. आपले त्यांच्याविषयी स्पष्ट मत सांगताना ते म्हणतील- " तनमनधन ! त्या भारतीयांचे तन आहे ईस्ट आफ्रिकेत, धन आहे ब्रिटनमध्ये आणि मन आहे भारतात. अशी ही त्रिस्थळी यात्रा. मग केविलवाणी परिस्थिती नाही होणार तर काय ? आमचं मात्र असं स्पष्ट सांगणं आहे की कोणत्याही भारतीयाला, मग त्याचा पासपोर्ट कुठल्याही देशाचा असो, हिंदुस्थानचे दरवाजे उघडे आहेत. आताचं हे नवीन कॉन्झर्वेटिव्ह सरकार आलंय ना इथं, त्याचंही धोरण, आपल्याला वाटतंय त्यापेक्षा ह्या लोकांकरता अधिक मवाळ राहील. आणखी एक लोक लंडनमध्ये पदन्यास करतील- ! " एक आशावाद. आपल्या निळ्या कोल्ह्यासारखी अवस्था झालेल्या लोकांविषयी आत्मीयता. सडेतोड विवेचन मात्र नलिनीबाई सांगणार- अहो ॲसेटस् इंग्लंडमध्ये ठेवून जर हे लोक लायबिलिटीज् फक्त भारतात घेऊन जाऊ लागले तर हा आतबट्ट्याचा व्यवहार कोणता देश सहन करील ? आणि खरं सांगू का त्यांचा कित्येक वर्षांत भारताशी संबंध नसल्याने त्यांना आपल्या देशाविषयी तितकीशी आत्मीयता वाटत नाही !

सध्याचा भारत ! तिथली बिकट परिस्थिती. स्वदेशाविषयीच्या निष्ठा अन् प्रेम. राष्ट्रीयत्वाचे आवाहन. एक ना अनेक. मोहरा वळतो मग बी.बी.सी. कडे. आप्पासाहेब रागावले आणि परिणामी बी.बी.सी. च्या दिल्लीतील कार्यालयाची उचलबांगडी झाली. कारण एकच. अहिंसेचे पुजारी झालो म्हणून काय झाले ? आत्तापर्यंतचा बी.बी.सी.चा इतिहास पाहिला तर भारताची केवळ काळी बाजूच दाखविण्याची वृत्ती !

" अहो उद्या जर आम्ही इंग्लंडवरील चित्रणात फक्त सोहोस्केअरमधील व्यभिचारी जगच दाखविले, पिकॅडलीवरील हिप्पीज् तेवढे टिपले किंवा ईस्ट लंडनमधील स्लम्स फक्त दाखविल्या तर ते ब्रिटनचे यथार्थाने चित्रण होईल का ? ब्रिटिशांना अजून वाटते, भारत हा ' म्युझिअम पीस ' आहे. एक तर साधुसंतांचा देश नाही तर दारिद्र्य-रोगराई यांनी किडलेले राष्ट्र ! आणि ह्या पंकजातून आम्हाला वर काढण्यास ह्यांची ' चर्च ॲण्ड चॅरिटी ' तेवढी उपयोगी पडणार ! आमचं आता स्पष्ट सांगणं आहे की, ब्रिटिशांनी ही चर्च-चॅरिटीची वल्गना टाकून द्यावी. आमच्याकडे त्रुटी आहेत; पण त्या निवारण्याकरता आम्ही काय योजना करीत आहोत त्या दाखवा की! कसे केले आम्ही अस्पृश्यतानिवारण ? रोगराई कशी हटविली ? कोटी कोटी लोकांच्या देशात अन्न पुरविण्याचे कार्य आम्ही कसे करत आहोत ? देवळे अन् भटजीशाही तेवढी दाखवतात. पण त्या देवळांमार्फत ठिकठिकाणी चाललेल्या युनिव्हर्सिटीज यांना काय दिसत नाहीत ? पंगू लोकांच्या, अंधांच्या शाळा यांना आढळत नाहीत ? पुढल्या वीस-पंचवीस वर्षांत हिंदुस्थानची क्रयविक्रय शक्ती प्रचंड वाढणार आहे. कुणी काहीही केलं, कुठल्याही पक्षाचं सरकार आलं तरी भारत संपन्न होणार ! मग त्यावेळी ब्रिटिश आमच्याशी कसे वागणार ? भागीदार म्हणून की तटस्थतेने ? गेल्या एक वर्षाच्या माझ्या लंडनमधील वास्तव्यावरून असं सिंहावलोकन करता येईल की ब्रिटन-भारत संबंध पुढील कार्याच्या दृष्टीने सुधारणार आहेत. तांत्रिक, शास्त्रीय, औद्योगिक अन् सांस्कृतिक सर्व सर्व दृष्टींनी. कितीतरी कमिट्या स्थापन होऊन कामाला लागल्यात. आम्ही आमच्या उन्नतीकरता कुणाशीही सलोखा करू. चीन किंवा पाकिस्तानशीसुद्धा ! पण आता थांबणार नाही. बी.बी.सी. च्या लोकांना ह्या दुर्दम्य आशावादी भारताची ओळख पटून त्यांची चूक त्यांना समजली तर आम्ही त्यांच्याविषयी पुनर्विचार करण्याचा प्रयत्न जरूर करू ! "

न बोलणारे आप्पासाहेब ' राष्ट्र ' ह्या विषयावर उन्मेखून बोलले. आता एखादा माणूस स्वत:विषयी काही बोललाच नाही तर काय करणार तरी काय ? आम्ही भरपूर प्रयत्न केला. वेगवेगळ्या तऱ्हेने एकच प्रश्न विचारून. नेमकं उत्तर काढण्याची शिकस्त केली. पण आप्पासाहेब आपले तटस्थ. तसे बोलले भरपूर. मनमोकळं, हसतखेळत. पण स्वत:विषयी फारच थोडं सांगून. अगदी सुरुवातीलाच लक्षात आलं की हे काम काही वेगळंच आहे. आत्मस्तुती नको, पण स्वत:चं कर्तृत्व दुसऱ्याने प्रश्न विचारल्यावर मग सांगायला काय हरकत आहे ? टेपरेकॉर्डरने शब्दन् शब्द टिपला म्हणून ठीक. त्याची अनेकदा उजळणी तरी करता आली. पण तो ' बोलका ढलपा ' बोलणं मुद्रित करीत होता म्हणून आप्पासाहेब संकोच करीत होते असं मुळीच नव्हतं. वास्तविक अशा गप्पांत टेपरेकॉर्डरची मदत अवश्य असावी ह्याकरता त्यांचाच उत्साह अधिक. नाहीतरी त्यांचे सहकारी श्री. अरविंद देव नव्हते का म्हणाले,

"Appasaheb will never speak a word which cannot be recorded!" मग अडचण कुठे होती? एवढं तोलून मापून बोलायचं कारण काय? वाटलं, त्यांच्यातला हायममिशनर तर जागा झाला नाही ना? तसे हायकमिशनर आप्पासाहेब अनेकदा पाह्यले...त्यांची व्याख्यानं ऐकली....समारंभातून भेटलो...टेलिव्हिजनवर बऱ्याच प्रसंगी पाह्यले. गेल्या एक वर्षाच्या काळात ते किमान दोनशे ठिकाणी तरी गेले असतील. मनात जाणीव होती की आप्पासाहेबांना समाजपुरुषाला भेटताना बुरखा घ्यावा लागतो. अन् इतक्यात ते स्वत:च म्हणाले होते, हायकमिशनरला बहुरूपी व्हावं लागतं, वेगवेगळी रूपं घ्यावी लागतात. समाजातील ज्या ज्या प्रकारच्या व्यक्तींना भेटायचं त्यांच्या पातळीवर अंशत: तरी यावं लागतं. आम्हाला पाह्यचे होते ह्या बुरख्यापलीकडचे आप्पासाहेब! त्यांच्या प्रचंड व्यक्तिमत्त्वाचे पापुद्रे उलगडून बघण्याची इच्छा होती. हाती आले मात्र एक प्रसिद्धिपराङ्मुख आणि तरीही अनुभवसमृद्ध कर्तबगार जीवन!

अस्वस्थता वाढविणारी घड्याळाची गती. तरी समाधान एकच.... आप्पासाहेब "पाहिल्याचे" नलिनीबाई "दिसल्याचे" जिभेवर रेंगाळणारी ती उपाहाराची चव. मनात घोळणारे ताजे तत्त्वज्ञान. तेवढ्यासाठी केलेल्या अनंत खटपटी, प्रचंड तयारी. देव-ताम्हनकरांसमवेतची पूर्वचर्चा. टेलिफोन, पत्रे अन् प्रश्नमालिका. सगळ्यातून हाती आलेला समाधानी नि:श्वास. राजदूताचा निवास सोडताना जड झालेली पावले. रस्ता अजूनही गजबजलेला. वीजनळ्यांच्या मंद-प्रखर उजेडात झगमगणारे स्वच्छंदी पाश्चिमात्य जीवन. आणि या एकंदर समाधानाच्या जाणिवेत आमची पबकडे वळणारी पावले बस्स इतकंच!!

■

१८

# गोवा मुक्ति वीर

तो एक गोड समारंभ होता. लंडनमधील भारतीय दूतावासाच्या मागल्या रस्त्यावरील 'इंडिया क्लब' या श्री. कृष्ण मेनन यांनी स्थापिलेल्या क्लबच्या लाऊंजमध्ये अठ्ठावीस निमंत्रित मंडळी जमली होती. त्या समारंभात आपुलकी होती. कुजबुजाटात औत्सुक्य होते. सर्वांच्या चेहऱ्यावर विजयाचा आनंद होता. समारंभाचे अध्यक्ष भारतीय राजदूत श्री. आप्पासाहेब पंत होते. शेजारी समितीचे अध्यक्ष डॉ. द.वि. ताम्हनकर होते. आणि मुख्य पाहुण्यांचे नाव होते डॉ. तेलो मॅस्करनेस ! तो सत्तरी ओलांडलेला गोवामुक्तिवीर आपल्या बळकट शरीरयष्टीने जमलेल्या लोकांना स्वत:च्या वयाविषयी संभ्रम पाडीत होता. आपल्या आठ वर्षांच्या कारावासामुळे त्यांच्या चेहऱ्यावर काहीतरी हरवले आहे असा भाव होता. डोळयांत मात्र त्या सुदूरच्या भारतभूची स्वप्नेच दिसत होती !

बुधवार दिनांक २९ जुलै रोजी आम्ही लंडन विमानतळावर प्रतीक्षा करीत होतो. विमान उशिरा येणार होते. त्या वेळी विमानतळाच्या पेयगृहात आठजण त्या कधीच न पाहिलेल्या वीराविषयी तर्क करीत होते. कसे दिसत असतील डॉ. तेलो मॅस्करनेस ?

ओळखायचे कसे त्यांना? बॅरिस्टर मोहन पुंगलीयांनी त्यांचा फोटो पाह्यलेला होता. आठवण झाली स्वा. वीर सावरकरांच्या लंडन बातमीपत्राची. त्या वेळी १९०८ मध्ये श्री. दादासाहेब खापर्डे लंडनला आले होते. दिवस कठीण होते. गुप्तहेरांचा ससेमिरा होता. आणि तरीसुद्धा लंडनच्या चेरिंगक्रॉस स्थानकावर दादासाहेबांचे स्वागत करण्यास शेकडो देशभक्त गर्जनांच्या कल्लोळात उभे होते. आज परिस्थिती पालटलेली आहे. स्वतंत्र भारताचे शिक्षित नागरिक सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असलेल्या देशात वास्तव्य करून आहेत. आणि तरीसुद्धा भारताच्या अविभाज्य स्वतंत्रतेकरता ज्याने तुरुंगाचे आठ वर्षे केवळ गजच पाहिले त्या डॉ. मॅस्करनेस यांच्या स्वागताकरता फक्त आठ दिवानी माणसे जमावीत ह्यासारखी शरमेची गोष्ट असू शकेल काय? शिखांचे संत फत्तेसिंग लंडनला आले होते तेव्हा ब्रिटनमधील अवघी शीख जनता विमानतळावर 'सत्श्री अकाल' च्या घोषणा देत उभी होती. विमानाच्या शिडीपासून तलवारींच्या कमानींतून फत्तेसिंग गौरवाने चालत बाहेर आले. आणि तेलो मॅस्करनेस आले तेव्हा जमली होती केवळ बोटावर मोजण्याइतकी मंडळी!

मात्र त्यांच्या सुटकेप्रीत्यर्थ योजलेला समारंभ गोड तर खराच होता. काही भारतीय पत्रकार जमले होते. तातडीची दूरवाणीवरून विनंती करताच केंब्रिजहून चार ॲम्नेस्टी इंटरनॅशनलचे गोरे कार्यकर्ते आले होते. भारतीय दौत्यावासातली काही मंडळी आली होती. बाकीचे होते रानडे-मॅस्करनेस विमोचन समितीचे लंडनमधील कार्यकर्ते. प्रस्तुत लेखकाने सर्वांचे स्वागत केल्यावर डॉ. ताम्हनकरांचे भाषण झाले. त्यांनी एक गमतीदार प्रसंग सांगितला. पोर्तुगालमध्ये डॉ. सालाझार स्वतःचे राजकीय क्षेत्र सुरू होण्यापूर्वी कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. तेलो मॅस्करनेस त्या वेळी त्यांचे विद्यार्थी होते. पुढे प्राध्यापक सालाझार पोर्तुगालचे 'सर्वेसर्वा' बनले. आपल्या हुकूमशाही राजवटीत त्यांनी डॉ. मॅस्करनेस यांना भारतीय नागरिकत्वाचा त्याग करून पोर्तुगीज नागरिक बनण्यास सांगितले. त्या विनंतीचा (की आज्ञेचा?) डॉ. मॅस्करनेस यांनी धिक्कार करताच सालाझारमधला 'मास्तर' हुकूमशहाच्या रूपाने जागा झाला. 'गुरुसे चेला बढकर है" हे बघताच त्यांच्या तळपायाची आग मस्तकी गेली. पुढे आठ वर्षे पोर्तुगीज कोठडीत खिचपत पडले असता डॉ. मॅस्करनेस यांना ती आठवण नेहमी होत असेल! श्री. आप्पासाहेब पंतांचे डॉ. मॅस्करनेस यांच्याबद्दल गौरवपूर्ण भाषण झाले. डॉ. मॅस्करनेस यांच्या इंग्रजी भाषेवर पोर्तुगीज भाषेचा पगडा बसलेला आहे. कदाचित्त आठ वर्षांत त्यांना त्या भाषेचा स्पर्शही झाला नसेल. आपल्या भाषणात डॉ. मॅस्करनेस म्हणाले, 'माझे शरीर जरी पोर्तुगीजांच्या तुरुंगात बद्ध झाले होते तरी पोर्तुगीज सरकार माझा आत्मा कधीच काबीज करू शकले नाही.' भाषणाच्या अंती डॉ. मॅस्करनेस यांनी स्वतःच्या टेपरेकॉर्डवर मुद्रित केलेले स्वतःचे 'Confession of my faith' सर्वांना ऐकविले. ते

मनोगत त्यांनी कारागृहातून सुटताच आपल्या मुलीकडे लिस्बनला राहात असता म्हटले होते. त्या अवीट स्फूर्तिप्रद विश्वासातील नि:श्वास असे- ' बंदिवासात असताना मी जो काही प्रकाश पाहिला तो फक्त भारतीय क्षितिजावर लाल रक्तिमा उधळणाऱ्या रविराजाचाच होता. कारागृहात जे पाणी मी प्यायलो ते केवळ मला भारतीय पुण्यसरिताचीच आठवण करून देई. जुलमी गजांपलीकडे जी काही भूमी मला दिसली ती केवळ सस्यश्यामल भारतीय धरित्रीच होती. आता आस एकच राह्यली आहे की, केव्हा एकदा तो सूर्य, ती गंगा आणि तिच्या काठची भूमी मी बघेन. ' चहापान झाले. समितीचे सचिव श्री. नारायण गुणे यांनी आभार मानल्यावर तो अनौपचारिक सोहळा संपला.

योगायोग असा की डॉ. सालाझार गेली दोन वर्षे मृत्युशय्येवर खिळले होते. अधिकारसमाप्तीनंतर त्यांना रुग्णशय्येवरून श्री. मोहन रानडे व डॉ. मॅस्करनेस मुक्त झालेले बघावयास लागले. काळ सूड घेतो म्हणतात तो असा. डॉ. मॅस्करनेस सुटकेनंतर एक महिना लिस्बनला त्यांच्या मुलीकडे राह्यले ( की त्यांना राहावे लागले ) नंतर ते स्पेनमध्ये माद्रिदला आले. भारतीय वकिलातीत त्यांची व्यवस्था होती. तिथून लंडनला पोहोचण्यापूर्वीच डॉ. सालाझार ख्रिस्तवासी झाले. ' मरणांतानि वैराणि ' या न्यायाने आता सर्वच झगडा संपलेला आहे. २९ एप्रिलच्या ' तमसा-तटाकी ' पोर्तुगीज राजकीय परिस्थितीविषयी काही भाकिते केलेली होती. ती इतक्या लवकर खरी ठरतील असे वाटले नव्हते. शेवटी मार्शल कीटानो उदारमतवादी झाले तर ! ते काही असो, दोन्ही भारतीय देशभक्त पोर्तुगीजांच्या जबड्यातून सुटलेले आहेत. सर्वांचेच प्रयत्न कारणीभूत झालेले आहेत. प्रयत्न कुणी केले नव्हते ? लंडनहून भारतीय दूतावासातून हालचाली घडल्या. श्रीमती इंदिराजींनीही काही खटपट केली म्हणतात ! पोपकडे गाऱ्हाणे नेले होते. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने अभियोग चालवला. लिस्बनमधील देशभक्त बॅरिस्टर कामत यांच्या मदतीला तर मोलच नाही ! तसं पाह्यलं तर भारतातील श्री. सुधीर फडके यांनी स्थापिलेली विमोचन समितीच खरी कष्ट करून गेली. लंडनची तिची शाखा दोन वर्षांपूर्वी स्थापन झाली आणि दगड भंगविताना शेवटला प्रहार जसा तुकडे पाडतो तसे त्या समितीचे झाले. ते काही असो. हे लिहीत असता डॉ. मॅस्करनेस दिल्लीला पोहोचलेही असतील. तिकडे स्वागतसमारंभ चालू असेल. गोवा भारतात विलीन झाला असता दोन गोवाविमुक्तिवीर परक्यांच्या कारावासात बद्ध असण्याचे लांछन आता दूर झाले आहे. ह्यासारखी समाधानाची गोष्ट नव्हे !

लंडनमध्ये आणखी एक घटना जुलैच्या मध्याला घडली. ती म्हणजे ब्रिटनमध्ये भारतीय आर्किटेक्ट लोकांची एक संघटना स्थापन झाली. इथे जे कुणी शिक्षित भारतीय आहेत त्यांच्यात आर्किटेक्ट तरुणांचा भरणा अधिक आहे. गोल्डर्सग्रीन मोहोल्ल्यातील बहुतेक मऱ्हाठी मंडळी स्थापत्यविशारद आहेत. त्यांच्या संघटनेची आवश्यकता गेली

कित्येक वर्षे बोलली जात होती. वेस्टएंडमधील एका हॉलमध्ये १८ जुलैला चाळीस आर्किटेक्टस् जमले होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस्‌चे अध्यक्ष व कॉमनवेल्थ आर्किटेक्टस् असोसिएशनचेही अध्यक्ष, दिल्लीचे श्री. जयरतन भल्ला हे त्या स्थापनेच्या समारंभात प्रमुख पाहुणे होते. समारंभाकरता अध्यक्ष म्हणून श्रीमती जेन ड्र्यू बाई बोलावल्या होत्या. जेन ड्र्यू ह्या पंजाबची राजधानी चंदीगढ बांधताना भारतात, प्रख्यात फ्रेंच आर्किटेक्ट ल कर्बुझिअर यांच्या समवेत काम करीत असत. त्या पं. नेहरूंच्या मर्जीतल्या होत्या. त्यांचे भारतीय स्थापत्याशी जडलेले संबंध जाणूनच त्यांना अध्यक्षस्थानी बोलावले होते. उद्‌घाटनाची सभा निर्विघ्नपणे पार पडली. आता प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. इथल्या अनेक भारतीय स्थपतींच्या गाऱ्हाण्यांना तोंड फोडण्याकरिता व इतर स्थापत्यविषयक कार्यक्रम योजण्याकरता ह्या नवीन संस्थेचा चांगलाच उपयोग होईल. या स्थापनेकरिता सर्वश्री साठे-देशपांडे या द्वयींचे प्रयत्न खरोखरच स्तुत्य आहेत.

■

१९

# डोळस अंध

काही काही व्यक्तींचं आयुष्यच आकर्षक असतं. इतरांना हवंहवंसं वाटणारं. त्याची अन् माझी पहिली भेट झाली अन् तेव्हापासून मी त्याच्याकडे एकसारखा जातच राहिलो. कारणं अनेक. आज काय पत्र वाचायला जा. उद्या काय म्हणे तर पत्र लिहायला जा. मी फोन उचलायचो. 'हॅलो' म्हटल्याबरोबर तो सुरुवात करायचा. "अरे, एकाने किर्लोस्करचा दीपावली अंक आणून टाकलाय. केव्हा येतोस वाचायला. गेल्या कित्येक महिन्यांत मराठी असं काही वाचलंच नाही बघ मी. पुष्कळ दिवसांचा उपवास सोडायचाय्. तेव्हा बराच वेळ काढून ये."

मग भेटीची वेळ ठरायची. लंडन युनिव्हर्सिटीच्या होस्टेलवर माझ्या अशा कितीतरी खेपा झाल्या. दुसऱ्या मजल्यावरची ती त्याची खोली. वेळेवर जाण्याच्या बाबतीत मी जागरूक असे. वेळ जाणण्याच्या बाबतीत तो तितकाच रसिक असे. त्याच्या खोलीत मी प्रवेश केला की तो त्याच्या मनगटावरील घड्याळाची काचेची झडप उघडून काट्यांना स्पर्श करून म्हणे, "अगदी वेळेवर आलास की रे. बस मी चहा ठेवतो." चहाच्या

केटलचा प्लग बसवून पाणी उकळवायला ठेवत तो भराभर बोलायला सुरुवात करी. मला त्याची अन् माझी पहिली भेट आठवतेय्. प्रवेशकक्षात मी माझ्या मित्रांसह आलो. तिथल्या स्वागतसज्जेने आम्हाला विचारले, "कोणाला भेटायचंय् तुम्हाला?" त्याचं नाव सांगितल्यावर तिने ध्वनिक्षेपकावरून घोषणा केली आणि थोड्याच अवधीत तो खाली आला. माझ्यासमोर बरोबर उभा राह्यला व हात पुढे करून खळाळून हसला. कसं बरोबर ओळखलं त्याने आम्ही कुठे आहोत ते !

त्याच्याबद्दलची माहिती हळूहळू समजत गेली. मी विचारले नाही अन् त्याने सांगितले पण नाही. नेहमीप्रमाणे मी जातच राह्यलो. तो त्याचे "टॉकिंगबुक" वाजवीत ठेवून ऐकत असायचा. अन् मध्येच ते बंद करून मला विचारायचा, "हा कोण बोलतोय ओळख पाहू?" मी नवीन होतो त्या वेळी ह्या देशात. त्यामुळे शरणागती पत्करावी लागायची अथवा चुकीचे उत्तर तरी तोंडातून सटकायचे.

"हा वेल्श शब्दोच्चार आहे. वेल्समधील माणसे इंग्लिश अशा उच्चारांनी बोलतात." अन् मग इंग्लंडमध्ये इंग्लिश किती विविध प्रकारे बोलले जाते यावर त्याचे एक छोटेसे व्याख्यानच व्हायचे. नाहीतरी खूप बोलणे त्याच्या रक्तातच होते. दुसऱ्याला बोलके करून स्वत:ही भरपूर बोलणे हा त्याचा धर्म होता. कायद्याचा अभ्यासक असल्याने प्रत्येक विधान कारणे देऊन तो सिद्ध करायचा. मी एके दिवशी त्याला विचारले, "काय रे, टी.व्ही. वर आपला कार्यक्रम होतो. त्यात तबला तू का नाही वाजवायला जात?"

"टी.व्ही. वर मी का नाही जात? कारण क्रमांक १- त्यांना मी उत्कृष्ट तबला वाजवतो हे माहीत असून ते मला बोलावीत नाहीत. असल्या लोकांच्या बाबतीत मी ठरवून टाकलेय्- खुदाके घर भी न जायेंगे बे बुलाए हुए. कारण क्र. २- ते तबलावादक वगैरेंना द्रव्य चांगले देत नाहीत. मला माझी "पोझिशन डाऊन" करायची नाही. कारण क्र. ३- मला माझ्या अभ्यासात त्यांना सोयिस्कर असलेल्या वेळी जाणे परवडणार नाही. कारण क्र. ४- एक तुकडा वाजवायला माझी बोटे तयार नसतात. कारण क्र. ५- ज्यांना कळत नाही तिथे..."

"अरे अरे अरे, बस झाली तुझी कारणपरंपरा. तुझ्याच शब्दाचा वापर करून बोलायचे तर इंग्लिशांसारखी 'ची-ची' किती करतोस?"

एक दिवस असाच मी त्याच्याकडे गेलो. तो पाईपमधून धूम्रवलये काढीत बसला होता. शेजारी कुणी आंग्ल त्याला वृत्तपत्र वाचून दाखवीत होता. थोड्या वेळाने तो गोरा तरुण उठून गेला आणि मग आमची 'हिब्रू वाणी' सुरू झाली. (त्याचे गोरे मित्र त्याची अशीच चेष्टा करायचे.)

"काय अण्णा, कुठे गुप्त झाला होता आठ दिवस?"

"लीडस्पर्यंत जाऊन आलो बघ. चार गावी राह्यलो दोनदोन दिवस. मँचेस्टरच्या

युनिव्हर्सिटीत तबला वाजवून दाखविला. तिथे आपल्या भारतीयांची एक युनियन आहे म्हणे. पंधरा गिनी मिळाल्या. मी विचार केला, तेवढीच मीठमिरची सुटली. नाहीतरी थोडा काळजीतच होतो पैशाच्या. पण म्हणतात ना, ' खुदा देता है तो हात भरभरके देता है. कसे ? ' लीडस्‌ला व्याख्यान संगीतावर. आवाजी नाय पाह्यजे. समस्त इंग्लिश सभेला गार केले बघ. विषय काय म्हणून विचार- ' ग्रँजर ॲण्ड मिझरी ऑफ रिदम् ' उगीच नावही हलकंफुलकं नको. अन् व्याख्यानही सप्रयोग झालं बघ. तबला समोर मांडून आणि मांडी ठोकूनच व्याख्यानाला बसलो होतो. भारतीय संगीत हा प्रकार इतका भयानक ( ? ) असेल असं बापजन्मी त्यांना वाटलं नसेल. दोन तास संगीतावर भाषण कुणी दिलेय्. टाळ्यांचा नुसता गजर चालू होता माझ्या तबल्यावर, थांब तुला खोटं वाटायला नको. प्रत्यक्ष ऐकवतोच. टीमनं टेप केलंय. " तो त्याच्या कपाटापाशी गेला व त्याचा टेपरेकॉर्डर काढून त्याने सुरू केला. त्याची ती मोठ्ठ्याने बोलण्याची सवय, अगदी पूर्ण उच्चार करून बोलण्याची ढब, श्रोतृवर्गाला मधून मधून ॲण्ड माय डिअर फ्रेंडस् असं उद्देशून आकर्षित करण्याची ती त्याची चाल, सगळं सगळं. कसं छान रेकॉर्ड झालं होतं. जणू माझ्यासमोरच व्याख्यान चाललंय्. व्याख्यानात नारदमुनी आणले होते. दोन चक्क संस्कृत श्लोकही म्हटले होते. व्याख्यानातल्या त्या त्याच्या तबल्याच्या एकेक बंदिशीला कडाडून टाळ्या पडल्या होत्या.

" ह्या जगात आपल्या आवडीच्या तीनच वस्तू. तो तंबोरा, तो पलीकडला तबला-डग्गा आणि हा टेपरेकॉर्डर. प्राण गेला तरी कुणाला देणार नाही बघ. कुणीतरी म्हणाले, भारताहून मी निघालो त्या वेळी मी तबला, तंबोरा नंतर पाठवून देऊ म्हणून. मी म्हटले, छट् ते होणे नाही. ते माझ्याबरोबरच जायचे आणि आलेही महाराज. "

एक दिवस महाराष्ट्र-मंडळात काहीतरी कार्यक्रम होता. इथल्या महाराष्ट्र-मंडळात भांडणे आहेतच. तो आमचा गुण प्रांत सुटला तरी इथे सात हजार मैलांवर कायमच आहे. काही कारणाने विविध कार्यक्रम करणारे काही कलावंत ( ! ) रुसले अन् आले नाहीत. जे आले ते प्रेक्षकांत बसले. तो खरा तबल्याची साथ द्यायला आला होता. व्यवस्थापकांनी अडचण सांगून त्याला गाणे म्हणण्याचीही विनंती केली. " हे बरे आहे बुवा. भटजी भटजी लग्नाला या अन् आंतरपाटामागे तुम्हीच उभे राहा. आता अडचण आहे म्हणता तर म्हणतो गाणं मी " तो पुटपुटला. त्याचं शास्त्रोक्त सुरू झालं अन् सुरुवातीलाच काहींनी आपण लंडनमध्ये आहोत हे विसरून टाळ्या वाजविल्या. त्यांना लाईट हवे होते. त्याने आलापी रोखली, माईक हाताने पुढे ओढून तो ओरडला, " हे पाहा, मंडळाच्या विनंतीनुसार मी गातो आहे. बीटल्सच्या फॅनना मी विग्मोर हॉलमध्ये हे ऐकवलंय्. त्यांना सहन झाले अन् तुम्हाला होत नाही काय ? " आणि मग गाणे शांतपणे पार पडले. कार्यक्रम संपल्यावर मी त्याला म्हटले, " दामू, तू दम तर खरा भरलास बघ. अगदी गाणे

संपल्यावरसुद्धा कित्येकांना टाळ्या वाजविताना घाबरल्यासारखे होत होते!"

त्या दिवशी तो जेवायला आला. स्टेशनपर्यंत एकटा आला. तिथून मी सांगितल्याप्रमाणे फोन केला. काही मिनिटांत मी त्याला आणायला स्टेशनवर गेलो. वाटेने येताना त्याला म्हटले, "तुझ्या आवडीची भाजी केली आहे रे दामूअण्णा. ओळख कोणती ती?"

"काय वांग्याची भाजी केली का वहिनींनी. गुड गुड! आज हा ब्राह्मण खरा जेवणार हं."

जेवायला बसल्यावर मी त्याला सांगितले, "हे बघ रे, वांग्याची भाजी वाढली आहे. लसणीची चटणी आहे. काकडीची कोशिंबीर आहे. ही मधोमध पोळी. आणि उजव्या हाताच्या बाऊलमध्ये खिमा आहे. बघ. खातोस ना तू?"

"अरे खातोस ना म्हणून काय विचारतोस? आपण माणूस सोडून सगळं खातो बघ." अन् तो खरोखरच मनापासून जेवला त्या दिवशी. "वहिनी, ब्राह्मण तृप्त झालाय् हो आज. काय पाह्यजे ते मागून घ्या आत्ताच. ख़रं सांगतो रोज ते सॉसेस एग आणि बेकन खाऊन असा कंटाळलोय् मी. रोस्ट लॅम्ब, स्टेक अँड किडनी पाय ह्याशिवाय ह्या इंग्लिशांना दुसरं काही ठाऊक आहे का? वा वा, आज खरा मजा आला. आता घरी आईला पत्र लिहीन ना त्यात ह्या वांग्याच्याच भाजीचे 'पुराण' लावीन हं वहिनी!" ह्यावर आम्ही सगळेच हसलो.

ईगोइझम काहींनाच शोभतो. तो बाळगणे येरागबाळाचे काम नव्हे. त्याला व्यक्तिमत्त्व तसे लागते. तो सांगायचा अन् आम्ही आ करून ऐकायचो. नंतर कधी कधी वाटायचे, खरे असेल काय हे सगळे? पण खोटे कधीच वाटले नाही हे खरे. त्याला इथे येताना पैशाची गरज होती. तो सांगायचा, "उठलो, अन् तीन लोकांना भेटलो. अगदी 'ॲपॉइन्टमेंट' घेऊन. पंतप्रधान नेहरूंनी पैसे दिले. त्यांच्या दिल्लीच्या 'तीनमूर्तीतच' बसलो होतो बघ. नेहरूंनी शुभ चिंतिले आणि मी मनात म्हटले, "परत येईन ना तेव्हा अशा बंगल्यात राह्यचीच पात्रता घेऊन येईन. आहात कुठे?"

"आणखी कुणी आर्थिक मदत केली का रे तुला?"

"दुसरे आपले डॉ. राधाकृष्णन. खरा राजा माणूस. मी म्हटले त्यांना, ब्राह्मण आहे, सत्पात्री दान मागतोय्." तेही हसले मनापासून. कुठलासा श्लोक म्हणून शुभास्ते पन्थानःचा आशीर्वादही दिला. राजा माणूस! डॉ. झकीर हुसेन यांनीपण चांगली मदत केली, बरं का रे. "अरे मदत मागायची तर उगीच आलतूफालतू माणसाकडे का जा?" मी मनात म्हटले, तुझे एक ठीक आहे बाबा, प्रत्येकाला थोडाच इतका धीर असतो?

खरंच धैर्याचा खरा दामू! कुठेही जाईल. कुणातही मिसळेल. बोलायला काहीही विषय त्याला चालेल. हसेल मोठ्ठ्याने. एकदा अंडरग्राउंड रेल्वेच्या एस्कलेटरवर ताना

२०

# पुण्याचा मांसाहारी ब्राह्मण

ताम्हनकर गेले.

लंडनमधले ' केसरी ' चे ताम्हनकर शनिवार दि. २९ मे ८२ रोजी निधन पावले.

दादा ताम्हनकर जाणार हे सर्वांना अगोदरच ठाऊक होते. तसे बोलावणे कधीपासूनचे आले होते- पण त्यांचीच जगायची इच्छा बळकट होती. शरीर कसेबसे तगवून धरून चिकाटीने ते गेली पाच वर्षे जगले. पंधरा वर्षांपूर्वी आम्ही ताम्हनकरांचा विनोदाने ' भीष्माचार्य ' असा उल्लेख करायचो; पण प्रत्यक्षात त्यांना शरपंजरस्थित व्हावे लागेल असे मात्र वाटले नव्हते. ८३ वर्षे म्हणजे वृद्धावस्था आलीच. पण दादांना त्या अवस्थेत गेली काही वर्षे नुसती अंथरुणावर काढावी लागली याचेच वाईट वाटते. त्यांचेच इंग्लिश मित्र लॉर्ड फ्रेनर ब्रॉके ९४ वर्षांचे होऊनही अजून हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये जातात. अगदी दोन वर्षांपूर्वी ते मुंबईलासुद्धा कामानिमित्त जाऊन आले. दादा ताम्हनकरांपेक्षा वयाने मोठे असलेले इथले आणखी एक मराठी वार्ताहर सुंदर काबाडी अजून कार्यरत आहेत. मात्र दादांना आम्ही भीष्माचार्य म्हणायचो ते त्यांच्या इथल्या दीर्घ

वास्तव्यामुळे. ३१ सालापासूनचा लंडनमधला ५० वर्षांहून अधिक इतिहास त्यांनी प्रत्यक्ष पाह्यला होता.

जीन दादा ताम्हनकरांपेक्षा कितीतरी तरुण. दोघांचे लग्नच मुळी झाले ४६ साली. दादांचा बी.बी.सी. वरला आवाज ऐकून ती या माणसाविषयी उत्सुक झाली आणि त्यांचे लग्न झाले. अशी ' गोरी-काळी ' लग्ने इथे फारशी टिकत नाहीत- पण दादा ताम्हनकर आणि जीनची ताटातूट दादांच्या मृत्यूनेच केली. जीन दादांचे आजारपण सतत सहन करीत आली. दादा एखाद्या कोबीच्या गड्ड्याप्रमाणे सतत व्हीलचेअरमध्ये असत. त्यांना ही जर्मन वंशाची उंच धिप्पाड इंग्लिश बाई उचलायची, झोपवायची. सगळे काही गेली काही वर्षे लहान मुलाप्रमाणे चालले होते. बरे, मदत अशी कुणाचीच नाही. एक मुलगी- पण तीही लग्न होऊन नवऱ्याबरोबर वेगळ्या घरी राहणारी. एवढे झाले- पण जीनच्या चेहऱ्यावरचे हास्य लोपले नाही.

१९३१ साली म्हणजे बरोबर अर्धशतकापूर्वी दादा ताम्हनकर लंडनला आले. गोलमेज परिषद होती. म. गांधी आले होते. न. चिं. केळकर होते. केसरीचे प्रतिनिधी म्हणून द.वि. ताम्हनकर परिषदेला आले. यांव्यतिरिक्त सर तेजबहादूर सप्रूंचे राजकीय सचिव म्हणूनही ते परिषदेत काम पाहात होते. गोलमेज परिषद संपवून दादा परत गेले आणि म. गांधींच्या सांगण्यावरून परत लंडनला पोहोचले. मग मात्र ते इथलेच झाले. भारतीय स्वातंत्र्याकरता लंडनला राहून त्यांनी काही प्रयत्न करावेत ही गांधींची इच्छा. तीनुसार दादा राजकीय लिखाण करू लागले- आणि मग सगळेच बदलले. एक वडील भाऊ पंडित आत्माराम मॉरिशस बेटावर धार्मिक पुढारी बनला होता.

इथे इंग्लंडमध्ये दादा त्यांच्या ब्रिटिश नियतकालिकांतील लिखाणामुळे प्रसिद्ध होऊ लागले. आजऱ्याचा हा चित्पावन ब्राह्मण मग बदलला. निदान बाह्यतः तरी बदलला. पुण्याला राह्यले असते तर दादांची मूर्ती धोतरटोपीत वावरली असती- वरणभातावर त्यांचा देह पोसला असता. पण लंडनला सगळेच बदलले. नुसता सूट-बूट वेष आला नाही. नुसते जेवणात स्टेक आले नाही, तर वामांगीची रुखमाईसुद्धा फ्रॉकमधली गोरी जीन आली. मागल्या अंगणात तुळशीऐवजी डॅफोडिलस-ट्यूलिप्स फुलले आणि बाह्यांगाने दादा ताम्हनकर बदलले. कधी कधी मात्र असे वाटते, की ते अंतर्यामी मात्र मराठीच राह्यले. पंधरा एक वर्षांपूर्वी महाराष्ट्र मंडळातल्या एका मराठी नाटकाला ताम्हनकरांनी लॉर्ड फ्रेनर ब्रॉक्व्यांना अतिथी म्हणून आणले होते. ब्रॉके यांचा परिचय करून देताना दादा इंग्रजीत म्हणाले- हे पाहा, मी तुम्हांला ब्रॉके यांचा परिचय करून देणार आहे. तो तुम्हांला हवाय. स्वतः फ्रेनरला त्याची आवश्यकता नाही, तेव्हा यापुढले वक्तव्य मी मराठीत करतो !' नमनाला अशी विनोदी पखरण करून दादांनी एक विरोधाभासी किस्सा मराठीत सांगितला. ' मी लंडनला आलो आणि पुण्याचा हा ब्राह्मण मांसाहारी

मारीत होता. बाकीचे इंग्लिश आ करून पाह्यलाच लागले. मला उगीचच चोरट्यासारखे झाले. शिव्या द्यायला लागला तर शेलक्या शिव्यांचाही भरपूर साठा आहे त्याच्याजवळ. गंभीर विषयावर तो क्वचित बोलतो. तसा 'मसाला' जमला तरच ! दामू म्हणजे एक विचित्र रसायन आहे. नागपूर-मुंबईची दादागिरी त्याच्यात एकत्र झाली आहे. मागे एकदा गप्पाष्टकांत तो म्हणाल्याचे आठवतेय्.

"अरे यार, कुणापुढे हार खाणार नाही. तुमचा विश्वास बसणार नाही लेको. कुठे गेलो होतो बरं जॉनबरोबर ? हा, हा केंब्रिजजवळच होतं ते खेडेगाव. रात्री पोहोचलो आम्ही तिथं. जॉनचे मित्र गोळा झाले होते त्या खोलीवर. मध्ये टेबलावर बाटल्या मांडून त्यांनी त्या खोलीला गडकऱ्यांच्या शब्दांत अगदी आर्य मदिरा मंडळाचे, चुकलो आंग्ल मदिरा मंडळाचे स्वरूप आणले होते. सगळेच स्कॉलर. केंब्रिजला शिकणारे. मोठमोठ्याने शेक्सपिअरवर वाद घालत होते. आणि सांगतो बाळ्या तुला, अस्मादिकांची स्वारी जॉनबरोबर तिथे हजर झाली. कुणीतरी एक म्हणाला, 'काय बीअर घेणार काय ?' मी ताडकन् म्हणालो, नो थँक्स, मी पाणी पीत नाही. स्कॉच असेल तर द्या. नाहीतर रम विथ् ब्लॅककरंट. तो गार झाला. त्याला वाटले हा इंडियन पिऊन पिऊन काय पिणार ? त्यांची 'ची-ची' जोरात चालू होती. असा राग आला. इंग्लिशपोट्टे झाले म्हणून काय त्यांना शेक्सपिअर कळलाय होय ? माझी एम.ए. ला फिलॉसॉफी होती म्हणून काय मी शेक्सपिअर विसरलो काय ? स्कॉचचा एक जोरदार घोट घेतला मी अन् 'माय डिअर फ्रेन्डस्' करून अशी खणखणीत आरोळी ठोकली. जॉन मला आवरू लागला. मी त्याला म्हटले, 'तू थांब जॉन. माझ्या उपस्थितीत शेक्सपिअरचा मुडदा नाही पडू देणार !' आणि सांगतो तुला मुकुंदा, तासभर भाषण दिले. त्यांना खरा शेक्सपिअर समजावून सांगितला तेव्हाच स्कॉचचा दुसरा घोट घेतला. सुझन भाळली आमच्यावर ती त्याच बैठकीमध्ये महाराज !" अन् मग तो मोठ्यांदा हसला. चष्मा काढून त्याने पुसला. खूप दूरवर कुठेतरी पाह्यल्यासारखे केले. त्या प्रसंगाचा ठसा त्याच्या मनावर खूप खोलवर उमटला असावा. गर्ल फ्रेन्डस् ह्या देशात मिळणे सोपे अन् त्याच्या विद्वत्तेवर तर बऱ्याचजणी भाळल्या होत्या.

असाच एक दिवस त्याच्या खोलीवर गेलो सांत्वन करायला. मी सांत्वन काय करणार म्हणा. जगातली सगळी तत्त्वज्ञाने कोळून प्यायलेल्या फिलॉसॉफी दामूचं सांत्वन ? नुकतेच त्याचे वडील वारले होते. नागपुरात आणि आजूबाजूला त्यांनी केलेली सेवा महशूर होती. तिथल्या 'तरुण भारत' मध्ये निधनोत्तर त्यांच्यावर लिहिलेल्या लेखाचे कात्रण पोस्टाने दामूकडे आले होते. मी वाचून दाखवीत होतो. तो खराखुरा गंभीर झाला होता. आपण इतक्या दूरवर असता वडिलांना मृत्यू येणे ही घटनाच किती जीव कासावीस करणारी ! लेख वाचीत असता सुझन गुपचूप आत येऊन बसली. मराठी

बोलण्याबद्दल त्याने तिची क्षमा मागितली. माझं वाचन संपलं. आपल्या वडिलांची आकृती दामूच्या मनात उभी राहिली असावी. तो म्हणाला, " चला, ते तर गेले. त्यांनी खूप काम केलंय्. नागपूर त्यांचं सदैव ऋणी राहील. तेही माझ्यासारखेच होते. त्यांनी स्वत: नागपूरला अंधविद्यालय चालविले होते. मला म्हणाले, दामू ब्रेल शिक. पण मला ब्रेल शिकायचे नव्हते. कारण मी इतरांहून वेगळा नाही. मी फक्त वाचून दाखविलेले ऐकले अन् अभ्यास केला. मग वडिलांनी मला संगीत व तबला शिकायला लावले. तेही मी शिकलो. म्हणूनच मी स्वत:ला तुमच्यासारखा समजतो. माझं जगात काही अडत नाही, अडणार नाही. वयाच्या सात वर्षांपर्यंत माझ्या चर्मचक्षूंनी मी जे काही पाहून ठेवलंय त्याचा पूर्ण ठसा माझ्या अंतश्चक्षूंवर कायमचा पडलाय्. गुलाबाचा लाल रंग, आकाशाचा निळसर रंग, गवताचा हरा रंग, समुद्राच्या लाटांवर दिमाखाने मिरविणारा पांढराशुभ्र फेस सगळं सगळं मला आठवतंय, दिसतंय् !... "

मध्यन्तरात मी त्याला भेटलोच नाही. तो परीक्षेच्या गडबडीत होता. तीन महिने त्याचा अखंड अभ्यास चालू होता. रोज़ सोळा ते अठरा तास. कुणी वाचून दाखवायचे याचे वेळापत्रक निश्चित केलेले होते. शिवाय युनिव्हर्सिटीने दिलेली ' टॉकिंग-बुक्स ' होतीच. परीक्षा झाल्यावर भेटलो. तो पूर्ण समाधानी होता. " सगळे पेपर्स चांगले गेलेत बघ. कोण नापास करणार आता मला ? "

अन् थोड्याच दिवसांत सकाळी फोन खणखणला. " मुकुंद, काल रिझल्ट लागला. ७० टक्के मार्कस् मिळाले. अगदी मस्त काम झाले. एल.आय.एम. पदरात पडली. आता स्कॉलरशिप मिळाली तरच पुढील अभ्यासासाठी राहता येईल. नाहीतर इथलं आपलं चंबूगबाळं आवरावे लागणार. झाली आता साडेतीन वर्षे. खूप झाले. थिसिसही पुरा होत आलाय्. बघूया कसं जमतेय् ते. भेटू लवकरच. "

■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

१ फेब्रुवारी ६७ ला दामू वाडेगावकर भारतात मुंबईला परतला. तो प्राचार्य झाला. त्याला अनेक सन्मान त्याच्या यशाबरोबर मिळाले. माझ्या इतक्या लंडन-मुंबई सफरी झाल्या. पण प्रत्येक वेळी माझी भेट हुकली. दामूचे लग्नही झाले. त्याला कितीतरी वर्षे लोटली... आणि अचानक गेल्या वर्षी दामू गेल्याची वार्ता लंडनला पोहोचली !

' भेटू लवकर च ' हे या लेखातले वाक्य आता सतत टोचत राहणार !

युनिव्हर्सिटीत तबला वाजवून दाखविला. तिथे आपल्या भारतीयांची एक युनियन आहे म्हणे. पंधरा गिनी मिळाल्या. मी विचार केला, तेवढीच मीठमिरची सुटली. नाहीतरी थोडा काळजीतच होतो पैशाच्या. पण म्हणतात ना, ' खुदा देता है तो हात भरभरके देता है. कसे ? ' लीडस्‌ला व्याख्यान संगीतावर. आवाजी नाय पाह्यजे. समस्त इंग्लिश सभेला गार केले बघ. विषय काय म्हणून विचार- ' ग्रँजर अ‍ॅण्ड मिझरी ऑफ रिदम् ' उगीच नावही हलकंफुलकं नको. अन् व्याख्यानही सप्रयोग झालं बघ. तबला समोर मांडून आणि मांडी ठोकूनच व्याख्यानाला बसलो होतो. भारतीय संगीत हा प्रकार इतका भयानक ( ? ) असेल असं बापजन्मी त्यांना वाटलं नसेल. दोन तास संगीतावर भाषण कुणी दिलेय्. टाळ्यांचा नुसता गजर चालू होता माझ्या तबल्यावर, थांब तुला खोटं वाटायला नको. प्रत्यक्ष ऐकवतोच. टीमनं टेप केलंय. " तो त्याच्या कपाटापाशी गेला व त्याचा टेपरेकॉर्डर काढून त्याने सुरू केला. त्याची ती मोठ्ठ्याने बोलण्याची सवय, अगदी पूर्ण उच्चार करून बोलण्याची ढब, श्रोतृवर्गाला मधून मधून अ‍ॅण्ड माय डिअर फ्रेंडस् असं उद्देशून आकर्षित करण्याची ती त्याची चाल, सगळं सगळं. कसं छान रेकॉर्ड झालं होतं. जणू माझ्यासमोरच व्याख्यान चाललंय्. व्याख्यानात नारदमुनी आणले होते. दोन चक्क संस्कृत श्लोकही म्हटले होते. व्याख्यानातल्या त्या त्याच्या तबल्याच्या एकेक बंदिशीला कडाडून टाळ्या पडल्या होत्या.

" ह्या जगात आपल्या आवडीच्या तीनच वस्तू. तो तंबोरा, तो पलीकडला तबला-डग्गा आणि हा टेपरेकॉर्डर. प्राण गेला तरी कुणाला देणार नाही बघ. कुणीतरी म्हणाले, भारताहून मी निघालो त्या वेळी मी तबला, तंबोरा नंतर पाठवून देऊ म्हणून. मी म्हटले, छट् ते होणे नाही. ते माझ्याबरोबरच जायचे आणि आलेही महाराज. "

एक दिवस महाराष्ट्र-मंडळात काहीतरी कार्यक्रम होता. इथल्या महाराष्ट्र-मंडळात भांडणे आहेतच. तो आमचा गुण प्रांत सुटला तरी इथे सात हजार मैलांवर कायमच आहे. काही कारणाने विविध कार्यक्रम करणारे काही कलावंत ( ! ) रुसले अन् आले नाहीत. जे आले ते प्रेक्षकांत बसले. तो खरा तबल्याची साथ द्यायला आला होता. व्यवस्थापकांनी अडचण सांगून त्याला गाणे म्हणण्याचीही विनंती केली. " हे बरे आहे बुवा. भटजी भटजी लग्नाला या अन् आंतरपाटामागे तुम्हीच उभे राहा. आता अडचण आहे म्हणता तर म्हणतो गाणं मी " तो पुटपुटला. त्याचं शास्त्रोक्त सुरू झालं अन् सुरुवातीलाच काहींनी आपण लंडनमध्ये आहोत हे विसरून टाळ्या वाजविल्या. त्यांना लाईट हवे होते. त्याने आलापी रोखली, माईक हाताने पुढे ओढून तो ओरडला, " हे पाहा, मंडळाच्या विनंतीनुसार मी गातो आहे. बीटल्सच्या फॅनना मी विग्मोर हॉलमध्ये हे ऐकवलंय्. त्यांना सहन झाले अन् तुम्हाला होत नाही काय ? " आणि मग गाणे शांतपणे पार पडले. कार्यक्रम संपल्यावर मी त्याला म्हटले, " दामू, तू दम तर खरा भरलास बघ. अगदी गाणे

संपल्यावरसुद्धा कित्येकांना टाळ्या वाजविताना घाबरल्यासारखे होत होते ! "

त्या दिवशी तो जेवायला आला. स्टेशनपर्यंत एकटा आला. तिथून मी सांगितल्याप्रमाणे फोन केला. काही मिनिटांत मी त्याला आणायला स्टेशनवर गेलो. वाटेने येताना त्याला म्हटले, " तुझ्या आवडीची भाजी केली आहे रे दामूअण्णा. ओळख कोणती ती ? "

" काय वांग्याची भाजी केली का वहिनींनी. गुड गुड ! आज हा ब्राह्मण खरा जेवणार हं. "

जेवायला बसल्यावर मी त्याला सांगितले, " हे बघ रे, वांग्याची भाजी वाढली आहे. लसणीची चटणी आहे. काकडीची कोशिंबीर आहे. ही मधोमध पोळी. आणि उजव्या हाताच्या बाऊलमध्ये खिमा आहे. बघ. खातोस ना तू ? "

" अरे खातोस ना म्हणून काय विचारतोस ? आपण माणूस सोडून सगळं खातो बघ. " अन् तो खरोखरच मनापासून जेवला त्या दिवशी. " वहिनी, ब्राह्मण तृप्त झालाय् हो आज. काय पाह्यजे ते मागून घ्या आत्ताच. खरं सांगतो रोज ते सॉसेस एग आणि बेकन खाऊन असा कंटाळलोय् मी. रोस्ट लॅम्ब, स्टेक अँड किडनी पाय ह्याशिवाय ह्या इंग्लिशांना दुसरं काही ठाऊक आहे का ? वा वा, आज खरा मजा आला. आता घरी आईला पत्र लिहीन ना त्यात ह्या वांग्याच्याच भाजीचे ' पुराण ' लावीन हं वहिनी ! " ह्यावर आम्ही सगळेच हसलो.

ईगोइझम काहींनाच शोभतो. तो बाळगणे येरागबाळाचे काम नव्हे. त्याला व्यक्तिमत्त्व तसे लागते. तो सांगायचा अन् आम्ही आ करून ऐकायचो. नंतर कधी कधी वाटायचे, खरे असेल काय हे सगळे ? पण खोटे कधीच वाटले नाही हे खरे. त्याला इथे येताना पैशाची गरज होती. तो सांगायचा, " उठलो, अन् तीन लोकांना भेटलो. अगदी ' अॅपॉइन्टमेंट ' घेऊन. पंतप्रधान नेहरूंनी पैसे दिले. त्यांच्या दिल्लीच्या ' तीनमूर्तीतच ' बसलो होतो बघ. नेहरूंनी शुभ चिंतिले आणि मी मनात म्हटले, " परत येईन ना तेव्हा अशा बंगल्यात राह्यचीच पात्रता घेऊन येईन. आहात कुठे ? "

" आणखी कुणी आर्थिक मदत केली का रे तुला ? "

" दुसरे आपले डॉ. राधाकृष्णन. खरा राजा माणूस. मी म्हटले त्यांना, ब्राह्मण आहे, सत्पात्री दान मागतोय्. " तेही हसले मनापासून. कुठलासा श्लोक म्हणून शुभास्ते पन्थानःचा आशीर्वादही दिला. राजा माणूस ! डॉ. झकीर हुसेन यांनीपण चांगली मदत केली, बरं का रे. " अरे मदत मागायची तर उगीच आलतूफालतू माणसाकडे का जा ? " मी मनात म्हटले, तुझे एक ठीक आहे बाबा, प्रत्येकाला थोडाच इतका धीर असतो ?

खरंच धैर्याचा खरा दामू ! कुठेही जाईल. कुणातही मिसळेल. बोलायला काहीही विषय त्याला चालेल. हसेल मोठ्ठ्याने. एकदा अंडरग्राउंड रेल्वेच्या एस्कलेटरवर ताना

२०

# पुण्याचा मांसाहारी ब्राह्मण

ताम्हनकर गेले.

लंडनमधले ' केसरी ' चे ताम्हनकर शनिवार दि. २९ मे ८२ रोजी निधन पावले.

दादा ताम्हनकर जाणार हे सर्वांना अगोदरच ठाऊक होते. तसे बोलावणे कधीपासूनचे आले होते- पण त्यांचीच जगायची इच्छा बळकट होती. शरीर कसेबसे तगवून धरून चिकाटीने ते गेली पाच वर्षे जगले. पंधरा वर्षांपूर्वी आम्ही ताम्हनकरांचा विनोदाने ' भीष्माचार्य ' असा उल्लेख करायचो; पण प्रत्यक्षात त्यांना शरपंजरस्थित व्हावे लागेल असे मात्र वाटले नव्हते. ८३ वर्षे म्हणजे वृद्धावस्था आलीच. पण दादांना त्या अवस्थेत गेली काही वर्षे नुसती अंथरुणावर काढावी लागली याचेच वाईट वाटते. त्यांचेच इंग्लिश मित्र लॉर्ड फ्रेनर ब्रॉक्वे ९४ वर्षांचे होऊनही अजून हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये जातात. अगदी दोन वर्षांपूर्वी ते मुंबईलासुद्धा कामानिमित्त जाऊन आले. दादा ताम्हनकरांपेक्षा वयाने मोठे असलेले इथले आणखी एक मराठी वार्ताहर सुंदर काबाडी अजून कार्यरत आहेत. मात्र दादांना आम्ही भीष्माचार्य म्हणायचो ते त्यांच्या इथल्या दीर्घ

वास्तव्यामुळे. ३१ सालापासूनचा लंडनमधला ५० वर्षांहून अधिक इतिहास त्यांनी प्रत्यक्ष पाह्यला होता.

जीन दादा ताम्हनकरांपेक्षा कितीतरी तरुण. दोघांचे लग्नच मुळी झाले ४६ साली. दादांचा बी.बी.सी. वरला आवाज ऐकून ती या माणसाविषयी उत्सुक झाली आणि त्यांचे लग्न झाले. अशी 'गोरी-काळी' लग्ने इथे फारशी टिकत नाहीत- पण दादा ताम्हनकर आणि जीनची ताटातूट दादांच्या मृत्यूनेच केली. जीन दादांचे आजारपण सतत सहन करीत आली. दादा एखाद्या कोबीच्या गड्ड्याप्रमाणे सतत व्हीलचेअरमध्ये असत. त्यांना ही जर्मन वंशाची उंच धिप्पाड इंग्लिश बाई उचलायची, झोपवायची. सगळे काही गेली काही वर्षे लहान मुलाप्रमाणे चालले होते. बरे, मदत अशी कुणाचीच नाही. एक मुलगी- पण तीही लग्न होऊन नवऱ्याबरोबर वेगळ्या घरी राहणारी. एवढे झाले- पण जीनच्या चेहऱ्यावरचे हास्य लोपले नाही.

१९३१ साली म्हणजे बरोबर अर्धशतकापूर्वी दादा ताम्हनकर लंडनला आले. गोलमेज परिषद होती. म. गांधी आले होते. न. चिं. केळकर होते. केसरीचे प्रतिनिधी म्हणून द.वि. ताम्हनकर परिषदेला आले. यांव्यतिरिक्त सर तेजबहादूर सप्रूंचे राजकीय सचिव म्हणूनही ते परिषदेत काम पाहात होते. गोलमेज परिषद संपवून दादा परत गेले आणि म. गांधींच्या सांगण्यावरून परत लंडनला पोहोचले. मग मात्र ते इथलेच झाले. भारतीय स्वातंत्र्याकरता लंडनला राहून त्यांनी काही प्रयत्न करावेत ही गांधींची इच्छा. तीनुसार दादा राजकीय लिखाण करू लागले- आणि मग सगळेच बदलले. एक वडील भाऊ पंडित आत्माराम मॉरिशस बेटावर धार्मिक पुढारी बनला होता.

इथे इंग्लंडमध्ये दादा त्यांच्या ब्रिटिश नियतकालिकांतील लिखाणामुळे प्रसिद्ध होऊ लागले. आजऱ्याचा हा चित्पावन ब्राह्मण मग बदलला. निदान बाह्यत: तरी बदलला. पुण्याला राह्यले असते तर दादांची मूर्ती धोतरटोपीत वावरली असती- वरणभातावर त्यांचा देह पोसला असता. पण लंडनला सगळेच बदलले. नुसता सूट-बूट वेष आला नाही. नुसते जेवणात स्टेक आले नाही, तर वामांगीची रुखमाईसुद्धा फ्रॉकमधली गोरी जीन आली. मागल्या अंगणात तुळशीऐवजी डॅफोडिल्स-ट्यूलिप्स फुलले आणि बाह्यांगाने दादा ताम्हनकर बदलले. कधी कधी मात्र असे वाटते, की ते अंतर्यामी मात्र मराठीच राह्यले. पंधरा एक वर्षांपूर्वी महाराष्ट्र मंडळातल्या एका मराठी नाटकाला ताम्हनकरांनी लॉर्ड फ्रेनर ब्रॉक्व्यांना अतिथी म्हणून आणले होते. ब्रॉके यांचा परिचय करून देताना दादा इंग्रजीत म्हणाले- हे पाहा, मी तुम्हांला ब्रॉके यांचा परिचय करून देणार आहे. तो तुम्हांला हवाय. स्वत: फ्रेनरला त्याची आवश्यकता नाही, तेव्हा यापुढले वक्तव्य मी मराठीत करतो!' नमनाला अशी विनोदी पखरण करून दादांनी एक विरोधाभासी किस्सा मराठीत सांगितला. 'मी लंडनला आलो आणि पुण्याचा हा ब्राह्मण मांसाहारी

बनला. याच्याउलट २४ साली फ्रेनर भारतात गेले आणि तो इंग्लिश माणूस संपूर्णपणे शाकाहारी बनला ! ' दादा ताम्हनकर बाह्यत: असे जे बदलले ते परिस्थितीमुळे.

एक काळ असा होता, इंग्लंडमध्ये भारतीय मंडळी बोटावर मोजण्याइतकी होती. मग मराठी तर अगदीच तुटपुंजी. त्यामुळे त्या काळी लंडनला बाजारात मीठमिरची मसाला वगैरे काहीच नव्हते. लोणची-पापड यांचे तर नाव नको. आज परिस्थिती बदलली आहे. शेवग्याच्या शेंगाही मिळू लागल्यात. पीटर-लिंडाच्या नावांसमवेत ट्यूब रेल्वेच्या भिंतीवर कुठे कुठे ' रमेश लव्हज् रजनी ' अशाही प्रेमाच्या घोषणा लिहिलेल्या दिसू लागल्यात- इतकी भारतीयांची गर्दी आणि तीनुसार घडलेले बदल दृश्यस्वरूपात आढळू लागलेत. दादांनी हा पन्नास वर्षांचा आलेख डोळसपणे पाह्यला, दुसरे महायुद्ध पाह्यले आणि नव्याने सुरू झालेले फॉकलंडचे युद्ध प्रत्यक्ष टेलिव्हिजनवर ' याचि देही याचि डोळा देखिले ' एका पत्रकाराच्या चष्म्यातून. आता बंगलोरच्या डेक्कन हेरॉल्डला वार्तापत्र पाठविणे केवळ अशक्य होते. लेखणी तर नव्हेच, पण मेंदूही निकामी झाला होता. नीट काहीसे आठवत नव्हते. दुसऱ्याने वाचलेले अंशत:च कळत असे, अशी दीनावस्था आली. जन्मभर या माणसाने केवळ लेखणीवर जीवन तोलले. घरातल्या प्रत्येक खोलीत पुस्तकांची संपत्ती- दोघांच्या आवडीची. ती पुस्तकेही आता धूसर दिसू लागली. एक लोकमान्यांचे तैलचित्र होते, त्याचे रंग पुसट झाले. जन्मभर दादांनी एकाच माणसाला पुजले आणि ते म्हणजे लोकमान्य टिळक. टिळकांप्रमाणेच भांडकुदळ असलेले दादा टिळकांच्या व्यक्तिरेखेपुढे फक्त नम्र असत. जसे दादा निग्रही तसेच हट्टी, दुराग्रहीही. त्यांनी सार्वजनिक कामात रस पुष्कळ घेतला. पण प्रत्यक्षात निश्चित स्वरूपात घडले फक्त लेखनच. जाताना श्रीशिलकीत उरली तीन पुस्तके. लोकमान्य टिळक चरित्र, नंतर झाशीच्या राणीचे चरित्र आणि ६९ साली प्रसिद्ध झालेले सरदार पटेलांचे चरित्र. दादांनी केलेले हे लिखाण इंग्रजीत असल्याने ते सर्वदूर पसरले. केसरीतले लिखाण तेवढे मराठीत व्हायचे. पुढे ते थांबवले. पण तेव्हापासून चिकटलेली ' केसरीचे ताम्हनकर ' ही उपाधी कायम राह्यली. दादांच्या लिखाणातल्या संकल्पात शेवटचे काम होते छ. शिवाजी महाराजांच्या चरित्राचे. आज त्याची पाने हस्तलिखितातच विसावलीत. शेवटल्या आजाराने त्या चरित्राला वर येऊ दिलेच नाही.

दादांना फारसे कुणी साहित्यिक क्षेत्रातले मित्र न राह्यल्याने छ. शिवाजी महाराजांच्या चरित्राच्या लेखनावर त्यांनी कुणाशी चर्चा केल्याचे ऐकिवात नाही. त्यामुळे ते चरित्र कितपत भरीव निघणार होते, लिखाण प्रत्यक्षात कुठवर आले होते, संशोधन कुठल्या प्रकारचे होते वगैरे सर्वच अज्ञात आहे. तिकडे मुंबईत दत्तो वामन पोतदारांचे शिवचरित्र असेच अर्धवट राह्यले. जीनशी चर्चा केल्यावर लक्षात येतेय, की ताम्हनकरांच्या शिवचरित्राची पाने कुणा जाणकाराने जर ताब्यात घेतली नाहीत तर हे कामही वाया

जाईल. हाती घेतलेल्या गोष्टी अर्धवट सोडाव्या लागाव्यात असा दादांना शाप तर नव्हता?

मराठी माणसांच्या दृष्टीने दादांचे मुख्य काम म्हणजे विलायतेतील महाराष्ट्र मंडळाची स्थापना. १९३२ साली न. चिं. केळकरांच्या विनंतीवरून दादांनी चार मराठी डोकी एकत्र केली. चहाच्या कपावर महाराष्ट्र मंडळ निघाले. दुसऱ्या महायुद्धात तो मंडळाचा बीजांकुर जो गुप्त झाला तो पुन्हा प्रगट व्हायला ५२ साल उजाडले. आज मंडळाचा सुवर्ण महोत्सव होईल त्याला दादा नसणार. तसे ते मंडळातून केव्हाच निवृत्त झाले होते. प्रथम प्रथम अध्यक्ष असायचे. मग महत्त्वाच्या कार्यक्रमांना येऊ लागले. नंतर पत्र लिहून आपले मत व्यक्त करायचे. अलीकडे त्यांनी सगळेच बंद केले होते. आम्हीच भेटलो की मंडळाचा विषय निघायचा. बाकी दादा अलिप्तच असायचे. स्वतःच्या मुलाने अकाली ओढवून घेतलेल्या मृत्यूमुळे तर ते अंतर्मुख झाले नव्हते? काही म्हणा, गेली काही वर्षे त्यांच्यातला जोम गेला होता. पुढे तो आजारपणाने अजिबात नामशेष केला. मग माणसे तुटत चालली. दोनचार मित्र सोडले तर खरी साथसंगत शेवटपर्यंत जीननेच केली. ती दादांच्या कामात रस घेऊन त्यांना मदत करायची. त्यांचे टायपिंग करायची, नोट्स काढायची. तिने स्वतःचा पाश्चात्त्य वेष सोडला नाही आणि दादांनाही बदलायला लावला नाही. विमानप्रवास सोसत नाही म्हणून तिच्या कपाळी भारताची धूळ लागली जरी नाही तरी भारतीय प्रश्न तिला तेवढेच खोलवर ठाऊक होते. तिने साडी कधी नेसली नाही, पण भारतीय परंपरा तिला नीट ठाऊक होती. दादांना ती 'डटा' म्हणे. त्या दत्ताचे तिने डेव्हिड कधी केले नाही. कधी कधी दादांना तीच 'डटोपन्त' म्हणून हाक मारायची. इथे स्वतःच्या नावाचे इंग्लिशांच्या सोयीकरता अपभ्रंश करणारे अनेक आहेत. ते स्वतःला आपणहून पीटर किंवा जॉर्ज म्हणायला दादांइतकाच जीनला पण 'ताम्हनकर' नावातल्या 'ह' च्या अगोदर 'म' लिहिणाऱ्यांवर राग होता. दोघांनी आपल्या कन्येचे नाव वृन्दा ठेवले आणि ती वृन्दाही मोठेपणी आपल्या अर्धभारतीयत्वाचा अभिमान बाळगून आहे, जपून जोपासून आहे.

लंडनच्या गोल्डर्सग्रीन विभागातील हूपलेन रस्त्यावरील स्मशानभूमी. अन्त्यविधीच्या चॅपेलमध्ये दादांची शवपेटी आत आणली जात असता जीनने एक हुंदका दिला. शेजारी उभ्या असलेल्या वृन्दाने व तिच्या नवऱ्याने जीनला सावरले. जीनने दादांच्या अन्त्यविधीला काही हिंदू संस्कार व्हावेत म्हणून डॉ. शर्मांना मुद्दामहून बोलावले होते. 'वासांसि जीर्णानि यथा विहाय' डॉ. शर्मा मंत्र जपत होते. आपण जाणार, लवकरच जाणार हे दादा ताम्हनकरांना जेव्हा कळले तेव्हा त्यांनी सरळ हिंदुस्थानची वाट धरली. जीन-वृन्दाच्या विरोधाला न जुमानता ते व्हीलचेअरवरून लंडन विमानतळावर आत शिरले. मायलेकींच्या रडण्याकडे बिलकूल लक्ष न देता त्यांनी निग्रहीपणाने आपली व्हीलचेअर आत ढकलली. आपली हाडे आता ओंकारेश्वराजवळ मुळामुठेत जावी, हीच

त्यांची इच्छा होती. आता दादा कधीच दिसणार नाहीत या कल्पनेने त्या दोघी रडत होत्या- पण प्रत्यक्षात तसे घडायचे नव्हते. कोइमतूरला मसाज ट्रीटमेंट घेऊन दादा परत लंडनला आले. त्यानंतर त्यांनी अडीच वर्षे काढली. जीर्ण झालेली शरीराची वस्त्रे टाकून द्यायला त्यांना इतका अवधी लागला. चॅपेलमध्ये जमलेल्या व्यक्तींकडे सहज नजर टाकली. अर्धी गोरी मंडळी जीनच्या बाजूची- अर्धी भारतीय मंडळी. इनमिन पंचवीस माणसे. त्यांत दहाबाराच मराठी डोकी. अनेक संस्थांच्या संस्थापकांच्या निर्वाणाच्या दिवशी इतकी थोडी संख्या पाहून गलबलून आले. वास्तविक दादा ताम्हनकरांच्या अन्त्यसंस्कारास अवघे महाराष्ट्र मंडळ लोटायला हवे होते- पण योग काही वेगळाच होता.

चॅपेलबाहेर आम्ही जमलो. सुंदर ऊन पडले होते. विस्तीर्ण हिरवळीवर खूपशी फुले फुलली होती. सगळेच मूक होते. लंडनमधले आणखी एक मराठी व्यक्तिमत्त्व कोमेजले होते.

■

२१

# इंदिराजी लंडनमध्ये !

इंदिराजी इथे आल्या त्या एका गोंधळलेल्या अवस्थेतच. चिकमंगळूरचा निकाल जाहीर होऊन प्रचंड बहुमताने त्या पार्लमेंटवर निवडून आल्या व लगेचच त्यांची पूर्वनियोजित लंडनयात्रा अंमलात आली. एका बाजूला विजयाची भावना जरी असली तरी त्या विजयावर लंडन विमानतळापासूनच विरोधी निदर्शनांनी विरजण घातले. अन्यान्य भारतीय संस्थांचे, पक्षांचे कार्यकर्ते सतत सात दिवस विरोधी घोषणा करीत राहिले. ब्रिटिश वृत्तपत्रप्रतिनिधींचाही इंदिराजींवर राग दिसला. त्याची कारणे काहीही असोत, कितीही असोत, परंतु बातमीदार, मुलाखत-प्रमुख सगळ्यांनीच एकाच सुरात बातम्या दिल्या. मुलाखतीच्या वेळी 'आणीबाणी-लोकशाहीची गळचेपी' या विषयावर तोंडसुख घेतले. असे सर्वत्र विरोधाचे वातावरण पाहिल्यावर इंदिरा गांधींचा हिरमोड नक्कीच झाला असणार. आश्चर्याची गोष्ट ही की इतके असताही त्यांच्या बोलण्यात कुठेही आपण लादलेल्या 'आणीबाणीच्या' परिस्थितीबद्दल पश्चात्ताप नव्हता, आपणावर होणाऱ्या कोर्टकेसची भीती नव्हती. आपल्या देशात वावरावे इतक्या सहजतेने बाई इंग्लंडमध्ये

संचार करीत होत्या. त्यांच्या आठवड्याच्या खडतर प्रवासात नाही म्हणायला जवळजवळ सर्वच प्रमुख ब्रिटिश राजकीय नेत्यांनी त्यांच्या बाबतीत ' नरो वा कुंजरो वा ' तरी केले किंवा आपुलकीने साथ तरी दिली.

इंदिराबाईंची डायरी भरगच्च होती. सात दिवस त्यांनी अखंड दौरा केला. लंडनच्या क्लॅरिजेस हॉटेलमध्ये निवास ठेवून, सोबतीला स्वराज पॉल यांच्यासारखा मित्र ठेवून, त्या अनेक लोकांना भेटल्या. ' मी माझ्या लोकांना भेटायला आले आहे ' असे त्यांचे पालुपद होते. तसेच प्रत्येकाला ' मी इमर्जन्सी आणून लोकशाहीचे रक्षणच केले होते ' हे सूत्र सांगत त्यांनी मुलाखती दिल्या. ( माझ्या ११ वर्षांच्या कारकीर्दीत इमर्जन्सी फक्त १९ महिनेच होती ! ) प्रोटोकॉल म्हणून आल्या आल्याच त्या पूर्वसंकेत देऊन श्री. नानासाहेब गोरे यांच्या घरी चहापानास गेल्या होत्या. नंतर त्या इथले पंतप्रधान श्री. जेम्स कॅलहॅन यांना भेटल्या. विरोधी पक्षाचे श्री. एडवर्ड हीथ ( पूर्वीचे पंतप्रधान ) हे त्यांना भेटायला स्वत: होऊन आले होते व होस्टेलवर वाट पाहात राह्यले होते ! पुढची निवडणूक टोरी पक्षाने जिंकली तर होऊ पाहणाऱ्या पंतप्रधान श्रीमती मार्गारेट थॅचर यांनाही इंदिराजी भेटल्या. सर्वश्री पीटर शोअर व मायकेल फूट यांच्यासारख्या प्रमुख मंत्र्यांची त्यांनी भेट घेतली. काही भारतीय संस्थांच्या कार्यक्रमांना जाऊन भाषण करायचा त्यांनी प्रयत्न केला. इंग्लिश व भारतीय मित्रमैत्रिणींचा तसेच परिचितांचा त्यांनी सहवास घेतला.

आठवड्याच्या दौऱ्यातील दोन-तीन प्रसंग महत्त्वाचे उल्लेख करण्याजोगे होते. दक्षिण वेल्समधील एब व्हेल भागात ट्रेडगार नावाच्या गावी एका वेल्डिंग फॅक्टरीचे उद्‌घाटन बाईंच्या हस्ते झाले. वेल्समधील श्री. स्वराज पॉल या कारखानदाराच्या उद्योगसमूहात हा एकदशलक्ष पौंड खर्च करून बांधलेला कारखाना नव्याने उघडण्यात आला. स्वराज पॉल यांनी इंदिराजींचा सगळाच भार उचलला असल्याने स्वत:च्या कारखान्याचे उद्‌घाटन त्यांनी बाईंच्या हस्ते केले यात नवल नाही. ट्रेडगार गाव हे मायकेल फूट यांच्या मतदारसंघात आहे. श्री. फूट हे पूर्वी पंतप्रधानकीकरिता श्री. कॅलहॅन यांच्याविरुद्ध लढत होते. दिल्लीचा ऑर्गनायझर म्हणतो की स्वराज पॉल यांच्या कारखानदारीत मायकेल फूट यांचे शेअर्स आहेत ! अर्थातच मायकेल फूट हे या उद्‌घाटनप्रसंगी हजर होते. ते इंदिराजींच्या बाजूने बोलले. " अकरा वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत इंदिरा गांधींनी भारतास कमालीचे स्थैर्य आणून दिले. भारतासारखे मोठे राष्ट्र शतश: विदीर्ण होत असता, त्या कठीण प्रसंगी एकजिनसी समाज राखण्यात इंदिरा गांधींखेरीज अन्य कुणी नव्हते, हे जगाने विसरता कामा नये ! " लेबर पक्षाच्या एका नेत्याचे, एका भांडवलदाराच्या कारखान्याच्या उद्‌घाटनप्रसंगीचे हे उद्‌गार ! ! ह्या प्रसंगी किंबहुना सर्वच ठिकाणी पोलिसांची संख्या प्रेक्षक-श्रोत्यांपेक्षा अधिक ठेवून संरक्षणाचा बंदोबस्त कडक ठेवण्यात आला होता. काही भाडोत्री शिखांच्या हातात ' इंदिरा गांधींचे स्वागत असो ' अशा

शब्दांचे फलक देऊन त्यांना एब व्हॅलीत आणले होते. ह्या कार्यक्रमानंतर एक महत्त्वाचा भाग इंदिराजींनी उरकला. त्या दरीतील एका टेकडीवर नाय बेव्हन नावाच्या लेबर पक्षाच्या एका मंत्र्याचे एक स्मारक आहे. नाय बेव्हन हे वेल्श गृहस्थ इथे आरोग्यमंत्री होते. ब्रिटनमधील ' नॅशनल हेल्थ ' ची पद्धती त्यांनी १९४५ मध्ये सुरू केली. तीनुसार इथे जनसामान्यास वैद्यकीय मदत व औषध फुकट मिळते. अशा परोपकारी नाय बेव्हन यांच्या स्मारकाजवळ इंदिराजी पोहोचल्या. सहा वर्षांपूर्वी जेव्हा हे स्मारक निर्माण झाले, त्याच वेळी खरे म्हणजे त्या यायच्या. पण त्या वेळी जमले नाही. " पं. नेहरूंचा एक सच्चा मित्र, कधी शांत तर कधी उद्रेकी, पण आमच्याच विचारांचा " असे त्यांनी नाय बेव्हनचे वर्णन केले.

बार्बरा कार्टलँड या लेखिकेने इंदिराजींना पाचारण केले. ७७ वर्षांच्या या लेखिकेने आजपर्यंत २४९ कादंबऱ्या लिहिल्या. शेवटची ' फ्लॉवर्स फॉर दि गॉड ऑफ लव्ह ' ही तिची कादंबरी जरी भारताच्या वातावरणावर असली तरी दोघींनी भेटीत वाढत्या महागाईवरच चर्चा केली ! क्लरिजेस हॉटेलमधून स्वतःच्या सफेद रोल्सरॉईसमधून कार्टलँड बाईंनी इंदिराजींना जेव्हा लॉर्ड माऊंटबॅटनकडे नेले, त्या वेळी काही तुरळक शिखांनी हॉटेलबाहेर घोषणा केल्या. वीस वर्षांपूर्वी कार्टलँडबाई जेव्हा भारतात गेल्या होत्या, त्या वेळी नेहरू कुटुंबाशी त्यांची ओळख लेडी माऊंटबॅटननी करून दिली होती. त्यानंतरच्या प्रत्येक भारत सफरीत त्या इंदिराजींचा पाहुणचार घेत असतात. बातमीदारांनी कार्टलँडबाईंना त्यांच्या कादंबरीची नायिका इंदिरा गांधी होणे शक्य आहे का ? असे विचारले असता त्या म्हणाल्या, " माझ्या कादंबरीच्या नायिका ह्या अठरा वर्षांच्या कुमारिका असल्याने तो प्रश्नच येत नाही ! "

आणखी एका समारंभात इंदिराजी चमकल्या. ' इंडिया लीग ' ह्या पुरातन हिंदी संस्थेचा पन्नासावा वर्धापनदिन त्यांच्या उपस्थितीत साजरा झाला. गुरुवार दि. १६ नोव्हेंबर ७८ ला सायंकाळी पाच वाजता हा समारंभ होता. परंतु तो सोहळा तितकासा संपन्न झाला नाही. त्यानंतरच्या भोजनास न थांबता इंदिराजी लगेच ' इंडो-ब्रिटिश असोसिएशन ' च्या वार्षिक जेवणाच्या कार्यक्रमास हजर झाल्या. ह्या संस्थेचे अध्यक्ष श्री. स्वराज पॉल आहेत. त्यांच्या नावातही इंडो-ब्रिटिश सख्य असल्याने त्या संस्थेचे अध्यक्ष म्हणवून घेण्यात त्यांना औचित्य वाटत असावे. ह्या जेवणाच्या कार्यक्रमात खूपच रथीमहारथी हजर होते. असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा कॉन्झर्वेटिव्ह पार्टीचे श्री. एल्डन ग्रिफिथ्स हे इंदिराजींना प्रथमपासूनच ' इतो इतो ' करीत होते. पीटर शोअर, मायकेल फूट हे मंत्रिद्वय, कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे लॉर्ड कॅरिंग्टन, बार्बरा कार्टलँड, वृत्तपत्र स्तंभलेखक जेम्स कॅमेरॉन इत्यादी मंडळी प्रमुख होती. भारताचे राजदूत श्री. नानासाहेब गोरेही त्या प्रसंगी आमंत्रित होते. सगळ्यांच्याच भाषणात ' अहो रूपं अहो ध्वनिः ' चा प्रत्यय येत

होता. नानासाहेबांनी मात्र आपले नेहमीचे सहजस्फूर्त शैलीदार भाषण केले. ( नानासाहेब भाषण वाचून कधीच दाखवत नाहीत ! ) त्यांनी निरनिराळ्या व्यक्तींना आपल्या भाषणात तीन प्रमुख इशारे केले. समारंभ अर्थातच पं. नेहरूंबद्दल असल्याने नानासाहेबांनी सर्वप्रथम पं. नेहरूंच्या कर्तृत्वावर दोन वाक्ये सांगितली. नेहरू हे केवळ 'फ्रीडम फायटर 'च नव्हते; त्यांच्या लेखी राजकीय स्वातंत्र्याशिवाय खऱ्या अर्थाने 'फ्रीडम ' ला महत्त्व होते. जागतिक मतस्वातंत्र्याचे ते उद्गाते होते ! ' त्यानंतर ते म्हणाले, " लोकशाहीचे तंत्र आम्ही ब्रिटिशांकडून घेतले व ते जोपासले हे जरी खरे असले तरी त्या लोकशाहीचा अर्थ आमच्यात पूर्वीपासूनच रुजलेला आहे. ' सहिष्णुता ' हा आमचा प्रमुख धर्म आहे. " नुकतीच इथल्या वाढत्या काळ्या लोकसंख्येवरची थॅचरबाईंची प्रतिक्रिया जाणून ते पुढे म्हणाले, " आम्ही परमतसहिष्णू असल्यानेच भारतात सर्व भाषिक, धार्मिक, पंथीय समाज एकत्र ठेवून राहू शकलो. त्यामुळे तीन टक्के काळे इथे येताच जो गोंधळ राजकीय नेत्यांत उडाला तशी परिस्थिती भारतात कधीच उत्पन्न झाली नाही ! " श्री. नानासाहेबांचे भाषण वेगळे होते. जमलेल्या ५०० मंडळींनी ते आवडीने स्वीकारले व टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले.

ह्या तीनचार प्रसंगांचा अपवाद सोडला तर मात्र सगळीकडे इंदिराजींच्या धिक्काराच्याच घोषणा ऐकू येत. अगदी पहिल्या दिवशी विमानतळावर त्या घोषणा सुरू झाल्या. इंदिराजींना ' नाझी-डिक्टेटर ' आदी विशेषणांचा उपहार रोज मिळत गेला. त्याही आपल्या भाषणात विरोधकांना आवडीने ' फॅसिस्ट ' म्हणून संबोधित. विमानतळावर भारताचे दुय्यम राजदूत श्री. नाझरथ गेले होते. " व्ही.आय.पी. " लाऊंजमध्ये त्यांना इंडिया लीगची मंडळी भेटली. सोमवारी लंडनच्या साऊथहॉल या 'प्रतिजलंदर ' विभागात डोमिनिअन थिएटरमध्ये इंडियन वर्कर्स असोसिएशनतर्फे स्वागतसमारंभ होता. तिथे जातेवेळी कुण्या निदर्शकाने अंडे फेकल्याने बाईंची साडी खराब झाली. निदर्शक अनावर झाले. डोमिनिअनमध्ये दोन हजार मंडळी घुसली. दरवाजे बंद करण्यात आले. बरीच मंडळी बाहेर थांबली. आत इंदिरा गांधींनी फक्त तेरा मिनिटे भाषण केले. त्यात निदर्शकांनी इतका गोंगाट केला की, ते कुणाला ऐकूच येऊ शकले नाही. बर्मिंगहॅमला अशीच स्वागतसमिती होती. तिच्यातर्फे बोलगोपाळांचा मेळावा योजला होता. त्यानंतर नुकत्याच स्थापन झालेल्या ' इंडियन ओव्हरसीज काँग्रेस ' तर्फे भव्य भोजन समारंभ आखला होता. दोनही कार्यक्रम झाले. पण तिथेही विरोधकांनी भरपूर निदर्शने केली.

इथल्या सामान्य जनतेस ' इंदिरा गांधी भेट ' हा काय प्रकार आहे कळतच नव्हता. महात्मा गांधींशी त्यांचे नाते अजूनही तरुण मंडळी लावतात ! राजकीय वर्तुळातील लोकांना भारतावर अजूनही ' नेहरू 'चेच राज्य असावे असे वाटत असल्याने ते

इंदिराजींचे स्वागतच करीत होते. इंडिया लीगच्या डॉ. तारापद बसूंचे ' इंडिया वीकली ' नावाचे एक साप्ताहिक आहे. लोक त्याला गंमतीने ' बंगाल वीकली ' म्हणतात. त्या साप्ताहिकातून इंदिरा गांधींचे स्वागत गेले काही आठवडे निष्ठापूर्वक केले जात होते. ब्रिटिश वृत्तपत्रांना इंदिराजींपासून काही लभ्यांश नसल्याने त्यांनी मात्र आपला विरोधी सूर कायम ठेवला होता. टाइम्स, गार्डीयन व डेली टेलिग्राफ या तीन प्रमुख पत्रांनी इंदिरा गांधींचे स्वागत करण्याचे नाकारले होते. फार कशाला ' सन ' सारख्या वर्तमानपत्रानेही इंदिराजींची बातमी विरोधात राहूनच दिली होती. फोर्ड कंपनीच्या कामगार संपप्रकरणावर गार्डीयनने एक व्यंगचित्र प्रसिद्ध केले. मोटार कारखान्याचा एक मजूर दुसऱ्याला सांगतो, " इंदिरा इथे आपले वजन पुन्हा स्थापण्याकरताच केवळ आलेली नाही, मी तर ऐकतो की मोटारकारखान्यासाठी जागा शोधायलाही आली आहे ! " टेलिव्हिजनच्या बातमीदारांचा इंदिरा गांधींवर राग जुना असावा. त्यांची भारतातून झालेली हकालपट्टी त्यांना आठवत होती किंवा काय कोण जाणे ! ' टी.व्ही.आय ' नावाच्या एका कार्यक्रमात इथला प्रसिद्ध मुलाखतदार जोनाथन डिम्बल्बी याने आपले सर्व कर्तृत्व पणास लावले. त्याच्या प्रश्नांवर, प्रश्न विचारण्याच्या पद्धतीवर लोकांचे दुमत असेल. पण इंग्लंडमध्ये डेव्हिड फ्रॉस्टनंतर जोनाथन डिम्बल्बीसारखा दुसरा ' पृच्छक ' नाही हे सर्वमान्य आहे. आजपर्यंत इंदिराजी खूप दमल्या होत्या. पण चेहऱ्यावर त्रासल्याचा भाव कधीच नव्हता. ' टी.व्ही.आय ' मध्ये बाईंचे रागावलेले डोळे; त्रासलेला चेहरा दिसला. " तुम्हा बातमीदारांना अल्पस्मृतीचा शाप असावा, नाहीतर तेच तेच प्रश्न तुम्ही मला फिरून विचारले नसतेत. " त्या आणखीही खूप म्हणाल्या. जोनाथनचे प्रश्न उद्धट, गैरवाजवी आहेत असेही त्यांचे मत होते. शहा कमिशन निघाले. खूप गरमागरम चर्चा ऐकायला मिळाली ! टेलिव्हिजनने इंदिराजींच्या बहुतेक हालचाली कॅमेऱ्याने टिपून प्रसिद्धी दिली. बाईंचे भाग्य थोर. त्यांना प्रसिद्धीची वाण कधीच पडली नाही. ' फ्रेन्ड्स ऑफ इंडिया सोसायटी ' नावाची संस्था ' आणीबाणीच्या ' काळात जगात ठिकठिकाणी स्थापन झाली. इंग्लंडमध्ये ह्या संस्थेने आणीबाणीच्या काळात पुष्कळ काम केले आहे हे सर्वश्रुतच आहे. ह्या संस्थेने अल्प प्रमाणात निदर्शनात भाग घेतला. पण निदर्शनाने इंदिराजींना गैरवाजवी प्रसिद्धी मिळेल म्हणून त्या संस्थेने आपला हात आखडूनच घेतला होता असे कळले.

जगात सगळीकडेच या भेटीविषयी उत्सुकता होती. पण तितकीच तिच्या अनावश्यकतेबद्दल उदासीनता होती. लोकशाही दडपणाच्या प्रकाराबद्दल जळजळ होती. केंब्रिज युनियनचे विद्यार्थी लंडनला इंदिरा गांधींचे भाषण ऐकण्याकरिता खास कोच करून आले होते. भूतपूर्व अमेरिकन राष्ट्राध्यक्ष निक्सन हे ऑक्स्फर्ड युनियनपुढे भाषण देण्यास तयार आहेत. दोन भूतपूर्व नेत्यांचा हा होऊ घातलेला योग गमतीदार आहे.

इथले पंतप्रधान श्री. कॅलहॅन हे इंदिरा गांधींना भेटले. तसाच मैत्रीचा हात श्री. निक्सन यांना त्यांच्या लंडनभेटीत मिळेल काय याविषयी शंका व्यक्त करून ' न्यूयॉर्क डायरी ' या सदरात गार्डीयनमध्ये पीटर हिलमोरने एक गमतीदार प्रसंग उद्‌धृत केला आहे. इंदिराजींच्या लंडनभेटीविषयी त्याचा सकृद्दर्शनी संबंध नाही, तरीसुद्धा भारताचे आजी-माजी पंतप्रधान पुत्रवेडाने कसे गांजले आहेत याविषयी इथल्या वर्तमानपत्रात बातम्या येत असल्याने तो प्रसंग द्यावासा वाटतो. इंदिराजींच्या एका आर्थिक सल्लागाराने ही बातमी ' Now it can be told ' अशा थाटात न्यूयॉर्कला फोडली. पीटर हिलमोर लिहितो की, "हा सल्लागार इंदिरा गांधींची ' रुपयाच्या अवमूल्यनाबद्दल ' भेट घेण्याकरिता खूपच प्रयत्न करीत होता. मोठ्या प्रयासाने त्याला एका सकाळी भेट मिळाली. न्याहारीच्या टेबलावर तो आपली योजना इंदिराजींना सांगत असता मोठा आवाज झाला. संजय गांधीने आपली थाळी भिंतीवर फेकली होती. कारण आचाऱ्याने ' स्क्रँबल्ड एग ' फारच तेलकट केले होते ! ' " मी तुझ्याकरिता स्वत: न्याहारी करते, तू काळजी करू नकोस " असे समजावून इंदिराजी स्वयंपाकघरात ज्या गडप झाल्या त्या पुन्हा दिसल्याच नाहीत !

पं. जवाहरलाल नेहरूंच्या ८९ व्या जयंतीचे निमित्त साधून इंदिराजी लंडनला आल्या. त्यांच्या येण्याचे पडघम बरेच दिवस वाजत होते. त्यांना तिकडे यायला परवानगी मिळते की नाही याबद्दल भाकिते चालली होती. मग चिकमंगळूरची निवडणूक आली. इंग्लंडमधल्या भारतीयांना इंदिराजींची बाजू घ्यावी न घ्यावी असा संभ्रम पडला. दोन भोजन कार्यक्रमाच्या अतिशय महाग प्रवेशिका फारच थोड्या विकल्या गेल्याने कार्यक्रमाच्या संयोजकांना चिंता पडली. चिकमंगळूरला ' जितं मया ' झाले व भोजनपत्रिका चुटकीसरशी विकल्या जाऊन प्रवेशसंख्या थांबवावी लागली ! स्वतंत्र भारत व त्याचे परदेशस्थ भारतीय; त्या सर्वांनाच अजून प्राप्त परिस्थितीची पुरेपूर जाणीव झालेली दिसत नाही.

■

२२

# कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही !

नारायण गणेश गोरे नावाचा वृद्ध तपस्वी एव्हाना भारतात पोहोचून जुना झाला असेल. जेव्हा संसार होता तेव्हा अखंड भटकंती केली आणि वानप्रस्थाश्रमाचे आयुष्य जेव्हा जगायचे त्या वेळी या माणसाने लंडनला संसार थाटला. राधा नावाच्या मानलेल्या मुलीने त्यांना केन्सिंग्टन ब्लेस गार्डन्सवरील आलिशान बंगल्यात रांधून द्यायला सुरुवात केली. आयुष्यात कधीच नोकरी न केलेल्या या मुसाफिराने लंडनला आपल्या सेवानिवृत्तीच्या वयात सर्वांत मोठ्या जबाबदारीची नोकरी स्वीकारली. इकडे येताना राज्यशकट हाकण्यासाठी मुंबई महानगरपालिकेतून डेप्युटी कमिशनरच्या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या भाऊ वैद्यांसारख्या समर्थ कृष्णसारथ्याची निवड केली. राधा भारतातच मुलीसारखी राह्यली होती, ती इथेही आली यात नवल नाही.

दिवसा हायकमिशनरचे काम, फावल्या वेळात मागच्या पुढच्या बागेत चक्कर लावणे, प्रसंगी एखादा वाफाही खणणे, नियमित मिताहार, नियमित लेखन, आलेल्या पैपाहुण्यांची देखभाल इत्यादी गृहस्थाश्रमी माणसाची सर्व कृत्ये, कर्तव्ये अंगवळणी पाडून लंडनचे

आयुष्य सुरू झाले. आज मात्र त्या जोडीत आणलेल्या संसाराचा सारीपाट उधळून लावून, स्वतःच्या नोकरीवर स्वाभिमानाने व स्वेच्छेने लाथ मारून हा व्रती जसा आला अगदी तसाच रूढार्थाने रिकाम्या हाती परंतु इंग्लंडमधल्या अवघ्या भारतीय लोकांचे प्रेम शिदोरीत बांधून भारतात पुन्हा कामच करण्यासाठी परतला आहे. नारायण गणेश गोरे ही आता लंडनला आठवण तेवढी उरली आहे... !

इंडिया हाऊसच्या दूतावासात आजपर्यंत आठ राजदूत होऊन गेले. नानासाहेब गोरे हे नववे. इंडिया हाऊसच्या तिसऱ्या मजल्यावरील भिंतीवर आठही जणांची छायाचित्रे टांगली आहेत. त्या चित्रांच्या मांडणीत खरं म्हटलं तर आता नवव्या चित्राकरता जागा नाही. उपचार म्हणून तिथला कुणी कर्मचारी नानासाहेबांचे चित्र तिथे गर्दी करून लावीलही. पण ते सर्वच दृष्टींनी तिथे योग्य दिसणार नाही. बावीस महिन्यांची आठवण ती काय ? बाकीचे हायकमिशनर तीन तीन चारचार वर्षे राहून गेले. त्यांतले बरेचसे नुसते राहूनच गेले. आज त्यांतल्या कित्येकांची नावे फक्त तसबिरीखालची अक्षरे वाचून तेवढी उजळायची.

मराठी राजदूत असे तीनच झाले. बाळासाहेब खेर, आप्पासाहेब पंत व नानासाहेब गोरे. बाळासाहेबांचा लंडनमधला काळ जुना होता. त्या वेळी त्यांना भेटलेली मंडळी लंडनमध्ये आता थोडी उरलीत. मात्र आप्पासाहेबांचे रुबाबदार व्यक्तिमत्त्व व संस्थानिकी छाप त्यांच्या खळाळत्या हास्याबरोबर अनेकांनी अनुभवली आहे. त्यांचा जमाना आत्ताआत्ताचा होता. नानासाहेब आले व पुन्हा एकदा इंडिया हाऊसची कळा बदलली. आम्हा लोकांचे तिथे येणे-जाणे वाढले. तशाच अपेक्षाही. आणि सूर जमतोय तोच ते गेलेही. आता इंडिया हाऊसच्या पायऱ्या चढताना प्रत्येक पायरीगणिक नानासाहेब गोऱ्यांची आठवण झाल्याखेरीज राहणार नाही.

इंडिया हाऊसमधील नानासाहेबांच्या कारकीर्दीचे मूल्यमापन जरूर करता येईल. त्यांनी लावून दिलेला धडा तिथे पुढे अनेक वर्षे गिरविला गेला तर ते आमचे भाग्यच ठरेल. तिथे घडलेल्या सुधारणांतील सिंहाचा वाटा नानासाहेबांचा खास होता. अनेक पावसाळे पाह्यलेल्या, उदास विचारे धनसंचय करणाऱ्या अधिकाराची जाणीव अजिबात न दाखविणाऱ्या आणि विवेकी अशा नानासाहेबांच्या चार गुणांतील 'एकैक मणि उद्धरणाय किमु यत्र चतुष्टयम्' अशी परिस्थिती असताना त्यांनी 'हे' केले, त्यांनी 'ते' केले याचा पाढा वाचण्याची खरे म्हटले तर जरूरच नाही. त्यांनी ते ते केले नसते तरच आश्चर्य होते.

नानासाहेबांनी इंग्लंडमधील भारतीय जनतेकरता खूप केले. इंडिया हाऊसमधील पासपोर्ट वगैरे बाबतीतली कटकट कायमची बंद केली. आज तिथली पासपोर्टबाबतची प्यादी भराभर हालताना दिसतील. मुंबई-दिल्ली विमानतळावर प्रवाशांना कस्टम्सच्या

मार्गात लाल व हिरवे दिवे दिसतील. वैध मार्गाने जाणाऱ्या प्रवाशांना हिरव्या दिव्याच्या रोखाने जाऊन कमीत कमी वेळात आपल्या नातेवाइकांना भेटायला जाता येईल.

भारतात जाताना काय काय व किती किमतीपर्यंतच्या वस्तू नेता येतात याबाबतचे नियम शिथिल नव्हे पण सोपे करून त्यांच्या प्रती छापवून आम जनतेचा त्यांनी दुवा घेतला. ' इंडिया न्यूज ' नावाचे इंडिया हाऊसचे साप्ताहिक मुखपत्र बंद पडले होते, ते नानासाहेबांनी सुरू केले यात काहीच आश्चर्य नाही. पण नियमितपणे त्यात स्वत:च्या स्वाक्षरीने 'थॉट फॉर दी विक ' लिहिणारे नानासाहेब गोरे हे धैर्याचे खरेच. आपण एक जबाबदारीची कामगिरी करीत आहोत, अशा वेळी निरनिराळ्या घटनांवर विचार लिहिणे ते परखड, सत्य उतरविणे या तारेवरील कसरतीतून नानासाहेब सहीसलामत पार पडले. हेच ते आश्चर्य !

इंडियन हाऊस तर सार्वजनिक ठिकाण. कुणाही व्यक्तीने तिथे गाऱ्हाणे मांडावे. भेट मागावी. न मिळाली असे झाले नाही. कुणालाही भेटीची परवानगी देण्याचा रिवाज आप्पासाहेब पंतांनी पाडला होता. नानासाहेबांनी त्या प्रथेचा अतिरेक केला. एकदा कुणी भडक माथ्याचा माणूस त्यांची भेट मागत होता. त्याच्या काही वेडगळ मागण्या होत्या. त्या मान्य करणे केवळ अशक्य होते. त्यामुळे त्याच्या चढ्या आवाजाला प्रवेशकक्षेतील अधिकारी दाद देत नव्हते. त्याचीही नानासाहेबांनी भेट घेतली. आपले म्हणणे शांतपणे ऐकून घेणारा हायकमिशनर पाहून तो अडाणी गहिवरला. नानासाहेबांच्या पायाला हात लावून स्वत:ची मांग काय होती हे विसरूनच परतला !

आज इंडिया हाऊसमधील काही समस्या अर्धवट आहेत. इंग्लंडमधील भारतीयांचे काही प्रश्न सोडविले गेले नाहीत. सार्वजनिक पैशाचा अपहार किंवा तत्संबंधीचे भिजत घोंगडे याबद्दल हिरीरीने नानासाहेबच पुढे झाले होते. त्या गुंतागुंती सोडविण्याकरता नानासाहेब नाहीत ही चूक नानासाहेबांची की ते आम्हा रहिवाश्यांचे दुर्दैव ? भारतीय राजकारणाने मारले अन् पावसाने झोडपले तर तक्रार तरी कुणाकडे करायची ?

जुन्या संकेतांना मोडायचे हा तर नानासाहेबांचा बाणा होता. इंडिया हाऊसमध्ये जसे अनेकजण भेटले त्याप्रमाणे नाईन केपीजीमध्येही सर्वांना प्रवेश मिळू लागला. नऊ क्रमांकाचे केन्सिंग्टन पॅलेस गार्डन्स या राजपथावरील हायकमिशनरांचे घर म्हणजे इंग्लिश माणसाच्या किल्ल्यापेक्षाही अधिक बंद पूर्वी असायचे. उच्चभ्रूंना पार्ट्या देण्याकरताच त्याची भव्य लोखंडी दारे करकरायची. या रूढीला धक्का लावून अनेकांची पायधूळ वेळोवेळी तिथे लागली. नानासाहेबांची काळजी घेणाऱ्या इंडिया हाऊसमधील अधिकाऱ्यांनी याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली.

तिथला फोन म्हणजे केवढा गुप्त आकडा. तोही अनेकांच्या मुखोद्गत झाला. वेळीअवेळी नानासाहेबांना गाठण्यासाठी तो सतत वाजू लागला. सहज एकदा मंडळाचे

कार्यकर्ते जमले असता मंडळाच्या निरनिराळ्या कार्यक्रमांवर चर्चा चालली होती. खिडकीतून मागील दारच्या प्रशस्त सुंदर हिरवळीकडे पाहून नानासाहेब म्हणाले, ' तुमचे चैत्री हळदीकुंकू आमच्या लॉनवर करा ना ! ' ही सहजता सर्वांनाच जाणवली.

नाईन केपीजीवर गाण्याचे कितीतरी कार्यक्रम झाले. नुसते झाले नाही तर चांगलेच रंगले. त्या गाण्यांना पुष्कळशी मनापासून दाद देणारी दर्दी ' कानसेन ' मंडळी आमंत्रित केलेली असायची. अपवादाला पुतळ्यासारखी स्वस्थ बसणारी माणसे असायची, नाही असे नाही. तिथल्या गाण्यांच्या मेळाव्यात भैरवीनंतर आणखी एक आकर्षण असायचे. आणि ते म्हणजे नानासाहेबांचे उत्स्फूर्त भाषण. अतिशय अनलंकृत भाषेत त्यांचे रसाळ भाषण व्हायचे. त्यात राजकीय नेत्याचा आवेश नसायचा, ओघही नसायचा. परंतु तरीही ते अकृत्रिम भाषेतले बोलणे ऐकत राहावेसे वाटे.

गाण्यावरचा त्यांचा अभिप्राय महत्त्वाचा असायचा. उगीच फुकट स्तुती न करता परंतु गायक दुखविला जाणार नाही अशा शब्दांत ते मोजकेच असे परिशीलन करायचे. एका गायिकेच्या कार्यक्रमाला जाऊन आल्यावर गप्पा मारताना त्यांना तिच्या गाण्याबद्दल प्रश्न विचारला असता ते म्हणाले, ' टच नाही झालं हो ! ' गाणे ऐकल्यावर आत कुठेतरी गलबलल्यासारखं व्हायला हवं असं ते नेहमी म्हणायचे.

जी गोष्ट गाण्याची तीच नाटकाची. मंडळाची सगळीच नाटके त्यांनी पाह्यली. त्यांतल्या छोट्या कलावंतांचे कौतुक केले. ते आले आणि महिन्यातच ' रायगडला जेव्हा जाग येते ' हे नाटक होते. किल्ल्यातील पायऱ्या उतरून येणाऱ्या संभाजीच्या पाठीवरला छोटा राजाराम त्यांना त्या प्रसंगी एकदम स्पर्श करून गेला. ती आठवण पुढेही ते सांगत.

नाईन-केपीजीवर परिसंवाद झाले. ७९ च्या प्रारंभी नानासाहेब भारतात परत जाऊन आले. त्यांनी तिथे उदंड पाह्यले. औरंगाबादला हरिजनांवर झालेले अत्याचार पाहून त्यांनी तिथे मुद्दाम दौरा केला. जनता पक्षाच्या सरकारने काय प्रगती केली याचे समालोचन केले. या त्यांच्या सर्व अनुभवांवर चर्चा झाली.

पुढे एसएम जोशी आले. त्यांना भेटायला म्हणूनही नानासाहेबांनी घरीच बैठक बोलावली. सगळ्या चर्चांच्या प्रसंगी प्रसंगांचं औचित्य असलेली निवडक डोकी असायची. क्वचित कुठे नीरस वागणारी मंडळी जांभया देत मागे बसायची. आम्हीही नानासाहेबांकडे चर्चेला गेलो होतो एवढेच त्यांच्या दप्तरी त्यांना हवं असायचं.

या सर्व प्रसंगी सर्व प्रकारचे लोक जमायचे. नानासाहेब स्वतः प्रजासमाजवादी. पण आमंत्रितांत संघाचे स्वयंसेवक असायचे. भिन्न जातींचे आणि धर्मांचे लोक असायचे. खरे म्हणजे नानासाहेबांनी ' सोशॅलिस्ट ' हे केवळ एका पक्षाचे नाव नसून तो एक स्वतःच्या जीवनात बाणविण्याचा गुण आहे हे स्वतः सप्रयोग सिद्ध केले.

आणि त्यामुळेच सर्व प्रकारचे लोक त्यांच्यापर्यंत जाऊन पोहोचले.

नानासाहेबांनी वर्णाश्रम परिषदेमध्ये जाऊन वर्णाश्रमपद्धतीविरुद्ध आपले मत दिले. एखाद्याच्या घरी पूजेच्या निमित्त जाऊन देवावर नसलेला आपला विश्वास बोलून दाखविला. पण आपल्याला पसंत नसलेल्या पंथांकडे आपल्या विचारसरणीला विरोधी असलेल्या संस्थांकडे जाण्याचे मात्र टाळले नाही. त्यामुळे सर्वांनाच ते हवेहवेसे वाटले. भारतात केलेला अथक प्रवासाचा क्रम इथेही त्यांनी चालू ठेवला.

आज एका योगायोगाची गंमत वाटते. भारतात एस्टीसारख्या वाहनाने प्रवास करणाऱ्या नानासाहेबांना इथे डेमलरमधून हिंडून खूपच सुख मिळाले असणार. पण त्याचाही त्यांना कंटाळा आला. मुक्तपणे हिंडणे या गोष्टीला हायकमिशनर या पदामुळे बाध आला. प्रोटोकॉलची सवय करून घ्यावी लागली, इच्छा नसताना ! तीही गोष्ट त्यांनी सहन केली.

प्रथम वर्षभर, असंतोषी आनंदमार्गींच्या घातपाती कृत्यामुळे त्यांना सतत स्कॉटलंड यार्डच्या रक्षकांच्या सावलीतून चालावे लागले. पण म्हणून प्रवास थांबविला नाही. एकेका कार्यक्रमाकरता स्कॉटलंडमध्ये एडिंबरा किंवा आयर्लंडमध्ये बेलफास्टला जाणे झाले. बोलावले आहे ना मग न जाऊन कसे चालेल ? त्यांचेही समजून घेतले पाह्यजे ही त्यांची वृत्ती होती.

या सर्व उलाढालीत नानासाहेबांना आधार असा काय जो वाटला असेल तो मराठी मंडळींचा. मराठी मंडळींनी त्यांच्यावर फारच लोभ केला. घरच्यासारखी मंडळी त्यांच्याकडे जात येत राह्यली व तेही छोट्यामोठ्या लोकांत रमले. कुणाच्या बागेतल्या फळझाडापासून, कुणाला झालेल्या छोट्याशा आजारापर्यंत त्यांची बारीकसारीक विचारपूस असायची. त्यांच्या घरी एकेका प्रसंगी दीडशे दोनशे लोकांकरता अन्न शिजायचे. त्यांच्याकरता जो आचारी भारतातून यायचा होता तो मात्र आता नानासाहेबांचे परतण्याचे ठरले तेव्हा आला !

आत्मचरित्र हा इतिहासाचा केवढा मोठा आधार. नानासाहेबांच्या पन्नाससाठ वर्षांच्या राजकीय उलाढालीत, सामाजिक सेवेत, व कलात्मक आयुष्याच्या पटावर अनेक घडामोडी, चढउतार झाले असणार. आणि त्यांचा पिंड तर लेखकाचा. तेव्हा ते सगळे त्यांनी मुद्रित करून ठेवले तर बरे या विचाराने त्यांना आत्मचरित्राबद्दल विचारले. पण त्याबद्दल त्यांचा आज घटकेला तरी विरोधच दिसला.

आत्मचरित्रातील विधानांबद्दल संबंधित मंडळी वेगळाच अर्थ काढू शकतात व मग नसता घोळ होतो या भीतीने त्यांनी ते न लिहिण्याचा आपला मनोदय सांगितला. या निर्णयामुळे खरोखरच वाईट वाटले. त्यांची लंडन कारकीर्द, तिथे आलेले अनुभव, भेटलेल्या भिन्न भिन्न व्यक्ती, पाह्यलेले जग हे सर्व नमूद व्हावे अशी इच्छा होती. न जाणो भविष्यात नानासाहेब मत बदलतील व सगळे वृत्त ( वेळ मिळाला तर ) लिहितीलही.

रिक्त हस्ताने नानासाहेब खरोखरच जात आहेत ही सत्य गोष्ट. एवढी संगीताची आवड आहे तर एखादा टेपरेकॉर्डर-म्युझिकसेंटर तरी घ्या ना, असा राधाने आग्रह केला. पण तोही त्यांनी मोडून काढला. एका संस्थेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना एक भिंतीवर लावायचे घड्याळ भेट म्हणून दिले. तेही त्यांनी महाराष्ट्रातील गरजू संस्थेला देण्याचा आपला मनसुबा भेट स्वीकारतानाच जाहीर केला.

परत जाताना नानासाहेब पैसे भरून महाराष्ट्र मंडळाचे आजीव सभासद झाले. अगदी शेवटी शेवटी एक गाण्याचा कार्यक्रम त्यांच्या घरी झाला. त्या वेळी मराठी लोकांनी अचानक पैसे गोळा करून ते नानासाहेबांना दिले. सुमतीबाई गोऱ्यांच्या स्मृतीनिमित्त काढलेल्या नाशिकच्या आदिवासींच्या मुलींच्या वसतिगृहासाठी ते पैसे होते.

आज नानासाहेब गोरे परत गेले आहेत. लंडनला सरकारी नोकरीत असताना स्वपक्षहिताकरिता तडकाफडकी दिल्लीला जाण्यात केलेल्या त्यांच्या तांत्रिक चुकीबद्दल तिकडे त्यांच्यावर प्रखर टीका झाली. प्रत्यक्षात त्या कृत्यामुळे काही विपरीत परिणाम झाले का यावर कुणी विचार केला की नाही ठाऊक नाही. स्वतःच्या कृष्णशिष्टाईचा उपयोग न होऊन विफल भावनेने लंडनला परतल्यावर त्यांना ज्या व्यथा झाल्या असतील त्या त्यांच्या निकटवर्तीयांनाच ठाऊक असणार.

पुष्कळ वर्षे ज्यांनी खांद्याला खांदा लावून कार्य केले, सहकार्य दिले त्या ' सार्थी ' नी असे वर्तन का करावे ते कळत नाही, यावर ते मधून मधून उद्वेगाने बोलतही. जनता पक्षाच्या विजयानंतरच्या राजघाटावरच्या गांधींच्या समाधीसमोरच्या शपथांचा फोलपणा त्यांना राहून राहून आठवला आणि खेदाचे हसू आले. मोगल साम्राज्यात झाली नाही इतकी अधिकारासाठीची सुंदोपसुंदी त्यांनी पाहिली व स्वतपाचे फळ असे दिसताच मनातल्या मनात टाहो फोडला.

नंतर सरकार बदलताच नोकरीचा राजीनामा देऊन आपले भारताला जाण्याचे प्रस्थान ठेवल्यावर एकदोन भाषणांत त्यांनी सर्व मनमोकळेपणाने सांगितले. ते म्हणाले, " मला इथे आता बिलकूल राहायचे नाही. हे पद सोडताना मला यत्किंचितही दुःख होत नाही. आता जितक्या लवकर मी तिकडे पोहोचेन तितके हवे आहे. पूर्वी कुणी हायकमिशनर आपली खुर्ची सोडताना येथला मुक्काम जितका लांबविता येईल तितका लांबवीत. मग कुठलेही कारण त्यांना चाले. कुणी राणीची भेट घेतल्याखेरीज जाता येत नाही या संकेतानुसार ती अवघड भेट मिळेपर्यंत लंडनला थांबून राहात. मी मात्र स्वेच्छेने परत जात आहे. कुणी जा म्हणून सांगायच्या आत जात आहे. सध्याच्या सरकारशी माझे मतभेद आहेत. त्यामुळे इथे राहण्यात मला स्वारस्य वाटत नाही ! "

या बाबतीत इतकेच म्हणता येईल की, शेवटी त्यांनी बाणेदारपणे तत्त्वनिष्ठेकरता 'आराधनाय लोकानां मुञ्चतो नास्ति मे व्यथा' असेच प्रतिपादन केले ! आपले

बाजपायी, दंडवते वगैरे मित्र अधिकाराच्या जागेवरून दूर झाले आहेत अशा वेळी आपण लंडनला हायकमिशनरचे पद भूषवावे हे गैर आहे हीच त्यांची भावना होती व ती त्यांनी जाहीर प्रगट केली.

नानासाहेबांची भारताला जाण्यासंबंधात तुलना काहीशी सावरकरांशी होऊ शकते. १९१० मध्ये पॅरिसला प्रकृतिस्वास्थ्याकरता विश्रांती घेत असता सावरकरांना भारतात आपले एकेक मित्र पकडले गेल्याच्या बातम्या कळल्या, आणि अस्वस्थ होऊन भारतास परतण्यासाठी ते लंडनला गेले.

नानासाहेब गोरे नेमके हेच करीत होते. नाहीतर त्यांनी कधीतरी भाषणात सांगितलेल्या कालिदासाच्या एका श्लोकातील घटनेची पुनरावृत्ती इथे झाली नसती. एका बाजूला लंडन वास्तव्यात रम्य गोष्टी बघण्याचं आणि मधुर संगीत ऐकण्याचं भाग्य त्यांना लाभले असतानाच प्रत्यक्षात मात्र आतल्या आत नकळत ते ' पर्युत्सुक ' झाले, मनामध्ये कुठेतरी गलबलले गेले यांत शंका नाही !

दुष्यन्ताची हंसपदिका नावाची पत्नी एक सुरेल गाणे म्हणते आहे. आणि त्या सुखाच्या प्रसंगी दुष्यन्त मात्र कावराबावरा होतो आहे व म्हणतोय....

*' रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्*
*पर्युत्सुका भवति यत्र सुखानोऽपि जन्तुः*
*तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वं*
*भावस्थिराणि जननान्तर सौहृदानि। '*

नानासाहेबांना भेट दिलेल्या एका चित्राच्या पाठीमागे लिहिले होते- ' कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही ! ' त्या काव्यपंक्तीचा भावार्थ जरूर ठाऊक होता पण शब्दार्थ लागत नव्हता. तो त्यांनाच विचारला. त्यांनी लगेच कृष्णेकाठच्या कुंडल नावाच्या गावाबद्दल लिहिलेली गडकऱ्यांची कविता आणि वर्डस्वर्थच्या ' यारो रीव्हिजिटेड ' या कवितेवरून गडकऱ्यांना सुचलेली ती कल्पना व गैरे व गैरे सांगितले.

लंडनमध्ये वडीलधारे माणूस आम्हा तरुणांना पूर्वी कुणी नव्हते. मराठी भाषा आणि मराठी मन जाणणारे नारायण गणेश गोरे नावाचे गृहस्थ इथे बावीस महिने राहून ती उणीव भरून काढीत होते !....

थेम्स वाहती राहील, पण तिच्या तीरावरील लंडन या ऐतिहासिक नगरीत ' ती ' मजा आता पुन्हा येणार नाही !...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3988
दा. क्र. 25963
नोंद 21911/98
शाखा

REFBK-0025163

आठवणींच्या दूर्वांचा लक्ष    पैंजण

काठोकाठ भरू द्या पेला    सोबत ३ मे ७०

पिकासोपेक्षा लेननची चित्रे अश्लील !    सोबत १९ एप्रिल ७०

'जितम् मया जितं मया'    सकाळ २० ऑगस्ट ६६

दुर्दम्य आशावादी    सोबत १० मे ७०

पंगुं लंघयते गिरिम्    महाराष्ट्र टाईम्स २ जानेवारी ७२

जेव्हा पाण्याला आग लागते !    विवेक एप्रिल ६७

टेस्ट ट्यूब बेबी    सोबत ५ एप्रिल ७०

पॉवेल साहेबांचा उद्योग    सोबत ८ मार्च ७०

गृहिणींनी हीथना निवडले !    सोबत १९ जुलै ७०

'थंड' निवडणूक    सकाळ ३१ मार्च ६६ आणि सोबत ७ जून ७०

'काळ्यां'चा प्रश्न    सोबत १२ एप्रिल ७०

'त्रिशंकू'- रंजन वेद    सोबत १५ मार्च ७०

कुंचला लढ्याचे चित्र रेखाटतो    महाराष्ट्र टाईम्स

वादळ 'कौमार्य चाचणी'चे !    महाराष्ट्र टाईम्स ४ मार्च ७९

नयी जिंदगी नया जीवन    महाराष्ट्र टाईम्स १९ मे ७४

बहुरूपी हायकमिशनर    पैंजण

गोवा मुक्तिवीर    सोबत २३ ऑगस्ट ७०

डोळस अंध    महाराष्ट्र टाईम्स

पुण्याचा मांसाहारी ब्राह्मण    साप्ताहिक मनोहर-सप्टें. ६२

इंदिराजी लंडनमध्ये !    साप्ताहिक मनोहर ३ डिसेंबर ७८

कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही !    लोकसत्ता २५ ऑगस्ट ७९

■

REFBK-0025163

आठवणींच्या दूर्वांचा लक्ष    पैंजण

काठोकाठ भरू द्या पेला    सोबत ३ मे ७०

पिकासोपेक्षा लेननची चित्रे अश्लील !    सोबत १९ एप्रिल ७०

'जितम् मया जितं मया'    सकाळ २० ऑगस्ट ६६

दुर्दम्य आशावादी    सोबत १० मे ७०

पंगुं लंघयते गिरिम्    महाराष्ट्र टाईम्स २ जानेवारी ७२

जेव्हा पाण्याला आग लागते !    विवेक एप्रिल ६७

टेस्ट ट्यूब बेबी    सोबत ५ एप्रिल ७०

पॉवेल साहेबांचा उद्योग    सोबत ८ मार्च ७०

गृहिणींनी हीथना निवडले !    सोबत १९ जुलै ७०

'थंड' निवडणूक    सकाळ ३१ मार्च ६६ आणि सोबत ७ जून ७०

'काळ्यां'चा प्रश्न    सोबत १२ एप्रिल ७०

'त्रिशंकू'- रंजन वेद    सोबत १५ मार्च ७०

कुंचला लढ्याचे चित्र रेखाटतो    महाराष्ट्र टाईम्स

वादळ 'कौमार्य चाचणी'चे !    महाराष्ट्र टाईम्स ४ मार्च ७९

नयी जिंदगी नया जीवन    महाराष्ट्र टाईम्स १९ मे ७४

बहुरूपी हायकमिशनर    पैंजण

गोवा मुक्तिवीर    सोबत २३ ऑगस्ट ७०

डोळस अंध    महाराष्ट्र टाईम्स

पुण्याचा मांसाहारी ब्राह्मण    साप्ताहिक मनोहर-सप्टें. ६२

इंदिराजी लंडनमध्ये !    साप्ताहिक मनोहर ३ डिसेंबर ७८

कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही !    लोकसत्ता २५ ऑगस्ट ७९

■

